म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

आणि



म. ग्रं. ठाणें
विषय
अ. नं.

REFBK-0006986

बरे येतो

ले. श्री. शा. हणमंते

# ग्रंथप्रकाशन

( दि. २७।२।४९ )

या पुस्तकाचे प्रकाशन सर परशुरामभाऊ कॉलेजच्या लेडी रमाबाई हॉलमध्यें

**डॉ. बाबासाहेब जयकर, कुलगुरु, पुणें विद्यापीठ,**

यांचे हस्ते झाले. त्याप्रसंगी अध्यक्षांनीं पुस्तकांतील एकदोन वेंचे वाचून दाखवून पुस्तक उपयुक्त असल्याचे सांगितले. लेखक मध्यम स्थितीतील असूनहि त्यांनी रु १००१ ची पुणें विद्यापीठास देणगी दिल्याबद्दल कुलगुरुंनी प्रशंसोद्गार काढले. सदरहू देणगी पुस्तकाच्या विक्रीतून आगाऊ दिली आहे

# व्यवहार आणि शिष्टाचार

लेखक

श्रीधर शामराव हणमंते
'वाटेचा सोबती', 'भारतवर्ष', 'रघुनाथ नारायण हणमंते यांचें चरित्र इ. पुस्तकांचे कर्ते

REFBK-0006986

[आवृत्ति दुसरी]

१२ डिसेंबर १९४८ ] [ मूल्य तीन रुपये

"व्यवहारानुरूपोधर्मः।"

(धर्म हा व्यवहाराला धरून असला पाहिज.)

—चाणक्य सूत्रें.

# अर्पण पत्रिका

भारतीय आर्यसंस्कृतीचे प्रतीक असणारे
सदाचार, प्रतिकूल परिस्थितींतहि
पाळण्याचें मनोधैर्य दाखवून
सद्धर्माचरणी हिंदु समाजाची
परंपरा अखंड टिकवि-
णाऱ्या सर्व सज्जनांना
हा ग्रंथ सादर
अर्पण करीत
आहे.

श्री. शा. हणमंते


प्रकाशक :
श्रीधर शामराव हणमंते
रिटायर्ड स्टेशन मास्तर,
गोगटे बंगला, सोलापूर.

मुद्रक :
ज. वा. भावे,
"मौक्तिक मुद्रणालय",
२०१ सदाशिव पेठ, पुणें २.

# अनुक्रमणिका


| क्र. | प्रकरणाचें नांव | पृष्ठ | क्र. | प्रकरणाचें नांव | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| | दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना | | १५ | नीती अनीती | ११३ |
| | सुहृद् प्रस्ताव [श्री. चि. ग. कर्वे] | | १६ | स्त्रियांशी वर्तन | १२० |
| | लेखकाचें मनोगत | | १७ | स्त्रीशालीनता | १२५ |
| १ | दिनचर्या | १ | १८ | स्वावलंबन | १३० |
| २ | स्वच्छता | ९ | १९ | चाल-चालणूक | १३३ |
| ३ | भोजनव्यवहार | १९ | २० | सर्वसाधारण राहणी | १३८ |
| ४ | पोषाख | ३४ | २१ | वाचन-लेखन | १४५ |
| ५ | संभाषणप्रसंग | ४२ | २२ | आदरसत्कार | १५२ |
| ६ | वेळेचा सदुपयोग | ५० | २३ | बाजारहाट | १५९ |
| ७ | परस्पर-व्यवहार | ५६ | २४ | दानधर्म | १६३ |
| ८ | शेजारधर्म | ६७ | २५ | सत्संगति | १६८ |
| ९ | पुरुषप्रयत्न | ७१ | २६ | तीर्थयात्रा व प्रवास | १७२ |
| १० | कर्तव्यपालन | ७८ | २७ | पत्रव्यवहार | १७९ |
| ११ | व्यवहारचातुर्य | ८३ | २८ | पैसा | १८३ |
| १२ | धार्मिक व्यवहार | ९१ | २९ | शिस्त | १८९ |
| १३ | कौटुंबिक व्यवहार | ९७ | ३० | पशू आणि वनस्पती. | १९४ |
| १४ | सामाजिक व्यवहार | १०६ | ३१ | अंत्य संस्कार | १९८ |



श्रीधर शामराव हणमंते

# पुनर्भेट

" शास्त्राभावे शिष्टाचारमनुगच्छेत् "
शास्त्रवचन नसेल तेथें शिष्टाचाराप्रमाणे वागावें.

—चाणक्यसूत्रें

शके १८६२ मध्यें हे पुस्तक प्रथम प्रसिद्ध केलें. त्यास आज सुमारे ८ वर्षे झालीं. पुस्तकास साहित्यसम्राट कै. तात्यासाहेब केळकर, रामदासी वाङमयाचे एकनिष्ठ उपासक धुळयाचे श्री. शं. श्री. देव इ. थोर विद्वानांकडून तसेंच केसरी, महाराष्ट्र इ. पत्रांकडून जरूर तितकें रसग्रहण व प्रोत्साहन मिळाल्यामुळे पहिली आवृत्ति २।३ वर्षातच संपून गेली. युद्धजन्य परिस्थितीमुळें दुसऱ्या आवृत्तीचें काम लांबणीवर टाकणें भाग पडलें. तथापि अनेक सहृदय वाचकांकडून एकप्रकारचा आपुलकीचा आग्रह व प्रोत्साहन मिळाल्यामुळें ही दुसरी आवृत्ति प्रसिद्ध करण्याचें धाडस करीत आहे.

व्यवहार आणि शिष्टाचार यांचे सापेक्ष महत्व चिरंतनचे आहे. वेदांत मूळ धर्म सांगितला तो पहिला; स्मृतींत सांगितला तो दुसरा; आणि तदनंतर शिष्टांचा आचार हा तिसरा धर्मच होय असें स्मृतिवचन आहे.

" तैहि शिष्टैश्चरितो धर्म : सम्यगेव युगे युगे "

वायु पुराण—अ. ५९

ते शिष्ट जो धर्म आचरितात तोच त्यांच्या त्यांच्या युगांत उत्तम धर्म होय.

"धर्म हा देखील व्यवहाराला धरून असला पाहिजे" याचाच अर्थ धर्माला देखील व्यवहार डावलून चालत नाही. याचें प्रसिद्ध उदाहरण म्हणजे कन्या सगोत्राची असेल तर तिला परगोत्रांत दत्तक देऊन तिच्याशीं विवाह करतां येतो हें धर्मशास्त्र मानतें. इतकें शिष्टाचाराचें महत्व मानलें गेलें आहे. एवढेंच नव्हे तर १४ विद्या आणि ६४ कला यांत शिष्टाचाराचाहि अंतर्भाव केला आहे.

" वैनायिकीनां विद्यानांच ज्ञानम् । "
(विविध शिष्टाचारांचे ज्ञान.) —पुरुषार्थ

ही ६० वी विद्या आहे असें म्हटले आहे.

मनुष्य हा समाज करून राहूं लागला व सुसंस्कृत व प्रगत होत गेला तसतसे त्या त्या काळीं मान्य असें शिष्टाचार उत्पन्न होत गेले व होतात. कालातरानें फरक होतात ही गोष्ट निराळी. बदल होणें हा सृष्टीचा धर्म आहे. असे हे शिष्टाचार प्राचीन वाङ्मयांतहि आढळतात. ब्रह्मतत्त्वांचें संशोधन करणाऱ्या सप्तऋषींनीं भगवान पिप्पलाद मुनीकडे जातांना भेटी-दाखल समिधा घेतल्या होत्या असें प्रश्नोपनिषदांत म्हटलें आहे. ज्याचे भेटीस जावयाचें त्यास संतोष होईल अशी वस्तू उपायन अथवा भेट म्हणून अर्पण करणें या शिष्टाचारांत अधिक औचित्य आहे. लहान मोठा कोणी कोणाकडे भेटीस गेला तरी रिक्त हस्तानें जाऊं नये असें शास्त्रच आहे. परिस्थितीला मात्र शास्त्र कधींच आडवें येत नाही. सुदाम्यानें श्रीकृष्णाकडे जातांना मूठभर पोहेच नेले होते ही पौराणिक कथा प्रसिद्धच आहे. आजहि सामान्य मनुष्यदेखील थोडा खाऊ वगैरे नेतो आणि न्यावा हे शिष्टाचाराचे नवें स्वरूप इतकेंच.

व्यवहारांत, आचारविचारांत कालांतरानें फरक होणें हें स्वाभाविक असलें तरी तो विवेकानें व्हावा यांतच समाजाचा अभ्युदय आहे. केवळ पाश्चात्यांचें अंधानुकरण आतां भारत स्वतंत्र झाल्यावर तरी सर्वस्वी त्याज्य एवढेंच नव्हे तर संस्कृतीला विघातक आहे. यापुढें भारतीय संस्कृतीला व परंपरेला पोषक असेंच सर्व विधीविधान तसेच शिष्टाचार समाजांतील शिष्टांनीं रूढविले पाहिजेत. श्रेष्ठ माणसें जशीं वागतात त्याचेंच अनुकरण प्रायः इतर माणसें करतात म्हणून जुने चांगले असलेले आचार दक्षतेनें जतन करणें व नवे येणारे आचार पारखून घेणें यांचें उत्तरदायित्व अशा शिष्टांकडेच येतें.

संस्कृति या शब्दाचा आजकाल फार बाऊ वाटतो. संस्कृति या शब्दांत जुनेपणाचा वास येतो म्हणून कित्येकास कसेसेंच होतें. वास्तविक "खासगी आचार विचार, आहार विहार, समाजांतील घटकांचे परस्पर संबंध, समाजरचना, सामाजिक ध्येये, कुटुंबव्यवस्था व गृहजीवन पद्धति, आवडी निवडी या सर्व गोष्टींचें समुच्चय रूपी नांव म्हणजेच संस्कृति." (जानपद आणि अतिमानव—देशमुखकृत) इतका संस्कृति या शब्दाचा

खोल अर्थ आहे. अशा रीतीनें परंपरागत प्राप्त झालेलें विचारधन म्हणजे त्या त्या समाजाची संस्कृति.

संस्कृतीची खरी कसोटी केवळ संख्या नाहीं, शहरांचा आकार नाहीं, तेथील पिकेंहि नाहींत पण त्यांतील माणसे कशाप्रकारचीं आहेत हीच होय असें इमर्सन म्हणतो त्यांतले इंगित तरी हेच.

शिष्टाचार याचा अर्थ परस्पराशीं पाळण्याच्या रीतीभाती होत. व्यवहार जाणणाऱ्या व नव्या मनुष्याच्या बुद्धीनें प्रतिक्षणीं नवी रीतभात होते असे शुक्रनीतींत सांगितलें आहे. अशा जुन्या नव्या रीतीभाती अथवा शिष्टाचार यांचे साकल्यानें ज्ञान असणें सुसंस्कृत समाजाला आवश्यक असतें.

"एका वर्षांत फळ हवें असेल तर धान्य पेर, दहा वर्षांत फळें हवीं असतील तर झाडें लाव आणि शंभर वर्षानंतर फळ हवें असेल तर माणसांना शिकवून तयार कर."

अ. भा. विज्ञान परिषदेचे अध्यक्ष सर मॉरिस ग्वायर १९४७.

मनुष्याला सुसंस्कृत करण्यास अशी नित्याचीच शिकवण लागते.

त्या त्या कालाचे शिष्टाचार सज्जनांनी मानलेच पाहिजेत असा दंडक प्राचीन काळापासून आहे. पांडवकालीं द्यूताचें आमंत्रण स्वीकारणें हा शिष्टाचार होता म्हणून धर्मराजानें तें स्वीकारलें असें महाभारत सांगतें. आजहि सुवासिनींचें आमंत्रण स्वीकारणें, पाहुण्यास बोलपट पाहण्यांस घेऊन जाणे असें कांहीं व्यक्तिगत आणि युद्धकालांत एकमेकांच्या नरडीचा घोट घ्यावयास निघालेले शत्रुपक्ष यांना देखील बंदिजनांची देवाण घेवाण तसे अयुद्धमान नागरिकास उपसर्ग न होऊं देणे वगैरे सामुदायिक शिष्टाचार पाळावे लागतातच. एवंच शिष्टाचारांचे असें हें महत्व चिरंतनचें आहे.

व्यवहार शास्त्र हें समन्वय शास्त्र आहे. एकांगी नाहीं. पडेल तेथे व्यवहार शास्त्र आपला मार्ग काढतें. निरनिराळ्या धर्मांत, समाजांत, पंथांत, त्यांच्या धर्म तत्वांत, पद्धतीत, रीतीरिवाजांत कितीहि भेद असले

मनुष्य हा समाज करून राहूं लागला व सुसंस्कृत व प्रगत होत गेला तसतसे त्या त्या काळीं मान्य असें शिष्टाचार उत्पन्न होत गेले व होतात. कालांतरानें फरक होतात ही गोष्ट निराळी. बदल होणें हा सृष्टीचा धर्म आहे. असे हे शिष्टाचार प्राचीन वाङ्मयांतहि आढळतात. ब्रह्मतत्त्वांचें संशोधन करणाऱ्या सप्तऋषींनीं भगवान पिप्पलाद मुनीकडे जातांना भेटी-दाखल समिधा घेतल्या होत्या असें प्रश्नोपनिषदांत म्हटलें आहे. ज्याचे भेटीस जावयाचें त्यास संतोष होईल अशी वस्तू उपायन अथवा भेट म्हणून अर्पण करणें या शिष्टाचारांत अधिक औचित्य आहे. लहान मोठा कोणी कोणाकडे भेटीस गेला तरी रिक्त हस्तानें जाऊं नये असें शास्त्रच आहे. परिस्थितीला मात्र शास्त्र कधींच आडवें येत नाही. सुदाम्यानें श्रीकृष्णाकडे जातांना मूठभर पोहेच नेले होते ही पौराणिक कथा प्रसिद्धच आहे. आजहि सामान्य मनुष्यदेखील थोडा खाऊ वगैरे नेतो आणि न्यावा हे शिष्टाचाराचे नवें स्वरूप इतकेंच.

व्यवहारांत, आचारविचारांत कालांतरानें फरक होणें हें स्वाभाविक असलें तरी तो विवेकानें व्हावा यांतच समाजाचा अभ्युदय आहे. केवळ पाश्चात्यांचें अंधानुकरण आतां भारत स्वतंत्र झाल्यावर तरी सर्वस्वी त्याज्य एवढेंच नव्हे तर संस्कृतीला विघातक आहे. यापुढें भारतीय संस्कृतीला व परंपरेला पोषक असेंच सर्व विधीविधान तसेच शिष्टाचार समाजांतील शिष्टांनीं रूढविले पाहिजेत. श्रेष्ठ माणसें जशीं वागतात त्याचेंच अनुकरण प्रायः इतर माणसें करतात म्हणून जुने चांगले असलेले आचार दक्षतेनें जतन करणें व नवे येणारे आचार पारखून घेणें यांचें उत्तरदायित्व अशा शिष्टांकडेच येतें.

संस्कृति या शब्दाचा आजकाल फार बाऊ वाटतो. संस्कृति या शब्दांत जुनेपणाचा वास येतो म्हणून कित्येकास कसेसेंच होतें. वास्तविक "खासगी आचार विचार, आहार विहार, समाजांतील घटकांचे परस्पर संबंध, समाजरचना, सामाजिक ध्येयें, कुटुंबव्यवस्था व गृहजीवन पद्धति, आवडी निवडी या सर्व गोष्टींचें समुच्चय रूपी नांव म्हणजेच संस्कृति." (जानपद आणि अतिमानव—देशमुखकृत) इतका संस्कृति या शब्दाचा

खोल अर्थ आहे. अशा रीतीनें परंपरागत प्राप्त झालेलें विचारधन म्हणजे त्या त्या समाजाची संस्कृति.

संस्कृतीची खरी कसोटी केवळ संख्या नाहीं, शहरांचा आकार नाहीं, तेथील पिकेंहि नाहींत पण त्यांतील माणसे कशाप्रकारचीं आहेत हीच होय असें इमर्सन म्हणतो त्यांतले इंगित तरी हेच.

शिष्टाचार याचा अर्थ परस्पराशीं पाळण्याच्या रीतीभाती होत. व्यवहार जाणणाऱ्या व नव्या मनुष्याच्या बुद्धीनें प्रतिक्षणीं नवी रीतभात होते असे शुक्रनीतींत सांगितलें आहे. अशा जुन्या नव्या रीतीभाती अथवा शिष्टाचार यांचे साकल्यानें ज्ञान असणें सुसंस्कृत समाजाला आवश्यक असतें.

" एका वर्षांत फळ हवें असेल तर धान्य पेर, दहा वर्षांत फळें हवीं असतील तर झाडें लाव आणि शंभर वर्षानंतर फळ हवें असेल तर माणसांना शिकवून तयार कर. "

अ. भा. विज्ञान परिषदेचे अध्यक्ष सर मॉरिस ग्वायर १९४७.

मनुष्याला सुसंस्कृत करण्यास अशी नित्याचीच शिकवण लागते.

त्या त्या कालाचे शिष्टाचार सज्जनांनी मानलेच पाहिजेत असा दंडक प्राचीन काळापासून आहे. पांडवकालीं द्यूताचें आमंत्रण स्वीकारणें हा शिष्टाचार होता म्हणून धर्मराजानें तें स्वीकारलें असें महाभारत सांगतें. आजहि सुवासिनींचें आमंत्रण स्वीकारणें, पाहुण्यास बोलपट पाहण्यांस घेऊन जाणे असें कांहीं व्यक्तिगत आणि युद्धकालांत एकमेकांच्या नरडीचा घोट घ्यावयास निघालेले शत्रुपक्ष यांना देखील बंदिजनांची देवाण घेवाण तसे अयुद्धमान नागरिकास उपसर्ग न होऊं देणे वगैरे सामुदायिक शिष्टाचार पाळावे लागतातच. एवंच शिष्टाचारांचे असें हें महत्व चिरंतनचें आहे.

व्यवहार शास्त्र हें समन्वय शास्त्र आहे. एकांगी नाहीं. पडेल तेथे व्यवहार शास्त्र आपला मार्ग काढतें. निरनिराळ्या धर्मांत, समाजांत, पंथांत, त्यांच्या धर्म तत्वांत, पद्धतीत, रीतीरिवाजांत कितीहि भेद असले

तरी त्यांत व्यवहारशास्त्र एकवाक्यता आणतें व एकमेकाशी असहिष्णुतेचा त्याग करण्यास शिकवितें. मनुष्य अति घाईंत असला तरी "थोडे थांबाल तर बरें होईल" असें म्हटल्यावर दुसरा क्षणभरच कां होईना थांबेल. उभयपक्षीं समाधान हाच व्यवहाराचा समन्वय. "स्फुट, त्रोटक व ठाशीव रीतीनें उपदेशिलेल्या या सूत्रवचनांचा लहानांनाच काय पण थोरांनाहि उपयोग आहे." असा अत्यंत समर्पक व मार्मिक अभिप्राय देऊन ज्यांनी या पुस्तकास गौरविले ते सा. स. तात्यासाहेब केळकर यांचे पूज्य स्मृतीस या द्वितीय आवृत्तीचे प्रसंगी लेखकास नम्र अभिवादन केल्याविना राहवत नाहीं. कांहीं किरकोळ वाक्यें कमी अधिक करण्याखेरीज पहिल्या आवृत्तींतील मूळ मजकुरात विशेष बदल असा फारसा केला नाहीं. पण प्रत्येक प्रकरणांत नवीन भर घातली आहे. खेरीज शेजारधर्म, कौटुंबिक व्यवहार, स्वावलंबन, बाजारहाट, पशू आणि वनस्पति व अंत्यसंस्कार ही सहा प्रकरणें आणि लोकसमजुती हें परिशिष्ट नवीन घातलें आहे.

दुसरा विशेष म्हणजे मलपृष्ठांवर व्यवहार आणि शिष्टाचार–दर्शन चित्र दिलें आहे. यांत आगमन व निर्गमन म्हणजे भेट व निरोप हे दोन प्रसंग चित्रित करण्यांत आले आहेत. ते रसिकांस आवडतील असें वाटतें.

पुस्तकास पूर्वींप्रमाणेंच याही आवृत्तींत वेळांत वेळ काढून जरूर तेथें मार्गदर्शन व इतरहि सहाय्य देऊन उपकृत केल्याबद्दल महाराष्ट्र शब्दकोशाचे संपादक रा. चिंतामण गणेश कर्वे यांचा लेखक अत्यंत ऋणी आहे.

तसेंच मौक्तिक मुद्रणालय नवीनच असलें तरी छपाईचें काम सुबक व वेळेवर करून दिल्याबद्दल मुद्रणालयाचे होतकरू चालक रा. ज. वा. भावे यांचाही मी आभारी आहे

शेवटीं ज्याच्या कृपाप्रसादानेंच हा द्वितीय आवृत्तीचा योग आला त्या श्रीशालाच वंदन करून स्थलकाल विवेक जाणून ही भेट आवरती घेतो.

सोलापूर,
मिति मार्गशीर्ष शुद्ध ११,
शके १८७० (गीताजयंति)
दि. १२ डिसेंबर १९४८.

श्रीधर शामराव हणमंते,
रिटायर्ड स्टेशन मास्तर.

नं. नं. ८६७ २५।६।२८
नं. नं. १०३८८

# सुहृद् प्रस्ताव

सुसंस्कृत समाजांत शिष्टाचाराला फार महत्त्व आहे. पाश्चात्य वाङमयांत शिष्टाचार शिकविणारीं पुस्तकें कितीतरी निघतात व खपतात. कोर्टकचेऱ्या, सभासंमेलनें, लग्नकार्ये, गांठीभेटी यांसारख्या घराबाहेरील प्रसंगीं शिष्टाचार पाळणें तर आवश्यकच असतें, पण आपल्या घरींहि तो पाळावा लागतो शिष्टाचार म्हणजेच सदाचार. प्रत्येक समाजांत शिष्ट-वर्ग असतोच व त्याची चालचलणूक आपण या वर्गांत मोडण्यासाठीं अनुसरावी लागते. या शिष्टवर्गाच्या हातांत सामान्यत: समाजशासनाची मोठी सत्ता असते व हा वर्ग उच्च संस्कृतीचें संरक्षण आणि संवर्धनहि करीत असतो.

आपल्याकडे परकीय अंमलापासून अशा स्वकीय शिष्टवर्गाला दुर्बलत्व प्राप्त झालें आहे व युरोपियन शिष्टवर्गाचे अनुयायी होण्याची अनिष्ट प्रथा पडली आहे. आपल्या समाजाच्या आचारव्यवहाराचें नियमन अधिकारी-वर्गाकडून होत नाहीं. त्यामुळें त्यांत अतिशय शैथिल्य आलेलें आहे; कोणता आचार किंवा व्यवहार हा शिष्ट म्हणावा याची पंचाईत पडूं लागली आहे. पूर्वीं आमचे आचार आणि व्यवहार धर्माशीं निगडित केलेले असल्यामुळें, आचार गेला तर धर्म गेला, जात गेली, अशी भीति वाटत असे. पण आज कसाहि आचार ठेविला तरी धर्म बिघडत नाहीं. कारण धर्माचें अधिष्ठानच अजिबात काढून घेण्याचा अप्रत्यक्ष सरकारचा आणि प्रत्यक्ष अविचारी सुधारकांचा अट्टाहास चालू आहे. आज देशांत श्रेष्ठ व अनुकरणीय वर्ग म्हणजे जेत्यांचा ! तेव्हां त्या वर्गाचे आचारव्यवहार पत्करून आपली सुसंस्कृतता हीन दाखविण्याची दास्यबुद्धि विशेषत: संपत्ति-मानांत आणि आंग्लशिक्षितांत दिसून येते, ही मोठी खेदाची गोष्ट आहे.

जणूं आमच्यांत शिष्ट नव्हतेच व शिष्टाचारहि नव्हतेच ! आज आमचें स्वतंत्र राज्य असतें किंवा आमचें स्वराज्य असतें तर आमचीच राहणी आणि आचार अनुकरणीय ठरले असते ना. मागें कोचीन, त्रावणकोर येथील सीरियन ख्रिस्ती समाजानें हिंदूंचेच आचार उचलले. महाराष्ट्रांतील जुन्या (बेने-इस्रायल) यहुद्यांनीं देखील तेंच केलें. पार्शी आणि गुजराथी समाज यांत परवांपर्यंत आचारभेद फारसे नव्हते. पण या गोष्टी स्वराज्यांत होऊं शकल्या. त्या वेळीं हिंदुसमाज बलिष्ठ होता.

व्यवहार आणि शिष्टाचार कालमानानें बदलत असतात व ते बदलावेतहि. ऋषिकालीन परिस्थिति गेली, तीबरोबर यज्ञयागहि गेले व गुरुकुलसंस्थाहि गेल्या; मोंगलाई गेली, तीबरोबर आदाबबंदगीहि गेली व गोषाहि गेला; मराठेशाही गेली, तीबरोबर स्वारीशिकारी आणि मोहिमा गेल्या, बारावंडी गेली व बोरूहि गेले. आतां आंग्लाई नवीन चालीरीती घेऊन आली आहे व त्यांत सुद्धां सारखे बदल चालले आहेत. असें जरी आहे तरी स्वसंस्कृतिदर्शक परंपरागत आचार जे असतात ते सोडावेत असें कोण स्वाभिमानी सुज्ञ म्हणेल ? जे शिष्टाचार स्वसमाजनीतीवर आधारलेले आहेत व ज्यांत आपली संस्कृति उत्कटत्वानें प्रतीत होते ते आजहि अवश्य सांभाळले पाहिजेत. व्यवहाराचेंहि तसेंच. त्यांतून केवढा तरी इतिहास भरला आहे ? हिंदुव्यवहारशास्त्र किंवा हिंदु कायदा स्वतंत्र कशाकरितां ? सर्व धर्मीयांना एकच कायदा कां नाहीं ? धर्म आणि व्यवहार किंवा कायदा परस्परावलंबी असतात, हे प्रत्येक सरकार ओळखून असतें. तेव्हां प्रत्येक समाजानेंहि आपले शिष्टाचार आणि व्यवहार तारतम्यानें जरूर पाळले पाहिजेत. हे बदलत जात असले तरी विशिष्ट, निदान पाव शतकाइतक्या कालखंडांत तरी, सामान्यतः अविचल व बहुजनमान्य असतात, यांत शंका नाहीं. तरी प्रस्तुत पुस्तकांतल्याप्रमाणें त्यांना लेखनिविष्ट केल्यास मोठाच उपयोग होतो.

शिष्टाचार आणि व्यवहार हे मनुष्य पुस्तकांवरून शिकतो असें नाहीं. ते प्रायः पाहूनच येतात. तथापि ज्यांना पाहाण्यास संधि मिळत नाहीं, किंवा

त्यांचा निश्चितपणा कळत नाहीं त्यांच्यासाठीं अशीं पुस्तकें करण्याची पद्धति वैदिक काळापासून आहे, हें सूत्रग्रंथावरून दिसून येणार आहे. चाणक्य, नारद, विदुर इत्यादिकांनीहि पुढें ती रचनापरंपरा चालविली. राजपुत्रांसाठीं आचारपाठ तयार केले जात. पेशवाईंत 'नारायण व्यवहार शिक्षा' हा ग्रंथ, तसेंच सवाई माधवरावासाठीं त्याच्या दोन्ही आजींनीं लिहिलेले जावते वगैरे उपलब्ध आहेत. सर्व कुटुंबांतून परवां परवांपर्यंत मुलांना असें व्यवहाराचें शिक्षण आपोआप मिळे. देवधर्मावर श्रद्धा, वडील माणसांविषयीं आदर व त्यांचें आज्ञापालन, सत्य आणि सचोटी ठेवण्याविषयीं कटाक्ष, नीतिमर्यादा राखणें, कुलाभिमान आणि देशाभिमान इत्यादि गोष्टी घरीं आणि शाळेंत मुलांच्या मनावर ठसविल्या जात. पण आतां पाहावें तों दोहींकडे याबाबतींत मुग्धता ! उलट शिष्टाचार आणि नीतिमर्यादा सोडण्यास लावणाऱ्या गोष्टी हरघडी डोळ्यांसमोर घडणार. यामुळें कोंवळ्या मनावर समाजधारणेस हानिकारक असे परिणाम झाल्याशिवाय राहात असतील का ?

श्री. हणमंते यांनीं मोठें धैर्य करून प्रस्तुत पुस्तक लिहिलें व पदरास खार लावून घेऊन छापलें, याबद्दल महाराष्ट्रीय जनतेनें त्यांचे ऋणी असलें पाहिजे. खुसखुशीत किंवा सहज खपणारीं पुस्तकें लिहिणें निराळें, व समाजहितबुद्धीनें अशीं नीतिशिक्षक पुस्तकें लिहिणें निराळें. पहिल्यांत निव्वळ स्वार्थबुद्धी तर दुसऱ्यांत परमार्थबुद्धि दिसून येते. अशा पुस्तकांचें संपादन करण्यांत फारच मोठी जबाबदारीहि पण आहे. आज समाजांत अमुकच आचार किंवा व्यवहार शिष्टमान्य आहे, हें छातीठोक सांगणें धाडसाचें आहे खरें. कारण वर म्हटल्याप्रमाणें काळाच्या द्रुतगतीनें आचार बदलत आहेत. शिवाय नीति-अनीति, सभ्यता–असभ्यता, धर्म–अधर्म हीं देखील कालसापेक्ष आहेत. तथापि नजीकच्या मागच्या काळांत जे आचार शिष्ट धरले गेले होते तेच आज कांहीं काल तरी शिष्ट धरले पाहिजेत. श्री. हणमंते यांनीं असेंच केलें आहे.

पं. मालवीयजीप्रमाणें 'भारतीय सभ्यता' असा शब्दप्रयोग केल्यास आपल्या देशाची अब्रू राखणारी सभ्यता किंवा शिष्टाचार पाळण्याची केवढी मोठी जबाबदारी प्रत्येक भारतपुत्राच्या अंगावर येऊन पडते. ती पार पाडणें त्याचें आद्य कर्तव्य नाहीं काय ? या बाबतींतले युरोपियनांचे गुण आपण घेतों पण आपले टाकतों ! आज पाश्चात्य संस्कृतीचें अंधानुकरण विशेषतः सुशिक्षितांत चाललें आहे व आपले आचार-व्यवहार रानटी म्हणून ते त्याज्य ठरवीत आहेत. अशा क्रांतींत प्रस्तुत पुस्तकाचा अनादर होईल कीं काय अशी भीति मनाला शिवत आहे. तथापि लेखकानें प्रामाणिकपणानें व कर्तव्यबुद्धीनें व्यवहार-शिष्टाचाराचे धडे-जुनेच पण नव्यानें समाजापुढें मांडले आहेत. सुविचारी समाजानें उदारबुद्धीनें त्यांच्या दीर्घ व्यासंगाचें आणि परिश्रमाचें चीज करावें अशी अखेर आग्रहाची विनंति, व्यवहार जाणून करतों व मूळ पुस्तकाएवढी प्रस्तावना न खरडण्याचा शिष्टाचारहि पाळतों.

शके १८६२ फाल्गुन शु. १५<br>
२०४ सदाशिव,<br>
वाघवाडी, पुणें २

चिंतामण गणेश कर्वे

———

ग्रं. नं. १५५१८

# लेखकाचें मनोगत

धर्मादपि व्यवहारो गरीयान् ।
धर्मापेक्षां सुद्धां व्यवहाराचें महत्त्व अधिक आहे
( चाणक्यसूत्रें )

" मराठी रेलवे गाईड " अथवा " वाटेचा सोबती " व " भारतवर्ष " अथवा " हिंदुस्थानचें संक्षिप्त गॅझेटीयर " अशीं दोन पुस्तकें मी यापूर्वी लिहून प्रसिद्ध केलीं आहेत. त्यानंतर वाचनाचा व्यासंग असूनहि आजवर लिहिण्याचा योग, रेलवेनोकरीसारखा दगदगीचा व्यवसाय असल्यामुळें आला नाहीं. तो प्रस्तुत पुस्तकानें आला ही परमेश्वराची कृपा.

रेलवेनोकरींत आलेला दीर्घकालीन अनुभव व सूक्ष्म निरीक्षण यामुळें व्यवहारांत वागण्याचे बाबतींत साधारणपणें पुष्कळांचें थोडक्यांत कोठें कसें चुकते व त्यामुळें थोड्याशा हयगयीनें व चुकीनें परिणामीं एखादी गोष्ट किती अनर्थाला कारण होते, याची जाणीव नेहमीं होत असल्यामुळें व्यवहारांत सर्वसाधारणपणें वागावें कसें व कसें वागले असतां आपला व्यावहारिक उत्कर्ष होतो, व एकंदरींत आपलें चुकतें कोठें व तें कसें तारतम्यानें टाळावें, यासंबंधीं सूचनात्मक एखादें पुस्तक लिहावें असा फार दिवसांचा मनोदय होता. त्यांत नुकतें हिंदी भाषेंतील श्री. गणेश दत्त शर्मा कृत " व्यावहारिक सभ्यता " या नांवाचें पुस्तक सहज पाहण्यांत आलें. त्यावरून मूळ विचारास चालना मिळाली व त्याचेंच प्रत्यंतर म्हणजे प्रस्तुत प्रयत्न होय.

साधारणपणें व्यवहाराचे बाबतींत आमचा समाज, विशेषतः हिंदुसमाज, फार मागासला आहे. तो इतर कांहीं बाबतींत स्वतःस कितीहि पुढारलेला

समजो; परंतु व्यवहारांत, वागण्यांत, बोलण्यांत आवश्यक जो रुबाब, दक्षता, स्वाभिमान, संघटना, पेहराव व एकंदर राहणी या सर्व बाबतींत जो गबाळेपणा, अनियमितपणा व शिस्तीचा अभाव दिसून येतो, तोच त्याचे व्यावहारिक उत्कर्षास आड येतो हें उघड आहे. रेलवे स्टेशनांत तिकिटें घेतांना असो; अगर देवालयांत दर्शनास गेल्यावेळीं असो; कोण घाई, गोंधळ अगर गोंगाट केला जातो ! हें सर्वांच्या परिचयाचेंच आहे. हें दृश्य चिंतनीय नाहीं काय ?

शिरोभागीं उद्‌धृत केलेल्या अवतरणांत ' धर्मापेक्षां सुद्धां व्यवहाराचें महत्त्व अधिक आहे ' असें आर्य चाणक्य सांगतात तें नितान्त सत्य आहे. " आधीं प्रपंच करावा नेटका । मग पहावा परमार्थविवेका ॥ " असें श्रीसमर्थ म्हणतात. ज्याला व्यवहार साधणार नाहीं त्याला परमार्थ तरी काय साधणार ? व्यवहार म्हणजे सदाचरणाची लोकरीत व तदनुरूप वर्तन व एकंदर जीवनक्रम होय. उत्तम वर्तन व उत्तम व्यवहार कसा असावा हा नित्याचा प्रश्न आहे. सामान्य मनुष्याच्या सर्वसाधारण जीवनाला मार्गदर्शक म्हणजे व्यवहाराला आवश्यक अशा गोष्टींचेंच विवेचन व चर्चा पुढील पंचवीस प्रकरणांतून केली आहे व निरनिराळे दृष्टान्त व समर्पक उतारे देऊन विषय सुगम करण्याचा प्रयत्न केला आहे.

> अमृताहून गोड अन्न । परि रुचि न ये शाकेंवीण ।
> दृष्टान्तावीण ग्रंथ संपूर्ण । रसीं न चढे सर्वथा ॥–श्रीधर

या न्यायानें जागजागीं सुभाषितें व थोरांचीं वचनें उद्‌धृत केली आहेत. त्यांचा मुख्य हेतु सुविचारजागृति करणें हा आहे.

पुष्कळ लोकांची अशी समजूत आहे कीं, जी संवय जडली अगर जो स्वभाव बनून गेला, ती सुटणें अशक्य आहे. पण ही गोष्ट तितकीशी खरी नाहीं. संवयीचा त्याग करणें अशक्य नाहीं; पण कष्टसाध्य आहे, हें मात्र खरें. मनुष्य निश्चयानें व मनावर घेईल तर त्याला सभ्यतेला अयोग्य व एकंदरींत व्यवहाराला अनिष्ट अशा कित्येक गोष्टींचा व संवयींचा त्याग

करतां येईल " नर करणी करे तों नरका नारायण हो जाय. " पुरुषार्थी मनुष्यास अशक्य असें नाहींच. पण तितका मनाचा खंबीरपणा हवा.

सभ्यता व संस्कृति हे जवळ जवळ पर्यायवाचक शब्द आहेत. तथापि त्यांत थोडा सूक्ष्म भेद आहे. संस्कृति म्हणजे धार्मिक, वैदिक अगर सामाजिक सुधारलेली स्थिति; व तिला अनुसरून शिष्टजनसंमत आचरण व दुसऱ्याशी वर्तणूक याचें नांव सभ्यता. ही सभ्यता देशकालानुसारी आहे. निरनिराळ्या देशांत व तेथील मानवसमाजांत सभ्यतेची विशिष्ट विचारप्रणाली असते. खाणेंपिणें आणि मजा करणें अगर सर्व कामें यंत्रानें करून घेणें—स्वार्थापलीकडे कांहीं नाहीं—ही पाश्चात्य संस्कृति; तर भारतीय सभ्यता स्वार्थपरायणतारहित व सर्व प्राणिमात्रांचें कल्याण सारखेंच चिंतणारी आहे.

पाश्चात्यांच्या संसर्गानें आम्ही आंधळे झालों आहों. त्याचीं फळें अनुभवीत आहोंतच. नित्यक्रम, खाणेंपिणें, परस्परव्यवहार, रीतिभाती अगर एकंदर दैनंदिनव्यवहार हीं सर्व आजला आमच्या प्राचीन संस्कृतीला सोडून चालली आहेत. त्यामुळें सर्वच बाबतींत आम्ही अवनत होत आहोंत. आमची राहणी निसर्गाला सोडून तर आचरण व्यवहाराला सोडून !

पुढील प्रबंधांत केलेलें सर्वसामान्य विवेचन व ते ते विषय नित्याचे आहेत. यांत कित्येकांत विशेष नाविन्य वाटणार नाहीं, तथापि सूक्ष्म दृष्टीनें पाहणारांस त्यांत कांहीं तरी विचार करण्यासारखें आहे असें वाटेल, असा भरंवसा आहे. "जो आपलें अन्न शिजवून खातो व विचारशक्तिसंपन्न आहे त्याला मनुष्य म्हणतात," अशी मनुष्याची शास्त्रीय व्याख्या आहे. ज्याला विचार नाहीं, ज्ञान नाहीं, तो पशूच होय.

'ज्ञानेन हीनाः पशुभिः समानाः ।'—भर्तृहरि

साधारणपणें व्यवहारांत वागणें अगर व्यवहार निभावून नेणें, वाटतें तितकें सोपें नाहीं. पुष्कळ वेळां क्षुल्लक कारणानें व्यवहारांत कसें बिघडतें व कार्यहानि कशी होते व त्यापासून उपसर्ग कसा पोंचतो याचें विवेचन, भोजन-

व्यवहार, संभाषणप्रसंग, परस्परव्यवहार, नीति–अनीति, सामाजिक व्यवहार इत्यादि प्रकरणांतून केलें आहे. त्यांतील मर्म गुणज्ञ वाचक हंसक्षीरन्यायानें घेतील, अशी सदिच्छा व्यक्त करतों.

हस्तलिखित प्रत तयार करण्याचे कामीं आमची ज्येष्ठ कन्या चि. सौ. कमलाबाई बेंद्रे, ( स्कूल मिस्ट्रेस, नूतन विद्यालय, गुलबर्गा ), हिचा बराच हातभार लागला आहे, हें नमूद करावेंसें वाटतें.

श्रीयुत रा. चिंतामण गणेश कर्वे, संपादक–महाराष्ट्र शब्दकोश यांच्या केवळ सौजन्यानें व प्रोत्साहनानेंच हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें साहस केलें. प्रुफें तपासण्याचे कामीं व इतर जी स्वयंस्फूर्तीनें व आपुलकीनें त्यांनीं मदत केली त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. तसेंच पुस्तकाचे अंतरंगास अनुसरून असणारी सुंदर प्रस्तावना लिहून दिली, याबद्दल प्रस्तुत लेखक त्यांचा अत्यंत ऋणी आहे. असो. आतां शेवटीं ज्याच्या कृपाप्रसादानेंच प्रस्तुत प्रयत्न सिद्धीस गेला त्या श्रीशालाच शतशः प्रणाम करून हें मनोगत संपवितों.

मोहोळ (जि. सोलापूर)<br>
रंगपंचमी, शके १८६२.

श्रीधर शामराव हणमंते

# व्यवहार आणि शिष्टाचार

## १

## दिनचर्या

पूर्वाण्हे चाचरेद्धर्मं माध्यान्हेऽर्थमुपार्जयेत् ।
सायान्हे चाचरेत्काममित्येशां वैदिकी श्रुतिः ।।

१

अहोरात्राच्या चोवीस तासांत मनुष्यानें कसें वागावें याचें विवेचन प्राचीन ग्रंथांत विस्तृतपणें दिलेलें आहे. ते आजकालच्या वाढलेल्या जगाच्या व्यवहारांत व्यवसाय भेदामुळें सर्वांनांच सारखे शक्य नसल्यामुळें दैनंदिन कार्यक्रम म्हणून प्रत्येकानें ठरविला पाहिजे आणि त्याप्रमाणें चालू परिस्थितींत योग्य तो फेरबदल करून पण नियमितपणें वागलें पाहिजे.

२

पहिली गोष्ट म्हणजे प्रत्यकानें पहाटें उठून परमेश्वराचे स्मरण करून नित्य उद्योगास लागावे. सर्व सृष्टि ज्यावेळी जागी होतें त्यावेळी निजून राहणें करंटपणाचे लक्षण होय. प्रभात काळाला रामप्रहर म्हणतात. प्रभात काल म्हणजे दिवसाचा अत्यंत उत्साहाचा काल असें शास्त्र सांगतें.

" प्रातःकालकी वायुको सेवन करत सुजान
याने मुख–छबि बढत है, बुद्धि होत बलवान "

३

प्रातः स्मरणाची व भूपाळ्या वगैरे म्हणण्याची पद्धति मानसशास्त्र दृष्ट्या देखील फारच उपयुक्त आहे. तिचे आचरण प्रत्येकानें प्रातःकाळीं जरूर करावें. मुखमार्जनानंतर आपले मुख प्रत्यही आरशांत पहावें हें प्रसन्नकारक आहे.

४

दिनचर्या नियमित पाहिजे. त्यामुळें कोणतेहि काम वेळेवर करण्याची संवय आपोआप जडते. त्याचा भावी आयुष्यांत मनाला एक प्रकारचे शिस्तीचें वळण लावण्याच्याकामीं फार उपयोग होतो.

५

पण आजकाल असें पुष्कळ ठिकाणीं पाहण्यांत येतें कीं, सकाळचे आठ वाजले तरी कित्येक जण अद्यापि आंथरुणावरच असलेले आढळून येतात. तेथेंच आलेल्यांचा चहानें सत्कार केला जातो ! घरचा केरवारा, झाड-लोट झालेली नसतें. हें दृश्य अमंगल होय. पूर्वींच्या ज्या आमच्या अनेक चांगल्या रूढी आहेत त्यांत पहाटें उठण्याची सवय ही मुख्य होय.

६

जागें होतांच शांत मनानें परमेश्वराचे स्मरण करून " मला सद्बुद्धि दे. " अशी प्रार्थना करावी. नंतर शरीर व घर यांची स्वच्छता करण्यास प्रारंभ करावा, यांत हित आहे.

७

' कालाय तस्मै नमः ' असें म्हणण्याची पाळी येते ती अशा वेळींच कीं, चांगल्या हिताच्या गोष्टी जेव्हां रुचत नाहींत व मनुष्य अगर समाज आड-

मार्गानें जातो. त्यांपैकींच ही एक होय. भौतिक सुधारणा जशा जशा पुढें जाऊं लागल्या आहेत तसा तसा मनुष्य अधिक अवनत व दुर्बल होऊं लागला आहे.

८

आजकाल पिठाच्या गिरण्या झाल्यामुळें स्त्रियांची पहाटें उठण्याची सवय गेली व विद्यार्थी देखील पहाटें उठून अभ्यास करीत नाहींत. याचा व्हाव-याचा तोच परिणाम म्हणजे आळस आला, दारिद्र्य वाढलें, बुद्धीची चमक नाहींशी झाली. याकरितां ही आत्मघातकी सवय सोडावी.

९

नंतर स्नान, व्यायाम, उपाहार, कामधंदा, विश्रांति, करमणूक, निद्रा हा नित्याचा क्रम प्रत्येकानें आपल्या व्यवसायाला व दर्जाला शोभेल, जमेल असा आंखला पाहिजे व त्याप्रमाणें वर्तणूक ठेविली पाहिजे. यांतच अभ्युदय आहे.

१०

मुखमार्जनानंतर पहिले काम म्हणजे स्नान. प्रातः स्नान अत्यंत आरोग्यदायक होय. प्रातःस्नानानें शरीर सतेज होते, कांति वाढते, मन सुप्रसन्न होतें, अंगांत एकप्रकारचें ओज उत्पन्न होतें. प्रातःस्नानाचा परिपाठ अगत्यमेव ठेवावा नंतरच नित्यक्रमास आरंभ करणें श्रेयस्कर

११

दिनचर्या म्हणजे नित्यक्रम. यांत होतां होईल तों अंतर पडूं देऊं नये. म्हणजे-सकाळीं उठल्यापासून रात्रीं निजेपर्यंत सर्व व्यवहार-जेवणखाण, वाचन–लेखन, गप्पा–गोष्टी, उपासना अगर समाज सेवा यांत सुसूत्रता असावी. अशी सवय बाणली तर माणसाच्या हातून मोठाली कामें होतात.

१२

थोर पुरुषांच्या वागणुकींत कालाचा सद्व्यय करण्यासंदर्भीं अशाच प्रकारचे नियम सर्वत्र आढळतात व त्यांस अनुसरून जे वागतात त्यांचाच जगांत उदय होतो. आपल्या अभ्युदयाची इच्छा करणाऱ्या स्त्री, पुरुष अगर विद्यार्थी ह्यांनीं आपल्या सोयीप्रमाणें कां होईना कालाचा सद्व्यय करण्याची सवय ठेविली पाहिजे.

१३

अशी सवय होण्यास प्रत्येकानें आपले सोयीप्रमाणें कामकाजाच्या अनुकूलतेनें आपल्या दिनचर्येचा आराखडा आंखून त्यास जमेल असें वेळापत्रक करून आपल्या बसावयाच्या जागेंत सदैव समोर राहील असें लावलें पाहिजे; म्हणजे त्याकडे पाहून तरी जाग येईल.

१४

वेळांपत्रकांत ठळक कालविभाग व त्यांत नित्य करावयाच्या कामाची नोंद असावी व त्याप्रमाणें करीत असावें. केलें तर सर्व कांहीं होतें, नाहीं तर कांहींच नाहीं हा नित्याचा अनुभव आहे. रोज रात्रीं दुसरे दिवशीचे कामाचा आराखडा तयार करून त्याप्रमाणें त्या दिवसाचे संध्याकाळीं झालेल्या कामाचा आढावा घेतला तर योजिले किती, त्यांपैकीं झालें किती व राहिलें रकिती, हें तेव्हांच कळेल. हें जो लक्षपूर्वक पाहील त्याचें हित झाल्याशिवाय ाहणार नाहीं.

१५

अहोरात्रीच्या चोवीस तासांचा व्यय, नित्याचा दिनक्रम, व त्याची कालविभागणी हीं ज्याच्या त्याच्या परिस्थितीप्रमाणें राहतील. " लवकर निजेलवकर उठे, तया संपत्ति आरोग्य भेटे।" या न्यायानें सकाळीं लवकर उठणें, शौच, मुखमार्जन, स्नान, व्यायाम, भोजन, नित्याचा कामधंदा, कर-

मणूक, विश्रांति व निद्रा इतक्या गोष्टींचा दिनचर्येंत अंतर्भाव होतो व त्या त्या गोष्टी शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें प्रत्येकानें आचरणात आणण्याचा प्रयत्न करणें याचेंच नांव दिनचर्या.

१६

व्यवहारांत दिनचर्येला फार महत्त्व आहे. ज्याची दिनचर्या नियमित, पद्धतशीर रहाते त्याचाच ऊर्जितकाल होतो हें नितान्त सत्य आहे.

१७

दिनचर्येचें महत्त्व व आवश्यकता पुरुषांना आहे; तीच गोष्ट महिलावर्गालाहि लागू आहे. स्त्री व पुरुष हीं प्रपंचगाड्याचीं दोन चाकें आहेत. तीं दोन्ही कार्यक्षम व व्यवहारकुशल होण्यास त्यांची दिनचर्या नमुनेदार असली पाहिजे व तशीच शिस्त पाहिजे.

१८

व्यवहारांत स्त्रीपुरुषांचे निसर्गनिर्मित निराळे गुण व कर्तव्यें मानिली आहेत. त्यांत सामर्थ्य, धैर्य, काटकपणा, बुद्धिमत्ता, न्यायनिष्ठुरता इत्यादि पुरुषांचे; व सौंदर्य, धर्मनिष्ठा, साहस, तेजस्विता, चातुर्य इत्यादि स्त्रियांचे मुख्य गुण होत व ते संपादन करण्याचा प्रत्येक स्त्रीपुरुषानें प्रयत्न करावा, यांतच व्यावहारिक उत्कर्ष आहे.

१९

दिनचर्येंत तसेंच वर्तनक्रमाविषयीं सर्वसाधारणपणें सांगतांना समर्थ म्हणतात—

प्रातःकाळीं उठत जावें । प्रातःस्मरण करावें ।
नित्य नेमें स्मरावें । पाठान्तर ।।
सावधानता असावी । नीतिमर्यादा राखावी ।

जनास मानेल ती करावी । क्रीया शुद्ध ॥
सर्वदा प्रसंग पाहून वर्तत जावें ॥

याप्रमाणें ज्याचा वर्तनक्रम चोख राहील तोच भाग्याला चढेल. रोजच्या रोज आयुष्य किती कमी होतें याचा विचार न करतां नुसतें "किती वाजले?" म्हणून खिशांतलें घड्याळ काढून वेळ पहातात त्यांची कींवच करणें बरें.

२०

प्रत्येकाची परिस्थिती, ऐपत, व्यवसाय निरनिराळा असतो. ज्यान त्यानें आपल्या परिस्थित्यनुरूप वर्तनक्रम ठरवावा. साधारणपणें ठराविक वेळेची नोकरी नसणारांचा कार्यक्रम—

पहाटें ५ ला उठणें.
६ ते ८ शौचमुखमार्जन, ईशस्तवन, स्नान, व्यायाम, दिवसाचा कार्यक्रम व तो पार पाडण्याचा निश्चय.
८ ते ११ नित्याचा उद्योग, पत्रव्यवहार वगैरे.
११ ते १२ दोन प्रहरचे भोजन.
दुपारीं १२ ते १ विश्रांति.
१ ते ६ उद्योगधंदा.
संध्याकाळीं ६ ते ८ मोकळे फिरणें, संध्याकाळचा उपाहार.
रात्रीं ८ ते १०॥ गप्पागोष्टी, मनोरंजन, कौटुंबिक करमणूक, दिवसांतील झालेल्या कामाचें पर्यालोचन व दुसरे दिवसाच्या कामाची योजना.
रात्रीं १०॥ ते पहाटें ५ झोंप. (मनुष्याला सहा तास निद्रा पुरी होते असें वैद्यकशास्त्राचें मत आहे.)

## दिनचर्या खास स्त्रियांकरितां:—

कालावधि ज्याचे त्याचे सोईप्रमाणें

( सर्व सामान्यपणें अपवाद वगळून )

१ प्रात:काली उठून शौचमुखमार्जन स्नान घरांतली साफसफाई वगैरे.

२ पूजापाठ.
३ पाकनिष्पत्ती जेवणखाण.
४ वाचन चर्चा.
५ समवयस्क स्त्रियांशी गप्पा गोष्टी.
६ हस्तकौशल्याची कामें.
७ रात्रीचे भोजन
८ मुलांचे शिक्षण
९ सर्वसाधारण देखरेख सामान निवडणें हिशेब ठिशेब इ.
१० निद्रा

२१

वर्तनक्रमाविषयीं कांहीं ठोकळ नियम आहेत ते कुशलतेनें पाळणें व्यवहारांत अत्यंत अगत्याचें तसेंच हिताचें आहे. ते येणेंप्रमाणें—

१ स्वधर्मनिष्ठ व कर्तव्यपरायण असावें.
२ आहार बेताचा असावा.
३ भाषण थोडें, हितकर व गोड असावें.
४ आदा पाहून खर्च करणें.
५ उदार असावें पण उधळे असू नये.
६ वेळेचा दुरुपयोग न करणें.
७ शरीर, वर्तन, मन व वस्त्र स्वच्छ ठेवणें.
८ पदरचें द्यावें पण जामीन होऊं नये.
९ उसनवारी म्हणजे कर्ज करूं नये.
१० नित्य एखादा तास तरी एकांतात अभ्यासांत घालवावा.
११ नित्य आयव्यय लिहीत जावें. त्यापासून व्यवहारांत आपण आहोंत कोठें हें समजतें.

तात्पर्याकडे नजर देऊन कोणींहि आपल्या परिस्थित्यनुरूप या नियमांचा उपयोग करून घेतल्यास त्याचे हितच होईल.

२२

दैनंदिनी लिहिण्याचा प्रघात हें दिनचर्येचें एक प्रमुख अंग आहे. पुष्कळांना ही सवय नसते. ज्याचें झालें तर इष्ट आहेच पण व्यवहारांत अशा दैनंदिनीचा प्रसंगीं इतरांसही उपयोग होतो. मात्र त्यांत नित्याचे आहार निद्रा इतकीच भाकड कथा असूं नये; तर त्या त्या दिनीं घडलेल्या महत्त्वाच्या घडामोडींची स्मरणार्थ नोंद व त्या विषयीं आपलें विचार लिहीत जावें. यामुळें सूक्ष्म निरीक्षणाची संवय होते. हा दैनंदिनीचा फार मोठा उपयोग आहे.

२३

अशा कितीतरी गोष्टी असतात; प्रत्येकाच्या आयुष्यांत असें कांहीं प्रसंग घडून येतात पण कालांतरानें त्यांचें विस्मरण होते. पण ते ते सुख दुःखाचे प्रसंग अगर घटना, निरनिराळे उद्योग, आप्त इष्ट वा सुहृन्मित्रांच्या गांठीभेटी, स्थळ काल प्रसंग निर्देश करून दैनंदिनीत त्या त्यावेळीं टिपून ठेवल्या तर स्वतःचे पूर्वचरित्र आठवल्याचे आत्मसमाधान ज्याचे त्यांस तर होईलच पण भावी पिढीलाही ते मार्गदर्शक होईल म्हणून अशी दैनंदिनी-सह दिनचर्या ठेवणें हें एक प्रकारे सामाजिक कर्तव्यच ठरतें.

---

# स्वच्छता

६८८९ ग्रं. क्र.

१

झोपेंतून उठल्यावर तोंड वगैरे स्वच्छ घेतल्याशिवाय कोणासही भेटूं नये. निद्रितावस्थेमध्यें लाळ गळल्यामुळें वगैरे मुद्रा अगर चेहरा कांहीं विचित्र दिसतो.

२

नाक साफ करतांना अगर खाकरतांना मोठ्यानें आवाज करूं नये. दुसऱ्यास किळस न येईल इकडे लक्ष असावें.

३

थुंकणें अगर बेडकें टाकणें वगैरे ज्या गोष्टींपासून किळस उत्पन्न होते त्या आडबाजूलाच कराव्यात. भर रस्त्यांत लोकांच्या रहदारींत थुंकणें वगैरे ही गोष्ट असभ्यतेंचो द्योतक आहे. शिवाय त्यामुळें सार्वजनिक आरोग्य बिघडण्यास मदत होते.

४

वारंवार थुंकण्याची खोड ही किळसवाणीच होय. कित्येकांना ही जडलेली असते. अशी खोड असणारे बैठकींतून अगर चार मंडळींतून मधूनच थुंकण्यासाटीं उठून जातात; ही खोड लावून घेणें चांगलें नव्हे. यांत शिष्टाचारभंग आहे.

५

तोंडांत बोटें घालणें अगर दातांनीं नखें कुरतडणें हेंहि तितकेंच असभ्य व अमंगल होय. मनुस्मृतींत म्हटलें आहे — " दंतैर्नोत्पाटयेत नखान् । "

६

पांढरे शुभ्र चमकदार दांत असणें ही एक जीवनाची ज्योत आहे. दातांची योग्य निगा लहानपणींच घेतली तर दंत अगर हिरडीचे रोग होत नाहींत.

७

घर चंद्रमोळी असले तरी चालेल, चैनीचे पदार्थ घरीं नसले तरी चालतील, पण सर्वत्र स्वच्छता, टापटीप व जागच्याजागीं जिन्नस ठेवण्याची पद्धत असावी. " अंगीं असावी स्वच्छता । पदरीं असावी लीनता ।। "

८

आपले दांत नेहमीं स्वच्छ ठेवा. ज्याचे दांत अस्वच्छ,कीट बसलेले,किडके असतात त्याचें सर्व सौंदर्य व्यर्थ होय. रात्रंदिवस पानें चघळून तोंड अगर ओठ लालभडक करणें क्वचित् एखादे वेळीं का होईना अनवधानतेमुळें मुखरस गळणें सभ्यतेचें द्योतक नव्हे.

९

जेवणानंतर दांत–तोंड धुणें फार घाईनें उरकण्याची कित्येकांस सवय असतें. हें चांगलें नव्हे. प्रत्येक जेवणानंतर अगर कांहीं खाल्यानंतर दांत, नखें वगैरे साफ ठेवणें; दांतांच्या सांधींत खरकटें अगर अन्नाचा अंश न राहील हें पाहणें अगत्याचें आहे. असें राहिलेलें खरकटें कुजूनच पायोरियासारखे दंतरोग होतात.

१०

पान–तंबाखू खाऊन बैठकीजवळच कोपऱ्यांत, अगर कवाडाचें आड अगर भिंतीवर पिचकारी मारणें, अंगांतील कपड्यांवर मुखरस गाळणें,

विडी ओढणारांनीं विडीचे तुकडे राटेल तेथें टाकणें, यागोष्टी जितक्या असभ्यतेच्या तितक्याच घाणेरड्या व घातक आहेत. दुसऱ्याच्या घरीं तरी यासंबंधीं विशेष दक्षता घ्यावी.

११

आगगाडींतून प्रवास करतांना डब्यांत बसल्या ठिकाणींच थुंकणें, पाणी टाकणें, विडीचे तुकडे फेकणें, अगर फळें खाऊन टरफलें टाकणें या गोष्टी गलिच्छ होत. त्या शेजारी असणाऱ्या उतारूंस त्रासदायक होतात. दुसऱ्यास उपसर्ग न होईल इकडे पाहिले पाहिजे. अशा प्रकारचा केरकचरा स्टेशनचे उलट बाजूस टाकावा. फलाटावर फळांच्या साली टाकूं नयेत. विशेषत: केळीच्या साली फरशी अगर डांबरी सडकेवर पडून त्यावरून पाय घसरल्यामुळें कित्येक माणसें जन्माचीं अधू झालेलीं उदाहरणें आहेत.

१२

उलटबाजूला फेकतांना देखील गाडी उभी असो अगर वेगांत असो प्रथम खालीं कोण जातो येतो काय अगर रेलवे–कामगार वगैरे कांहीं काम वगैरे करतात काय, हें प्रथम पाहिलें पाहिजे.

१३

सार्वजनिक मठ अगर धर्मशाळा वगैरे ठिकाणीं कोणत्याहि प्रकारची घाण करूं नये. कारण तीं तीं ठिकाणें अनेकांच्या सुखार्थ बांधलेली असतात. कोणी एखादा चुकून तसें करीत असल्यास जाणत्यानें त्याची समजूत घालून त्यास तसें करण्यापासून परावृत्त करावें.

१४

घरांतील केरकचरा, फळांच्या साली, खाऊचे कागद, उष्टीं पानें अगर पाणी बाहेर फेकतांना रस्त्यावरून जाणाऱ्यायेणारांच्या अंगावर न पडेल ही खबरदारी घेतली पाहिजे.

१५

मनुष्याला बहात्तर खोडी असतात असें म्हणतात. हें परिगणन खरें असो अगर मानीव असो पण त्यांपैकीं अनेक अनेकांच्या अंगी असतात, ही गोष्ट नित्य आहे. त्या खोडी लागू न देणें हें लहानपणींच शिकलें पाहिजे. चालताना बोलतांना निरनिराळे अंगविक्षेप करणें, डोकें खाजविणें, हातवारें करणें, नखें कुरतडणें, मान उडविणें, डोळे मिचकावणें, अकारण हास्य वगैरे, या अशा खोडी होत.

१६

व्यसनांचें झालें तरी असेंच. मोठ्या व्यसनांचा विचार फार मोठा. तथापि लहान व्यसनें समाजांत कमी नसतात. त्यांत कित्येक इतकीं दृढमूल झालीं आहेत कीं, तीं व्यसनें व्यसनें आहेत व वाईट आहेत हें मनुष्य प्रांजळपणें मान्य करीत नाहीं. अशा लहान व्यसनांत तंबाखू खाणें, विडी-सिगारेट ओढणें, तपकीर ओढणें वगैरे येतात. व्यसन आणि अस्वच्छता याची समव्याप्ति अगर निकट संबंध आहे.

१७

तंबाखू खाणाऱ्यांच्या बैठकींत पिकदाणीचें महत्त्व आहे. ती अनेकांनीं वापरणें व ती दिवसभर बैठकीजवळ जपून ठेवणें अगर आळसामुळे बसल्या ठिकाणाहून कोणी पहात नाहीं असें पाहून वाटेल तेथें पिचकारी मारणें या गोष्टी असभ्य होत. पानामुळें तोंड नेहमीं अस्वच्छ राहतें. पानाचे तुकडे व सुपारीचे कण दातांत अडकून कुजतात, व पान खाण्यानें जरूरीपेक्षां जास्त लाळ उत्पन्न होते.

१८

विडी-सिगारेट ओढणेंहि असेंच. व्यसनांचे असेंच आहे. एक विनोदी कवि म्हणतो, "पंचपक्वांन्न भोजनोत्तरीं । विडी पाहिजेच सत्वरी । न मिळे

तरि अंतरी । दुःख बाप मेल्याचें ।। " इतका या व्यसनांचा पगडा आहे. तंबाखू ओढण्याचे सवयीनें दांतावर वाईट परिणाम होतो म्हणतात.

१९

तपकीर ओढणारांचा हातरुमाल म्हणजे मळांचा खजिनाच! हीं व्यसनें अगर या सवयी अत्यंत घाणेरड्या, किळसवाण्या, अस्वच्छ तशाच आरोग्याला घातक होत.

२०

कोणाच्या घरीं अगर कोणत्याही एका ठिकाणीं जाजम, गालिचा अगर बैठक टाकिली असेल तेथें बैठकीवर जाण्यापूर्वी आपलें पाय अस्वच्छ नाहींत ना हें पाहिलें पाहिजे; नाहीं तर बैठक खराब व्हावयाची.

२१

आड, विहिरी अगर नदीनाले वगैरे जलाशयानजीक थुंकणें, चूळ भरणें अगर जेथें लोक पाण्याचा पिण्याकडे उपयोग करतात तेथें स्नान करणें, कपडे धुणें वगैरें सार्वजनिक आरोग्याचे दृष्टीनें अहितकर होय.

२२

आपलें घर सदासर्वदा स्वच्छ ठेवा. वस्तु जेथल्या तेथें ठेवणें ही स्वच्छता, व वाटेल ती वस्तू वाटेल तेथे निरर्गलपणें टाकणें, म्हणजेच अस्वच्छता. घराच्या कोणत्याही भागीं घाण, केरकचरा पडूं देऊं नये. तो तेव्हांचे तेव्हां त्याकरितां मुद्दाम ठेवलेल्या टोपलींतच व एका ठिकाणीं टाकावा, म्हणजे घाण राहात नाहीं. घराप्रमाणें घराचे आसपासहि स्वच्छता राखिली पाहिजे.

२३

शौचाला जाऊन आल्यानंतर हातापायास मातीं, साबण वगैरे लावून स्वच्छ धुतल्याशिवाय कोणत्याहि वस्तुस स्पर्श करूं नये. संडासांतून बाहेर

कित्येक स्त्रीपुरुष विकच्छ बाहेर येतांत, हें असभ्य तसेंच दुसऱ्याला किळस-वाणें वाटणारें आहे. शौचास जाऊन आल्यानंतर वस्त्रांतर करण्याची पद्धत गुजराथी समाजांत रूढ आहे. ती अवश्य अनुकरणीय आहे.

२४

शौचसमयीं अगर लघवीच्या वेळीं कोणाशींही बोलणें अगर मनाशींच गुणगुणणें, इकडे तिकडे बघणें करूं नये; बिलकूल मौन अगर शांत असावें.

२५

अंगावरच्या धोतरानें अगर सदऱ्यालाच हाततोंड पुसणें अमंगळपणाचें आहे. त्याकरितां स्वतंत्र हातपंचा (टॉवेल) वापरावा.

२६

भोजनास बसण्यापूर्वी हातपाय वगैरे स्वच्छ धुणें स्वास्थ्यप्रद आहे.

२७

नेहमीं वापरण्यांत येणारी भांडीं घासून पुसून स्वच्छ ठेवावींत. तशींच तीं कल्हईचीं असल्यास वेळच्या वेळीं त्यांना कल्हई केली पाहिजे. पदार्थ चांगले असले पण भांडीं चांगली स्वच्छ नसलीं तर जेवणाराचें तसेंच वाढ-णाराचें मन अप्रसन्न राहील. भांडीं बाहेरून तशीच आंतूनहि स्वच्छ घासतां यावी.

२८

श्मश्रु करवल्यानंतर तोंड किंवा अंग लगेच पाण्यानें स्वच्छ करणें आव-श्यक आहे. आळसामुळें अगर कांहींतरी क्षुल्लक अडचणीचें निमित्त करून लवकर स्नान न करणें, तसेंच वेळच्या वेळीं श्मश्रु न करविणें हेहि तित-केच अमंगळ व अजागळपणाचें आहे.

२९

घरीं मोडकेतोडकें रद्दी सामान, ज्यांचा कांहीं उपयोग नाहीं अशा वस्तूंची नसती अडगळ व संग्रहाचा हव्यास बरा नव्हे. अशी वस्तु कोणी

मागत असेल तर आनंदानें द्यावी. उपयुक्त असेल तर नीट ठेवून द्यावी. निरर्थक असेल तर फेकून द्यावी; त्यांत हानि नाहीं.

३०

कपडालत्ता, पादत्राणें व घरांतील निरनिराळया उपयोगांचें व किमतीचें कोणतेंहि सामान त्याच्या मगदुराप्रमाणें सुव्यवस्थितपणें ठेवल्यानें व तशी सवय प्रथमपासूनच मुलावाळांस लावण्यानें गृहसौंदर्यांत व तेणेंकरून स्वच्छतेंत भरच पडेल.

३१

स्वच्छता, व्यवस्था अगर टापटीप हीच घराची शोभा. घरांतील सर्व खोल्यांची जमीन, भिंती व कानाकोपरे रोज स्वच्छ झाडावेत. कोणताहि केरकचरा, खरकटें, निरुपयोगी पाणी, पाला व घाण सांठूं देऊं नये. मोऱ्या व संडास भरपूर पाण्यानें धुवून ठेवावींत. वर्दळ असो नसो सांजसकाळ केरसुणी फिरली, म्हणजे झाडून स्वच्छ केलें, तरच घर स्वच्छ राहील.

३२

कित्येकांस लहानपणापासून उठल्यावरोबर शौचास न जाण्याची सवय लागते. ही सवय अपायकारक होय. याचें पर्यवसान म्हणजे पुढें पुढें मलावरोध होतो. "सर्वेषामपि दोषांणां कारणं कुपिता मलाः।"

३३

अंतर्बाह्य स्वच्छता हा आरोग्याचा पाया आहे. उठल्यावरोवर जो शौचास जातो व जेवल्यावरोवर लघवी करतो त्याला वैद्याची जरूर लागत नाहीं, असें शास्त्र सांगतें.

३४

घरांत लहानसा बगीचा अगर पुष्पवाटिका असेल अशा ठिकाणीं कित्येकजण हात धुण्याचें व इतर पाणी व्यर्थ जाऊं नये म्हणून झाडांच्या

मुळांशीं बसून हात तोंड धुणें अशासारख्या गोष्टी अनवधानपणें करतात. पूजेच्या झाडांना अगर ज्याचीं फुलें देवास वाहिली जातात त्यांस उष्टें पाणी पाजणें हीहि एक प्रकारची अस्वच्छताच आहे. त्यांत पावित्र्य-नाश आहे.

३५

शारीरिक स्वच्छतेप्रमाणेंच मानसिक पवित्रता राखणें ही फार मोठी महत्त्वाची गोष्ट आहे. मानसिक पवित्रतेनें, वाल्याचे वाल्मीकी ऋषि होतात. "मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः ।" शारीरिक स्वच्छतेइतकीच अगर त्याहूनहि अधिक मानसिक पवित्रतेची नितान्त आवश्यकता आहे. पवित्र अंतःकरण अगर मन हेंच ईश्वराचें रूप आहे. म्हणूनच "मन करारे प्रसन्न, सर्व सिद्धीचें कारण।" असें तुकाराम म्हणतात.

३६

शारीरिक, मानसिक तसेंच घरांसंबंधीं वगैरे स्वच्छतेप्रमाणेंच सार्वजनिक स्वच्छता हाहि एक मोठा भाग आहे. या बाबतींत व्यवहारांत, समाजांत अत्यंत शिथिलता दिसून येते. प्रत्यक्ष उदाहरणें म्हणजे आपलीं सार्वजनिक मंदिरें, धर्मशाळा वगैरे होत. कित्येक मंदिरांत, प्रांगणांत अगर आसपास इतकी घाण असते कीं, मंदिराचें, पावित्र्य व गांभीर्य त्यामुळें नष्ट होतें. मंदिर हें सार्वजनिक उपासनेचें स्थान असल्यामुळें तेथें प्रत्येक उपासकानें इतरांस त्रास न होईल व मंदिराच्या शान्ततेस व स्वच्छतेस बाध न येईल असें वागलें पाहिजे. आपल्या घराप्रमाणें सार्वजनिक स्वच्छता प्रत्येकानें पाळली पाहिजे.

३७

स्वच्छता ही एक प्रकारची पवित्रता आहे. म्हणून अंतःकरण तसेंच शरीर व घर ही सर्वदा स्वच्छ, निर्मळ राखिली पाहिजेत. घरामध्यें घाण व अशुद्धता थोडीहि नसावी. सूर्यप्रकाश व हवा सर्व घरांत खेळती राहावी.

उपयुक्तता व सौंदर्य हीं दोन्ही सर्वांस प्रिय आहेत म्हणून घर निरोगी व हवाशीर तसेच रम्य व प्रेक्षणीय असावें. घरांत उपासनेचें स्थान निराळें असावें. तें घरांतील स्त्रियांनीं होईल तितकें रमणीय ठेवावें. अशाप्रकारें जें घर स्वच्छ, निर्मळ व धर्मपरायण असतें त्या ठिकाणीं साक्षात् लक्ष्मी वास करते.

३८

घर, सार्वजनिक जागा वगैरेप्रमाणेंच नद्या, विहिरी व पाणवठे वगैरे ठिकाणीं देखील स्वच्छतेच्या बाबतींत प्रत्येकानें दक्षता घेतली पाहिजे याहि बाबतींत समाजांत, विशेषतः खेडेगांवात अक्षम्य दुर्लक्ष दिसून येतें. आंत उतरतां येणाऱ्या विहिरीचें पाणी यामुळें तर पिण्याच्या कामीं अशुद्ध होतें. तेथेंच हातपाय धुणें, अंघोळ करणें व तेंच पाणी पिण्यास वापरणें अत्यंत दोषा-स्पद होय. तसेंच वाहत्या पाण्यांत उभे राहून चुळा भरणें अप्रशस्त होय.

३९

नित्य स्नान स्वच्छतेला अत्यंत आवश्यक मात्र स्नानाला भरपूर पाणी घेऊन आडोशाच्या जागेत विशेषतः सांधे वगैरे घासून पुसून स्वच्छ स्नान करणें अत्यंत हितावह आहे. त्वगरोग होत नाहींत.

४०

स्नानानंतर नित्याची उपासना निवांत जागेत ईश्वराची प्रार्थना एकाग्र चित्तानें करावी यांत मनःस्वाथ्य आहे. एकांतामुळें कांहीं नवीन विचार सुचतात. एकांतामुळें सर्वाआधी कळते असें समर्थ म्हणतात.

४१

व्यक्तिनिष्ठ स्वच्छता तर हवीच पण सार्वजनिक स्वच्छताहि प्रत्येकानें पाळिली पाहिजे. त्यांत सर्वांचेच हित आहे. पण पुष्कळांना याची जाणीव

नसते, स्वतःचे घरचा केरकचरा सहज लीलेनें रस्त्यावर नेऊन टाकण्यांत अगर मुलांना रस्त्याचे कडेला शौचाला नेऊन बसवण्यांत कांहींच वाटत नाहीं. वैयक्तिक स्वच्छेते इतकेंच महत्त्व सार्वजनिक स्वच्छतेलाही आहेच.

४२

जुन्या राहणींत पूजा अगर भोजन प्रसंगीं सोंवळे नेसण्याच्या कल्पनेचा उगम मूळ स्वच्छतेत आहे. गांवभर हिंडून आलेल्या कपड्यावरच घरीं सर्व वापर करणें, खानपान करणें, स्वच्छतेला सोडून आहे.

---

# ३

# भोजनव्यवहार

१

दीर्घायुष्य हा मनुष्याचा जन्मसिद्ध हक्क आहे. निसर्गानुसार तंदुरुस्ती राहील अशा नियमांचें पालन केल्यास मनुष्यास दीर्घ व निरोगी आयुष्य प्राप्त झाल्याशिवाय राहाणार नाहीं. मात्र जगण्यासाठीं खाणें पिणें आहे, खाण्यासाठीं जगावयाचें नाहीं, हें तत्त्व नेहमीं लक्षांत ठेवलें पाहिजे.

२

पिण्याचें पाणी ठेवण्याची जागा स्वच्छ व भांडें पवित्र ठेवा. अस्वच्छ हातानें पिण्याचें पाणी वापरूं नका. अगर उष्टें भांडें त्यांत बुडवूं नका. उष्टें भांडें म्हणजे ज्यांतून कोणीं प्यालें अगर भोजन केलें तें नुसतें पाण्यानें खंगाळून घेणें शुद्ध नव्हे. असें भांडें घासल्याखेरीज खरें शुद्धच नव्हे.

३

तोंड लावून पाणी प्याल्यानंतर तें भांडें दुसऱ्याचे हातीं न देतां खालीं ठेवावें. दुसऱ्याच्या घरीं गेल्यावेळीं तर या गोष्टीकडे अधिक लक्ष असावें. आपले घरीं कोणीं पाणी अगर कांहीं पेय घेतलें असेल तर त्याला तें पिण्याचें भांडें विसळून ठेवण्याविषयीं सांगूं नये. भांडें असतांना ओंजळीनें पाणीं पिऊं नये.

४

पिऊन उरलेलें, पाय धुवून उरलेलें अगर संध्योपासनेचें उरलेलें जल पुन्हां कोणत्याहि कामीं आणूं नये. म्हटलेंच आहे—

पाद्यशेषं पीतशेषं संध्याशेषं च यज्जलम् ।
तज्जलम् मदिरातुल्यं ग्राह्यं नैव कदाचन ॥

५

जेवतांना मिटक्या मारणें ठीक नव्हे. भोजन करतेवेळेस तोंड जीभ अगर ओठ यानें कसलाहि आवाज होऊं देऊं नये. कित्येकजण कुत्रें पाणी पितांना जसें चटचट आवाज करतें तसाच आवाज करतात. ही असभ्यता आहे.

६

जेवतांना अगर इतर कांहीं खातांना तोंडांत मावेल इतकाच घास घ्यावा. हातांत प्रथम भला मोठा घास घेऊन तो तोडून खाणें व राहिलेल्या भागाचा दुसरा घास करून खाणें ही गोष्ट असभ्यतेची आहे.

७

भोजनसमयीं शुष्क वादविवाद करणें अगर मुलांवर तणतणणें ठीक नव्हे. तसेंच बिलकूल मुके बनून म्हणजे अजिबात भाषण न करतां भोजन करणेंहि अनुचित होय.

८

भोजनाची जागा स्वच्छ, प्रकाशमय, पवित्र चिन्हांनीं व म्हणींनीं युक्त असावी. यांतच संजीवन आहे. अन्न हें तर चविष्ट असावेच पण तें डोळ्यांना देखील चांगले दिसले पाहिजे असे नीटनेटकें पात्र व वाढपही पाहिजे. मनही प्रसन्न असावे. अप्रसन्न स्थितींत कदापि भोजन करूं नये.

९

पंक्तींत भोजन करतांना बरोबर बसलेल्यांचें जेवण होण्यापूर्वीं आपलें जेवण संपविणें अगर इतर मंडळीच्या फारच मागें राहणें या दोन्ही गोष्टी ठीक

नव्हेत. भोजन करतांना चंचल दृष्टि अगर दुसऱ्याच्या पात्राकडे नजर ठेवणें चांगलें नव्हे; आपल्या ताटाकडेच लक्ष असावें. एखाद्याच्या घरीं भोजनास गेल्यावेळीं तेथें नसेल ती वस्तु मागणें बरें नव्हे.

१०

भोजनाचे निमंत्रण घेतेवेळीं कित्येकजण संदिग्ध उत्तर देतात. अगर उगीचच आढेवेढे घेतात. सवड नसल्यास स्पष्ट सांगितलेलें बरें. येतों म्हणून न गेल्यास अन्नाचा अपव्यय व व्यर्थ श्रम आणि वर आमंत्रक नाराज होतो तें निराळेच.

११

भोजन प्रसंगीं वक्तशीरपणा फार महत्त्वाचा आहे. वेळेचें अनुसंधान स्वतः यजमानानें तसेंच आमंत्रितांनींही पाळलें पाहिजे. यांत उभयपक्षी सौजन्य आहे. कार्य प्रसंगीं तर ही गोष्ट सहजासहजीं दुर्लक्षिली जाते. फार तर दहापांच मिनिटें वाट पाहून उपस्थितांची पंगत उरकावी यांत व्यवहार आहे. उशीरा येणारांचा बोलही राहत नाहीं व अन्नही निवून जात नाहीं.

१२

भोजन, ताट पाटावर किंवा उंच ठेवून करणें ही चांगली गोष्ट आहे' खरी भूक लागल्याखेरीज जेवण करूं नये. खऱ्या भुकेची लज्जत कोणत्याहि मसाल्यांत नाहीं. अन्नाकडे पाहून अगर घड्याळाकडे पाहून लागलेली भूक खरी नव्हे.

१३

मिष्टान्न एकट्यानें खाऊ नये असें शास्त्रच सांगतें. खाण्यापिण्याचे वेळेस कोणी समोर असेल तर त्यास दिल्याशिवाय खाऊं नये. भोजनास आरंभ करण्यापूर्वी कोणी इष्टमित्र अगर अतिथि उपस्थित असल्यास 'भोजन करा!' म्हटल्याखेरीज राहूं नये.

१४

चालत फिरत खाणेंपिणें ठीक नव्हे. शरीरस्वास्थ्याच्या दृष्टीनें ही गोष्ट हानिकारक आहे. खाण्याच्या वस्तु खिशांत भरून वाटेनें खात राहण्याची सवय बहुधा लहानपणापासून लागते. अशी सवय लागूं न देणें हें आई-बापांचें काम आहे.

१५

घरीं काय किंवा बाहेर गेल्यावेळीं काय, जेवतांना आपल्याला लागेल तेवढाच पदार्थ मागून घ्यावा; उगीच आधाशासारखे अधिक मागून घेऊन टाकूं नये. त्यांत अन्नाचा अवमान आहे.

१६

शास्त्रदृष्ट्या तर अन्न हें परब्रह्म आहे. भोजनाचे वेळीं सर्व वाढून झाल्यावर अन्न म्हणजे परब्रह्म म्हणून त्याची—ज्यानें दिलें त्या परमेश्वराची—प्रार्थना करून पंक्तीतील सर्व बसलेले पाहून बसावे हा शिष्टसंप्रदाय आहे.

१७

भोजनांत पंक्तीत बसल्यावेळीं पंक्तिप्रपंच करणें अगदीं वाईट आहे. पंक्तीस बसल्यावेळीं वाढप सगळ्यास सारखें असावे, कमी अधिक करूं नये.

भणंग आणि चक्रवर्ती । समान मान एके पंक्ती
हेंचि धार्मिकाची रीती । श्रेष्ठ ऐसे जाणिजे

"मुक्तेश्वर"

१८

कित्येकांस जेवतांना अमूक पदार्थ खारटच झाला आहे अगर तिखटच अधिक झाला आहे. अशा प्रकारची नांवें ठेवण्याची व जेवण होईपर्यंत

सारखी चिकित्सा करीत राहण्याची खोड असते. यांत अन्नाचा अवमान तर आहेच पण तें रांधणाऱ्याचाहि अप्रत्यक्षपणें अपमान आहे.

१९

भोजनप्रसंगीं गुणदोषाची चर्चा करून तो पदार्थ अमुक कारणामुळें मानवत नाहीं ही विचिकित्सा अगर दुसऱ्यास किळस येईल असें कारण देत बसूं नये.

जेवणानंतर त्वरित कोणतेही मानसिक अथवा शारीरिक श्रम करूं नयेत अगर श्रम केल्यानंतर लगेच जेवूं नये.

२०

जेवतांना जेवणारानें लागेल तितकेंच मागून घ्यावें व वाढणारानें मागेल तेवढेंच वाढावें यांत तिहेरी हित होते. अन्न वांया जात नाहीं, पान स्वच्छ राहतें म्हणजे शेजारीं बसणारास वीट येत नाहीं व उष्टे पदार्थ उकिरड्यावर टाकीत न गेल्यानें घाण टळते.

२१

भोजन करते वेळीं निव्वळ आप्पलपोटेपणा म्हणजे आपल्यापुरतें पहाणें इष्ट नव्हे. पंक्तींत बरोबर जेवणारांस काय पाहिजे, काय नको याची दखलगिरी घेणें अगत्याचे आहे. तसेंच सर्वांचें जेवण उरकल्याविना पंक्तींतून उठणें योग्य नव्हे.

२२

असेंहि पाहाण्यांत येतें कीं, जेवतांना कित्येक जण अन्न चिवडतात, म्हणजे निरनिराळ्या पदार्थांची सरमिसळ करतात. त्यांत ज्याचें त्याला कांहीं न वाटलें तरी दुसऱ्यास अस्वच्छ व अमंगळ दिसतें. दुसरें असें कीं, आपल्यांत पतीचे ताटांत स्त्रीनें भोजन करण्याची प्रथा अद्यापि जुन्या राहणीचे लोकांत आहे. अशा स्थितींत ताट स्वच्छ असणें अगर ठेवणें इष्ट आहे. एरवीं त्या पतिनिष्ठेचा अपमान आहे.

२३

भोजनाचे वेळीं जसे विचार असतील तसाच मनुष्य निःसंदेह बनतो असा अनुभव आहे. याकरितां भोजनाचे वेळीं नेहमीं शान्त, पवित्र व उच्च विचार असावेत.

साहाय्यक म्हणून–भोजनगृहांत थोर सज्जनांचीं वचनें (म्हणी) अगर चित्रें समोर असावींत. म्हणजे त्या त्या सद्‌गुणांचें स्मरण जागृत होतें.

२४

साबणानें शरीर स्वच्छ होईल पण पवित्र होणार नाहीं. आहार शुद्धीनें मात्र शरीराचे अणु परमाणु देखील शुद्ध होतात.

२५

पंधरा दिवसांतून एकादे उपोषण आवश्यक आहे. उपवासाला ताजें ताक, निव्वळ फलाहार अगर नुसतें शुद्ध जल एवढेंच पुरे.

२६

अन्न तारतेंहि व मारतेंहि अशी म्हण आहे. तिचें तात्पर्य इतकेंच कीं, खाणेंपिणें बेतानेंच पाहिजे. अधिक भोजन शरीरस्वास्थ्याची हानि करणारें आहे. 'जगण्याकरितांच खा, खाण्याकरतां जगू नका.' हें थोरांच्या उपदेशाचें रहस्य लक्षांत ठेवा. मिताहार ही सुखाचीं, आरोग्याची व दीर्घायुष्याची गुरुकिल्ली आहे.

२७

आज काल भोजन अगर खाण्यापिण्याचाहि निर्बंध राहिला नाहीं. प्रजापतीनें मनुष्यास फक्त दोन वेळा व पशूस मात्र वाटेल तेव्हां खाण्याची आज्ञा केली अशी कथा शतपथ ब्राह्मणांत आढळते. मधल्या वेळचे खाणें या

दृष्टीनें आरोग्यास फारसे हितावह नाहीं. सकाळीं व संध्याकाळीं दोनच वेळा जेवण करणारा, विद्वान उदंडायुषी होतो (शतपथ) हें लक्षांत घ्या.

२८

मिताहाराप्रमाणें आहारशुद्धीचेंहि महत्त्व आहे. 'आहारशुद्धौ सत्त्वशुद्धिः सत्त्वशुद्धौ धृवा स्मृतिः।' (छांदोग्य). आहारशुद्धीनें सत्त्वशुद्धि आणि सत्त्वशुद्धीनें बुद्धी पवित्र व निश्चयी होते. म्हणून आहार नेहमीं सात्त्विक म्हणजे मसाले वगैरे न घातलेला, ताजा, साधा, पवित्र व अल्प असावा. नियमित व परिमित आहार ठेवील तो आजन्म निरोगी होईल व राहील.

आयुःसत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः ।
रम्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्त्विकप्रियाः ॥
—भ. गी. अ. १७-८.

ज्या अन्नाच्या योगानें आयुष्य वाढतें, कंटकपणा येतो, शक्ति वाढते, रोग होत नाहीं, सुख वाढतें असें रुचकर, स्निग्ध व आवडणारें जें अन्न तें चांगलें, असें भगवान सांगतात. नाथ म्हणतात, 'अल्पाहार या नांव पथ्य । पवित्र म्हणजे धर्मार्जित । तेंहि अप्रयासानें प्राप्त । ते जाण निश्चित सात्त्विक आहार ॥'

२९

खाण्यापिण्याचा व आरोग्याचा निकट संबंध आहे. शरीरारोग्य असणें हें मोठें भाग्य आहे. 'किं भाग्यं देहवताम् ? आरोग्यम् ।' (आचार्य) 'ते सुभाग्याः सुपुण्याश्च येषां देह अनामयम् ।' (मार्कंडेय पुराण) 'देहीं आरोग्य नांदतें । भाग्य नाहीं या परतें ॥' असें समर्थहि म्हणतात. आरोग्य असेल तोच मनुष्य आपलें कर्तव्य पार पाडू शकतो. आरोग्य नाहीं तर मग सर्व व्यर्थ आहे.

३०

'धर्मार्थकाममोक्षाणां मूलमुक्तं कलेवरम् ।' असें म्हटलें आहे. चारहि पुरुषार्थ साधावयास मूळ देहारोग्य पाहिजे. मनुष्याची कर्तबगारी, त्याच्या

महत्त्वाकांक्षा अगर त्याचे सर्व सुखोपभोग शरीर सुदृढ असेल तरच त्यास अनुभवता येणें शक्य असतें. आपण रोगी असलों तर सर्व गोष्टीस मुकावें लागतें. यासाठींच शरीर अंतर्बाह्य शुद्ध व निर्मळ राखणें व आहारशुद्धि या गोष्टी मुख्य आहेत व आरोग्याचे नियमानुसार त्या पाळल्या पाहिजेत. जगांतील सर्व संपत्तीपेक्षां शरीरसंपत्ति श्रेष्ठ आहे. म्हणून प्रत्येक मनुष्यानें तिची वाढ करणें अवश्य आहे. 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ।'

## ३१

शरीरारोग्य राखण्यासाठीं आहार, निद्रा, जागरण व परिश्रम यांत नियमितपणा राखणें हा अत्युत्कृष्ट नियम होय. 'नित्यं मिताहारविहार-सेवी समीक्षकारी विषयोप्यसक्तः । दाता समः सत्य परः क्षमावान् आरोग्य-सेवीच भवत्यरोगः ॥' जो रोज हितकारक आहार विहाराचें सेवन करतो, कार्यांस विचारपूर्वक प्रवृत्त होतो, विषयलंपट न होता दानशील, समदृष्टि, सत्यवक्ता, क्षमावान् व सन्मार्गगामी असतो तो निरोगी असतो.

## ३२

जिव्हादास होऊन खादाडपणा करणारा किंवा मुळींच न खाणारा, अति झोंपाळु, अगर फाजील जागणारा, कांहींहि परिश्रम न करणारा व शरीर सामर्थ्याचा विचार न करतां फाजील कष्ट करणारा, अशांचे आरोग्य बिघडून त्यांच्याच्यानें कांहीं कार्य होणें नाहीं. जिव्हालौल्यानें आरोग्य बिघडतें, एवढेंच नाहीं तर मनहि बिघडते. घोड्याला जसा लगाम, तसा वासनेसही लगाम पाहिजे. संयम पाहिजे. जगांत अन्न न खाऊन मेलेल्यापेक्षां वाजवीपेक्षां जास्त खाऊनव मेलेल्यांचा आंकडा फार मोठा आहे.

## ३३

घर बांधले म्हणजे बांधलें असें नव्हे तर त्या घरांत पिढ्यान् पिढ्या नांदणूक झाली पाहिजे. लग्न केलें म्हणजे लग्न झालें हें खरें नव्हे तर पत्नी-

बरोबर सुखाचा संसार झाला पाहिजे. मुलगा झाला म्हणजे मुलगा झाला असें नव्हें तर अंतकाली तो समोर उभा असला पाहिजे; हें जसें, तसेंच जेवलों म्हणजे जेवलों नव्हे तर दुसरे दिवशीं कडकडून भूक लागली पाहिजे, तरच तें खरें जेवण.

३४

"औषध काय अनुत्तम भोजननिद्रादिकांत परिमितता।"

३५

युक्ताहारविहारानें जठराग्नीवर फाजील दडपण न पडतां अन्नपचन चांगलें होऊन शरिरास फायदा होतो. स्वामी रामतीर्थ म्हणतात, "मी फार थोडें खातों आणि जें कांहीं खातों तें चांगलें चावतो" (रामतीर्थ चरित्र). दीर्घायुष्य पाहिजे असेल तर जीभ आवरली पाहिजे. आहारविहाराचे बाबतींत नियमितपणा व निसर्गाला अनुकूल अशी साधी राहणीं हींच दीर्घायुषी जीवनाची सूत्रें होत.

३६

जेवण सावकाश म्हणजे पोटांत अवकाश ठेऊन, नीट चर्वण करून जेवणें हितप्रद आहे. सावकाश म्हणजे वायु संचरणार्थ जागा राखून ठेवणें.

'पूरयेत अशनेन अर्धम् तृतीयम् उदकेन वायोः संचरणार्थाय चतुर्थं अवशेषयेत्'--असें वैद्यकशास्त्र म्हणतें.

३७

रागावून कपाळाला आठ्या घालून वगैरें भोजन करणें आरोग्यास हानिकर आहे. कारण त्यामुळें पचन क्रियेवर वाईट परिणाम होतो. म्हणून पूर्वींची वहिवाट म्हणजे जेवतांना 'गोविंद' 'गोविंद' असा नामोच्चार करण्याची चाल आढळते. "ग्रासो ग्रासी गोविंदं। येणें स्मरणें अन्नशुद्ध।" (एक. भागवत)

पात्रावर घेतलेल्या अन्नाची कधीहि निंदा करू नये. 'अन्नंन निंद्यात्' (भृगुउपनिषद्) तर त्याची स्तुति करून भक्षण करणें व चित्त प्रसन्न ठेवणें व सात्त्विक विचारांनीं युक्त राखणें हीच शरीराची अंतःशुद्धि होय.

३८

पथ्याशिनां शीलवतां नराणां । सद्वृत्तभाजां विजितेंद्रियाणाम् ।
एवं विधानामिदमायुरेव । सत्यं भवेत् वृद्धमुनिप्रणीतम् ।।

सारावती नामक ज्योतिष ग्रंथांत ग्रहमानानें ठरलेलें आयुष्य जे कोणी शीलवान, सद्वर्तनी, पथ्यभोजी व जितेंद्रिय असतील अशांना मात्र लाभेल, इतरांस नाहीं, असें म्हटलें आहे.

शरीर निर्मळ व सुयंत्र ठेवण्याची विद्या फार सोपी आहे. माफक खाणें, वासनापासून दूर राहणें, शुद्ध मोकळ्या हवेंत व्यायाम करणें, जिभेचें लौल्य दंद करणें व सतत उद्योग करणें, म्हणजे आरोग्य महाग नाहीं. ' हितभुक् मितभुक् सोऽरुक् ' (वाग्भट) जो हितकर व मोजकें खातोपितो तो निरोगी राहतो. "तरवारीपेक्षां जिव्हेनें अधिक लोकांचे गळे कापले आहेत." अशी लॅटिन भाषेंत एक म्हण आहे; तींत बरेंच सत्य आहे.

३९

भोजनांत नेहमीं बदल असावा व एकाच वेळीं फार प्रकार असूं नयेत. मेवामिठाई व तळलेले बाजारी खाद्य पदार्थ बहुधा खाऊं नयेत ते असावे तितके स्वच्छ व चांगले नसतात यामुळें आरोग्यास विघातक होत. तुम्हांला ज्याची आवड असेल ते ते पदार्थ घरी करून खा.

४०

दुष्ट अन्नसेवन करूं नये अशी शास्त्राची आज्ञा आहे. आश्रयदुष्ट, कालदुष्ट, भाव दुष्ट, वाग्दुष्ट व संसर्गदुष्ट असे दुष्टतेचे प्रकार गुरुचरित्रांत वर्णिले आहेत. असले अगर अशा ठिकाणचे अन्न वर्ज्य होत. आज काल हॉटेले म्हणजे बाजारी अन्न खाण्याची प्रवृत्ति वळावली आहे. याचाच परिणाम बुद्धी भ्रष्ट होत चालली आहे.

## ४१

आरोग्य व दीर्घ जीवित्व यांचे मूळ घटक म्हणजे अत्यंत नियमितपणा, शुद्ध व मोकळी हवा, आवांक्याइतके श्रम व निष्काळजीपणा होत. आरोग्याला मूळ कारण आहार आहे. म्हणूनच श्रीकृष्णानें अर्जुनाला दुःख कमी होण्यासाठीं जे पांच उपाय सांगितलें आहेत त्यांत आहारविहार हा पहिला होय असें म्हटलें आहे. 'युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु। युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥'—भ. गी. ६–१७.

## ४२

भोजनपद्धति व व्यवहार यांतहि आपल्यास तपासून पाहण्यासारखें बरेंच आहे. काळहि झपाट्यानें बदलत आहे. तथापि स्वच्छता व आरोग्य यांचीं मूलतत्त्वें चिरंतन आहेत; त्यांत कधींहि बदल होणार नाहीं. पूर्वींचें सोवळें भांडें गेलें तरी हात धुण्याचे वेळेस प्रत्येकानें आपापलें उष्टें भांडें पिपांत बुडवून पाणी घेणें चांगलें नव्हेच. आजकाल तोल असा कशांत राहिलाच नाहीं. तसेंच भोजनपद्धतींतहि झालें आहे. कांहीं सोवळें नेसतात, तर कित्येक शर्ट घालूनच बसतात, दुसरे कित्येक याच्याहि पुढें जातात. तसेंच जेवण्याचें आमंत्रण घेऊन आयत्यावेळीं मालक कांहींतरी सबब दाखवून नकार दर्शविणें अगर ठरल्याप्रमाणें वेळेवर भोजनाची तयारी आमंत्रकाकडूनच न होणें, वाढपी वगैरेमंडळी अस्वच्छ असणें, भलताच आग्रह करून वाढणें अगर जेवणारानें उगाच अधाशीपणानें घेऊन पानांत अन्न टाकणें, हे दोष आपल्या भोजनपद्धतींत आहेत व ते व्यवहारांत उपेक्षणीय नाहींत. याकरितां त्यांचा त्याग केला पाहिजे.

## ४३

तसेंच जेवणाची बाब दिसण्यांत क्षुल्लक दिसली तरी प्रत्येकाचें जीवनसामर्थ्य इतर गोष्टींबरोबर तींतहि सामावलेलें असतें हें खोटें नाहीं. खऱ्या

समाधानानें होणारें जेवण व त्यापासून वाटणारा उत्साह कांहीं और आहे. कसें तरी कांहीं तरी खावयाचें, दोन गोळे घशाखालीं घालावयाचे व घटाघटा पाणी प्यावयाचें, कुठून तरी ढेकर द्यावयाचा, हा शुद्ध आचरटपणा होय. वाढलेल्या पदार्थांचा सुबकपणा न्याहाळावयाचा व प्रसन्न अंतःकरणानें तसेंच आपल्या जेवणाच्या पद्धतीनें दुसऱ्यांनाहि प्रसन्न करावयाचें हें मर्म लक्षांत ठेवलें पाहिजे.

## ४४

आजकाल आपल्या व्यवहारांत दांभिकपणा फार शिरला आहे. तोच प्रकार भोजनाचे बाबतींतहि. उगीच भीड अगर कोपरआग्रह फार. मनांत नसतां वर वर आग्रह करणें, उशीर झाला म्हणून एखाद्यानें निरोप घेतला तर त्यास "बसा हो जरा" म्हणून आग्रह करणें, हे शिष्टसंप्रदाय होऊन गेले आहेत. तसेंच जेवतांना उगाचच आग्रह करून वाढणें अगर भिडेनें नको असतां खाणें, या दोन्ही गोष्टी त्याज्य होत. ज्याला आयुष्यांत कांहीं तरी कार्य करावयाचें आहे त्यानें जेवणाचे कामीं अनियमितपणा, हयगय अगर भीड करतां कामा नये हें नेहमीं प्रत्येकानें लक्षांत ठेविलें पाहिजे.

## ४५

भोजनसमयीं आपल्यांत आग्रह करून वाढप करण्याची पद्धत आहे. तिचा मूळ हेतू एखाद्यास संकोच न व्हावा असा शुद्ध व सोज्वळ असला तरी अत्याग्रह आणि अनाग्रह दोन्ही त्याज्यच. यजमानाचे एकादेवेळ असो पण पंक्ति वारगीरच केव्हां केव्हां आपापसांत आग्रह करून यजमानाचा अधिकार आपणाकडे घेऊन कुचेष्टेचे प्रदर्शन करतात. ते सर्वथैव अयोग्य.

## ४६

भोजनाचा व आरोग्याचा जितका निकट संबंध आहे तितकाच व्यायामाचा व आरोग्याचा आहे. खाणेंपिणें आणि झोंप ही जितकी अवश्य आहेत तितकाच व्यायामहि आहे. आजकाल आमचें आरोग्य हॉटेलांच्या हातांत गेलें आहे. चहाचिवडा व भजी यांचा बेसुमार प्रसार आरोग्याचा घात करीत आहे. तसेंच व्यायामाकडे व शरीरबलसंवर्धनाकडे अक्षम्य दुर्लक्ष्य,

शारीरिक कष्ट न करण्याकडे प्रवृत्ति. हें मध्यमवर्गाच्या अनारोग्याचें मूळ कारण आहे. मध्यमवर्ग खाण्याला कमी करीत नाहीं, पण त्या मानानें शारीरिक कष्ट करीत नाहीं. या मनःप्रवृत्तींत फरक पडला नाहीं तर व्यायामानें शरीर कमावलेले लोक वस्तुसंग्रहालयांतच पाहावयास मिळतील, अशी साधार भीति वाटते. 'मनगटाचा जोर कोटि मनुष्यांहून थोर', हें भावी पिढीच्या मातापित्यांनीं व पालकांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे.

## ४७

भोजनांत साधेपणा हा आरोग्याचे दृष्टीनें तर आहेच पण व्यवहाराचे दृष्टीनेंहि आवश्यक आहे. पदार्थांच्या अनेक प्रकारांनीं अनेक विकार होतात हें जितकें खरें, तितकेंच अनेक प्रकारांनीं एकाचाहि खरा स्वाद कळत नाहीं. शिवाय 'रांधा आणि उष्टीं काढा' यांतच आपल्या महिलांचा बराच वेळ जातो, हेंहि लक्षांत घेणें अगत्याचें आहे.

## ४८

यांत्रिक सुधारणा जसजशी पुढें जाऊं लागली आहे, तसतसा मनुष्य अधिकाधिक ऐदी, आळशी व कृत्रिम रहाणीचा बनू लागला आहे. गिरणींत दळलेलें पीठ पचनास निःसत्त्व असतें. इकडे कोणाचे लक्ष जात नाहीं. घरोघरची जाती आतां प्रदर्शनांतूनच पाहण्याचा काल आला आहे. वास्तविक घरचें जातें सर्व रोगांना पिसून काढतें. घरचें दळणें, कांडणें स्त्रियांच्या व्यायामाला उपयुक्त असत. त्यांचें सहजीं आरोग्य राहात असे.

## ४९

भोजन व्यवहारांत जेवून उठतांना पान निर्मळ राखण्याचा दंडकही प्रत्येकानें पाळला पाहिजे. अधिक मागून घेऊन मग टाकून उठणें, मग तें उष्टें अन्न रस्त्यावर कसे तरी टाकणें, हा अन्नाचा अपव्यय आहे. समर्थ म्हणतात.

"आपण यथेष्ट जेवणें । उरलें तें अन्न वाटणें
परंतु वायां दवडणें । हा धर्म नव्हे" —दा. बो.

५०

प्रत्येक गोष्टीला नियम असतात; असावयालाच पाहिजेत. तसें भोजनाचेंहि आहे. हे नियम न पाळले गेल्यामुळेंच शरीरस्वास्थ्याची व आरोग्याची हानि होते. म्हणून असे ठोकळ नियम खालीं दिले आहेत :—

१ प्रथम परिश्रम करा आणि नंतर खा.

२ साधारणपणें दोनच वेळां जेवा (दिवसा बाराचे आंत, रात्रीं आठाचे आंत).

३ रात्रीं हलका आहार घ्यावा. 'एकभुक्त सदा रोगमुक्त'.

४ घशापर्यंत खाऊं नका. अन्न चर्वण करून खा.

५ गोड पदार्थ कमी खावे. गोड पदार्थामुळें दांत खराब होऊन पचनशक्ति बिघडतें.

६ भोजन मित व सावकाश असावें व तें साधें व ताजेंच असावें.

७ कढईपासून दूर राहा. तळलेले पदार्थ पचनास कठीण असतात.

८ चहा वगैरे उष्ण पेयें वर्ज्य करा.

९ भोजन व खाणें नेमलेल्या वेळींच करा.

१० शुद्ध कमाईचे अन्न खां. चोरी, अपहार वगैरेंनीं मिळविलेल्या द्रव्यापासून संपादिलेले अन्न दूषित होते.

११ आपले राहणें ज्याला भारभूत होतेसे दिसतें अशाचे घरीं भोजन करूं नये.

१२ जेवणानंतर तोंड स्वच्छ ठेवण्याविषयीं पूर्ण काळजी ठवावी. घाणेरड्या दांतांमुळें पुष्कळ रोग होतात.

१३ उषःपानाची सवय ठेवावी. त्यानें मलशुद्धि होते.

१४ फार खाल तर थोडें खाल आणि थोडें खाल तर फार खाल, यांत पुष्कळ अर्थ आहे. (पंतप्रतिनिधि).

१५ जवणप्रसंगीं कोणाचें पत्र हातीं आल्यास तें लगेंच फोडून वाचू नये.

५१

कोणाकडे आमंत्रणानुसार भोजनास गेल्यास भोजनानंतर—यजमान यजमानिणीचा निरोप घेण्यास सहसा विसरूं नये. भेटून जाणें व्यवहारांत अगत्याचें आहे.

# ४

# पोषाख

१

वस्त्र वापरण्याचा मूळ हेतु शीत, उष्ण, वायु यांजपासून शरीराचें संरक्षण करणें हा आहे. नुसत्या वैभवाचें प्रदर्शन करणें नव्हे. पोषाखाचेहि कांहीं सर्वसाधारण नियम आहेत आणि पद्धतिही ठरलेली असते. म्हणून त्या पद्धतीला धरून, वेळेला अनुकूल व परिस्थितीला अनुसरून आणि शरीराला नीट बसेल असाच असावयास पाहिजे.

२

आपला स्वदेशी पोषाख सोडून जाणूनबूजून विजातीय व परदेशी पोषाख आपलासा करणें ठीक नव्हे. आपली सभ्यता आपल्या राष्ट्रीय पोषाखांत आहे.

३

राष्ट्रीय पोषाखाविषयीं परकीय लोक किती दक्ष व तीव्र अभिमानी असतात, हें पहाण्यासारखे आहे. हिंदुस्थानसारख्या उष्ण देशांत आपला राष्ट्रीय पोषाख व इतरहि चालीरीती त्या त्या देशाचे लोक सोडीत नाहींत. प्रांतीय हवामानाप्रमाणें थोडासा फरक राहिला तरी आतां शेष हिंदुस्थानांत भाषा लिपी वगैरेप्रमाणें पोषाखांतहि राष्ट्रीयता आणिली पाहिजे.

४

कपडे वापरण्याचा कांहीं एक परिपाठ (फॅशन) अगर संकेत ठरलेला असतो; त्याविरुद्ध कपडे करूं नयेत. उदाहरणार्थ, कोटावर सदरा, अगर

विजार नेसून डोकीवर पगडी घालणें, अगर धोतर नेसून इंग्रजी टोपी (हॅट) घालणें, हें विपरीत दिसतें. कोणताहि पोषाख करणें तो एका पद्धतीचा असावा. अर्धा स्वकीय अर्धा परकीय असा धेडगुजरी करणें बरा दिसत नाहीं.

५

कित्येकजण नेहमीं मळकट कपडे वापरतात व एखादा सण व उत्सव आल्यावेळीं मात्र एकदम उंची भडक कपडे वापरतात. तें अनुचित होय. कपडे नेहमीं एकसारखे साफ व साधे असणें अधिक चांगलें. पोषाखावर मोठेपणा नाहीं. खरा मोठेपणा मनुष्याचे गुण, शील अगर स्वभाव यावरून समजला जातो.

६

वयपरत्वें आपल्या पोषाखांत बदल केला पाहिजे. तरच तें शोभून दिसतें. लहानपणचा पोषाख प्रौढपणीं व प्रौढपणचा पोषाख उतारवयांत करणें हास्यास्पद होय. कपडे ऋतुमानाप्रमाणें पाहिजेत. थंडीच्या दिवसांत मलमल अगर उन्हाळ्यांत गरम कपडे वापरणें म्हणजे शुद्ध अडाणीपणा होय.

७

कालमानाप्रमाणें पोषाखांत व राहणींत एकंदरीनें सर्वांतच असाधारण फरक होऊं लागला आहे अगर झाला आहे. पण त्यांत स्वाभिमानाची दृष्टी नाहीं. वेषभूषा आणि केशभूषा यांचे बाबतीत स्त्रियांनीं गोलपातळ नेसणें व शेपटा सोडणें व पुरुषांनीं शिरोभूषण विरहित बाहेर जाणें आजकाल समाजांत फार मोठ्या प्रमाणावर रूढ होत आहे. ह्या गोष्टी जुन्या भारतीय संस्कृतीला धरून नाहींत. भर उन्हांतून अगर पावसांतूनहि बोडक्यानें फिरणें वैद्य शास्त्रालाहि संमत नाहीं. समाजानें एका काळीं अनुभवून त्याज्य ठरविलेल्या गोष्टी पुन्हां रूढ अट्टाहासाने करण्यांत कोणचें हित साधतें याचा पोक्त विचार करावा.

८

कित्येकांस–विशेषत: बायकांना–ऐपतीपेक्षां भारी किंमतीचे कपडे वापरणें खोटे दागिने वापरणें यांची हौस असते. ही चांगली नव्हे. आपला असेल तो साधा ऐपतीला शोभेलसा कपडा वापरणें हिताचें आहे. मात्र तो स्वच्छ व नीटनेटका असावा. बावळट मनुष्याची किंमत कमी होते.

९

आपल्या संस्कृतीला सोडून व पाश्चात्यांच्या नकली भपक्याला भुलून आपण अंधानुकरण करीत आहोंत. पोषाखांत प्रतिसाहेब बनणें, मुलाबाळांची हौसेनें का होईना बायका मुलांची पोषाखासंबंधीची फाजील हौस भागविणें, संस्कृतीला सोडून आहे. आतां देश स्वतंत्र झाला आहे. हें परानुकरण पुरें.

१०

सिनेमांत दाखविल्या जात असणाऱ्या दृश्यांमुळें विशेषत: स्त्रियांत वेशभूषा, केशभूषा, अलंकार वगैरे बाबतींत अंधानुकरण झपाट्यानें होत आहे. पोलक्यांच्या बाह्या आंखूड करणें, पदर अस्ताव्यस्त पेहरणें ही प्रथा विशेषत: पांढरपेशांत वाढत आहे. सौंदर्याची शोभा आच्छादनांत असते, हें विसरूं नका.

११

शिखा, श्मश्रूचा त्याग ही एक सर्वसाधारण प्रथा भारतांत सर्वत्र रूढ होत आहे. या बिचाऱ्या केंसांचा असा कोणता घोर अपराध आहे कीं त्यांच्या मुळावरच जो तो उठतो! छत्रपति शिवाजी महाराज, राणा प्रताप, नरवीर तानाजी अगर विद्यमान जनरल नानासाहेब शिंदे यांच्या तसबिरा अवलोका आणि आजकालच्या नवयुवकांचे चेहेरे न्याहाळा म्हणजे काय फरक दिसतो पहा. उत्तर भारतांत ठेवतांत तशी खुणेपुरती तरी शिखाश्मश्रु अवश्य आहे. तानाजीच्या मिशा इतक्या भरदार व राठ होत्या कीं उभय भागीं लिंबें

ठेवलीं तरी त्या अचल राहत. शिखा–स्मश्रू या बाह्य धार्मिक चिन्हांच्या रक्षणाकरितांच केवळ एका काळीं रक्ताचे पाट वाहवले आहेत. त्यांचा अकारण त्याग म्हणजे शुद्ध अविवेक.

१२

एका काळीं मिशी गहाण ठेवणें फार बेअब्रूचें समजलें जात असे. तर श्मश्रूविरहित चेहरा हें सध्या एक प्रकारचे सौंदर्य मानलें जातें. हा काल-महिमा ! ! माजी राजप्रतिनिधि लॉर्ड कर्झन हे या प्रथेचे उत्पादक होते असें म्हणतात. इंग्रजांना ते कसेही शोभो. भारतीय संस्कृतीच्या दृष्टीनें पुरुषाला मिशा हें एक भूषण आहे. ईश्वरी देणगी आहे. स्त्रीला ती दीर्घ तपस्येनेंही प्राप्त होत नाहीं. हा निसर्ग आहे. ब्रह्मचाऱ्यानें दीर्घश्मश्रू असावें असें अथर्ववेदांत सांगीतलें आहे. एवढी तरी गोष्ट नवयुवकांनीं लक्षांत घ्यावी.

१३

आजकाल पोषाखाच्या इतक्या कांहीं फॅशन्स निघाल्या आहेत, प्रत्यहीं निघत आहेत कीं, डझनवारी कपडे असले तरी पुरे पडत नाहींत. पोषाखाचे बाबतींत द्रव्याचा बराच अपव्यय होतो. विशेषतः विद्यार्थ्यांनीं इकडे लक्ष दिलें पाहिजे. नुसत्या पोषाखानें मनुष्याची योग्यता वाढत नाहीं. उलट हसें होतें.

१४

पुष्कळांस आपण आहों त्यापेक्षां अधिक श्रीमंत दिसू देण्याची खोड असते. नसती उसनी ऐट आणणें, कोरडा डामडौल करणें, उधारी उचापत करणें, याचे पागोटें त्याच्या डोक्यावर–त्याचें पागोटें याच्या डोक्यावर करणें, लग्नकार्यांत वगैरे मागचा पुढचा विचार न करतां खर्च करणें, या गोष्टी व्यवहारांत अत्यंत हानिकर आहेत. असून दैन्य दाखवणें जसें वाईट तसेंच नसती ऐट व पोकळ डामडौल करणें तितकेंच वाईट होय.

१५

पोषाख साधा, स्वच्छ, सफेत, नीटनेटका व सभ्यतेचा असावा. छानछोकी असूं नये. घामट अथवा गबाळें पण असूं नये. गबाळ्या माणसाबद्दल कोणासहि केव्हांहि आदर वाटत नाहीं.

१६

पोषाखानें मनुष्याच्या स्वाभाविक दर्शनांत थोडी भरच पडते. एवढेंच नाहीं तर पोषाख म्हणजेच खरें दर्शन होय. आपण दिसतो कसे हें प्राय: आपण कोणते कपडे आणि ते कसे वापरतों यावर अवलंबून आहे.

१७

पोषाखाचे खरे मोल स्वच्छतेवर आहे. भारी मोलाचा कपडा असला तरी तो नीट न वापरला, स्वच्छ न ठेवला तर तो बरा दिसणार नाहीं व टिकणारहि नाहीं.

१८

पोषाखाप्रमाणें लहान मुलांच्या अंगावर कांहींना कांहीं दागिना वगैरे घालण्याची कित्येकांस अनिवार हौस असते; पण परिणामीं हें चांगलें नसतें. एक तर शारीरिक वाढीला तें बरें नव्हें. दुसरें पुष्कळ वेळां अनर्थाला कारण होतें. मुलांचे अंगावर दागिने घालण्यापेक्षां त्यांचें संगोपन चांगलें करणें, आरोग्य चांगलें राखणें, चांगल्या संवयी लावणें, त्यासंबंधीं दक्षता घेणें या गोष्टी जास्त श्रेयस्कर होत.

१९

पोषाख नेहमीं स्वच्छ, सुटसुटीत व त्या त्या व्यवसायाला अनुकूल असा असावा. आपला पेशवाई थाटाचा पोषाख, लोडाला टेकून बसावयाला अगर मंडपशोभेला ठीक आहे. पण चालू जमान्यांतल्या यांत्रिक कामाशीं

संबंध येईल तेव्हां, अगर कोणत्याहि चलाखीच्या कामाला निरुपयोगी आहे. उदाहरणार्थ भरधांव पळणें, पहाडी प्रदेशांत पायीं प्रवास करणें वगैरे कामीं तो अगदीं अडचणीचा होतो. रेलवे प्रवासांत पुष्कळ वेळां धोतर पायांत अडकल्यामुळें अनेक अनर्थ झाले आहेत. या दृष्टीनें अर्धी विजार उपयुक्त होय.

२०

'एक नूर आदमी आणि दस नूर कपडा' यांत बरेंच तथ्य आहे. ठाकठिकीच्या पोषाखानें एखादा अजागळ मनुष्यहि रुबाबदार दिसतो; व अंगाबरोबरीचे कपडे असले म्हणजे घालणारालाहि ऐटदार चालावेंसें व बोलावेंसें वाटतें. आपला व्यवसाय, सामाजिक दर्जा व आपली परिस्थिति यांस अनुसरून योग्य असाच पोषाख असावा.

२१

एखाद्या सार्वभौम राजानें भिक्षेकऱ्याचा वेष घेतला तर त्याची संभावना भिकाऱ्याप्रमाणेंच होणार. पोषाख पाहूनच प्रथम व्यवहारांत या–बसा होते. योग्यता मागाहून पाहिली जाते. इतकेंच पोषाखाचें महत्त्व आहे.

२२

चांगला व नीटनेटका पोषाख असणें हें एक प्रकारचें भांडवल आहे. त्यावर व्यवहाराचे पेठेंत आपली किंमत वाढवितां येईल, निदान आहे ती कमी तरी होणार नाहीं.

२३

काळ, वेळ, वय, प्रसंग व कार्य इतक्यांचा मेळ पोषाखाचे बाबतींत ठेवणें व्यवहारांत नितान्त आवश्यक आहे.

२४

पोषाख ऋतुमानाप्रमाणेंच असावा. आपला देश उष्ण असल्यामुळें पांढरे कपडेच हितावह होत, कारण पांढरा रंग उष्णता शोषून घेणारा नसतो. रंगी बेरंगी पोषाख सहसा नसलेला बरा.

२५

"वयानुरूपो वेषः" वयोमान व पेषा यांना अनुसरून पोषाख असला तरच त्याची समाजांत इभ्रत रहाते.

२६

रूपानें नीटस असून भोंगळ पोषाखानें मनुष्य वेंगरूळ दिसतो. कोणतीहि गोष्ट प्रमाणांत पाहिजे. एखाद्या लठ्ठभारतीनें नाजूक वेताची छडी हातांत धरणें अगर एखाद्या काडी पैहिलवानानें भला मोठा सोडगा बाळगणें ही दोन्ही त्याज्यच.

२७

राष्ट्रीय दृष्टीनें पोषाख हाहि एक विचार करण्यासारखा विषय आहे. पोशाखाच्या साम्यतेमुळें देखील आपलेपणा उत्पन्न होण्यास पुष्कळ मदत होते. हिंदुसमाजांत इतर बाबतींप्रमाणें पोषाखांतहि विस्कळितपणा आहे. कोणी रुमाल बांधतो तर कोणी साध्या टोपीवरच भागवतो. त्यांतहि पुन्हां विसंगति आहेच. पायांत वहाणा घालून वर साहेबी टोपी घालून रस्त्यावर ऐटीनें हिंडणारे आढळतात. हा नुसता विक्षिप्तपणा आहे. पोषाखाच्या साम्यतेनें देखील पुष्कळ उच्चनीच व कृत्रिम भेदभाव नाहींसे होतील. प्रांताप्रांतागणिक जी पोषाखपद्धति आहे तींत थोडा फरक करून पुढाऱ्यांनीं हिंदुस्थानचा एक राष्ट्रीय पोशाख ठरवून तो प्रचारांत आणला पाहिजे.

२८

गणवेष अगर एकसारख्या रंगाच्या पोषाखाचें महत्त्व कांहीं विशेष आहे. सैनिक अगर साध्या रक्षक-दलाचा ठराविक गणवेष उठावदार दिसतो तसाच रुबावांत भर घालतो. गणवेषाचें महत्त्व व उपयुक्तता प्राचीनांसहि अवगत होतीसे दिसते. राजा कार्तवीर्य परशुरामाचे आश्रमांत सैन्यासह आल्यावेळीं त्यानें नील वस्त्र धारण केलें होतें. त्याची छत्री नीलवर्णाची होती आणि सैन्यहि नील वर्णाचें होतें, असें गणेश पुराणांत वर्णन आहे.

## २९

गणवेषाचें महत्त्व स्वभावसिद्ध आहे. गणवेषानें मनुष्याचा पंथ, सांप्रदाय धंदा, नौकरीपेषा इत्यादि अनेक प्रकारांचा बोध होतो. इतरांपासून तो ओळखला जातो, व तो घालणारासही त्याचे कर्तव्याची जाणीव होण्यास सहाय्य होते. पेषास अनुसरून गणवेष असणें व्यवहारांत आगत्याचे आहे.

पोषाखाबाबत पुढील ठळक नियम लक्षांत घ्यावेत;

१ अंगाजोगता असावा.

२ ऋतुमानाप्रमाणें त्यांत जरूर फेरफार करीत असावें.

३ तो भडक असूं नये; आपल्या वर्णाला व वयाला साजेल असा असावा.

४ नवीन टूम निघतांच तिची उपयुक्तता पारखल्याखेरीज तिला कवटाळूं नये.

५ पोषाख एकाच धर्तीचा अगर पद्धतीचा असावा, घेडगुजरी व रंगीबेरंगी असूं नये.

६ डोकीवर टोपी असल्यास वेडीवाकडी करून घालूं नये. फेटा असल्यास तो नीट बांधावा.

७ सदासर्वदा खिशांत हात घालीत जाऊं नये.

८ ज्या समाजांत व समारंभास जावयाचे आहे तदनुकूल पोषाख करावा.

९ सर्व जण जेथें डोक्यास घालून बसतात तेथें आपणच उघडें बोडकें बसूं नये.

१० चालतांना पाय ओढीत चालूं नये व पादत्राणें नेहमी साफ ठेवावीत

---

५

# संभाषणप्रसंग

१

आपल्याला पूज्य, वयानें वडील व माननीय अशांशीं भाषण करणें झाल्यास विनयानें व नम्रतेनेंच करावें. त्यांत बेपरवाई अगर आडमुठेपणा असूं नये.

२

लंगोटीयार मित्राशीं अगर दाट ओळखीच्याशींच थट्टामस्करी करणें ठीक आहे. आपल्याहून वडील अगर लहान अशांशीं थट्टामस्करी करणें शोभत नाहीं. दाट मैत्री जरी झाली तरी थट्टेमध्यें अपशब्दांचा प्रयोग करूं नयें. अलंकारिक भाषेंत सभ्य विनोद केला तर त्यांत एक प्रकारचा आनंद आहे.

३

थट्टा अशांशीं करावी कीं त्याला ती सहन करण्याची शक्ति असावी व जर त्यानें उलट आपली थट्टा केली तर ती आपल्याला सहन झाली पाहिजे. नाहीं तर करूंच नये.

४

लोकाशीं बोलतांना—ते आपल्यापेक्षां वडील असोत अगर लहान असोत महाराज, साहेब, राव, पंत इत्यादि शिष्टचारसूचक शब्दांचा गौरवार्थी उपयोग करावा. कोणाशींहि कठोर शब्दांनी बोलूं नका. वाणींतच अमृत आहे व तींतच विषहि आहे.

५

मनुष्याची योग्यता, त्याची संगति वगैरेचें सम्यक्ज्ञान, बहुधा त्याच्या भाषणाचे रागरंगावरून अनुमानितां येते. अतएव एक हात लाकूड आणि आठ हात ढलपी असें असंबद्ध भाषण करूं नये.

६

नुसत्या गोड बोलण्यानेंच पुष्कळ लोक वळतात. त्यामुळें पुष्कळ वेळां कोणतेही काम लवकर होतें हा नेहमीचा अनुभव आहे. दुसरा कोणताही गुण नसला तरी वाणी निदान गोड असावी.

७

बोलणें तें भलेंच बोलावे, नाहीं पेक्षा अबोला असलेला बरा. भाषण नेहमी अर्थयुक्त, सत्य, हितकर, मोजकें, योग्य व ज्यावर कोणाला शंका काढता येणार नाहीं असें असावें. उपहासमिश्रण प्रतारणा करून अगर वर्मी लागेल, असें भाषण सहसा करूं नये.

८

तोंडानें शिवीगाळ करणें ही फार वाईट गोष्ट आहे. रागाच्या आवेशांत कित्येकांस अशी संवय असते कीं, ते सहज बोलतां बोलता अपशब्दांचा वर्षाव करतात. अशा वेळीं त्यांच्या जिभेवर नक्षत्रच पडलें आहे, असें म्हणून जाणते लोक त्यांचा उपहास करतात. रसना न आवरल्यामुळे शरीरांत रोग उत्पन्न होतात तसे जगांत वैरी उत्पन्न होतात.

९

ज्याच्याशीं गप्पागोष्टी अगर व्यवहार करणें आहे त्याच्या स्वभावाची प्रथम परीक्षा करा. कोणाहि अपरिचित व्यक्तीशीं पहिल्याच प्रसंगीं परिचित व्यक्तीप्रमाणें व्यवहार करण्याच्या भानगडींत पडूं नका.

१०

कित्येकांस आपला पक्ष खोटा असला तरी तो येन केन प्रकारेण खरा करूं पाहण्याची हौस असते. ही लबाडी आहे. विरुद्ध बाजूची गोष्ट न्यायाची असेल तर तिला तावडतोब मान द्या.

११

तोंडानें नेहमीं शुद्ध, उत्तम, गोड अगर सभ्य भाषाच वापरावी. कारण रंग, रूप अगर पोषाख यांवरून सभ्यतेची अगर असभ्यतेची परीक्षा केव्हां केव्हां फारशी होत नाहीं; पण संभाषणावरून तेव्हांच होते.

१२

एखाद्याला एखादीं गोष्ट कबूल केली असेल तर ती पूर्ण करण्याकडे लक्ष्य असावें. होण्यासारखी नसेल तर अगर करण्याची इच्छा नसेल तर खोटा भरंवसाहि देऊं नयें.

१३

गप्पा मारतांना कित्येकांस डोळे फिरविणें, पापण्या मिचकावणें वगैरे खोडी असतात. त्यांपासून अलिप्त रहा.

१४

सभ्यतेनें बोला, शिस्तीनें चाला, आज्ञाधारक बना आणि डोकें वापरा ही एक व्यवहारांतली फार मोठी चतुःसूत्री आहे.

१५

चेष्टेनें बोलण्याची कित्येकांना खोड असते. विनोद अगर छद्मी भाषण एखादे वेळींच खुलून दिसतें आणि रंजन होतें. पण घटके घटकेला कोटया करणें व चेष्टेवर नेणें, नसतें छिद्रान्वेषण करणें म्हणजे विनाकारण अप्रियता पत्करणें आहे. फाजील फटकळापणामुळें इतर सद्गुणांवर पाणी पडते हें विसरूं नये.

१६

आत्मप्रशंसा कधींहि करूं नये. मनुष्यानें आपलें काम किंवा कर्तव्य असें करावें कीं, लोक आपण होऊन त्याची प्रशंसा करतील.

१७

देशकालप्रसंग यांकडे लक्ष्य ठेवून बोललें पाहिजे. केव्हां केव्हां पवित्र शब्द देखील भलत्याच वेळीं उच्चारिले तर मोठाच अनर्थ गुदरतो. एरवीं 'रामनाम सत्य आहे' हें वाक्य पवित्र आहे; तथापि सर्वसाधारणपणें अशुभ वेळेला हें वाक्य उच्चारलें जात असल्यामुळें विवाहादि शुभ कार्याचे वेळीं असें म्हणणें अशुभ मानलें जातें. प्रसंगानें शब्दाचे अर्थ बदलले जातात ते असे.

१८

संभाषण नेहमीं मित, अकठोर, कोणाचाहि उपमर्द व उपहास न करणारें असें असावें; व त्यांत विनय, मार्दव व गोडी असावी. तरच वाणीचा खरा उपयोग. म्हणूनच मोरोपंत म्हणतात—

बोले तूं परि बोल तोल धरुनि सद्वाणि ही संपदा ।

विनय चांगला खरा पण सर्व गोष्टींप्रमाणें त्यालाहि मर्यादा आहेच. फाजील विनयहि चांगला नव्हे. अधिक लवून नमस्कार करणारे अगर हात जोडणारे महापापी व ठक असतात, ही खूणगांठ ठेवावी.

१९

वर्तनांत तर पाहिजेच पण बोलण्यांतहि सरळपणा असावा. तुसडेपणा असूं नये. त्यामुळें कार्यनाश होतो व आपल्याविषयीं विनाकारण अप्रीति उत्पन्न होते.

२०

गोड भाषण म्हणजे जें बोलावयाचें असेल तें योग्य तितक्या सौम्य शब्दांनीं व सभ्य भाषेनें बोलणें यांत कांहीं खर्चत नाहीं. पण कित्येकांस

हा विवेक राहत नाहीं व व्यवहारांत पुष्कळ वेळां त्यांचें बोलणें अहितकर होतें. उदाहरण द्यावयाचें तर ‘आमचेकडे भोजनास यावें,’ हें जेवणाचें आमंत्रण व ‘आमचेकडे पुल्ल्याला ये’ अगर ‘गिळायला ये’ हेंहि आमंत्रणच. पण एक जितके सभ्यतेचें तितकेंच दुसरे असभ्यतेचे व मनस्ताप करणारें आहे.

## २१

गोड बोलण्यास खोटें बोललेंच पाहिज असा कांहीं दंडक नाहीं. मग निष्कारण अप्रिय भाषण करून परस्परांचीं मनें कलुषित करण्यांत अर्थ कोणता ?

जिव्हाग्रे वसते लक्ष्मी जिंव्हाग्रे मित्रबांधवा: ।
जिव्हाग्रे राजसन्मानो जिव्हाग्रे बंधनं भवेत् ।।

मनुष्य आपल्या जिव्हेचा उपयोग करील त्याप्रमाणें लक्ष्मी, मित्र, बांधव व राजसन्मान किंवा उलट दारिद्र्य, शत्रु व बंधन हीं प्राय: होतात. गोड भाषणानें दोष देतां येतो व उपदेशहि करतां येतो. “हितं मनोहारि च दुर्लभं वच: ।” केवळ जिव्हेचा दुरुपयोग केल्यानें पुष्कळ वेळां स्नेहांत अंतर येतें.

बहुकाळींचा मित्रसंबंधु । तोंडीं एक बोखटा शब्दु ।
जैसा कांजीचा स्वल्पबिंदु । घटचि नाशी दुग्धाचा ।।–श्रीधर.

## २२

कित्येकांस सहज बोलतांना देखील अपशब्द वापरण्याची संवय असते. कित्येकांचें जिभेवर नक्षत्र पडलें आहे अगर जिभेला हाडच नाहीं म्हणतात. म्हणजे हरएक क्षणीं शिवीगाळ अगर अपशब्दांचा भडिमार व ग्राम्य शब्दप्रयोग चालूच असतो. हें सभ्यतेस सोडून आहे व व्यवहारास गर्ह्य आहे. हें केव्हां केव्हां स्वत:च्या कुटुंबीयांना, कन्यापुत्रांना देखील अनुलक्षून होतें. मग परजनांविषयीं वगैरे विचारावयासच नको. तांगेवाले, गाडीवाले हीं या बाबतीतली मूर्तिमंत उदाहरणें होत. मुक्या जनावरांना वाचा असत नाहीं म्हणून बरें; नाहीं तर तीं सूड उगवल्याशिवाय राहतीं ना! गाडीवाले व

टांगेवाले जन्मभर दरिद्री राहतात याचें कारण मुक्या जनावरांचा शाप असेल. *शस्त्रांनीं झालेली जखम भरून येते पण शब्दांनी झालेली केव्हांहि भरून येत नाहीं हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे.*

फुटलें मोतीं तुटलें मन । सांधूं न शके विधाता ॥ –मुक्तेश्वर

## २३

व्यवहारांत भाषणप्रसंग हरघडीं लहानमोठ्याशीं, श्रीमंतगरीबांशीं. बायकांमुलांशीं, शेजाऱ्यांपाजाऱ्यांशीं, सहाध्यायी व व्यवसायबंधु वगैरेशीं येतात व येणारच. त्या प्रसंगीं अनुसरून सभ्यतेनें वागणें व एकोपा संपादन करणें यांतच व्यवहार चातुर्य आहे. "जगापाशीं जगमित्र, जिव्हेपाशीं आहे सूत्र" हा सिद्धान्त आहे. कित्येकांस दुसऱ्यास टोंचून बोलण्याची अगर हसत हसत चिमटे घेण्याची संवय असते. ही खऱ्या सौजन्यास विघातक आहे.

## २४

विचारल्याशिवाय सल्लामसलत देऊं नये, उपदेश अगर बोध करूं नये. त्याचें महत्त्व वाटत नाहीं.

## २५

बोलणारांचीं गाजरें विकतात, न बोलणाराची केळीं विकत नाहींत म्हणतात तें खोटें नाहीं. व्यवहारांत शिक्षक, वकील, वैद्यक वा व्यापारी असे कितीतरी पेषाचे गृहस्थ बुद्धिमान असूनही बोलण्याची हातोटी न साधल्यामुळे आपापल्या व्यवहारांत न चमकता मागें पडलेले दिसतात.

## २६

लवणाखेरीज अन्नाला व विनयाखेरीज भाषणाला रुचि नसते, हा सिद्धांत आहे. संभाषणप्रसंगीं विनयाची आवश्यकता आहेच. पोकळ ताठा फशीं पाडल्याविना राहात नाही.

हा विवेक राहत नाहीं व व्यवहारांत पुष्कळ वेळां त्यांचें बोलणें अहितकर होतें. उदाहरण द्यावयाचें तर 'आमचेकडे भोजनास यावें,' हें जेवणाचें आमंत्रण व 'आमचेकडे पुल्ल्याला ये' अगर 'गिळायला ये' हेंहि आमंत्रणच. पण एक जितके सभ्यतेचें तितकेंच दुसरे असभ्यतेचे व मनस्ताप करणारें आहे.

## २१

गोड बोलण्यास खोटें बोललेंच पाहिज असा कांहीं दंडक नाहीं. मग निष्कारण अप्रिय भाषण करून परस्परांचीं मनें कलुषित करण्यांत अर्थ कोणता ?

जिव्हाग्रे वसते लक्ष्मी जिव्हाग्रे मित्रबांधवाः ।
जिव्हाग्रे राजसन्मानो जिव्हाग्रे बंधनं भवेत् ।।

मनुष्य आपल्या जिव्हेचा उपयोग करील त्याप्रमाणें लक्ष्मी, मित्र, बांधव व राजसन्मान किंवा उलट दारिद्र्य, शत्रु व बंधन हीं प्रायः होतात. गोड भाषणानें दोष देतां येतो व उपदेशहि करतां येतो. "हितं मनोहारि च दुर्लभं वचः ।" केवळ जिव्हेचा दुरुपयोग केल्यानें पुष्कळ वेळां स्नेहांत अंतर येतें.

बहुकाळींचा मित्रसंबंधु । तोडी एक बोखटा शब्दु ।
जैसा कांजीचा स्वल्पबिंदु । घटचि नाशी दुग्धाचा ।।—श्रीधर.

## २२

कित्येकांस सहज बोलतांना देखील अपशब्द वापरण्याची संवय असते. कित्येकांचें जिभेवर नक्षत्र पडलें आहे अगर जिभेला हाडच नाहीं म्हणतात. म्हणजे हरएक क्षणीं शिवीगाळ अगर अपशब्दांचा भडिमार व ग्राम्य शब्दप्रयोग चालूच असतो. हें सभ्यतेस सोडून आहे व व्यवहारास गर्ह्य आहे. हें केव्हां केव्हां स्वतःच्या कुटुंबीयांना, कन्यापुत्रांना देखील अनुलक्षून होतें. मग परजनांविषयीं वगैरे विचारावयासच नको. टांगेवाले, गाडीवाले हीं या बाबतीतली मूर्तिमंत उदाहरणें होत. मुक्या जनावरांना वाचा असत नाहीं म्हणून बरें; नाहीं तर तीं सूड उगवल्याशिवाय राहतीं ना! गाडीवाले व

तांगेवाले जन्मभर दरिद्री राहतात याचें कारण मुक्या जनावरांचा शाप असेल. शस्त्रांनीं झालेली जखम भरून येते पण शब्दांनी झालेली केव्हांहि भरून येत नाहीं हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे.

फुटलें मोतीं तुटलें मन । सांधूं न शके विधाता ।। —मुक्तेश्वर

२३

व्यवहारांत भाषणप्रसंग हरघडीं लहानमोठ्याशीं, श्रीमंतगरीबांशीं. बायकांमुलांशीं, शेजाऱ्यांपाजाऱ्यांशीं, सहाध्यायी व व्यवसायबंधु वगैरेशीं येतात व येणारच. त्या प्रसंगीं अनुसरून सभ्यतेनें वागणें व एकोपा संपादन करणें यांतच व्यवहार चातुर्य आहे. "जगापाशीं जगमित्र, जिव्हेपाशीं आहे सूत्र" हा सिद्धान्त आहे. कित्येकांस दुसऱ्यास टोंचून बोलण्याची अगर हसत हसत चिमटे घेण्याची संवय असते. ही खऱ्या सौजन्यास विघातक आहे.

२४

विचारल्याशिवाय सल्लामसलत देऊं नये, उपदेश अगर बोध करूं नये. त्याचें महत्त्व वाटत नाहीं.

२५

बोलणारांचीं गाजरें विकतात, न बोलणाराची केळीं विकत नाहींत म्हणतात तें खोटें नाहीं. व्यवहारांत शिक्षक, वकील, वैद्यक वा व्यापारी असे कितीतरी पेषाचे गृहस्थ बुद्धिमान असूनही बोलण्याची हातोटी न साधल्यामुळे आपापल्या व्यवहारांत न चमकता मागें पडलेले दिसतात.

२६

लवणाखेरीज अन्नाला व विनयाखेरीज भाषणाला रुचि नसते, हा सिद्धांत आहे. संभाषणप्रसंगीं विनयाची आवश्यकता आहेच. पोकळ ताठा फर्शी पाडल्याविना राहात नाही.

२७

भाषणाचे ओघांत आपण पुष्कळ गोष्टी बोलून जातों. पण कृतींत त्या उतरत नाहींत. बोललेलें न विसरणें हिताचें आहे. काय बोलतों, कोणाशीं बोलतों याचें भान ठेवणें जरूर आहे. जें बोलावयाचें तें नीट शहाणपणानें बोला.

२८

संभाषण प्रसंगीं बहुवा उच्च वर्णीयांकडून विशेषत: स्त्रियांमध्यें इतराशीं अरे तुरे संबोधण्याची प्रथा आढळते. ती आजच्या समतेच्या. कालांत तर असभ्यतेंत गणली जाते. व्यवहारांत कोणाशीहि बोलतांना साधारणपणें " अहो जाहो " म्हणणें सर्वस्वी श्रेयकर व त्यांत एक प्रकारची गोडी आहे.

२९

एखाद्या शिपायापासून तो प्रत्यक्ष तसा असला तरी नुसते शिपाई म्हणून हांक न मारतां " जमादार " वगैरे गौरवानें हांक मारणें व्यवहारांत अगत्याचें आहे. यांत माणुसकी आहे खेरीज त्यांत कांहीं खर्चतें असेंहि नाहीं.

३०

"झाड ओळखिजें, फुलें । आणि, मानस ओळखिजे बोले" (ज्ञानेश्वर) बोलण्याच्या धोरणावरून एकंदर रागरंग अथवा मनुष्याच्या अंत:करणाचा ठसाच मनश्चक्षुपुढें उभा रहातो. न सांगतां समजतें तें असे.

३१

व्यवहारांत मुखदुर्बळपणा जसा त्याज्य तसा अतिवाचाळपणाहि वाईटच. वितंडवाद त्याहून वाईट. वितंडवादानें व्यवहार कधीच पूर्ण होत नाहीं.

३२

संभाषण प्रसंगीं प्रसंगावधान राखल्यानें पुष्कळशा गोष्टी इष्ट फलदायी व इच्छित कार्यास अनुकूल अशाहि होतात. सम्राट राजा हर्ष दिग्विजयास

निघाल्यावेळीं आंगठी घालीत असतां ती खालीं पडली म्हणून जवळचे सैनिक भावी यशाविषयीं साशंक झाले; पण हर्षानें आंगठी ठशाप्रमाणें माझा छाप सर्वत्र पडेल म्हणतांच सर्वांचा उत्साह द्विगुणित झाला म्हणतात. हें प्रसंगावधान ! !

३३

हजरजबाबीपणा म्हणजे प्रसंगावधान राखून समयसूचकतेनें जेथल्या तेथें ' उत्तर देणें ' याची व्यवहारांत अत्यंत जरूरी असते. व त्याचे योगानें आपलाहि स्वाभिमान रहातो. निजाम व पेशवे यांचे भेटींत परस्पर बोलणें झाल्यावेळीं निजामानें गौरवानें पेशव्यास " एक बाजी और सब पाजी " असें म्हणतांच पेशव्यांनीं तेथल्या तेथें " एक निजाम ओर सब हजाम " असें सांगितल्याचें इतिहासांत वर्णन आहे. ही अभिजात समयसूचकता व्यवहाराला फार उपयोगी आहे.

३४

वाचनानें मनुष्य तत्पर होतो, लिहिण्यानें गंभीर होतो तर भाषणानें पूर्ण अगर प्रवीण होतो यांत शंकाच नाहीं.

---

# ६

# वेळेचा सदुपयोग

१

श्वः कार्यमद्य कुर्वीत पूर्वाण्हे चापराण्हिकम् ।
न हि प्रतीक्षते मृत्युः कृतमस्य न वाकृतम् ॥ (श्रीशंकराचार्य)

२

वेळेचें महत्त्व व मोल अजमावतां येणार नाहीं इतकें अमोल आहे. वेळ हेंच व्यवहाराचें खरें मोल आहे. सर्व कांहीं प्राप्त होईल; गेलेलें धनहि पुनः मिळेल; पण गेलेला काळ पुन्हां कधींहि परत येणार नाहीं. वर्तमान-कालाचा क्षण हां हां म्हणतां भूतकाळांत प्रविष्ट झाला कीं झाला. तो पुन्हां फिरणार नाहीं. याकरितां आचार्य म्हणतात, उद्यांचें काम आजच करा; दोनप्रहरचें काम सकाळींच करा.

३

आजच्या एका दिवसाची किंमत उद्यांच्या दोन दिवसांपेक्षां अधिक आहे. वेळेवर घातलेला एक टांका पुढचे नऊ टांके वाचवितो अशी म्हणच आहे.

४

मनुष्यजन्माचें सार्थक म्हणजे कुटुंबपोषण, लग्नकार्यें, द्रव्यसंग्रह, अगर स्थावर जंगम मिळकतीचें संपादन एवढेंच नाहीं तर यापलीकडे जास्त आहे. समाजाचा आणि राष्ट्राचा घटक या नात्यानें समाजाच्या उन्नतीस जो हातभार लावील त्याच्याच हातून आयुष्याचा सद्व्यय होईल हें निश्चित.

ग्रं. क्र. ६९८५

वेळेची गति जलद चालणाऱ्या कोणत्याही यंत्रापेक्षा अत्यंत शीघ्र आहे. चालतें यंत्र दिसते तसे, पण गेलेला समय दृग्गोचर होत नाही व त्याची पडछायाही दिसत नाहीं. म्हणून क्षण ना क्षण कोणत्यातरी सत्कार्यी वेंचला पाहिजे. जीवनाच्या व्यवहारांत तत्पर राहील त्याचा काल सार्थकी लागेल.

६

हिंदुस्थानांत वेळ फार स्वस्त आहे अशी परदेशीय लोकांत समजूत आहे म्हणतात. तें खरेंच आहे. कारण कामाचें तर राहो पण जेवणाचें देखील वेळच्यावेळेला आमचेकडून होत नाहीं.

७

वेळेची किंमत जाणणारा मनुष्य आपल्या शब्दाची किंमत जरूर जाणतो. व दुसऱ्याच्या सोयीगैरसोयीकडे पहातो; आपला तसाच दुसऱ्याचा वेळ फुकट दवडत नाहीं. पुढें करतां येईल म्हणून चालढकल केली तर कामाचा बोजा वाढतच जातो. नुसतें पत्र लिहावयाचें झालें तर कित्येकांस दिवसच्या दिवस लागतात; पण लिहूनच टाकलें तर तें काम पांचच मिनिटांत होतें हा सर्वांचा अनुभव आहे.

८

आजचा दिवस आजच; तो उद्यां कधींहि परत येणार नाहीं. वेळ ही ईश्वराच्या अत्यंत अमोल देणग्यांपैकीं एक आहे. गेला क्षण तो गेला. स्वतःच्या आळशीपणाचें समर्थन करतांना कित्येक लोक 'वेळ नाहीं' ही सबब पुढें करतात. ती निखालस खोटी आहे. कोणत्याहि गोष्टीस उशीर झाला यासारखी घाणेरडी सबब दुसरी कोणतीहि नाहीं.

९

वेळ हा पैसा आहे. वेळला किंमत आहे. म्हणून वेळेच्या प्रत्येक क्षणाचा हिशेब ठेवणें व तो जपून खर्च करणें अगत्याचें आहे. कोणत्याहि थोर पुरु-

षाच्या चरित्राचें निरीक्षण केलें तर असेंच दिसून येतें कीं, त्याच्या उत्कर्षाचें रहस्य त्याचा नियमितपणा अगर वक्तशीरपणा यांत आहे. हा नियमितपणा अत्यंत कांटेकोरपणानें पाळला जावा. तो रेल्वेंत तसा पाळला गेला नाहीं तर गाडी ठराविक वेळीं मुक्कामास पोंचणारच नाहीं, पण गाडीची वेळ नियमित असली तरी अनियमित वागणारास गाडी चुकल्यामुळें किती गैरसोयीचें, खर्चाचें व त्रासाचें होतें, हें कित्येक प्रसंगीं अनुभवास येतेंच.

१०

वेळेचा सदुपयोग केल्यानें किती तरी महत्त्वाचीं कामें होतात. वेळेची खरी किंमत ओळखणें म्हणजे जीवितकर्तव्याच्या भावी व अभंग इमारतीचा भरभक्कम पाया घालणें होय.

११

नियमितपणा हा एक मोठा सद्‌गुण आहे. तो प्रत्येकाचे आयुष्यांत प्रपंचांत, व्यवहारांत, कर्तव्यांत—इतकेंच काय भोजननिद्रादिकांत देखील सर्वत्र लागतो. तो ज्यांत असेल तो उपकारी होतो. नियमितपणा नसेल तर त्याचे हातून कार्यच होणार नाहीं, प्रपंचांत ओढगस्त होईल, व्यवहारांत अपेश येईल, कर्तव्यांत चुकारपणा होईल व भोजननिद्रादिकांत परिमितता नसेल तर आरोग्याची हानि होईल.

१२

कोणतीहि गोष्ट—त्यांतल्या त्यांत वेळ तरी विनाकारण खर्चू नये. ‘गेलीं वेळा येईल गोष्ट अशी पुन्हां कधींहि न वदावी।’ गेलेली संपत्ति उद्योगानें परत मिळवतां येईल, अभ्यासानें विद्या संपादन करतां येईल, आहारांत नियमितता ठेवून प्रकृति सुधारतां येईल, पण गेली वेळ ती गेलीच. यासाठीं आयुष्याच्या प्रत्येक क्षणाचा उपयोग करा.

१३

नियमितपणानें किती तरी गोष्टी होतात. कामें जलद उरकतात. कित्येक महिने राहून गेलेलें एखादें काम एका दिवसांतच होऊन जातें. पण केलें तर! तेव्हां तशी संवय प्रथमापासूनच लावून घेतली पाहिजे.

१४

नित्य नियमितपणें केलेलें थोडें काम देखील पुष्कळ होतें. पण तें नित्य आणि सतत केले तर.

१५

पैशाचा जमाखर्च प्राय: व्यवहारांत मांडला जातो. पण वेळेचा जमाखर्चहि तितकाच किंबहुना अधिक महत्त्वाचा आहे. हें व्यवहारांत त्रिवार सत्य आहे.

१६

‘ वेळ वांचविणें म्हणजे आयुष्य वाढविणें ’ अशी एक म्हण आहे; तींत फार अर्थ आहे. नुसते मनगटावर घड्याळ बांधण्यानें वेळेचें मोल समजत नाहीं; तर तिचा सदुपयोग करण्यानेंच.

१७

कोणाचे भेटीस जाणें तें ज्याकडे जावयाचें त्याला अनुकूल काल पाहूनच गेलें पाहिजे. भेट वाजवी पेक्षां जास्त लांबवूं नये. थोड्याशा प्रस्तावनेनंतर मुख्य काम सांगून टाकलेलें बरें. म्हणजे उभयपक्षी व्यर्थ कालक्षेप सहसा होत नाहीं.

१८

ज्यावेळचें त्यावेळीं काम करण्यांत औचित्य आहे. शेतकऱ्यानें हंगामांतच पेरणी केली पाहिजे; नाहीं तर वापसा निघून जावयाचा. हाच न्याय सर्व व्यवहारांत.

१९

स्वत:च्या धंद्याखेरीज मनुष्यास कांहीं हौसेच्या अगर छंदाच्या बाबी असाव्यात असें म्हणतात. त्यांचा उपयोग मनुष्याला फुरसतीचा वेळ घालवण्याकडे चांगला होतो. कोणास गाण्याचा, कोणास भजनाचा, कोणास ग्रंथवाचनाचा, कोणास चित्रें, पुस्तकें, फोटो, हस्ताक्षरें इत्यादि गोळा करण्याचा,

कोणास कांहीं जुन्यापुराण्या जिनसा गोळा करण्याचा अगर ठिकाणें पाहाण्याचा अगर तीर्थयात्रेचा, तर कोणास बगीचाचा छंद अगर नाद असतो. छंद असेच असावेत अगर लावून घ्यावेत कीं त्यांपासून मनोरंजन व्हावें पण वेळ रिकामा दवडला जाऊं नये.

२०

नियमितपणा, वक्तशीरपणा ही आयुष्यांतील यशाची व वैभवाची गुरुकिल्लीच आहे. तिचे अभावीं कोणीहि योग्यतेला चढूं शकणार नाहीं.

२१

बगीचाचा छंद हा एक आदर्श छंद आहे. यांत आरोग्य, स्वच्छता, नीटनेटकेपणा, पद्धतशीरपणा, हिशेबी वागणूक, काम वेळचे वेळीं करण्याची संवय तसेंच करमणूक इत्यादि अनंत फायदे होतात. निसर्गरमणीय फुलें व फळें पाहून कोणास आनंद व करमणूक होणार नाहीं? हंगामाप्रमाणें लागण व निगा वगैरे न केल्यास बागेचा बडदास्त राहणार नाहीं. बगीचाचा छंद असणारास वेळचे वेळीं काम करण्याची संवय जडते व तिचा इतर व्यवहारांतहि उपयोग होतो.

२२

निसर्गाची शिकवणूक या बाबतींत अत्यंत काटेकोरपणाची आहे. कालांतरानें ऋतु बदलतात, ऋतुपरत्वें वनश्री फुलते व तिला पानें फुलें येतात. हें सर्व नियमित वेळीं होत असतें. निसर्गाचा मनुष्यास हा एक प्रकारचा आदेशच आहे.

२३

नखचित्रें काढणें, शिपा, पोष्टाचीं तिकिटें जमविणें, चित्रसंकलन, नाणीं, शिलालेख इत्यादि वस्तुसंकलन हेंही अशाच प्रकारचे छंद आहेत. ज्याची गति जिकडे चालेल तसे छंद असणें, नसल्यास लावून घेणें म्हणजेच प्राप्त कालाचा सदुपयोग होय.

२४

छंद असा असावयास पाहिजे कीं तो नित्याचे व्यवसायापासून भिन्न पाहिजे. स्वभावाला अनुकूल पाहिजे. त्याला जरूर तितका वेळ देतां आला पाहिजे आणि त्या पासून आपली करमणूक झाली पाहिजे. बैठे काम असणारांस बगीचाचा वगैरे अंगमेहनतीचे छंद हितकर होत. फुरसतीच्या वेळीं छंद म्हणून केलेल्या प्रयत्नांतून फोर्ड मोटारींचा जन्म झाला म्हणतात.

२५

प्रत्येकाला नित्याच्या उपयोगाकरितां जो वेळ खर्च करावा लागतो तो सोडून देऊन रोज कांहींना कांहीं फुरसतीचा वेळ मिळतो; तो जर सत्कारणीं लावला, पत्ते कुटण्यांत अगर शेजाऱ्यांपाजाऱ्यांची खरीखोटी निंदा यांसारख्या निरर्थक गोष्टींत न घालविला, तर किती तरी कामें होतील; अगर तो वेळ कोणत्या तरी ज्ञानार्जनांत घालविला तर त्या वेळेचा सदुययोग होईल·व त्या मनुष्याला खऱ्या आनंदचा लाभ होईल.

२६

वेळेचा सदुपयोग करण्याचीं प्रवृत्ती प्रत्येक व्यक्तीला असणें समाजाच्या व राष्ट्राच्या हिताचें आहे. मग ती व्यक्ति स्त्री असो, पुरुष असो अगर लहान मुलें वा प्रौढ विद्यार्थी असोत. कोणत्याहि परिस्थितींत कालापव्यय होतां उपयोगी नाहीं. गप्पा मारतां मारतां देखील व्यवहारांत पुष्कळशीं लहानमोठीं कामें उरकतां येतात. हा प्रायः सर्वांचा नेहमीचा अनुभव आहे. वेळेची काटकसर करून सदुपयोग करणारास ऐश्वर्य लांब नाहीं हें खास.

———————

# ७

# परस्पर-व्यवहार

१

शिष्टाचार पाळणें व्यवहारात सापेक्ष असतें, निदान असावयास पाहिजे. केव्हां केव्हां असें दिसतें कीं कांहीं माणसें वरिष्ठाशीं तेवढे शिष्टाचार पाळतात. त्याचवेळीं ते कनिष्ठासीं तुच्छतेनें वागवितात हा व्यवहार नव्हे.

२

ओळखीचा मनुष्य रस्त्यांत समोरासमोरच भेटला तर 'कसे काय आहे' म्हणून क्षेम कुशल न विचारतां पुढें जाणें असभ्यतेचे आहे. उत्तर देणारानें 'ठीक आहे' म्हणून न सोडतां नसता पोल्हाळ लावणें म्हणजे शुद्ध कालापव्यय.

३

परस्पर व्यवहारांत मनाचा मोठेपणा दाखविण्याचें मुख्य सूत्र स्वतःची चूक असली तर ती त्वरित व प्रांजलपणें मान्य करणें होय. यांनीं सर्व कांहीं सुधारतें.

४

कोणापासून कांहीं वस्तु घेतली तर ज्याची त्यास ती परत देतांना तितक्याच विनयानें व कृतज्ञेनें परत करावी. गरज संपली म्हणून परत देतांना सहज लीलेनें फेंकून देणें अगर कृतीनें एक प्रकारची बेपर्वाई दाखविणें, हें कृतघ्नतेचें द्योतक आहे.

५

कोणताहि जिन्नस अगर पुस्तक कां होईना देणें झाल्यास टिपण-वहींत तें नोंदून देत जावे. म्हणजे विस्मरणानें गहाळ होत नाहीं. पुष्कळांची वस्तु

नेतांना जी बुद्धी असते ती परत करतांना रहात नाहीं. हा अनुभव आहे. आणलेली वस्तू आठवणीनें परत करीत जावी हें ओघानें आलेंच.

६

पुस्तकांच्या बाबतींत तर सामान्य सूचनेकडे बहुधा दुर्लक्ष होते. म्हणूनच "पुस्तकं वनिता वित्तं परहस्तगतंगतम्" हें सुभाषित सार्थपणें रूढ झालें आहे.

७

दुसऱ्यापासून कांहीं वस्तु आणिली व ती वापरतांना आपल्या हातून बिघडली, तुटली अगर फुटली तर मालकाचे इच्छेप्रमाणें ती भरून देणें अगत्याचें आहे. सर्वांत उत्तम म्हणजे तसलीच दुसरी वस्तु आणून त्याची त्यास देणें होय. वस्तू ज्या स्थितींत घेतांना होती त्याच स्थितींत ती परत करणें हा उत्तम व्यवहार.

८

उत्सव, मेळे, बाजारहाट अथवा माणसांची गर्दी असल्या ठिकाणीं गर्दीतून चालतांना कोणास धक्काबुकी झाली अगर कोणाचे अंगावर पाय पडला तर 'क्षमा करा!' म्हणून त्या मनुष्याचा राग शांत करणें जरूर आहे.

९

कोणी निजला असेल अशा ठिकाणीं असें कोणतेंहि काम करूं नये कीं त्यापासून झोंपलेल्या मनुष्याचे झोंपेंत व्यत्यय येईल. उगीच इकडून तिकड येरझारा घालणें, मोठ्यानें गप्पा मारणें अगर कांहींतरी गोंधळ करणें बरें नाहीं.

१०

कित्येक हलक्या मनाचे लोक दुसऱ्याची बदनामी करण्याचे हेतूनें अगर आपला कांहीं स्वार्थ साधणें अगर कोरडी धमकी देणें, याकरितां भिंतीवर, विशेषतः रेलवेच्या संडासामध्यें, आजूबाजूला. फळयावर वेड्यावांकड्या गोष्टी लिहितात. ही असभ्यता आहे. जाणत्यानें त्यास उत्तर

म्हणून तसलेंच कांहीं तरी त्याखालीं लिहीत बसणें अधिक असभ्यतेचें होय. त्यापेक्षां तिकडे दुर्लक्ष केलेलें बरें.

११

असें लिखाण आढळल्यास तें साफ पुसून टाकण्याचें काम एखाद्या सभ्यानें केलें तर त्याचें तें काम समाजावर उपकारक होईल.

१२

रेलवेंत, यात्रेच्या वेळीं, प्रवास करतांना केवळ आपल्याच सुखसोयी-कडे पाहूं नये; बरोबरीच्या प्रवाश्यांच्या अडचणींकडे अगर त्यांनाहि आराम मिळेल इकडे लक्ष्य असावें.

१३

रेलवेंच्या डब्यांत खिडक्यांशीं सामान वगैरे टाकून अगर खिडक्यांशीं उभें राहून लोकांना शुद्ध हवा मिळण्याचें मुष्कील करणें अगर थंडीचे दिवसांत मुद्दाम खिडकी उघडी ठेवून ती न सोसवेल अशांना कष्ट देणें हें अनुचित होय. बरोबरीच्या इतर प्रवाश्यांच्या सोयीगैरसोयीकडे लक्ष असावें.

१४

रेलवेप्रवासांत डब्यांत जागा असतांना आपल्याला अधिक प्रशस्त जागा राहावी म्हणून नवीन येणाऱ्या उतारूंना आंत येऊं न देण्याचा प्रयत्न करणें, जागा रिकामी नसल्याचा बहाणा करणें अगर माणसें खालीं गेलेलीं आहेत म्हणून खोटेंच सांगणें ही शुद्ध गुंडगिरी होय. खरोखरच जागा असेल तर जागेसाठीं लगबगीनें इकडे तिकडे जागा धुंडाळणाऱ्या उतारूंस बसूं देणें अधिक सभ्यतेचें होय.

१५

रेलवेच्या डब्यांत बसावयाच्या बाकांवर बेहिशेबी सामान लावून अगर मुद्दाम वेडेंवाकडें पसरून जागा अडकविणें अनुचित होय. शेजारीं दुसरे प्रवासी जागेच्या अभावीं अडचणींत बसले आहेत अगर उभे आहेत अशा वेळीं झोंपेचें मिष घेऊन निजणें ही असभ्यतेची वर्तणूक होय.

१६

थट्टामस्करी, जिचा प्राय: थोड्याबहुत प्रमाणांत घटकाभर करमणूक म्हणून अंतर्भाव करण्यांत येतो ती प्रमाणांत असावी, तिचा अतिरेक होऊं नये; नाहीं तर तीपासून वितुष्ट होण्याचा संभव असतो. म्हणतात ना "थट्टेची होते मस्करी."

१७

कोणाकडेहि गेल्या वेळीं बसा! म्हटलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त आसन पलंग वगैरेवर बसूं नये.

१८

ज्याच्याशीं ज्या कामासाठीं जेवढे पैसे ठरविले असतील तें काम झाल्यावर ठरल्याप्रमाणें पैसे बरोबर द्यावे. काम झाल्यावर त्यांत काटकसर करणें अगर पैसे कमी करण्याचा प्रयत्न करणें अन्याय होय.

१९

परीट, चांभार, कुंभार, न्हावी वगैरे कारू अगर कारागीर लोकांची मजुरी पुरी व जेव्हांचे तेव्हांच द्यावी. वेळेला थोडें अधिक देऊन राजी राखा. हे लोक प्रसन्नचित्त असतां कीर्ति व अप्रसन्न झाल्यास अपकीर्ति करतात.

२०

चालतां चालतां कोणाची डोक्याची पगडी, फेटा अगर टोपी धक्का लागून पडली, अगर चालतां चालतां ठेंच लागून मनुष्य पडला तर त्याकडे पाहून हसणें उथळपणाचें लक्षण होय. अशा वेळीं गंभीरता धारण करून न पाहिलेंसें दाखविणें उचित होय.

२१

कोणीहि आपल्यावर उपकार केले तर संधि मिळतांच त्या उपकारांची फेड करण्यास कधींहि विसरूं नका.

२२

कोणाचीहि कांहीं गुह्य गोष्ट अथवा कार्य आपल्याला समजलें तरी विशेष कारणाशिवाय अदूरदर्शीपणानें अथवा विकारवशतेच्या भरांत ती प्रकट करूं नये.

२३

कोणालाहि एकदम आकस्मिक रीतीनें भीति दाखविणें अगर भीतीनें त्याचा मनाला धक्का अगर दचका बसेल असें करूं नका. केव्हां केव्हां त्याचा इतका भयंकर परिणाम होतो कीं, मनुष्याला मोठाच पश्चात्ताप करण्याची पाळी येते.

२४

ज्याच्याजवळून जी वस्तु घेतली असेल ती त्याची त्यासच परत करावी. एकाची वस्तू घेऊन दुसऱ्यास कधींहि देऊं नये. यांत पुण्य तर नाहींच पण लफंगेपणा आहे.

२५

प्रसंगानुसार आपण एखाद्याजवळ कांहीं मागतों व तो तें देतो. त्यानंतर त्या मनुष्यानें आपल्यास एखादी वस्तु केव्हां तरी मागितली तर ती देण्यास अनमान करूं नका. यांतच व्यवहार आहे.

२६

निरनिराळ्या प्रांतांत व्यवहारांत वागणुकीचे कांहीं संकेत ठरलेले असतात, व रीतीभातींत थोडीबहुत भिन्नता असते. याकरितां परप्रांतीय मनुष्याशीं वागतांना अधिक दक्षतेनें व सभ्यतेनें वागावें हें बरें. कारण भिन्न राहणीमुळें आपल्या कित्येक संवयी त्याच्या दृष्टीनें चमत्कारिक ठरावयाच्या.

२७

ज्याचेवर आपण एकदां प्रेम केलें अगर ज्याच्याशीं दाट स्नेह असेल त्याच्याशीं कारणपरत्वेंहि वैर करूं नये. कांहीं कारणानें मनांत किंतु आला अगर स्नेहांत अंतर पडण्याचा प्रसंग आला तर ती गोष्ट आपण आपल्या मनांत ठेवावी. दुसऱ्याजवळ प्रकटपणें बोलू नये.

२८

कोणालाही मेहनतीचा मोबदला दिल्याविना राहूं नये. जरी लगेंच आपल्या श्रमाचा मोबदला घेण्याचा एखाद्यानें नकार दर्शविला तर दुसऱ्या वेळीं दुसऱ्या कांहीं तऱ्हेनें त्याच्या श्रमाचा मोबदला जरूर द्यावा.

२९

खमंग जाहिरातीचीं वर्णनें वाचून तात्कालिक स्फुरणानें एखादें पुस्तक अगर वस्तु व्ही. पी. नें मागविणें व नंतर ती न स्वीकारतां परत करणें ही एक मोठी असभ्यता किंवा लबाडीच आहे. मागवून परत करण्यापेक्षां न मागविलेलें बरें. त्यांत वस्तु पाठविणाराचें नुकसान होणार नाहीं.

३०

एखाद्याविषयीं कांहीं निंदा अगर बरीवाईट गोष्ट आपल्या कानांवर आली व ज्याची निंदा केली गेली असेल त्यासच त्यासंबंधीं कांहीं सूचना अगर त्याविषयीं त्याचे हिताकरितां कांहीं गोष्टी कळवावयाच्या असतील तर त्या त्यास एकीकडे कळवाव्या; इतर लोकांच्या देखत तसें करूं नये.

३१

एखाद्यानें भरंवशानें कांहीं एखादी गुप्त गोष्ट आपणास सांगितली व तिचा उलगडा कोणाजवळ करूं नका असें बजावलें असेल तर तिची आपण कोणाजवळहि वाच्यता करूं नये.

३२

एखाद्याची कांहीं बरी वस्तु पाहिल्याबरोबर ती मिळण्याची अभिलाषा करूं नये, व विनाकारण मागूं नये. मागून त्यानें दिली नाहीं तर आपल्यास दुःख होतें, व पाहिलेला जिन्नस ज्यापाशी मागितला त्याला दुःख होतें. कारण त्यालाहि तो आवडीचा, पाहिजे असा असतो.

३३

दुसऱ्याच्या वस्तु त्यांचे मालकाचे मर्जीविना उपयोगांत आणूं नयेत खास त्याच्या प्रिय अशा वस्तूंस (उदाहरणार्थ, एखादी मशीन, सायकल, घड्याळ अगर एखादें हत्यार) तर त्याला विचारल्याखेरीज मुळींच हात लावूं नये.

३४

दुसऱ्याची वस्तु म्हणून ती बेपर्वाईनें वापरूं नये. वेळीं आपल्या स्वतःच्या वस्तूपेक्षां अधिक जपून वापरावी.

३५

दुकानदारानें आपल्याकडे आलेल्या गिऱ्हाईकांशीं बोलण्यांत सभ्यता ठेवावी व गिऱ्हाईकांस लागेल तो माल दाखविण्यांत व त्याचा योग्य तो भाव सांगण्यांत हालगर्जीपणा करूं नये. सचोटीनें व नीतीनें राहणें दुकानदाराच्या हिताचें आहे. खोटी किंमत सांगून फसवणें अगर भारी किंमत घेऊन हलका माल गिऱ्हाईकांच्या पदरांत घालणें हें निंद्य आहे.

३६

व्यवहार नेहमीं रोखीचा चांगला. कित्येक दुकानांत, आज रोख व उद्यां उधार' अशा पाट्या असतात. त्याचा अर्थ, रोखीचा व्यवहार चोख तेव्हांच पुरा होणारा व उभयपक्षीं हितकर होय, असाच असतो. रोखीनें, माल चांगला व थोड्या बऱ्या भावानें मिळतो. तेंच उधारीचें सगळें कांहीं

निराळें. उधारीच्या गिऱ्हाइकाला मतस्वातंत्र्य अगोदरच नसतें. मग मालाची पारख व भावाची चौकशी अर्थात् दूरच.

३७

कोणाकडे भेटीस वगैरे गेल्यास रिकामें जाऊं नये. लहान मुलांस खाऊ वगैरे कांहीं ना कांहीं जवळ असावें. " रिक्तपाणिर्न पश्येत् राजानं देवतां गुरुम्।" हा शिष्टाचार अवश्य पाळावा. यांत व्यवहार आहे.

३८

व्यवहारांत बसावयाचें, टिकावयाचें, निभावून जावयाचें तर 'जशास तसें' हें त्रिकालाबाधित तत्त्व ग्राह्य आहे. " जशास तसा भेटे मनीचा संशय फिटे" अशी म्हणच आहे. एक कवि म्हणतो—

" गड्या जशास तसा वागे । तरी जगांत निभाव लागे ।।
जरी देव्हारीं विंचू आला । नको वाहूं तूं फुलें त्याला ।।
आणी पैजार कामाला । संत तुका स्पष्टपणें सांगे ।। "
धटाशीं आणावा धट । उद्धटाशीं पाहिजे उद्धट।
खटनटाशीं खटनट । आगत्य करी ।। (समर्थ)

३९

कधीं सुखाची पौर्णिमा तर कधीं दुःखाची अंवस हें जगाचें रहाटगाडगें चालूच आहे. तथापि पुष्कळसें सुखदुःख शेजारील माणसें कशीं असतात यावर अवलंबून असतें; व तीं कशीं असावीं हें व्यवहारांत आपल्या स्वतःच्या वागणुकीवर बहुधा अवलंबून असतें. देवाण-घेवाण ही व्यवहाराची मुख्य गुरुकिल्ली आहे. ती संभाळली पाहिजे. आपण दहादां दुसऱ्याकडे गेलों तर त्यांनाहि आपण एकदां तरी बोलावलें पाहिजे. पुष्कळांना घ्यावयाचें माहीत असतें, पण द्यावयाचें माहीत नसतें; अगर माहीत असून इच्छा नसते. हें व्यवहारांत इष्ट नाहीं.

४०

परस्परव्यवहार अगर व्यवहारांत परस्परांशीं वागणूक ही फार गुतागुतीची असते व तिला अनेक प्रकारचें तारतम्य पुष्कळ वेळां सांभाळावें लागतें. नुसतें जेवणाचें आमंत्रण स्वीकारणें अगर कोणत्याहि गोष्टीस होय अगर नाहीं म्हणणें यांतहि तारतम्य दाखवावें लागतें. यांतच परस्पर व्यवहाराचें रहस्य आहे.

४१

घरगुती व्यवहारांत देखील असेंच आहे. पुष्कळ वेळां आपण असें पाहतों कीं, केवळ अनियमितपणामुळें अगर अव्यवस्थित विनहिशेबी वागणुकीनें साधा शिष्टाचारहि पाळला जात नाहीं. घरच्या माणसांनीं स्वयंपाक करून वाट पहात बसावयाचें व या गृहस्थांनीं बाहेर कोणा स्नेह्याकडे खुशाल फराळ झोडून ढेकर देत यावयाचें व भूक नाहीं म्हणून सांगावयाचें! हें कशाचें द्योतक? घरच्या माणसांनीं तिष्ठत बसावें, अन्न निवून जावें व तें वायाहि जावें, असें तिहेरी नुकसान होतें. तसेंच काळवेळ न पाहतां एखाद्याकडे जाणें व अकारण उभयपक्षीं त्रासाचें व गैरसोयीचें करणें परस्पर व्यवहाराचे दृष्टीनें ठीक नव्हे.

४२

परस्पर व्यवहार सुखावह होण्यास मुख्य सूत्र म्हणजे आपल्या कृत्यापासून एखाद्यास उगीच त्रास होऊं नये, ही भावना जागृत असणें होय. ही भावनाच पुष्कळांना नसते. ते कीर्तनांत, सभेंत उगीचच वटवट करून इतर श्रोत्यांना व्यत्यय आणतात, इतर कोणी निद्रिस्त असतां गोंगाट करतात व उपसर्ग देतात. यात्रेंत किंवा देवदर्शनाचे वेळीं पाहा. अगर रेल्वे स्टेशनांत तिकीट घेतांना पहा. अगर गाडींत बसतांना पहा. सर्वत्र तडफडाट! व्यवस्थितपणा नाहींच. नीट सांगावयाला गेलें तर लगेंच आले एकेरीवर. "हे मोठे आले शिष्ट सांगायला!" असें दुरुत्तर ठेवलेलें. आपल्या कृत्यानें वा भाषणानें जर दुसऱ्यास ताप होत ससेल तर तें परस्पर व्यवहाराचे दृष्टीनें अत्यंत अनुचित होय.

४३

परस्पर व्यवहारांत तसेंच समष्टि धर्मांत शिष्टाचाराचे फार मोठे महत्त्व आहे. व्यवहारांत एखादा हरीचा लाल मी वाटेल तसा वागेन म्हणेल तर तें समष्टि धर्मांत खपणार नाहीं.

४४

परिचित इसमाबरोबर अति लगट करणें व्यवहारांत प्रशस्त नव्हे. अतिपरिचयानें अवज्ञा होते हा सार्वत्रिक नियम आहे. म्हणून एखाद्याकडे काम नसतांना कंटाळा येईपर्यंत जाणें परस्पर व्यवहाराचे दृष्टीनें अगदींच गैर होय. सांवलीचा कंटाळा आला कीं थोडेसें तरी उन्हांत बसावेसें वाटतें हा सहज स्वभाव आहे.

४५

व्यवहारांत केव्हां केव्हां अकारण वैर उत्पन्न होतें. याला जपलें पाहिजे. कोणाच्या अध्यांत ना मध्यांत असा असणाऱ्या मनुष्याशीं देखील कित्येकजण अकारण शत्रुत्व करतात हा जगाचा स्वभाव आहे. जग दुतोंडी आहे म्हणतात तें याचकरितां. यांसाठींच परस्परव्यवहारांत मनुष्यानें तारतम्यानें वागलें पाहिजे.

४६

परस्पर व्यवहारांत जसें कधीं व्यक्ति व्यक्तींचे तसेंच जाती जातींचे व्यवहारहि येतात.हिंदुस्थानांत हिंदु समाजांत अनेक ज्ञाती आहेत.प्रत्येक ज्ञातींत सुष्ट दुष्ट, सज्जन दुर्जन हे असतातच. मानवी स्वभावाच्या सर्वच छटा सर्वत्र तसेंच सर्व जातींत दृग्गोचर होतात. कोणीही इतरांस दूषण देऊं नये व समाजांत परस्परांविषयीं अनादर करूं नये.

४७

परस्पर व्यववहारांत शिष्टाचरणाचें महत्त्व विशेष आहे. तें न ओळखलें गेल्यामुळेंच कित्येक व्यवहारांत कार्यहानि होते. इतरांनीं आप-

णाशीं चांगलें वागावें अशी अपेक्षा असल्यास आपणहि तसेंच त्यांच्याशीं सभ्यतेनें वागलें पाहिजे. आपल्यावरून जग ओळखावें म्हणतात तें हेंच. एखाद्या गोष्टीचा आपणांस जसा त्रास होत असतो तसा तो आपणहि सहसा दुसऱ्यास देऊं नये. हा शिष्टपणा होय. एखाद्याच्या खाजगी गोष्टीविषयीं चारचौघांत विचक्षणा करणें अगर फटकन् कांहीं बोलून जाणें, अशिष्ट होय. तेव्हां हें टाळणें परस्परव्यवहार सुखावह होण्यास अत्यंत अगत्याचें आहे.

४८

शठं प्रति शाठ्यं कां शठं प्रति सत्यम् हा वैचारिक झगडा अनादि आहे. पण व्यवहारांत जशास तसें हाच न्याय परिणामी हितकर असा अनुभव आहे शठालादेखील सत्यानें वळवूं हा धर्मराजाचा प्रयोग अयशस्वी झाला. सत्यानें वळेल तो शठ कसला?

४९

इतिहासाची साक्षही अशीच आहे. शरण आलेल्यास अभय देणें जसा धर्म आहे तसेंच आततायी असेल तर त्याचा वध करावा हाहि धर्मच आहे. हें तारतम्य न ठेवलें गेल्यामुळेंच पृथ्वीराज चव्हाणाचा घात झाला. म्हणून व्यवहारांत तरी जशास तसें वागावे हेंच नीतितत्त्व गीतेचें अमर तत्त्वज्ञान सांगतें.

५०

"यस्मिन् यथा वर्तते यो मनुष्यः । तस्मिन्स्तथा वर्तितव्यं सधर्मः" ॥

आपल्याशीं जो जसा वागतो त्याचेशीं तसेंच वागावें यांत अधर्म तर घडत नाहींच पण अकल्याणहि होत नाहीं. (म. भा.). म्हणून जशास तसें हें नीतिशास्त्र व व्यवहार या दोन्हींना धरून आहे.

# ८

## शेजार धर्म

१

परस्परव्यवहारांत शेजारधर्माचाहि समावेश होतो. शेजारधर्म संभाळणें ही देखील कठिण गोष्ट आहे. केव्हां केव्हां क्षुल्लक कारणावरून बिनसतें. हा नित्याचा अनुभव आहे. वरचेवर शेजाऱ्याच्या घरीं जाणें, न विचारतां मध्येंच एखाद्याच्या कांहीं प्रकट अगर अप्रकट गोष्टींत तोंड घालणें, वरचेवर उसनें-पासनें करणें अगर त्यास उपसर्ग पोहोंचेल अगर त्रास वाटेल असें करणें, या सर्व गोष्टी शेजारधर्मास विरुद्ध आहेत.

२

शेजाऱ्यांनीं परस्पर एका कुटुंबांतील मनुष्याप्रमाणें वागणें शेजाऱ्याचे सुखदुःख अथवा सोयगैरसोय तोच आपली असें समजून वागणें, हा शेजारधर्म.

३

चांगला शेजार मिळणें ही भाग्याचीच गोष्ट आहे असें म्हणतात. यांत पुष्कळ अर्थ आहे. नाहीं तर " दोन्ही डोळे शेजारीं आणि भेट नाहीं संसारीं" अशी स्थिति प्राय: आजकालच्या नागरी जीवनांत आढळते. कित्येक वर्षें शेजारीं रहात असूनहि परस्पराविषयीं सामान्य माहितीहि असत नाहीं हा शेजारधर्म नव्हे.

४

अनेक बिऱ्हाडें असलेल्या ठिकाणीं एखाद्यावेळीं दार उघडण्याचा प्रसंग निदान दाराशीं असलेल्यांस, इतर आंतल्या बाजूस असलेल्याकडे आलेल्यांस

अवश्य तेवढी माहिती देणें वगैरे गोष्टी कराव्या लागतात यालाच व्यवहारांत शेजारधर्म म्हणतात.

५

व्यवहार हाच मूळ सापेक्ष मग तदंतर्गत शेजारधर्मंहि सापेक्ष असणारच-असावयास पाहिजे हें पुष्कळदा विसरलें जातें. आपण मात्र दुसऱ्याकडून एखादा जिन्नस लागला तर हक्कानें मागून घ्यावयाचा, देण्याचा प्रसंग आल्यास टाळाटाळी करावयाची, हें शेजारधर्मास विहित नाहीं.

६

कित्येकांस आपली वडेजाव मिरवण्याची संवय असते. जेथें तेथें शेजाऱ्या-पाजाऱ्या जवळ आमचें असें आहे, आमचें तसें आहे असें सांगणें, दुसऱ्यास उपसर्ग होईल याची दखल न घेणें, शेजारधर्माला निषिद्ध आहे.

७

शेजारधर्म सांभाळणें, यांतहि प्रतियोगिता ही पाहिजेच. केव्हां केव्हां क्षुल्लक कारणावरून बिनसतें. विशेषतः नागरी जीवनांत तर नळाच्या पाण्यावरून "चाळीतले चाळे" नित्याचे दिसून येतात.

८

नेलेला जिन्नस काळजीपूर्वक परत न करणें, केला तरी बदलून हलक्या प्रकारचा आणून देणें अगर परत मागितल्यास उलट शेजाऱ्यावर रागावणें हें सर्व शेजारधर्माला वावडें आहे.

९

मनुष्य असून पशूसारखें वागणें म्हणजे माणुसकी न दाखविणें हा समाजाचा एकप्रकारचा गुन्हा आहे. हें व्यवहारांत मनुष्यानें सदैव लक्षांत ठेवलें पाहिजे.

१०

शरीर, मन आणि अगत्य हीं माणसाचीं तीन अंगें होत. या तिन्ही अंगाची यथाप्रमाण उन्नति होणें म्हणजे माणुसकी असा सिद्धांत आहे.

११

माणुसकी असली तरच त्याला व्यवहारांत मनुष्य या नात्यानें मोल आहे. त्यानें प्रतिष्ठा वाढते. एरव्हीं माणुसकीशून्य म्हणजे नुसती मनुष्याकृति एवढेंच म्हणतां येईल "परोपकारबुद्धि, दया, शहाणपण, दूरदृष्टि न्यायबुद्धि, अन्यायाची चीड, इंद्रियनिग्रह, मनमिळाऊपणा इत्यादि अनेक सात्त्विक गुणांचा समुच्चयानें विकास म्हणजे माणुसकी" असें लो. टिळक म्हणतात. अशा या माणुसकीची व्यवहारांत नितांत आवश्यकता आहे.

१२

ईश्वराला देखील एकाकीपणाचा कंटाळा आला तेव्हां त्यानें सृष्टीची घडामोड उत्पन्न केली तसेंच मनुष्यासहि निव्वळ एकलकोंडेपणानें राहणें परवडत नाहीं. कोणीतरी शेजारी हवा असतो, नाहींतर भकास वाटतें; म्हणून शेजार आणि शेजारधर्म जाणणें आणि त्याप्रमाणें परस्पर वागणें व्यवहारांत हिताचें आहे. शेजारधर्माचे स्थूल नियम येणेंप्रमाणें:—

१ आपल्या ऐपतीबाहेर असलेली वस्तू मागूं नये.

२ प्रसंग जाणून योग्य तें साहाय्य करावें.

३ मागून आणलेली वस्तु सांभाळण्याची दक्षता घेतली पाहिजे.

४ नेलेलें सामान त्याची तूट फूट झाल्यास भरून देणें.

५ काम झाल्यावर ज्याची वस्तु त्याला विनाविलंब निश्चित वेळेला परत करणें.

१३

कोणास आपलेच विचार, व्यवहार, आवडीनावडी शेजाऱ्यावर लादाव्याशा वाटतात. शेजाऱ्यांनें आपल्याशीं जुळतें घ्यावें, आपण मात्र जुळतें

घेण्याचें कारण नाहीं, हें तत्त्वज्ञान व्यवहारांत वसत नाहीं. शेजारधर्मात तर नाहींच नाहीं.

१४

प्रत्येकजण आपल्या घरीं स्वतंत्र असला तरी त्याला वाटेल तसें वागण्यास समाज मान्यता देत नाहीं. शेजारधर्म पहावा लागतो. म्हणजे दुसऱ्यास उपसर्ग न होईल असेंच वर्तन ठेवले पाहिजे. मध्यरात्रीनंतरहि आरडाओरड व गोंधळ करणें म्हणजे दुसऱ्यास उपद्रवच. शेजारी म्हणजे नुसते जवळचे बिऱ्हाडांत रहाणारा एवढाच अर्थ नाहीं. प्रसंगप्राप्त परिस्थितींत निकटवर्ती असेल तो शेजारी; त्यास उपसर्ग न होण्याविषयीं जपणें हा शेजारधर्म. दुसऱ्याच्या भावनाविषयीं जरूर तो आदर राखणें हा तर सामाजिक आयुष्याचा मूळ पाया आहे.

१५

शेजारधर्माला आरंभ प्रायः स्त्रीसमाजाकडून होतो. थोडासा परिचय, उसनें पासनें, बसणें उठणें, अंगती पंगती या गोष्टी होतात. आरंभ जसा लवकर तसा विघाडहि कधीं कधीं लवकर होतो. शेजारधर्म टिकविण्यांत माणुसकी आहे.

१६

शेजारी नवीन आल्यास अगर आपण एखाद्याचे शेजारी नवीन गेल्यास माणसाची पारख केल्याखेरीज अधिक लगट करूं नये. कोणास माणसांची वर्दळ खपते तर कोणी माणूसघाण्या असतो. कोणास मुलांचा लळा असतो तर कोणास मुलांचें पथ्य असतें. हें जाणून वागणें यांत शेजारधर्माचा सर्व व्यवहार आला.

# १

## पुरुष-प्रयत्न

१

प्रारब्ध श्रेष्ठ कीं प्रयत्न श्रेष्ठ हा वाद फार जुना आहे व तो कधीं न संपणारा आहे. वचनें जशीं अनुकूल-प्रतिकूल, तसे अनुभवहि अनुकूल-प्रतिकूल असे दोन्ही बाजूंचे येतात. तथापि व्यवहाराचे दृष्टीनें पाहिलें तर प्रयत्नच श्रेष्ठ आहे व तो करीत रहावा यांतच पुरुषार्थ आहे.

२

नल, राम, युधिष्ठिर इत्यादिकांचीं उदाहरणें प्रारब्ध अपरिहार्य असें दर्शविणारीं तर सावित्री, मार्कंडेय वगैरेंचीं उदाहरणें प्रयत्न श्रेष्ठ असें दर्शविणारीं आहेत. जगांत सर्व कांहीं प्रयत्नानेंच मिळतें. मात्र तो अचूक पाहिजे व कार्यकारण संबंध लक्षांत घेऊन तो केला पाहिजे. उद्योगानेंच मनुष्याला ऐश्वर्य प्राप्ति होते. दैवाचें अस्तित्वच मुळीं प्रयत्नांत आहे. कर्म नसेल तर प्रारब्ध येणार कुठें ?

३

विश्वामित्रानें दैव बाजूला सारून प्रतिसृष्टि निर्माण केली, सावित्रीनें युक्तीनें यमाला जिंकून पतीला परत आणलें, श्री शिवाजी महाराजांनीं औरंगजेबाच्या कारागृहांतून सुटका करून घेतली व स्वराज्य स्थापले. चालू जमान्यांत दे. भ. सुभाषचंद्र बोस वेषांतर करून परदेशांत जाऊन प्रबल ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं सशस्त्र लढा दिला व जागतिक कीर्ति मिळविली या पौराणिक, ऐतिहासिक व आपल्या डोळ्या देखतच्या घटना पौरुष प्रयत्नाची दृश्य फलेंच होत. दैवावर भरवसा ठेवून या गोष्टी साध्य होणाऱ्या नव्हेत.

४

जगांत जे शूर, वीर, पराक्रमी थोर पुरुष होऊन गेले ते पौरुषप्रयत्नानेंच होत. दैव हें रडव्या लोकांनीं पुढें आणिलेलें आहे. कर्त्या पुरुषांनीं त्या दैवाला लाथ मारिली आहे. 'अनुद्योगाचे मार्गें लागून मनुष्यानें पुरुष-गर्दभ होऊं नये', असें योगवासिष्ठांत वसिष्ठांनीं श्रीरामचंद्रास सांगितलें आहे.

५

आधीं देव नसून आधीं उद्योग आहे, कर्तव्य आहे. दैवांत विद्या आहे कीं नाहीं हें अभ्यास केल्यावांचून समजत नाहीं. दैवांत पैसा आहे कीं नाहीं, हें कांहीं उद्योग न करतां कसें समजणार ? तात्पर्य दैव पंगू असून उद्योग हा स्वावलंबी आहे.

६

उद्योगाशिवाय ईश्वर कधींहि कृपा करीत नाहीं. सतत प्रयत्न करणा-रालाच परमेश्वर साहाय्य करतो, हा त्रिकालाबाधित सिद्धान्त आहे. दैव म्हणजे तरी काय ? देवाची कृपा व माणसाचा प्रयत्न हीं एक झालीं म्हणजे यश येतें.

७

आस्ते भग आसीनस्य ऊर्ध्वं तिष्ठति तिष्ठतः ।
शेते निपद्यमानस्य चराति चरतो भगः ॥ ( ऐ. ब्रा.)

जो बसतो त्याचें नशीब बसून राहातें. जो उठतो त्याचें भाग्यहि उठतें. जो झोंप काढतो त्याचें भाग्यहि झोंप काढतें. पण उद्योगाबरोबर त्यांचें भाग्यहि चालू लागतें, असा स्पष्ट श्रौतसिद्धांत आहे.

८

संपत्ति, सुख, कीर्ति, मानसन्मान हीं सर्व प्रयत्नवाद्यांनाच प्राप्त होतात. आळशांना कदापि नाहीं. जगाच्या कौशल्यांत, संशोधनांत व ज्ञानांत भर

घालणारे पुरुष सर्व प्रयत्नवाद्यांतूनच निर्माण झालेले दिसतात. उद्योगी पुरुषच साहसी होतो " साहसे श्रीः प्रतिवसति । "

९

प्रयत्नें वाळूचे कण रगडितां तेलहि गळे ।
तृषार्ताची तृष्णा मृगजळ पिऊनीहि वितळे ।

या पद्यांत म्हटल्याप्रमाणें प्रयत्नानें वाटेल ती गोष्ट साध्य आहे व जगांत शेंकडा नव्याण्णव गोष्टींत प्रायः हाच अनुभव येतो. मात्र तो प्रयत्न अचूक पाहिजे. अचूक प्रयत्नानें विधिलिखितसुद्धां बदलतें, असें समर्थ म्हणतात—

रेखा तितकी पुसोनि जाते । प्रत्यक्ष प्रत्यया येते ।
डोळे झांकणी करावी ते । काय निमित्य ।।

१०

जगांत पाहिजे तें उद्योगानें व कर्तृत्वानेंच होतें म्हणून आधीं प्रयत्न केला पाहिजे. लोकांमध्यें विशेषतः हिंदुसमाजांत, त्यांतल्यात्यांत अडाणी लोकांत–दैव, नशीब वगैरे ज्या कल्पना रूढ आहेत त्या पुरुषार्थ मारून टाकणाऱ्या आहेत; त्या आळशी लोकांनीं पुढें आणिल्या आहेत. त्या नाहींशा करा व उद्योगी बना. उद्योग न करणारा मनुष्य समाजाचा 'चोर' समजावा.

११

श्रमाविना श्रीची प्राप्ति नाहीं. पुरुषार्थी मनुष्याचा मित्र परमेश्वर, म्हणून यत्न करावा व पुरुषार्थ संपादन करावा. 'प्रयत्नांतीं परमेश्वर' अशी म्हणच आहे. मनुष्य प्रयत्न करूं लागला तर अंगणांतलीं झाडें देखील कल्पवृक्ष होतील.

१२

उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः । दैवंहि देवमिति कापुरुषा वदन्ति ।
दैवंनिहत्य कुरु पौरुषमात्मशक्त्या । यत्ने कृते यदि न सिद्धयति कोऽत्र दोषः ।।

यत्न करूच सिद्धि पावावी, मग ती न मिळाल्यास आपणाकडे दोष नाहीं असें म्हटले आहे. तेव्हां यत्नानेंच सिद्धि मिळते. नुसत्या दैवानें मिळत नाहीं. " यत्न तो देव जाणावा " असें समर्थ म्हणतात. म्हणून यत्नदेवाची उपासना करा.

कर्तृत्वहीन संसारी । नव्हे पुरुष ना तो नारी ॥ ( तुकाराम )

१३

आलस्यं हि मनुष्याणां शरिरस्थो महारिपु: ।
नास्तुद्यमसमो बंधु:कृत्वा यं नावसीदति ॥

उद्योग हा मनुष्याचा मित्र होय व आळस हा परम दारुण शत्रु होय. मनुष्यासाठीं देवानें सर्व कांहीं उत्पन्न करून ठेवलेलें आहे. पण स्वत:च्या खटपटीनें साध्य करून घेतलें पाहिजे. जमीनींत पीक येण्याची शक्ति ठेवली आहे. पण प्रथम बीं पेरलें पाहिजे, खत घातलें पाहिजे, कापणी, मोडणी केली पाहिजे. मग पीक हाताला येईल. उद्योग करावा, हा मनुष्याचा धर्म आहे. तो करील त्यालाच यश मिळेल.

१४

जयोऽस्मि व्यवसायोऽस्मि ।' असें श्रीकृष्णांनीं भगवद्गीतेंत सांगितलें आहे. उद्योग करणाऱ्याला देव साहाय्य करतो व म्हणूनच लक्ष्मी उद्योगी पुरुषाचा आश्रय करते.

१५

सततोद्योगानें मोह नाश पावतो अशी इंग्रजींत एक आहे.पण रिकामटेकडा मनुष्य नसता उपद्व्याप करीत रहातो.तेंच त्याचें मन कांहीं ना कांहीं उद्योगांत मग्न असेल तर त्याला नसते चाळे सुचत नाहींत. हा नेहमींचा अनुभवच आहे. खेड्यापाड्यांतून याचें चित्र ठळक दिसेल.

१६

दोनप्रहरचे बारा होईपर्यंत पाठ शेकीत चावडींत अगर गांवओटचावर तंबाखूचा धूर काढीत राहाणारा महाराष्ट्रांतील शेतकरी दरिद्री कां, हें पाहा-

वयाला लांब जावयास नको. त्याचें दारिद्र्य त्याचे आळसांतच आहे. मनुष्याला काम ( उद्योग ) पाहिजे व तें त्यानें सतत केलें पाहिजे. मिठाशिवाय भाजी जशी अळणी, तसेंच उद्योगाशिवाय आयुष्य अळणी होय.

१७

उद्योगाशिवाय ऐश्वर्य नाहीं, वैभव नाहीं. तो अमुकच करावा असें नाहीं; ज्याला जो सुचेल, पचेल, साधेल तो त्यानें करावा. निष्कारण कालक्षेप करूं नये, हा एकंदर मतितार्थ.

म्हणून आळस नसावा। तरीच पाहिजे वैभवा।
अत्रीं परत्रीं जीवा। समाधान ।। ( रामदास )

१८

उद्यमेन हि सिद्ध्यंति कार्याणि न मनोरथैः। ( पंचतंत्र )
मनुष्यानें विद्या, बल, यश आणि पुण्य यांची जोड करणें हें त्याचें अवश्य कर्तव्य आहे.

१९

आधीं मेळवी मग जेवी। गुंतल्या लोकांस उगवी।
शरीरकारणीं लावी। कांहीं तरी ।।

हा समर्थांचा दंडक आहे. उद्योग अगर श्रम केल्याविना जेवण्याचा मनुष्याला अधिकारच नाहीं हें यांतलें रहस्य आहे.

२०

आयुष्याचे पूर्वार्धांत व्यर्थ कालक्षेप केला तर मनुष्याला त्याच्या उत्तरार्धांत सुखाची आशाच नाहीं हें लक्षांत घेतलें पाहिजे.

२१

वस्तुतः उद्योगासारखा शिक्षक नाहीं. उद्योगानें मनुष्य आत्मसंयमी व सावध होतो. दक्षता आणि हुषारी मनुष्याला उद्योगानेंच प्राप्त होतात.

श्रेष्ठतेचा पाया स्वावलंबन. अधोगतीचें मूळ परावलंबन होय. जीवनकलहांत यश:प्राप्ति उद्योगानेंच होते. जगांतील मोठीमोठीं कामें उद्योगानेंच सिद्ध होतात. प्राचीन ऋषींचे ग्रंथ पाहा, वेरूळचीं लेणीं पाहा, म्हैसूरचा वृन्दावन, इजिप्तमधील पिरॅमिड पाहा, चीनमधील भिंत पाहा अगर सुवेझचा कालवा पाहा! हीं सर्व अद्भूत दृश्यें मानवी उद्योगानें सिद्ध झालीं आहेत. ज्या वस्तूविषयीं मनुष्याची प्रीति प्राप्त व्हावीं अशी त्याची इच्छा असते तीस पुरुषार्थ म्हणतात (जै.सू.) "धर्म, अर्थ, काम, मोक्ष" हे चार पुरुषार्थ होत. हें संपादन करण्यास पुरुषप्रयत्न अवश्य पाहिजे."

२२

उद्योगी माणसेंच पाषाणाचे अंगीं देवपण आणूं शकतात. पाषाणसुद्धां पाथरवट व भाविक लोक यांच्या कर्तृत्वशक्तीनें आणि सहवासानें देवपणास पात्र होतो. सततोद्योग हाच समाधानाचा खरा मार्ग आहे. रिकामा वेळ आपल्या कट्टया शत्रूहूनहि त्रास देणारा असतो.

२३

उद्योगानें व मनोनिग्रहानें आयुष्यहि वाढतें. शिवलीलामृतांत आलेली भद्रसेन राजाच्या मुलाची गोष्ट, अगर मार्कंडेयानें शंकराची आराधना करून विधिलिखितहि खोटें ठरविलें व आपण दीर्घायुषी झाला ही गोष्ट पाहा. पौराणिक कथा उद्योगाची व सतत प्रयत्नांचीच महती गातात.

२४

उद्योगाचें महत्त्व सांगावें तितकें थोडेंच आहे. मनुष्य कोणत्याहि अवस्थेंत असला तरी त्याचे मागें उद्योग हा परमेश्वरानें लावलाच आहे. शेतकरी उद्योग न करील तर खावयाला अन्न मिळणार नाहीं. विद्यार्थी अभ्यास करणार नाहीं तर तो ज्ञान संपादन करूं शकणार नाहीं. लहानमोठे कोणतेहि पदार्थ उद्योगाविना प्राप्त होणार नाहींत.

उद्यमः साहसं धैर्यं बलं बुद्धिः पराक्रमः ।
षडेते यस्य तिष्ठन्ति स सर्वं प्राप्नुयात् पुमान् ॥

उद्योग, साहस, धैर्य, बुद्धि, बल आणि पराक्रम हीं सहा जेथें असतात तेथें प्रत्यक्ष परमात्मा साहाय्यकारी होतो. या गुणांनींच मनुष्य सर्व प्रकारची

उन्नति साधूं शकतो असें वसिष्ठ महर्षि म्हणतात. पुरुषार्थ सिद्धीचा हा मूलमंत्र आहे. तस्मात् उद्योग हाच प्रधान आहे. माणसें उद्योग करून वैभवास चढलेलीं व सुखी झालेलीं उदाहरणें शेंकडों मिळतील पण उद्योग करून दारिद्र्य व अपकीर्ति झाली आहे असें आढळणारच नाहीं; मात्र सतत उद्योग केला पाहिजे.

प्रयत्न केल्यावांचून दैवहि फलप्रद होत नाहीं.

पूर्वजन्मकृतं कर्म तत् दैवमिति कथ्यते।
तस्मात् पुरुषयत्नेन विना दैवं न सिद्ध्यति ॥

पूर्वजन्मीं केलेलें जे जें कर्म (प्रयत्न) त्यालाच वर्तमानकाळीं दैव असें म्हणतात. तस्मात् प्रयत्न केल्याविना दैव फलप्रद होत नाहीं.

२५

भाग्यदेवता कोठें राहाते याचें उत्तर देतांना

॥ वसामि नित्यं सुभगे प्रगल्भे
दक्षे नरे कर्मणि वर्तमाने ॥

"कामांत गढून जाणारा व दक्ष असेल अशाच्याच जवळ मी रहातें" असें भाग्यश्रीनें सांगितल्याचें महाभारतांत वर्णन आहे. दैवाचें काम दैव करीत असतेंच; आपलें काम आपण करावें हा श्रेष्ठ मार्ग.

२६

अमेरिकेला प्रसिद्ध शास्त्रज्ञ व संशोधक एडिसन. 'वयाला पंचावन्न वर्षें होईपर्यंत रोजीं साडेएकोणीस तास काम करीत असे म्हणतात. केवढा जबरदस्त उद्योग!!

२७

जगांतल्या यच्चावत् सर्व गोष्टी दैव व पुरुषप्रयत्न या दोहोंवर अवलंबून आहेत. उत्तम मशागत केलेल्या जमीनीवर पाऊस पडल्यानें जसें पीक चांगलें येतें, त्याप्रमाणें उद्योगी पुरुषास दैवाची अनुकूलता झाल्यास मोठमोठीं कार्यें यशस्वी होतात. तथापि नुसत्या दैवानें काम साधत नाहीं; पुरुषप्रयत्नाची जोड पाहिजेच. दैव व प्रयत्न हीं नेहमीं एकमेकांच्या आश्रयानें असतात.

# १०

# कर्तव्यपालन

१

भगवान् श्रीकृष्णांनीं भगवद्गीतेंत सांगितलेल्या रहस्याचें सार दोनच शब्दांत सांगावयाचें तर तें " कर्तव्यकर्म कर ! " हेंच सांगतां येईल. गीता कुरुक्षेत्रांत सांगितली आहे. ' कुरु ' म्हणजे कर्म. तेव्हां कुरुक्षेत्र म्हणजे कर्तव्यक्षेत्र होय.

२

कुरुक्षेत्राच्या रणांगणावर दोन्हीकडील सैन्यें युद्धास सज्ज झालेलीं पाहून अखेर परिणाम म्हणजे सर्व आप्तेष्ट, गुरुजन यांचा नाश हें जाणून अर्जुनास मोह उत्पन्न झाला व ' मी युद्ध करीत नाहीं, ' असें म्हणून अर्जुन स्वस्थ बसला; त्यावेळीं श्रीकृष्णानें सुंदर उपदेश करून त्याचा भ्रम दूर केला व त्याला युद्धप्राप्त–कर्तव्य करावयास लाविलें. तो उपदेश म्हणजे भगवद्गीता होय. या गीतेंत सर्व धर्मांचें सार आहे व त्यांतील सिद्धांत त्रिकालावाधित आहेत.

तीर्थांमाजीं मातापिता । ज्ञानामाजीं सर्वसमता ।
व्रतांमाजीं पवित्रता । तेवीं तत्वतां मीही ।।
शोधून वेदशास्त्रांस । निवडोन पुराण इतिहास ।
सर्वांचाही ब्रह्मरस । गीता ही ।। (जानशिखा)

गीतेचें तत्त्वज्ञान अमर आहे. सर्व धर्म व नीति यांतील तत्त्वांचा समन्वय केला आहे. गीतेंत सर्व धर्मांचें सार गोवलेलें असल्यामुळें ती जगांत वंद्य झाली आहे.

३

'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन', कर्म करण्याचा तुझा अधिकार आहे. फळ मिळणें न मिळणें हें तुझ्या हातचें नाहीं असें अर्जुनाला सांगण्यांत भगवंताची कर्तव्यनिष्ठुरताच व्यक्त होते. व्यवहारांतदेखील कांहीं कांहीं गोष्टी कर्तव्य म्हणूनच कराव्या लागतात. व त्या केल्याच पाहिजेत.

४

धर्म (कर्तव्य) हा मनुष्याला मुख्य आहे. कर्तव्य म्हणून कराव्या लागणाऱ्या गोष्टी दिसण्यांत वाईट दिसल्या तरी त्या खऱ्या वाईट नव्हत. सर्व भार परमेश्वरावर टाकावा व आपलें कर्तव्य करीत असावें एवढेंच माणसाचें काम आहे. कर्में करावीं व तीं परमेश्वराला अर्पण करावीं; अहंकारबुद्धीनें त्यांचें कर्तृत्व आपलेकडे घेऊं नये; सुखानें हुरळून जाऊं नये; दुःखानें हताश होऊं नये; सर्व स्थितींत समता ठेवावी; वर्णाश्रम पाळलाच पाहिजे; क्षत्रियास उचित असें कर्तव्यकर्म–युद्ध केलेंच पाहिजे, हें गीतेचें सार आहे. गीता हें बोलाचें शास्त्र नाहीं, आचरणाचें शास्त्र आहे. 'मणभर चर्चेपेक्षां कणभर आचरण' केव्हांहि श्रेष्ठ होय.

५

ज्यानें त्यानें आपलें कर्तव्यच केलें पाहिजे. 'कर्तव्यास चुकला तो व्यवहारास मुकला,' ही सत्य गोष्ट आहे. म्हणूनच बुद्धिवान् कार्यैकनिष्ठ पुरुष आपलें कर्तव्य धैर्यानें व उत्साहानें पार पाडतात. मनुष्य पुष्कळ वेळां स्वकर्मभ्रष्ट होऊन भलत्याच कल्पनेच्या भरीं पडून करूं नये तें करण्यास प्रवृत्त होतो.

न जावें तेथ जाये। न पहावें तें जो पाहे।
न खावें तें खाये। तेवींचि तोषे॥ ज्ञानेश्वरी–अ. १३–१.

कर्तव्यभ्रष्टतेचा परिणाम दुःखप्राप्ति ह्राच व्हावयाचा.

६

कार्य कोणतें, अकार्य कोणतें याचा व्यामोह प्रत्येकास साध्या घरगुती गोष्टींत तसेंच व्यवहारांतहि पदोपदीं पडतो. व पुष्कळ वेळां हें करूं कां तें करूं असें होतें.

७

अशा वेळीं ज्याचें त्यानें आपलें प्रसंगप्राप्त कर्तव्य केलें पाहिजे. मग त्याचें फल मिळो अगर न मिळो. फलाची आसक्ति न ठेवतां कर्तव्यकर्म करीत राहावें. आपलें कर्तव्य प्रामाणिकपणें करण्यांत मोठेपणाचें बीज आहे. फलदाता श्रीहरि आहे असें मानून केवळ कर्तव्य म्हणून जें केलें जाते तें श्रेष्ठ प्रतीचें होय. 'स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धि लभते नरः।' असा गीतेचा सिद्धान्त आहे.

८

कर्तव्याचा आरंभ जन्मापासूनच होतो व मृत्यूनेंच संपतो. जन्मभर कर्तव्य मागें लागलेलेंच असतें. तें कधीं कोणास चुकावयाचें नाहीं. लहान असो मोठा असो, श्रीमंत अगर गरीब असो, प्रत्येकाचे पाठीमागें कर्तव्य म्हणून आहेच. धन्याचे नोकरांविषयीं तसेंच नोकरांनाहि आपल्या धन्याविषयींचे कर्तव्य आहे. आईबापांना आपल्या पुत्रांविषयीं, मुलांना मातापित्यांविषयीं, पुरुषाला स्त्रीविषयीं व स्त्रीला पुरुषाविषयीं परस्पर कर्तव्य असतेंच.

९

पुरुषांचीं तशींच स्त्रियांचीहि कर्तव्यें कांहीं निसर्गनिर्मित ठरलेलीं आहेत. पुरुषानें केव्हांहि रिकाम्या घरीं येऊं नये व स्त्रीनें कांहींहि जिन्नस वायां घालवूं नये, अशी कर्तव्याची वांटणी आहे. ती ज्याची त्यानें करण्यांतच व्यक्तिहित, समाजहित तथा राष्ट्रहित आहे.

१०

कर्तव्यतत्परता अंगीं असणें हा एक मोठा गुण आहे. कर्तव्यास पराङ्मुख होणें म्हणजे आपण आपल्या पायांवर धोंडा पाडून घेणें होय. मनुष्याची योग्यता त्याचें कर्तव्यतत्परतेवर असते; बाह्य गुणावर नव्हे.

११

कर्तव्यजागृति ज्याचे ठिकाणीं असेल त्याचें आयुष्य सुखानें जातें. कर्तव्यजागृतीमुळें मनुष्याला पुष्कळ समजतें, व त्याप्रमाणें तो वागण्याचा प्रयत्न करतो, तो प्रामाणिक व सत्याचा अभिमानी होतो, व आयुष्यांत येणाऱ्या आपत्तींशीं झगडण्याचें त्यास सामर्थ्य येतें.

१२

कर्तव्य शब्दाची व्याप्ति फार मोठी आहे. स्वत:पुरतें पाहणें म्हणजे कर्तव्य नव्हे. इतर कुटुंबियांचा नि:स्वार्थपणें परामर्ष घेणें, अगर समाजाविषयींचें कर्तव्य निष्कामपणें करणें, यालाच कर्तव्य म्हणतात. उदाहरणार्थ; नदीकांठीं एक पोहणारा आहे व दुसरा एक मनुष्य पाण्यांत बुडत आहे; तर त्यास वर काढणें हें पहिल्याचें कर्तव्य होय. नुसतें स्नान करून घरीं जाणें कर्तव्य नव्हें. स्वत: मेहनत घेऊन विद्याभ्यास करणें, एखादी कला हस्तगत करणें यास उद्योग म्हणतां येईल. पग विद्वान् होऊन अहेतुक बुद्धीनें विद्यादान करणें अगर आपले हाताखालीं अनेक तज्ज्ञ व कारागीर तयार करणें हें कर्तव्य होय. कर्तव्य म्हणजे ज्यावेळीं जी गोष्ट केली पाहिजे ती करणें. भिन्नपरिस्थितींत कर्तव्य भिन्न होऊं शकेल. एकच गोष्ट सर्व ठिकाणीं सारखीच लागू होणार नाहीं. कर्तव्याकर्तव्याची निवड करणें नेहमींच सोपें नसतें. तथापि प्राप्तकर्तव्य अत्यंत निष्ठेनें व दृढनिश्चयानें कितीहि अप्रिय व अनिष्ट असलें तरी केलेंच पाहिजे. श्रीकृष्णांनीं ' मामनुस्मर युद्धयच । ' असेंच किंकर्तव्यमूढ झालेल्या अर्जुनास उपदेशिलें व भीष्मादिक आप्तेष्टांचा वध होईल या भीतीनें धर्मसंमूढ होऊन युद्धपराङ्मुख झालेल्या अर्जुनास ' युद्ध करणेंच या कालीं तुझें कर्तव्य होय, ' हें सांगून तेंच युद्ध त्यास स्वेच्छेनें करावयास लाविलें.

कर्तव्यनिष्ठुरता ही अशीच कठीण गोष्ट आहे. पण ती प्रसंगीं करावी लागते. यांतच कर्तव्यश्रेष्ठतेचें व तें पालन करण्याचें बीज आहे. मुलगा न्यायाधीश असेल व बाप गुन्हेगार म्हणून त्याचे पुढें आला तर त्याचें न्यायाधीश या नात्यानें कर्तव्य म्हणून त्यांस शासन करावें लागतें; महाभारतांतील कच–देवयानी आख्यान हें या कर्तव्यनिष्ठुरतेचें उत्कृष्ट उदाहरण

होय. देवयानीसारखी रूप, गुण, शील व यौवन यांनीं संपन्न स्त्री पाणि-ग्रहणासाठीं सहजीं मिळत असतां, समाप्तविद्य कचानें तिचा अंगिकार केला नाहीं; ही कचाची कर्तव्यजागरुकता होय.

१३

कर्तव्यपालनाचे इतिहासांतील जिवंत उदाहरण म्हणजे बाजी प्रभू देशपांडे. रांगण्याच्या खिडींतून विशाळगडावर छत्रपती शिवाजी महाराज सुखरूप पोहोंचेपर्यंत मोंगलांच्या अफाट सैन्यास थोपवून धरून आपलें बलि-दान केलें व ते सुखरूप पोहचल्याबद्दल खुणेच्या तोफांचे आवाज ऐकल्या-नंतरच प्राण सोडला ही लोकोत्तर कर्तव्यनिष्ठा.

१४

आपलें कर्तव्य आपण करावयाचें, हें ध्येय नेहमीं प्रत्येकानें ठेवावें. आयुष्यांत, प्रपंचांत व व्यवहारांत निरनिराळ्या नात्यानें, पेषानें निर-निराळीं कर्तव्यें करावीं लागतात. तीं मनापासून केलीं पाहिजेत, त्यांत आपला स्वार्थ साधो अगर न साधो, कोणी स्तुति करोत वा निंदा करोत, त्याची पर्वा नको. कर्तव्यपालनानें अंतःकरणाला जें समाधान होतें तेंच कर्तव्याचें खरें बक्षीस होय.

१५

ज्या समाजांतील व राष्ट्रांतील लोक आपलें कर्तव्य उत्तम रीतीनें बजावतात त्याच समाजाची व राष्ट्राची उन्नति होते.

# ११

## व्यवहारचातुर्य

### १

जगाच्या बाजारांत ज्याला निभावून जावयाचें असेल त्याचे अंगीं व्यवहारचातुर्य असण्याची अत्यंत आवश्यकता आहे. नाहीं तर पुष्कळ वेळां 'वेडे मेजवान्या करती, शहाणे बसून खाती' असें होतें. याचा अर्थ व्यवहारज्ञ मनुष्य दुसऱ्याचे अकुशलतेचा फायदा घेतो. याकरितां प्रत्येकानें व्यवहारचातुर्य संपादन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. व्यवहारांत यश येण्यास बुद्धीपेक्षांहि धोरण असण्याची जरूरी असते. व्यवहारांत सौजन्यानें वागावें लागतें. त्याला कांहीं खर्च लागत नाहीं. पण त्यामूळें सर्व गोष्टी प्राप्त होतात हें मात्र खरें.

### २

परिस्थिति व प्रसंग लक्ष्यांत घेऊन बोलणें व वागणें अगर, एखाद्या गोष्टींत कांहीं तरी वैशिष्ट्य दाखविणें यास समग्र्येंकरून व्यवहारचातुर्य म्हणतात.

> दाक्षिण्यं स्वजने दया परजने शाठ्यं सदा दुर्जने
> प्रीतिः साधुजने नयो नृपजने विद्वज्जनेऽप्यार्जवम् ।
> शौर्यं शत्रुजने क्षमा गुरुजने नारीजने धूर्तता
> ये चैवं पुरुषाः कलासु कुशलास्तेष्वेव लोकस्थितिः ।।

आप्तसोयरे ह्यांच्याविषयीं दक्षता, आश्रितादिकांवर दया, दुर्जनांविषयीं शठपणा, सज्जनांवर प्रीति, राजाशीं नम्रता, विद्वानांशीं सरळपणा, शत्रूंशीं

शौर्य, श्रेष्ठाविषयीं सहिष्णुता व स्त्रियांपाशीं धूर्तता याप्रमाणें जो वागणारा व्यवहारनिपुण पुरुष असेल अशावर समाजधारणा अवलंबून असते.

३

इतर अनेक गोष्टींप्रमाणें बाह्य जगाचे व्यवहारांत ज्या ज्या गोष्टींची जरूरी असते त्या सर्वांचा आरंभ प्राय: घरापासूनच असतो, अगर होतो; तसेंच, व्यवहारचातुर्याचेंहि आहे. कुटुंबांत आईबाप, वडीलधारे, भाऊबहिणी, मुलीमुलें, सुना, आप्तेष्ट अशी निरनिराळ्या नात्याची मंडळी असतात. त्या सर्वांशीं वागतांना निरनिराळ्या धोरणानें वागावें लागतें; अनेकांचीं अनेक तंत्रें सांभाळावीं लागतात. यालाच व्यवहारचातुर्य लागतें.

४

व्यवहारांत मनुष्य एककल्ली असून भागत नाहीं. ऋतुमानाप्रमाणें हवेंत बदल झाला तरी तो सोसण्याचें सामर्थ्य शरीरांत पाहिजे, अगर मिळेल तें अन्न खाण्याची संवय मनुष्यास असली पाहिजे. त्याप्रमाणें निनिनिराळ्या लोकांशीं गोडीगुलाबीनें वागण्याची तयारी अंगीं असली पाहिजे. पाणी ज्याप्रमाणें ज्यांत मिसळावें त्याप्रमाणें बनतें, तद्वत् जसा मनुष्य भेटेल तसें त्याच्याशीं वागतां आलें पाहिजे व वागलें पाहिजे. तरच सर्व सुरळीत चालतें. हा जगाचा न्याय आहे.

५

केल्यानें देशाटन पंडितमैत्री सभेंत संचार ।
शास्त्रग्रंथविलोकन मनुजा चातुर्य येतसे फार ।।

जो चार देश फिरलेला असतो, मोठमोठ्या विद्वानांची ज्यास संगत लाभते, अगर ज्यानें निरनिराळ्या शास्त्रांचा सूक्ष्म अभ्यास केलेला असतो, तो चतुर असतो अगर होतो. मनुष्यानें व्यवहारचतुर होण्यास प्रवास, निरनिराळ्या शास्त्रांचा अभ्यास वगैरे गोष्टींचा अवलंब केला पाहिजे; तरच

त्याला व्यवहारांत हरघडी संबंध येणाऱ्या माणसांची पारख करतां येते. माणसाची पारख करूनच त्याच्याशीं व्यवहार करणें केव्हांहि चांगलें. त्याचे अभावीं पुष्कळ वेळां कित्येक माणसें फसतात हें आपण पाहतोच.

६

माणसांची परीक्षा चेहऱ्यावरून, बोलण्यावरून अगर पोषाखावरून साधारणपणें करतां येते. मात्र हें सर्वांशीं खरें नाहीं: कारण दिसण्यांत शिष्ट पण कृतीनें दुष्ट व गोड बोलून गळा कापणारांची संख्या समाजांत कांहीं कमी नसते. म्हणूनच माणसाची पारख करण्याची व्यवहारांत जरूरी असते. ती साधारणपणें "तथा चतुर्भिः पुरुषः परीक्षते श्रुतेन शीलेन कुलेन कर्मणा।" म्हणजे विद्या, स्वभाव, कुल व कर्तृत्व अशा चार प्रकारांनीं करावी लागते.

७

कोणत्याहि व्यवहारांत सिद्धि प्राप्त होण्यास चातुर्याची अत्यंत जरूरी आहे. चतुर मनुष्य आपलें काम सफाईनें व सुगमतेनें करून घेतो. अनेक फंदांतून आपली आपण सुटका करून घेतो. तसेंच आपल्या चातुर्यानें दुसऱ्याचे मनांतील भाव सहज समजून घेतो व परिस्थितीप्रमाणें आपली वागणूक ठेवतो. ज्याच्यांत व्यवहारचातुर्य नाहीं असा मनुष्य ठिकठिकाणीं फसला जातो. व व्यवहारांत मूर्ख ठरतो. याकरितां मनुष्यानें व्यवहारचातुर्य संपादन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

८

व्यवहारज्ञानांत देश, काल, परिस्थिति इत्यादि अनेक गोष्टींचे समग्र्यें करून अवलोकन व ते व्यवहारांत उपयोगांत आणण्याची कलाहि अवगत असली पाहिजे. नाहींतर केवळ पांडित्य व्यर्थ होय. वेळीं उपयोगी पडत नाहीं ते ज्ञान असून नसल्यासारखेंच.

विद्या उदंडचि शिकला । प्रसंगमान चुकतची गेला ।
तरी मग तये विद्येला । कोण पुसे ॥

दासबोध

९

व्यवहारचातुर्य ही अभ्युदयाची पहिली पायरी आहे. युक्ति अगर चातुर्य अर्थात् व्यवहारज्ञान प्रसंगीं फार मोठें काम देतें. वैभवकालीं अनेक मित्र मिळतात पण त्यांची खरी परीक्षा आपत्कालीं होते. ती व्यवहारज्ञानानें करतां येते.

१०

व्यवहार आणि व्यवहारज्ञान यांचा अन्योन्य संबंध आहे. व्यवहारांत वागणारांस व्यवहारज्ञान नसेल तर मग अंधारच–काळा बाजारच म्हणाना. पुष्कळ उत्पन्न असूनहि व्यवहारज्ञान अंगीं नसेल तर सर्व फोल आहे.

११

व्यवहारशून्य माणसाला देव प्रसन्न झाला तरी उपयोग होत नाहीं. या संबंधीं एक कल्पित गोष्ट सांगतात ती अशी : देवानें एकाला तीन वर दिले. एका वराने त्यानें बायको सुंदर असावी म्हणून मागितलें. बायको सुंदर झाली पण कमरेची घागर चुकली नाहीं. नदीवर पाण्यासाठीं गेल्यावेळीं कुटाळांनीं तिचे घड्यावर खडे मारिले, म्हणून वैतागून ती कुरूप व्हावी म्हणून दुसरा वर मागितला. तेव्हां ती अस्वली झाली आणि तिनें नवऱ्यास ओरखाडण्यास सुरुवात केली; तेव्हां पहिली होती तशीच होऊं दे, म्हणून तिसऱ्या वरानें मागणी केली. झालें ! देव प्रसन्न होऊन ती होती तशीच राहिली. हा सर्व व्यवहारशून्यतेचा परिणाम !

१२

प्रपंच म्हणजे काय आणि तो कसा करावा, व्यवहारांत तसेंच कुटुंबांतील निरनिराळ्या व्यक्तींशीं नातें, पैजा लक्षांत घेऊन वागावें कसें, व्यवहारांत

भल्या बुऱ्या प्रसंगीं कसें वर्तन असावें, कोणती दक्षता घ्यावी, नित्य नैमित्तिक अगर प्रासंगिक कार्याचा आरंभ कसा करावा याचें आकलन होणें हेंच व्यवहारज्ञान.

१३

व्यवहारज्ञानांत अनेकानेक गोष्टींचा समावेश होतो. समाजांत वागणें तर येतेंच पण व्यवहारांत हरघडी उद्‌भवणाऱ्या अनेक प्रश्नांची अद्यावत् माहितीहि अवश्यमेव करून घेतली पाहिजे. नाहींतर भोंगळपणा पदरी येतो.

१४

व्यवहाराला अजागळपणाचें वावडें आहे. पुष्कळ वेळां ऐपत असूनहि केवळ हलगर्जीपणामुळें अगर आळसामुळें कित्येक माणसें आवश्यक वस्तूंचा संग्रह करीत नाहींत, व जरूर पडली कीं धांवत सुटतात. मग हंसें होतें. हा अजागळपणा व्यवहारांत चांगला नव्हे. कारण त्यामुळें शेजाऱ्यापाजाऱ्यांस उपसर्ग होतो. कधींच कोणास मागणार नाहीं असें म्हणून जगांत चालावयाचें नाहीं, पण दुसऱ्याकडे शक्य तितकें कमी मागण्याचा प्रसंग असावा, हें व्यवहाराला बरें.

१५

तसेंच उसनवारी, उधारी वगैरेचेंहि आहे. व्यवहारांत असे प्रसंग लहानमोठ्यांस, गरीबश्रीमंतांस प्रत्येकास येतातच. रावापासून रंकापर्यंत सर्वांस उसनवारी ही करावी लागतेच. उधार आणावें लागतें. परंतु परिणामीं या गोष्टी वाईट आहेत, हें सदैव लक्ष्यांत बाळगलें पाहिजे. उसना मागून आणलेला जिन्नस अगर रक्कम ठरल्या वेळेला परत करणें व्यवहाराला अत्यंत जरूर आहे. उधार आणण्याची संवय अशीच घातकी आहे. त्यांत मनुष्याचें स्वातन्त्र्य राहात नाहीं; देईल तसला, देईल त्या भावानें माल घ्यावा लागतो व शेवटीं घर भिकेला लागतें. याकरितांच मनुष्याचे अंगीं व्यवहारज्ञान असण्याची आवश्यकता आहे.

१६

कोणत्याहि गोष्टींत बेंगरूळपणा, बावळटपणा अगर आडमुठेपणा करून चालत नाहीं. कोणत्याहि लहानमोठ्या गोष्टी व्यवस्थितपणें करण्याची संवय असली तरच हातून मोठमोठीं कामें देखील सफाईनें व लीलेनें उरकलीं जातात. प्रत्येक गोष्टीचें कांहींएक ठराविक तन्त्र असतें. तें तन्त्र जाणून काय तें केलें पाहिजे. तन्त्रसिद्ध गोष्ट हुकमी असते.

१७

ज्ञान हें कच्चा माल पुरवितें; चातुर्य त्याचा योग्य विनियोग करतें. चातुर्यावांचून ज्ञान जवळजवळ निरुपयोगी आहे. म्हणजे 'झाड सत्यभामेचे घरीं व फुलें रुक्मिणीचे दारीं' असें होतें. ज्ञान म्हणजे एखाद्या विषयाची माहिती व चातुर्य म्हणजे तिचा उपयोग कसा करावा ही कला. ज्ञान, चातुर्य आणि तदनुरूप आचरण हीं अवश्य पाहिजेत. 'यः क्रियावान् स पंडितः।' ज्याचें ज्ञान आचरणांत उतरलें तोच खरा ज्ञानी. कोणत्याहि नवीन गोष्टी किंवा कल्पना यांचा शोध लावून त्या प्रत्यक्ष आचरणांत आणणें हा मनुष्याच्या उन्नतीचा मूलमंत्र आहे.

१८

ऐहिक ऐश्वर्य प्राप्त होण्यास व व्यवहारांतहि मानमान्यता संपादण्यास सदाचार व चातुर्य यांची नितान्त आवश्यकता आहे.

सदाचार चातुर्य हीं दोन रत्नें, जगीं धन्य जे मेळवीती प्रयत्नें ।<br>
दीर्घायुता, धनिकता, बहुमान्यताही, चातुर्ययुक्त मनुजास अलभ्य नाहीं ।।<br>
(सुख आणि शान्ति)

१९

आकारेणैव चतुरास्तर्कयन्ति परेङ्गितम् ।<br>
गर्भस्थं केतकीपुष्पमामोदेनेव षट्पदाः ।।

चतुर लोक दुसऱ्याचें हृद्गत चर्येवरून ओळखतात. पानांत झांकलेलें केतकी पुष्प भ्रमर जे आहेत ते वासानेंच ओळखतात. म्हणूनच व्यवहारांत चातुर्याची आवश्यकता आहे. मनुष्याची पारख करावयास चातुर्य हें लागतेंच. एखादा मनुष्य वाजवीपेक्षां अधिक लवून नमस्कार करीत असेल तर तो महाठक आहे हें निश्चित समजावें.

२०

अपि शास्त्रेषु कुशला लोकाचारविवर्जिताः ।
सर्वे ते हास्यतां यान्ति यथा ते मूर्खपण्डिताः ॥ –पंचतन्त्र ५·३९

ज्ञान असूनहि ज्यांचे अंगीं व्यवहारचातुर्य नाहीं ते पंचतन्त्रांतील चार पढतमूर्ख ब्राह्मणांप्रमाणें लोकांच्या उपहासास पात्र होतात.

२१

कोणत्याहि गोष्टींत तसेंच व्यवहारांतहि तारतम्य पाहिजे. व्यावहारिक तारतम्य म्हणजे त्यांत स्वतत्र विचारांचा अंतर्भाव होतो. एकच गोष्ट नेहमींच सारखी लागू पडते असें नाहीं. वेळप्रसंगीं तारतम्य हें सर्वच गोष्टींत ठेवावें लागतें. यासच व्यवहारज्ञान अगर चातुर्य लागतें. थोडा स्वतंत्र विचार पटवून घेण्याची थोडी बुद्धि, दुसऱ्याचें थोडे बरें करण्याची इच्छा हीं मनांत असतील व प्रत्येकानें तीं व्यवहारांत आणलीं तर कितीतरी कलह मिटतील.

२२

इतिहास सुद्धां आपणांस हेंच शिकवितो. शक्याशक्यता, योग्यायोग्यता हीं पाहावींच लागतात. शिवाजीमहाराजांनीं मोरे व अफझुलखान आपल्या कार्याच्या आड आल्यावर त्यांमध्यें कोणताहि भेदाभेद न करतां त्यांचा

कांटा काढला; पण राणा जयसिंगाबरोबर तसें न करतां त्याच्याशीं सख्य केलें. ही गोष्ट इतिहासप्रसिद्धच आहे.

२३

हिते प्रतिहितं कुर्यात् हिंसते प्रतिहिंसितम् ।
तत्र दोषं न पश्यामि शठे शाठ्यं समाचरेत् ॥

हा जगाचा उघडा न्याय आहे. त्याशिवाय जगांत भागत नाहीं. शास्त्रकारांनीं देखील हें तारतम्य व्यवहार ध्यानांत घेऊनच सांगितलें आहे. व्यवहारांत कालभिन्नता म्हणजे स्थलकालविवेक व त्यासंबंधीं तारतम्य याची नितांत आवश्यकता आहे.

१२

# धार्मिक व्यवहार

१

या अखिल विश्वाचा निर्माता जो परमेश्वर त्याचे स्मरणानेंच अंतःकरण पवित्र होतें. अशा अंतःकरणाचे पवित्रतेंतच ज्ञानाचा प्रकाश पडून अज्ञानांधःकाररूपी तिमिराचा विनाश होतो. अतएव आपल्या बुद्धीची पवित्रता राहण्याकरितां त्या सच्चिदानंदब्रह्माचें—परमेश्वराचें रात्रंदिवस स्मरण करणें अवश्य आहे. सद्धर्माचार हें सभ्यतेचें चिन्ह व त्याचा अभाव हीच असभ्यता.

बोलावरून कळे चित्त। आचारणावरूनि पूर्वार्जित ।
क्रियेवरूनि वर्णाश्रम सत्य । परीक्षक जाणती ।। (मुक्तेश्वर)

२

गुराला जसें दावें तसें मनुष्याच्या मनाला खेंचून धरणारें धर्म हें साधन होय. धर्म म्हणजे आपलें कर्तव्यकर्म करण्याविषयीं जे नियम त्यांचा आचार होय. यतोऽभ्युदयनिःश्रेयः स सिद्धिः स धर्मः।।' जेणेंकरून ऐहिक व पारमार्थिक सुखाची प्राप्ति होते तोच धर्म, अशी धर्माची व्याख्या आहे.

३

कित्येक लोक ईश्वरचिंतन स्वतःचे मनःशुद्धीकरितां करीत नाहींत; तर लोकांनीं आपणास धार्मिक म्हणावें अशी त्यांची त्यांत स्वार्थी दृष्टि असते. असे लोक प्रायः जेथें लोकांची ये-जा बरीच असते अशा ठिकाणीं उपासने-

साठीं बैठक मारतात. खऱ्या धर्माचरणास एकांत स्थानच योग्य. चित्ताची एकाग्रता अशाच ठिकाणीं होते. ईश्वरस्मरणास एकांतस्थानच योग्य.

४

धार्मिक चिन्ह समजून अगर आयुर्वेदानुसार कपाळाला चंदनाचा तिलक लावणें इष्ट आहे. पण अधिक सुन्दर दिसावें म्हणून अनेकविध रंगाचे गंध-टिळे करणें धर्मदृष्टया विपरीतच.

५

भीक मागणें ही वाईट गोष्ट आहे. आपण कर्तव्यशून्य बनून दुसऱ्यानें स्वकष्टानें संपादन केलेल्या द्रव्यांतून, आपण कांहीं श्रम न करतां, आपणांस मिळण्याची इच्छा करणें सर्वथा अनुचित आहे.

६

हिंदुस्थानांत भीक मागणारांची संख्या पुष्कळच वाढली आहे व दिवसें-दिवस वाढत आहे. त्यास समाजानेंच आळा घातला पाहिजे. अनाथ-पंगू लोकांची गोष्ट निराळी, पण धडधाकट व तगडे भीक मागत फिरतात; कष्ट करणें त्यांस नको असतें इतकेंच.

७

मिळवून खाण्यास समर्थ अशांनीं भीक मागून निर्वाह करणें अत्यंत अनुचित आहे. वृद्ध, रोगी, अपंग, गरीब विद्वान, साधुसंन्यासी, अगर निर्धन विद्यार्थी हेच भिक्षा मागण्यास अगर दान घेण्यास पात्र होत. यांव्यतिरिक्त जे लोक भीक मागतात ते समाजांतील चोर होत व अशांस मदत करणें म्हणजे शुद्ध आळसाला मदत करणें होय.

८

कोणी कोणत्याहि धर्माचा अगर पंथाचा असो, त्याच्याशीं बंधुभावानेंच व्यवहार करावा. धर्म अलग झाला म्हणून माणुसकी सोडूं नये. माणुसकी

सोडून वागावें असें कोणताहि धर्म सांगत नाहीं. जो ज्या धर्माचा अनुयायी असेल त्यानें आपला धर्म निष्ठेनें पाळावा हेंच श्रेयस्कर आहे. 'स्वधर्मे निधनं श्रेयः ।' हेंच गीता सांगते.

९

ब्राह्मणधर्माप्रमाणें आचरण नसतां आपणांस ब्राह्मण म्हणविणें लांछनास्पद आहे. आजकाल वस्तुतः सर्वत्र हीच परिस्थिति आहे. ब्राह्मण तोच कीं जो समाजाची अधिक नम्रतेनें, स्वार्थरहित व ज्ञानद्वारां सेवा करणारा आहे समाज ब्राह्मणाचें स्वागत करण्यास केव्हांहि तयार असतो.

१०

क्षत्रिय म्हणजे समाजाचें रक्षण करणारा एकनिष्ठ सैनिक होय. क्षत्रिय तोच कीं जो मकपान, लठ्ठालठ्ठी वगैरे न करतां सात्विकपणें वागतो व आपला वेळ व द्रव्य यांचा अपव्यय करून राष्ट्राचें अगर समाजाचें नुकसान करीत नाहीं. क्षत्रियाची आवश्यकता राष्ट्रसंरक्षणाच्या कामीं आहे.

११

देशाची संपत्ति वाढविणारा तो वैश्य. कृषि, पशुपालन व व्यापार ही वैश्याची सद्वृत्ति होय. जो नियुक्त कर्तव्यें बरोबर करीत नाहीं, व्यापार वगैरे बाबतींत ज्याची दृष्टि राष्ट्रीय नाहीं, विदेशी मालास ज्याचेकडून उत्तेजन मिळतें व व्यापारांत राष्ट्राच्या हानिलाभाकडे ज्याचें ध्यान व ज्ञान नाहीं तो खरा वैश्य नव्हे.

१२

शूद्राचा धर्म सेवा होय. सेवावृत्ति करणारे सर्व शूद्र होत; मग जन्मानें ते कोणीहि असोत. सेवा करणें म्हणजे दानधर्म घेणें नव्हे. तेव्हां शूद्रांना समाजांत कमी समजणें निंद्य होय. कारण इतर वर्णांबरोबर राष्ट्रपरिवारांत त्यांनाहि महत्त्वाचें स्थान आहे.

१३

प्रत्येक गांवांत अगर नगरांत विस्ताराचे मानानें अनेक पूजास्थानें व एकाच देवतेचीं अधिक मंदिरें असूं नयेत अगर करूं नयेत. अशीं स्थळें गांवांत एकदोनच असावीं; नाहीं तर कलह व नसता अहंकार हीं उत्पन्न होतात व त्यांत मंदिरांची आबाळ होते. पण ही गोष्ट इतकी सार्वजनिक व गांवोगांव झाली आहे कीं, बांधणारानें मंदिर मोठ्या निष्ठेनें बांधिलें तरी पुढें तेथें झाडलोटहि होत नाहीं ही आमच्याकडील वस्तुस्थिति आहे. तिला आळा घातला पाहिजे.

१४

धर्माचे नांवावर लोकांपासून द्रव्य गोळा करणें व तें सत्कार्यीं खर्च न करणें, म्हणजे शुद्ध फसवणूक आहे. मठ, मंदिरें, धर्मशाळा यांचे संचालकांनीं धर्माचे नांवावर त्यांना मिळणाऱ्या दानाचा व्यय लोकोपकार कार्याकडेच करावा.

१५

मठ, मंदिरें व पूजास्थानें इत्यादि ठिकाणीं मंदिरालगत अगर तेथील आवारांत घर करून राहण्याची प्रथा पुष्कळ ठिकाणीं आढळते. ही अनुचित गोष्ट आहे. निवासस्थानच केल्यामुळें सर्व प्रकारचा प्रापंचिक व्यवहार, गोंधळ, गोंगाट तेथें सुरू होऊन, धार्मिक स्थानाचें पावित्र्य नाहींसें होण्यास अवसर मिळतो. तेव्हां धार्मिक व सार्वजनिक स्थानीं अशा प्रकारचे कोणाहि व्यक्तीचें निवासस्थान असूं नये. अन्य धर्मांत अशी मोकळीक ठेवलेली नाहीं. त्याचा बोध आपणांस घेतां नाहीं का येणार ?

१६

सुर्योदयानंतर अंथरुणावर पडून राहणें नितान्त आळशीपणाचें आहे. आपल्या शास्त्रकारांनीं सूर्योदयापूर्वी घटका दीड घटका उठण्याची आज्ञा

केली आहे. "लवकर निजे लवकर उठे। तया ज्ञान संपत्ति आरोग्य भेटे ।।" अशी इंग्रजीत म्हणच आहे.

१७

यज्ञोपवीत ही वैदिक धर्माची मुख्य खूण. व तें वेदांना मानणाऱ्या सर्व हिंदूंनीं घालावें त्याला धर्मग्रंथाचा विरोध नाहीं. यज्ञोपवीत धारण करण्यांत धर्म, इतिहास, भावनोद्दीपकता हे सर्व गुण आहेत.

१८

मन पवित्र राखलें तर चांगल्या संस्कारांची वृद्धि होते. उपासनेनें अंत:करणशुद्धि होते. याकरितां नित्य अर्धा तास तरी संध्योपासना अगर परमेश्वर प्रार्थना मनुष्यानें अवश्य केली पाहिजे.

१९

मुखानें चांगली वाणी काढा; कानांनीं चांगल्या गोष्टींचें श्रवण करा. डोळ्यांनींहि सत्कार्य व पवित्र दृश्येंच पाहा व मन सदैव चांगल्या कार्यांत गुंतवा. ही सदाचरणाची गुरुकिल्ली आहे.

२०

मधून मधून उपवास करणें हें शारीरिक व आध्यात्मिक या दोन्ही दृष्टींनीं श्रेयस्कर. म्हणूनच आमच्या शास्त्राकारांनीं पंधरा दिवसांनीं एक दिवस एकादशीचें उपोषण अवश्य मानलें आहे. एकादशी हें निष्काम व्रत आहे. व्यावहारिक स्वधर्माचरणाचें हें एक अंग आहे.

२१

सदाचाराचे सर्वसाधारण नियम प्रत्येकानें पाळले पाहिजेत; त्यांत व्यक्तिहित व सामुदायिक रीत्या समाजहित आहे.

१ सकाळीं उठल्याबरोबर व झोंपीं जातांना ईशस्तवन करीत असावें.

सन्मार्गानें द्रव्योपार्जन करावें तसेंच प्रपंचकार्यांत अंतर पडूं देऊं नये.

२ नित्य थोडा तरी ज्ञानसंग्रह, धनसंग्रह व धर्मसंग्रह अवश्यमेव करींत असावें.

३ वाडवडिलांशीं मर्यादेनें वागावें. तसेंच पत्नीचाहि आदर ठेवावा. कलहशून्य घरांत लक्ष्मी नसली तरी ती आपोआप चालत येते. स्त्रीनें पतिनिष्ठ तसेंच पतीनेंहि पत्नीनिष्ठ असावें.

४ परोपकारांतसुद्धां पात्रापात्र विचार असावा. दुष्टांवर उपकार करणें पाप आहे. जशास तसें वागावें हें श्रीकृष्णाच्या उपदेशाचें सार आहे.

५ धर्मानें, साधेपणानें व सभ्यपणानें वागणूक ठेवावी.

२२

नित्य नियमाविण । भोजन करी तोच श्वान ॥ ( तुकाराम )

कांहीं तरी नियम पाहिजेतच. अनियमित वागणाराचें सर्वच अनियमित. त्याला मग धरबंध रहात नाहीं.

२३

शास्त्रग्रंथांच्या श्रवणानेंच धर्माधर्माचें यथार्थ ज्ञान होतें. नित्य सद्बोध श्रवणानेंच मनुष्य कुबुद्धीचा त्याग करून सुविचारी होतो. म्हणून प्रत्येकानें नित्यनियमानें सद्ग्रंथांतील सद्बोधांचें अवश्यमेव श्रवण, पठण व मनन करीत असावें.

२४

जेथें सदाचार तेथें ईश्वराची कृपा आणि जेथें कृपा तेथेंच आयुष्य, आरोग्य, मनःप्रसन्नता, धैर्य, ज्ञान व ऐश्वर्य यांची समृद्धि होते.

# १३

# कौटुंबिक व्यवहार

१

चार आश्रमांपैकीं दुसरा गृहस्थाश्रम. गार्हस्थ्यांत प्रवेश म्हणजे कुटुंबाचा अर्थात् कौटुंबिक व्यवहाराचा प्रारंभ. कुटुंब हें लहानसें राज्यच असतें. म्हणतात ना, ज्याला कुटुंब चालवतां येत नाहीं तो समाजाची सेवा ती काय करणार ? कुटुंब हा समाजाचा पाया, तसेंच जीवनाचें विश्वविद्यालय आहे. म्हणून कौटुंबिक व्यवहारहि जाणलाच पाहिजे.

२

मनुष्याला उन्नतावस्थेस नेणाऱ्या अनेक सद्‌गुणांचा पाया म्हणजेच कुटुंब संस्था. सद्‌गुणांचें पोषण, प्रेमाची संस्थापना, स्वार्थत्यागाची शिकवण याचें सापेक्षी शिक्षण प्रथम कुटुंबांतच मिळतें.

३

कुटुंबाचीं दोन चाकें; स्त्री आणि पुरुष. ही निरनिराळ्या कुटुंबांत जन्मलेलीं, वाढलेली. यदृच्छेनें एकत्र येतात. नंतर त्या दांपत्यास कुटुंब ही संज्ञा मिळते. कुटुंबांत आई, बाप, भाऊ, बहीण, मुलें, सुना, लेकी व आप्त इष्ट वगैरे अनेक नात्यांनीं संबंध उत्पन्न होतो. कुटुंब हें मानवी जीवनाचें उगमस्थान आहे.

४

अविभक्त कुटुंबपद्धति यदृच्छेनें कमी कमी होत चालली आहे. आतां मोठीं कुटुंबें फारशीं आढळत नाहींत हें खरें. तथापि एखादें वडीलधारें

माणूस, नवरा, बायको व मुलें हीं असणारच. मुलें सज्ञान होऊन स्वतः कुटुंब-व्यवहार शिरावर घेईपर्यंत तरी तीं एकत्र रहाणारच. अशा वेळीं कौटुंबिक व्यवहार हाहि नित्याचाच आहे.

५

प्रकृतिभिन्नता अगर रुचिवैचित्र्य हीं मूळ निसर्गानेंच मानलेलीं आहेत. एकाच कुटुंबांतलीं व एकाच आईबापांचे पोटचीं सर्वच मुलें शरीरानें, मनानें, वाणीनें अगर स्वभावानें सारखींच निपजतात असें नाहीं. सृष्टीची ही तर मौज आहे. स्वरूपसाम्य तर नाहींच, पण आवाज देखील प्रत्येक परिचित मनुष्याचा भिंतीच्या आडून देखील निराळा प्रत्ययास येतो. तशाच आवडीनिवडीहि लक्षांत घेणें कौटुंबिक व्यवहारांत इष्ट असतें.

६

पितापुत्र, भाऊभाऊ, सासूसुना, दीरनणंद हे कुटुंब संस्थतले प्रमुख घटक. यांची परस्परांशीं वागणूक व त्यास अनुसरून सर्व व्यवहार म्हणजेच कौटुंबिक व्यवहार आणि तो बाह्यतः कितीहि गुंतागुंतीचा दिसला तरी तो समंजसपणें उलगडणें हाच व्यावहारिक पुरुषार्थ.

७

तीव्र जीवनकलहाच्या व मतस्वातंत्र्याच्या चालू काळांत लहान लहान कुटुंबेंच प्रायः सर्वत्र असलीं तरी त्यांतील प्रत्येक घटकांचे विचार सारखे नसल्यामुळें नव्या जुन्यांची ओढाताण होत असलेली नेहमीं दिसते. बापाचें मुलाचेंच न पटण्याचा जेथें हा काल तेथें सासू–सुनांचे " स्वसा श्वश्रूंचे सरळ बहुधा फार नसते " हें सुभाषित व्यावहारिक सत्य आहे यांत आश्चर्य कसलें ?

८

" प्राप्तेतु षोडशे वर्षे पुत्रं मित्रवदाचरेत् " हा जुनाच न्याय आहे. मिशांबरोबर मतेंहि फुटतातच ही स्वाभाविक उत्क्रांति लक्षांत घेऊन वडील

माणसें नव्यास यथायोग्य वाव देतील तर विपर्यासास कारणच राहाणार नाहीं. होतें असें कीं स्वार्थ सुटत नाहीं आणि अधिकारत्याग करवत नाहीं. येथेंच कलहाचें मूळ धरतें.

९

कुटुंब आणि कलह, मग तें कुटुंब कसलें. पण व्यवहारांत हें कटुसत्य प्रायः पुष्कळ ठिकाणीं आढळतें. त्याला आपपरभाव, वडीलकीचा अधिकार, कंजुषपणा, आपलाच हेका चालविणें, क्षुद्रबुद्धी, कानाचा हलकेपणा इत्यादि अनेक कारणें असतात, अगर होतात. त्यांचा परिहार कुटुंबाच्या हिताच्या दृष्टीनें वेळच्यावेळीं करणे हा खरा कुटुंबव्यवहार.

१०

एकजूट हा घराचा पाया हें खरें; पण परस्पर प्रेमळ सहकार्य हवें. नाईलाजापेक्षां गोडीं गुलाबीनें विभक्त होणें व्यवहाराच्या दृष्टीनें सुखाचें ठरतें. दुरून प्रेमहि रहातें. घरांत कटकटी चालू ठेवून एकत्र असल्याचा देखावा दाखवणें ही व्यवहारांत आत्मवंचना होय.

११

कुटुंब ही व्यवहारांत प्रत्येकाची, वयपरत्वें आपले उत्तरदायित्व कसें पालन करावें हें शिकण्याची, अगर जाणून घेण्याची प्राथमिक शाळाच आहे. जगांत कसें वागावें याचें प्राथमिक शिक्षण प्रथम कुटुंबांतच मिळतें. जगाच्या एकंदर व्यवहाराचा आरंभ प्रथम कौटुंबिक व्यवहारापासूनच होतो, म्हणून तो प्रत्येकानें अवगत करून घेतलाच पाहिजे व त्याप्रमाणें वागलें पाहिजे.

१२

कुटुंबांत प्रत्येक व्यक्तीचे परस्परांशीं कांहीं हक्कहि असतात. ही गोष्ट पुष्कळदां साधारणतः उभयपक्षी विसरली जाते. मनुष्य सज्ञान झाला म्हणजे जो तो आपल्या परीनें विचार करूं लागतो. हा नैसर्गिक क्रमच

आहे. पाणी उताराला वहातें. तोच न्याय जाणून कौटुंबिक व्यवहारांत आवश्यक तेवढें मतस्वातंत्र्य ज्यांचे त्यास मिळू देणें अगर वडिलमाणसांनीं अर्पण होऊन देणें हाच व्यवहार.

१३

सामाजिक व्यवहारांत सभ्यतेला जें महत्त्व आहे, तेंच कौटुंबिक जीवनांतहि असावयास—ठेवावयास पाहिजे. सभ्यता बाहेर तशीच कुटुंबांतहि अवश्य पाळिली पाहिजे. आईबाप, भाऊबहीण अगर पत्नी यांस आदरानें संबोधणें अगत्याचें आहे. कुटुंबांत परस्पर प्रेम, आदर व सहकार्य निर्माण करणें हा कौटुंबिक आदर्श व्यवहार कोणासहि आपल्या जीवनांत योग्य वागणुकीनें साध्य होईल.

१४

अर्थात् कुटुंबांतील वडील माणसावरच याचें उत्तरदायित्व येतें हें प्रायः विसरलें जातें. आजकाल तरुण पिढी वडीलधाऱ्या माणसांचें ऐकावयास तयार नसते. यांतलें रहस्य हीं वडीलधारी माणसें भावी पिढीस योग्य वळण लावण्याच्याकामीं जरूर ती दक्षता घेत नाहींत हें होय.

१५

कुटुंबाचें मूळ घटक म्हणजे पति-पत्नी. दाम्पत्यधर्मांतहि व्यवहार येतोच. सापेक्षतेंतच व्यवहार आणि शिष्टाचार यांचे बीज आहे. उभयतांनीं परस्परांचे मनोगत जाणून तदनुरूप प्रसंगाला उचित असें कर्तव्य बजावणें इष्ट. पती बाहेरून आला असतां त्याचा श्रम परिहार करण्यांकडे दुर्लक्ष, करून नाहीं त्या गोष्टी काढणें अगर पत्नीच्या त्रस्त मनस्थितींत पतीनें काळ वेळ न पाहतां भलतेच आदेश देणें कौटुंबिक व्यवहारांत अकारण मनःस्वास्थ्य बिघडविणारे होते.

१६

राजाला जसा मंत्री तसें संसारात पतीला पत्नी पूर्ण सहकार्य आणि साहाय्यकर्ती असावी—व्हावी. स्त्री हाच कुटुंबसौख्याचा व एकंदर चारित्र्याचा

६१३६ ६८८५

मोठा आधार असतो. म्हणूनच " गृहिणी सचिवः सखी मिथः " असें कालिदासानें म्हटलें आहे.

पतिपत्नीचीं कर्तव्यें हीं व्यवहारांत स्वाभाविकपणें भिन्न असतांत. घरचें पहाणें स्त्रीचें काम, तर बाहेरचें पुरुषाचें. आहे त्या स्थितींत गुजराण करणें प्रायः स्त्रीकडे येतें म्हणून कौटुंबिक व्यवहारांत उभयतांनीं तडजोडीनें वागणें, एकाचे क्षेत्रांत दुसऱ्यानें ढवळाढवळ होतां होईल तों न करणें, व्यवहारांत श्रेयस्कर.

१८

पतिपत्नीनीं शाब्दिकयुद्धें सहसा करूं नयेत. मतभेदाचे प्रसंग नेहमीच यावयाचे. अशावेळीं कोणी तरी आवरते घेणेंच बरें. व्यवहारांत कित्येकदां विपरीत प्रकार आढळतो. तें व्यवहारांत लाजीरवाणें आणि अंती क्लेशाला कारण होतें.

१९

विवाह म्हणजे तडजोड, ही गोष्ट कुटुंबांत पतिपत्नीनीं केव्हांहि विसरूं नये. परस्परांनी परस्परांचे इच्छेस मान देणें, स्वतःच्या व्यक्तिमत्वाचें अवास्तव स्तोम न माजविणें, परस्परांचें मनोगत जाणून त्याप्रमाणें व्यवहारांत, आचरणांत आणणें, परस्परांकरितां त्याग व संयुक्त सुखाला प्राधान्य देणें हे सर्व कौटुंबिक व्यवहारांत अगत्याचें आहे. तसेंच दाम्पत्यधर्माचा तो श्रेष्ठ आदर्श आहे हें उभयतां पतिपत्नीनीं लक्षांत घेतलें पाहिजे.

२०

" नणंदेच्या वासाने बारा कोसावरचें दूध नासतें " या म्हणींत बराच अर्थ आहे. गेल्या पिढीपर्यंत बालविवाह प्रचलित असल्यामुळें कुमारिकांना सत्तेच्या घराची खरी कल्पना व उमज लवकर पडत असे. पण आजकाल

प्रौढ कुमारिकाच असल्यामुळें त्यांजकडून माहेरचें ममत्व लवकर सुटत नाहीं व अशा नवपरिणीत वधूशी श्रमविभागाचे बाबतींत नव्या घरी जरूर तितके सहकार्य मिळत नाहीं. येथेच अंतर्गत संघर्षाचे बीज रुजतें. तें विवेकानें टाळावे यांत कुटुंबस्वास्थ्य आहे.

२१

जगांत सर्वच गोष्टीला मर्यादा आहे, तशीच कुटुंबव्यवहारांतहि असावी लागते. पुत्रस्नुषा कर्तीसवरती झाली म्हणजे त्यांचे हातीं कारभार सोंपवून आपण हळुहळू निवृत्त व्हावें यांत शहाणपणा आहे. प्राचीनांची हीच शिकवण आहे. वानप्रस्थाश्रमास जातेसमयीं धर्मानें पुष्कळ आग्रह केला तेव्हां 'मी आपले ऐश्वर्य आमचे काळांत उपभोगिले. आतां तुमचे वैभव तुम्हालाच असूं दे' हें कुंतीचे उद्गार किती थोर आहेत !! पण स्वार्थ सुटत नाहीं आणि विवेक भेटत नाहीं. ताक उसने द्यावयाचे, नव्हे नुसतें नाहीं म्हणावयाचे तें देखील सुनेने नाहीं, ही वृत्ती व्यवहारांत अत्यंत दूषणीय होय.

२२

कौटुंबिकव्यवहारांत गैरसमजहि कलहाला केव्हां केव्हां कारण होते, गैरसमजाचे निराकरण तो दिसून आल्यावर वेळींच करावे, नाहींतर त्याची वाढ झपाट्यानें होते आणि ते कुटुंबस्वास्थ्यास हानिकर होते. म्हणून कौटुंबिक कल्याण इच्छिणाऱ्या पित्यानें प्रौढ विवाहित पुत्रांस आपण होऊन मिळकतीचे विभाग करून द्यावे. पित्याचे अभावी बंधूनीं परस्पर समजून विभाजन करून घ्यावे असा दंडक शुक्रनीतींत दिला आहे, तो मानवी स्वभाव व कौटुंबिक व्यवहार याचा मेळ घालण्यासाठींच.

सदार प्रौढ पुत्रान्द्राकश्रेयोर्थी विभजेत पिता ।

सदार भ्रातरः प्रौढा विभजेयुः परस्परम् ॥ (शुक्रनीति अ. ३)

कौटुंबिक व्यवहारांत कुटुंबस्वास्थ्याचे दृष्टीनें कुटुंबियांनीं पाळावयाचे नियम येणें प्रमाणें--

१ आतली आग बाहेर नेऊं नये. म्हणजे घरांतील बिंग बाहेर नेऊं नयें.

२ बाहेरची आग आंत आणूं नये. म्हणजे स्वकीयाविषयीं कोणी नालस्ती केली तरी तींत भर घालून आगींत तेल ओतूं नये.

३ उसनवार नेलेले आठवणीनें परत करतो त्यासच पुन्हां द्यावें. जो तसें वागत नाहीं त्यास पुन्हा देऊं नयें.

४ जे आप्तेष्ट निर्धन असतील अशास शक्य तें सहाय्य द्यावें.

५ कुटुंबांत सर्वांशी समतेनें वागावें. त्यात भेदभाव अगर कमीअधिकपणा करूं नये.

## २३

पतिपत्नींनी परस्पर वागण्याचे कांहीं अनुभविक नियम व आडाखे आहेत ते असे:—

| स्त्रीनें पतीशी कसें वागावे ? | पतीने स्त्रीशी कसें वागावे ? |
|---|---|
| १ पती बाहेरून येताच त्यांचे मधुर भाषणानें स्वागत करणें. | १ स्त्रीचा केव्हांहि अवमान करूं नये. |
| २ अनुमतिविना कोणतीहि गोष्ट न करणें. | २ योग्य तें पालन पोषण व रक्षण हें कर्तव्य समजावे. |
| ३ पतीस आवडतील ते पदार्थ, भोजनासाठी करून देणें. | ३ एकपत्नीव्रत अवश्यमेव पाळणें. |
| ४ परगृहीं फारसें जाऊं नये. | ४ गृहव्यवस्थेंत ढवळाढवळ करूं नये. |
| ५ पोशाख वगैरे बाबतीत भपका असूं नये. | ५ इतरांसमक्ष वाक्ताडन करूं नये. |

हे ठोकताळे म्हणजे कौटुंबिक व्यवहारांत सुखाचें मूलमंत्र होत. त्यांची दखल व्यवहारांत पतिपत्नींनी निरलसपणें घेतली पाहिजे. यांत कुटुंबसौख्य आहे.

२४

शरीराचीं पांचहि बोटें सारखीं नसतात हें खरें. अंगठ्याचें काम करंगळी करीत नाहीं. करंगळीचें काम आंगठा करूं शकत नाहीं. पांचांचाहि आपल्यापरी उपयोग आहे. तसेंच कुटुंबांत सर्वच सारख्या योग्यतेचीं नसतात. कुटुंबकर्त्यानें ज्याचे त्याचे योग्यतेप्रमाणेंच काम द्यावें व घ्यावे. कुटुंबव्यवहारांत ही योजकता पाहिजे.

२५

कुटुंब हें एक राज्यच असल्यामुळें त्यांतहि राज्यकारभारांतली खातेविभागणी असावी लागते आणि ती करावी. तथापि ती सर्व परस्परावलंबी पण एकाच गृहराज्याची आहेत. म्हणजे त्यांत सर्वांचें समाईक हित आहे व तें कुटुंबांतल्या सर्व घटकांनीं कुटुंब व्यवहारांत विसरतां कामा नये.

२६

कौटुंबिक व्यवहारांत बराच मोठा भाग स्त्रियांचा असतो हें कुटुंब चालविणाऱ्या स्त्रियांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे. बालसंगोपन, आहे त्यांत समाधान, घरच्या मंडळींचें दुखणें बहाणें, आल्यागेल्याची योग्यतेप्रमाणें व्यवस्था करणें इत्यादि गोष्टी कुटुंबव्यवहारांत स्त्रियांसच कराव्या लागतात. नाहीं तर पतीनें एखाद्याला आमंत्रण द्यावें व पत्नीनें कपाळाला आठ्या घालाव्या यांत कुटुंबाचा लौकिक रहात नाहीं.

२७

मित्र निवडतां येतांत. पण आप्त वा कुटुंबीय हीं जन्मसिद्ध असतात. त्यांचे त्यांचे नात्याप्रमाणें वागवून घेणें व जुळते घेणें कुटुंबांत अगत्याचें असतें. सहोदरांत देखील स्वभावभेद व प्रकृतिभिन्नता असते मग इतरांत तर ती असणारच. म्हणून कुटुंबकर्त्या वडीलधाऱ्या माणसानें वडीलपणाचा फारसा दुराग्रह धरूं नये.

२८

कुटुंबियांत श्रमविभाग अवश्य. तसाच सौख्यलाभांतहि प्रत्येकाचा वांटा असतो. हें उत्तरदायित्व कळत नकळत, वडीलधाऱ्या माणसाकडून व्यवहारांत दुर्लक्षिलें जातें. खाणें, पिणें तसेंच खेळ करमणूक वगैरे प्रसंगीं स्त्रीला कशाला, मुलांबाळांना काय करावयाचें आहे असें म्हणून त्यांना वगळून आपण एकेकटयानें उपभोग घेणें व्यवहारांत अविचारीपणाचें होतें इतकेंच नव्हे तर त्यांत कुटुंबद्रोह आहे.

२९

कौटुंबिक व्यवहाराचे दृष्टीनें स्वतःचे इस्टेटीचे वा मिळकतीचें व्यवस्थापत्र निर्बंधपंडितांची जरूर तो सल्ला घेऊन करून ठेवण्याची पाश्चात्यांची पद्धत नितांत अनुकरणीय आहे. त्या अभावी पश्चात अनेक कटकटी उत्पन्न होतात व कुटुंबाची हानि होते. ती टाळण्याचें व स्वतःचे इच्छेस अनुसरून मिळकतीची विल्हेवाट व वहिवाट चालू रहाण्याचा नैर्बंधिक प्रयत्न म्हणजे मृत्युपत्र. तें प्रत्येकानें आयुष्याचे उत्तरार्धांत—अविलंबें उपयोजिणें एकंदरींत कुटुंबाच्या हिताचें आहे.

३०

धरसोडीचें वर्तन अथवा लहरी स्वभाव हा कुटुंबसौख्याचे दृष्टीनें मोठा दोष मानला आहे. क्षणांत एक दुसऱ्या क्षणीं दुसरेंच अशामुळें कोठेंच धर लागत नाहीं. असा तोल नसणारा माणूस कुटुंबव्यवहारांत प्रायः अयशस्वी होतो. ज्याचे त्यालाहि सुख लागत नाहीं आणि कुटुंबियांनाहि त्याच्याशी कसें वागावें हें उमगत नाहीं. पुष्कळ धन मिळविलें तरी त्याचा उपयोग ज्याचेसाठीं करावयाचा त्याचे प्रकृतिधर्म, आवडी निवडी हीं अगत्यानें जाणलीं पाहिजेत हाच कुटुंबव्यवहार.

# १४

# सामाजिक व्यवहार

१

वैयक्तिक धर्म ज्याचा त्यानें आचरावयाचा असतो; कुटुंबाबाहेरील व्यक्तींचा त्यांत फारसा संबंध येत नाहीं. पण समाजाचा घटक या नात्यानें समाजांत वागतांना कोणते नियम अनुसरले पाहिजेत, याचेंहि ज्ञान प्रत्येकास असलें पाहिजे.

२

लहान मोठा कोणीहि असो—मग गुरुजन व माननीय व्यक्तींविषयीं बोलावयासच नको— घरापर्यंत आल्यावेळीं 'या, बसा!' म्हणून स्वागत करणें हें पहिलें काम आहे. यांत शालीनता व्यक्त होते व आगताचें मन साहजिकच प्रसन्न होतें. पुष्कळ वेळां ही क्षुल्लक दिसणारी गोष्ट न सांभाळल्यामुळें परिणामीं उभयपक्षीं अप्रसन्नता उत्पन्न होते.

३

जांभई आल्यावेळीं आपला हात किंवा रुमाल यानें तोंड झांकून घ्यावें व जांभई देतांना कोणत्याहि प्रकारचा आवाज करूं नये. जांभईनंतर कांहीं म्हणावयाची संवय असली तर तें, किंवा 'ॐशांतिः' इत्यादि शुभ शब्द उच्चारावेत. कित्येकांस चुटक्या वगैरे वाजविण्याची संवय असते ती व्यर्थ आहे.

४

परिचित थोर माणसांची कोठें भेट झाली तर त्यांनीं प्रथम आपणांस नमस्कार करण्याची अपेक्षा दाखवूं नका. तर प्रथम आपणच त्यांस अभिवादन करावें. यांत सौजन्य आहे.

५

सूर्योदय व सूर्यास्त या संधिसमयीं खाणें, पिणें, निजणें, ओरडणें, या गोष्टी अप्रशस्त होत.

६

वाहनांत बसून जातांना वृद्ध, रोगी, स्त्रिया, आंधळे, लंगडे, व्यंग असलेले अगर ओझीं वाहणारे समोरून आल्यास त्यांना रस्ता द्या.

७

दुसऱ्याचे घरीं जाऊन आपल्या मनास येईल तसा व्यवहार करणें अगर करूं इच्छिणें फार चुकीचें आहे. कित्येकांस अशी संवय असते. ती चांगली नव्हे. ज्याचे घरीं आपण जातों त्याच्या चालीरीतीप्रमाणें आपण चालणें अगत्याचें आहे.

८

वाजवीपेक्षां अधिक नट्टापट्टा करणें छचोरपणाचें व अज्ञानप्रदर्शक आहे. सभ्य लोक असले ढंग पसंत करीत नाहींत.

९

वेळेचें महत्त्व राखा. जो मनुष्य वेळेचा आदर करतो त्याचा सर्व संसार आदरच करतो. सभेला वगैरे वेळेला हजर राहण्याविषयीं दक्ष रहा. घड्याळाचा उपयोग वेळेची बचत करण्याकडे करा. नुसते शोभेकरितां घड्याळ जवळ बाळगणें व्यर्थ आहे.

१०

आपल्याकडून कांहीं अपराध घडला तर निर्भयतापूर्वक तो कबूल करा व त्याबद्दल क्षमा मागून घ्या. त्यांत मनाचा मोठेपणा प्रतीत होतो.

११

कोणाचीहि अनामत म्हणून ठेवलेली वस्तु आपण कामीं आणूं नये. पुष्कळ लोक गहाण वगैरे ठेवलेल्या वस्तु आपल्या कामीं लावतात, अगर चांगली किंमत आली तर मालकाला विचारल्याखेरीज विकूनहि टाकतात. हें गैर आहे.

१२

आपलें हित चिंतणारा कांहीं उपदेश करीत असेल तर तें लक्ष्यपूर्वक ऐकून घ्या व त्याबद्दल त्याचेविषयीं कृतज्ञता प्रकट करा. उलट अशा वेळीं हसण्यावारी नेणें अगर बेपर्वाई दाखविणें अधमपणाचें आहे.

१३

लोकांच्या येण्याजाण्याचे वाटेवर कांटे, कांचेचे तुकडे वगैरे, कीं ज्या पासून दुसऱ्यास उपसर्ग व त्रास होईल अशा जिन्नसा टाकूं नयेत. परोपकारासारखें पुण्य नाहीं व परपीडेसारखें पाप नाहीं तें याकरितांच. एवढेंच नाहीं तर असें कोणी टाकलेलें आढळले तर त्यांवर चुकून कोणाचा पाय पडेल म्हणून तें बाजूला करणें सामाजिक कर्तव्य आहे.

१४

स्नान करतेवेळेस अगर कपडे वगैरे धुतांना दुसऱ्याचे अंगावर शितोडे न उडतील इकडे लक्ष्य द्या. नाहीं तर अशा क्षुल्लक कारणावरून कलह होतात.

१५

ऐकणाराला ग्राम्य वाटेल, लज्जा उत्पन्न होईल अगर घृणा वाटेल असे शब्दप्रयोग करणें अनुचित होय. कित्येकांस ही अमंगल संवय असते. तिचा त्याग करा.

१६

चुकूनहि जुगार खेळूं नका. जुगार अत्यंत घातक आहे. एकदां नाद लागला म्हणजे मनुष्य कोणतें पाप करील याचा नियम नाहीं. धर्मराजा व नलराजा यांनीं केलेल्या द्यूताचा अगर जुगाराचा काय परिणाम झाला हें पुराणान्तरीं वर्णिलें आहे. कित्येक राजघराणीं देखील यामुळें मातीमोल झालीं आहेत.

१७

स्वतःचे कर्तृत्वावर व पुरुषार्थावर जगा. पोटासाठीं दीन बनून भीक मागत फिरणें नामर्दपणाचें आहे; स्वतःचे कर्तृत्वावर जगणारा व ऐश्वर्य संपादन करणारा खरा पुरुषार्थी होय.

१८

एखाद्याच्या खासगी गोष्टीबद्दल चांभार चौकशी करणें खोदून खोदून विचारणें तेंहि विशेष परिचय नसतां प्रयत्न करणें, तसेंच वय काय याचीहि नसती चौकशी सामाजिक नीतीला मान्य नाही.

१९

कथा, कीर्तन, प्रवचन अगर सभा वा समाज यांतून मध्येंच उठून जाणें असभ्यतेचें आहे. आपल्याला अवकाश नसेल तर त्या स्थळीं जाऊंच नये. तेथें येऊन जलदी परत जाण्याचा विचार असेल तर अशा जागीं बसावें कीं, तेथून उठून गेल्यास कोणाचेंहि लक्ष वेधलें जाणार नाहीं

२०

पुष्कळदां असें पाहण्यांत येते कीं, कथा, कीर्तन वगैरे प्रसंगीं बरेंच जण डुकली घेऊं लागतात. हें अनुचित आहे. तेथें जाऊन डुकली घेण्यापेक्षां घरीं निजून राहणें बरें. जर तेथें गेल्यावर झोंप न आवरेल तर तडक उठून चालतें व्हावें. म्हणजे तितकीच भीड तरी कमी होईल.

२१

वाचनालयांत दुसरा कोणी वर्तमानपत्र अगर पुस्तक वाचीत असेल तर त्याचे जवळून तें घेण्याची आतुरता दाखविण्याचें वर्तन करूं नये. अत्यंत जरूरच असेल तर त्याचेकडून नम्रपणें मागून घ्यावें. तसेंच मोठ्यानें बोलणें अगर गोंगाट करणें अशिष्ट होय.

२२

सभा, समाज वगैरे ठिकाणीं आपली योग्यता, प्रतिष्ठा, वयोमान यांना अनुसरून प्रथमच अशा ठिकाणीं बसावें कीं कोणासहि तेंथून उठा म्हणण्याची सहसा संधी न द्यावी. तसेंच विशेष मानाच्या जागीं यजमानानें दाखविल्याशिवाय बसणें गैर आहे.

२३

कोणाच्याहि कांहीं दुःखप्रसंगीं न बोलवतांहि जाऊन त्याचें सांत्वन करणें, व तो मनुष्य आपला द्वेष्टा असला तरी ती गोष्ट लक्षांत न घेतां अशा वेळीं त्याचे दुःखांत सहभागी होणें, यांतच खरी माणुसकी आहे.

२४

कोणी आपली कांहीं गुप्त गोष्ट आपल्याजवळ बोलूं इच्छित नसेल तर ती ऐकण्याविषयीं अति उत्सुक होऊं नका. चोरून ऐकण्याचा प्रयत्न करूं नका. तसे ऐकण्याचा प्रयत्न करणें हा एकप्रकारचा सामाजिक अपराध आहे.

२५

घरीं मुलांबाळांचीं इतकेंच नव्हे तर जनावरांचीं नांवें देखील कानाला गोड लागतील अशीं ठेवावींत. कर्णकटु असूं नयेत. चांगली नांवे ठेविली तर त्या त्या नामधारी प्रतापी व्यक्तिच्या कीर्तीपासून स्फूर्ति प्राप्त होण्याचा संभव आहे. उगाच कांहींतरी टोपण नांवे ठेवणें यांत स्फूर्तिनाश आहे.

२६

हुंडा घेण्याचा मोह सुटत नाहीं, ही एकच गोष्ट आमच्या शिक्षणाचें वैयर्थ्य सिद्ध करण्यास पुरेशी आहे. (चापेकर)

२७

लग्न, मुंजी वगैरे कार्यें– विशेषतः सोयरीकसंबंध व तदनुषंगिक हुंडा वगैरे गोष्टी– यांचे व्यवहार पैशावरच अतिशय अवलंबून असतात. समाजाला लागलेली ही एक कीड आहे म्हटलें तरी चालेल.

२८

हुंड्याला कांहीं ताळतंत्र राहिला नाहीं. ऐपत असो नसो, केवळ स्थळ पाहावयास आलें म्हणून, मुलाच्या अभ्यासाला पैसा पाहिजे वगैरे पोरकट सबबी सांगून पैसा उकळणें व तेंहि स्पष्ट एकदमच न सांगतां अनेक हेलपाटे घालावयास लावून मग आडपड्यानें सांगणें, यासारखा बेवकुबपणा नाहीं व यांत माणुसकी तर नाहींच नाहीं.

२९

शिक्षणानें हे प्रकार बंद होतील असा समज होता, पण तो खोटा ठरला आहे. मुलांचें शिक्षण जितकें अधिक तितका त्यांचा बाजारभाव अधिक वाढलेला. याचें कारण लग्नाचें क्षेत्र संकुचित. पोटजातींत विवाह सुरू होतील तर विवाहाचें क्षेत्र विस्तृत होईल व हुंड्याच्या या दुष्ट पद्धतीला कांहीं तरी आळा बसेल.

३०

कन्या अगर पुत्र, धन किंवा हुंडा घेऊन विकणें याला अपत्यविक्रय म्हणतात. मुलामुलींचा पैसा घेणारीं दोन्ही कुळें अधोगतीस जातात.

गोहन्ता देवभूहर्ता कन्याविक्रयकारकः ।
महापातकिनो लोके चांडालात् अधिकोऽधमः ॥

गाईची हत्या करणारा किंवा करविणारा, देवाब्राह्मणांस दिलेली जमीन हिसकावून घेणारा व कन्याविक्रय करणारा व करविणारा हे लोक जगांत चांडाळाहून देखील महान् अधम होत.

३१

लग्नकार्यांत हजारों रुपये खर्चावयाचे पण भटजीस द्यावयाच्या सुपाऱ्या बारीक व किडक्या निवडून आणावयाच्या; अगर उष्टचा पत्रावळी बाहेर टाकतांना त्याहि फुकट न देतां मोबदल्यांत केरसुण्या घेण्याची अपेक्षा करणें, असली हीन कृपणता गर्ह्य होय. यांत माणुसकी नाहीं.

३२

सामाजिक व्यवहारांतच समष्टिधर्माचा अंतर्भाव होतो. तो प्रत्येकानें पाळला पाहिजे. हें सामाजिक कर्तव्य होय. सार्वजनिक धर्मशाळा, मठ, मंदिरें, वाचनालयें इत्यादि ठिकाणांचा दुरुपयोग न करणें इत्यादि सर्व सामाजिक कर्तव्यें होत, व समाजाच्या हिताकरितां प्रत्येकानें तीं पाळलींच पाहिजेत.

---

## १५

# नीति-अनीति

१

धर्माकरितां, व समाजधारणेकरितां प्रसंगानुसार व्यवहाराला धरून सांगितले जाणारे नियम म्हणजे नीति; ही नीतीची थोडक्यांत व्याख्या आहे.

२

अशा कोणत्याहि ठिकाणीं कीं जेथे कांहीं एक प्रकारचें कुंपण अगर आडोसा घालून जाण्यास मोकळीक ठेवली नाहीं व प्रवेश करण्यास मनाई आहे, अशा बंगल्यांत अगर बगीच्यांत आडमार्गानें प्रवेश करूं नका. लहानपणीं अशा ठिकाणचीं फुलें व फळें वगैरे पाहून तीं तोडून घेण्याची प्रवृत्ति होते. ती झाली तरी विचारल्याखेरीज हात लावूं नये हा उत्तम मार्ग.

३

रेलवेचीं स्टेशनें, डाकघरें, नाटकगृहें, सभा, वाचनालयें, कारखाने वगैरे सार्वजनिक ठिकाणीं लावलेल्या जाहिराती प्रथम वाचून पाहा व त्यांतील सूचनाविरुद्ध आचरण करूं नका.

४

कित्येक दुकानदार आपल्या दुकानांत 'एकच भाव' अगर 'उधारी बंद' अशा पाट्या लावतात. पण प्रत्यक्ष अंमलबजावणी तशी कसोशीनें करीत नाहींत, गिऱ्हाईक पाहून करतात. हें ठीक नव्हे. आपण नियम केला तर तो आपण प्रथम पाळला पाहिजे; तर लोक पाळतील.

३०.

कन्या अगर पुत्र, धन किंवा हुंडा घेऊन विकणें याला अपत्यविक्रय म्हणतात. मुलामुलींचा पैसा घेणारीं दोन्ही कुळें अधोगतीस जातात.

गोहन्ता देवभूहर्ता कन्याविक्रयकारकः ।
महापातकिनो लोके चांडालात् अधिकोऽधमः ॥

गाईची हत्या करणारा किंवा करविणारा, देवाब्राह्मणांस दिलेली जमीन हिसकावून घेणारा व कन्याविक्रय करणारा व करविणारा हे लोक जगांत चांडाळाहून देखील महान् अधम होत.

३१

लग्नकार्यांत हजारों रुपये खर्चावयाचे पण भटजीस द्यावयाच्या सुपाऱ्या बारीक व किडक्या निवडून आणावयाच्या; अगर उष्टया पत्रावळी बाहेर टाकतांना त्याहि फुकट न देतां मोबदल्यांत केरसुण्या घेण्याची अपेक्षा करणें, असली हीन कृपणता गर्ह्य होय. यांत माणुसकी नाहीं.

३२

सामाजिक व्यवहारांतच समष्टिधर्माचा अंतर्भाव होतो. तो प्रत्येकानें पाळला पाहिजे. हें सामाजिक कर्तव्य होय. सार्वजनिक धर्मशाळा, मठ, मंदिरें, वाचनालयें इत्यादि ठिकाणांचा दुरुपयोग न करणें इत्यादि सर्व सामाजिक कर्तव्यें होत, व समाजाच्या हिताकरितां प्रत्येकानें तीं पाळलींच पाहिजेत.

---

# १५

# नीति-अनीति

१

धर्माकरितां, व समाजधारणेकरितां प्रसंगानुसार व्यवहाराला धरून सांगितले जाणारे नियम म्हणजे नीति; ही नीतींची थोडक्यांत व्याख्या आहे.

२

अशा कोणत्याहि ठिकाणीं कीं जेथे कांहीं एक प्रकारचें कुंपण अगर आडोसा घालून जाण्यास मोकळीक ठेवली नाहीं व प्रवेश करण्यास मनाई आहे, अशा बंगल्यांत अगर बगीच्यांत आडमार्गानें प्रवेश करूं नका. लहानपणीं अशा ठिकाणचीं फुलें व फळें वगैरे पाहून तीं तोडून घेण्याची प्रवृत्ति होते. ती झाली तरी विचारल्याखेरीज हात लावूं नये हा उत्तम मार्ग.

३

रेलवेचीं स्टेशनें, डाकघरें, नाटकगृहें, सभा, वाचनालयें, कारखाने वगैरे सार्वजनिक ठिकाणीं लावलेल्या जाहिराती प्रथम वाचून पाहा व त्यांतील सूचनाविरुद्ध आचरण करूं नका.

४

कित्येक दुकानदार आपल्या दुकानांत 'एकच भाव' अगर 'उधारी बंद' अशा पाट्या लावतात. पण प्रत्यक्ष अंमलबजावणी तशी कसोशीनें करीत नाहींत, गिऱ्हाईक पाहून करतात. हें ठीक नव्हे. आपण नियम केला तर तो आपण प्रथम पाळला पाहिजे; तर लोक पाळतील.

५

तसेंच कित्येक सभ्य, खऱ्या अर्थानें सुशिक्षित, व्यवहारी व हिशेबी गृहस्थांच्या घरीं त्यांचेकडे अनाहूत येणाऱ्या लोकांकरितां अगर स्वतःचे राहणीबाबत सूचनावजा कांहीं नियम असतात–उदाहरणार्थ, जोडे वर आणूं नयेत, विचारल्याखेरीज पुस्तक वगैरेंस हात लावूं नये इत्यादि–त्यांचें उल्लंघन करूं नये.

६

खेळ, सभा वगैरे ठिकाणीं तेथील स्वयंसेवक गर्दी न करण्याविषयीं प्रार्थीत असेल तर त्याची आज्ञा अविलंबें पाळावी. यांत सार्वजनिक हित आहे. नको असेल तर तेथून उठून चालतें व्हावें हें बरें. नीति म्हणजे सदाचाराचे नियम. नीतीचा संबंध स्वसुखाशींच असतो असें नव्हे. तो इतरांच्या सुखाशींहि असतो हें ध्यानांत घेतलें पाहिजे.

७

एखाद्याकडे विनाकारण जाऊन त्याचा वेळ व्यर्थ दवडणें ठीक नव्हे. आपल्याला वेळ जसा रिकामा तसा दुसऱ्यालाहि असेल, असें समजणें चुकीचें आहे. उद्योगी माणसास रिकामा वेळ सहसा नसतो. म्हणून त्याचेकडे जाऊन निष्कारण बसून गप्पा मारणें म्हणजे व्यर्थ कालक्षेप.

८

मठ, मंदिरें इत्यादि पवित्र ठिकाणीं पायांत जोडे वगैरे घालून जाणें अप्रशस्त व पावित्र्याची हानि करणारें आहे. कोणत्याहि धर्मांत ही गोष्ट त्याज्य व तिरस्करणीय मानिली आहे. मंदिरात जाण्यापूर्वी हातांतल्या काठी, छत्री वगैरे वस्तु देखील बाहेरच ठेवाव्या.

९

कोणाच्याहि घरीं गेल्या वेळीं, आपण न विचारतां घरांतल्या माणसांनीं बोलावल्याखेरीज एकदम आंत प्रवेश करणें असभ्यतेचें आहे.

१०

जेथें कांहीं कथा कीर्तन, प्रवचन, व्याख्यान चाललें असेल तेथे मध्येंच श्रोत्यांनीं आपआपसांत कुजबुजणें, टीका व टिंगल करणें असभ्यतेचें आहे.

११

फुलांना पाहून साधारणपणें तीं तोडण्याची प्रवृत्ति होते; पण तीं अकारण तोडण्यापासून काय उपयोग ? त्यापेक्षां तीं झाडावरच राहिलीं तर चांगलीं दिसतात. जरूर नसतां तीं तोडून, अधिक काल टिकणारें त्यांचें सौंदर्य लगोलग नष्ट करूं नका.

१२

अशिक्षित मनुष्य पाहून त्याचा अनादर करूं नका. सभ्यतेची कसोटी नुसता सुशिक्षितपणा इत्यादिकांवर नाहीं, तर आचरणावर आहे. असें पाहण्यांत येते कीं पुष्कळदां अशिक्षित माणसें चांगलीं शीलसंपन्न असलेलीं दिसून येतात, तर सुशिक्षित माणसें दुराचारी व अनीतिमान आढळतात.

१३

चोरी, व्यभिचार, जुगार वगैरे निंद्य कर्में आपल्या कुलाची सभ्यता कलंकित करतात; अतएव ह्या सर्व निंद्य गोष्टींपासून दूर रहा.

१४

निरुद्योगी बसूं नका. नेहमीं कांहींना कांहीं उपयुक्त कार्य करीत रहा. रिकामटेकडेपणा मनुष्यास आळशी व असभ्य बनवतो. निरुद्योगी मनुष्य

मोठा असला तरी अवमानित होतो. नेहमीं पुरुषार्थी व्हा. अनेक कामे अर्धवट करणाऱ्यापेक्षां एकच काम पूर्ण करणारी व्यक्ति श्रेष्ठ होय.

१५

शपथ घेण्याची संवय चुकूनहि लावून धरूं नका. 'शपथ' वगैरे शब्दप्रयोग सहजासहजीं भाषणात करणारे लोक प्रायः अस्सल लबाड असतात असें समजावें.

१६

माणसानें आपला व्यवहार व भाषणप्रसंग यांचा रोख असा ठेवावा कीं सहसा शपथ वाहण्याची जरूरी पडूं नये. जे लोक नेहमीं खरें व स्पष्ट बोलतात त्यांचेवर सर्व लोक विश्वास ठेवतात. सत्यभाषणी सभ्य असतात, व मिथ्यावादी असभ्य हें ठरलेलेंच.

१७

सत्ता व अधिकार प्राप्त झाल्या वेळी त्यांचा दुरुपयोग करूं नका. शक्य तर त्यांचा दुसऱ्यास उपयोग होईल असें करा. यांत सौजन्य आहे. सत्ता असूनहि ज्याला मद नाहीं तोच सभ्य होय.

नमन्ति सफलाः वृक्षा नमन्ति सुजना जनाः ।
शुष्कं काष्टं च मूर्खं च न नमन्ति कदाचन ॥

१८

कोणाशीं कांहीं वायदा केला तर तो पाळण्याचे बाबतींत पूर्ण विचार करा. ठरल्याप्रमाणें पुरा करूं शकत नाहीं असा वायदा करूं नका.

१९

समाजाचे सुव्यस्थेकरितां समाजांत प्रचलित असलेल्या नियमांची कधींहि चेष्टा करूं नका. त्यांत तुमचाच मनाचा हलकेपणा प्रगट होईल.

अशानें समाजनीतीवर कित्येकांची असलेली श्रद्धा नाहींशी करण्याचें पाप मात्र तुम्हांस लागेल हें विसरूं नका.

२०

सडकेच्या कडेला, मंदिरांत, धर्मशाळेंत वगैरे सूचनार्थ पाट्या लाविलेल्या असतात. त्या खराब करणें, नासधूस करणें, इष्ट नव्हे कारण त्या सार्वजनिक हिताकरितांच असतात.

२१

नीतिमर्यादा हाच मनुष्य व पशु यांतील मोठा भेद होय. 'धर्मेण हीनाः पशुभिः समानाः।' धर्ममर्यादा नाहीं तो मनुष्य पशुच होय असें धर्मशास्त्र सांगतें. मनुष्यानें माणुसकीनें वागावें हेंच नीतिशास्त्राचें थोडक्यांत रहस्य आहे.

२२

'धिक् धिक् ज्ञानं नीतिशून्यम्।' नीतिशून्य ज्ञानाला व वर्तनाला शतशः धिक्कार असोत, असें शास्त्रवचन आहे. नीतियुक्त वर्तन अगर सद्वर्तन घडण्यास स्वार्थत्याग, परोपकारबुद्धि, व्यवहारदक्षता, कालाचा योग्य व्यय करण्याचा गुण, निरलस स्वभाव, स्वधर्मनिष्ठा इत्यादि गुणांची नितान्त आवश्यकता आहे.

२३

नीतिबंधन हें समाजांत व्यक्तिव्यक्तींशीं असलेले हितसंबंध सुरळीत चालण्यास आवश्यक आहे. या नीतीवरच कुटुंबाचें, त्यांतील व्यक्तींचें, समाजाचें व राष्ट्रांचें स्थैर्य, प्रगति व सौख्य अवलंबून आहे.

२४

बंधनाच्या पलीकडे जाणें हें नाशाचें उघड लक्षण आहे. धार्मिक तसेंच नैतिक बंधनें मानणें यांतच इहपरकल्याण आहे.

२५

पण आमच्या समाजांत या बाबतींतल्या व्यवहारांत शिथिलता अगर उदासीनता दृष्टोत्पत्तीस येत आहे. समाजाच्या पूर्वपरंपरेविषयीं व चाली-रीतीविषयीं अज्ञानच नव्हे तर विपरीत ज्ञान समाजांत फैलावत आहे व स्वैराचार बळावत आहे, ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. परंपरेनें समाजांत मान्य झालेलीं नीतिबंधनें चुटकीसरशीं झुगारून देणें, हा निव्वळ उथळपणा आहे; यांत स्वारस्य तर कांहींच नाहीं. जुन्या शास्त्रातील गोष्टींचा उपहास करणें, त्याविषयीं अनादर दाखविणें, शास्त्रनिषिद्ध अशा गोष्टी प्रौढीनें मुद्दाम करणें, अद्वातद्वा कसेंतरी वागणें, 'यांत काय आहे, त्यांत काय आहे ?' असा वावदूकपणा करणें व मान्य निर्बंधांची अवहेलना करणें, या सर्व गोष्टी नैतिकदृष्ट्या अत्यंत अनुचित होत.

२६

व्यक्ती–व्यक्तीत तशीच समाजाची वा व्यवहाराची धारणा हि नीती-वरच अधिष्ठित आहे. एखाद्याचें कांहीं घेतलें तर त्याचें त्यास देणें, परत करणें हीच नीति. दुसऱ्याचें लुबाडणें म्हणजेच अनीति. नीति–अनीतीचे हें थोडक्यांत सार आहे.

२७

विश्वासाचा अविश्वास करू नये. विश्वास दाखवून गळा कापणें महापाप आहे. चोरी करण्यापेक्षां विश्वासघात करण्यांत अधिक पाप आहे.

२८

रावण तपस्वी व शिवभक्तहि होता. परदाराभिलाषेनें त्याचें आयुष्य क्षीण झाले. मनुष्य धार्मिक असला तरी आचरण नीतीला सोडून असेल तर त्याचें त्याला प्रायश्चित्त मिळणारच, हें कोणाहि कल्याणेच्छूनें लक्षांत ठवलें पाहिजे.

२९

मातापित्याशी अगर वडील माणसाशीं आज्ञाधारकपणें तसेंच बहीण भावंडानीं परस्पर वात्सल्यानें वागणें जरूर. मात्र याचें बीजारोपण लहानपणीच झालें पाहिजे आणि ते त्यां त्या काळच्या वडीलधाऱ्यांनीच केले पाहिजे. त्याचा पुढील आयुष्यांत एकंदर जीवनांत फार उपयोग होतो.

३०

शास्त्रांत पशूचा मनुष्य व मनुष्याचा देव वनविण्याची शक्ती आहे. म्हणून शास्त्र हे मानलेंच पाहिजे.

नीतीचें सुकाणूं सुटलें कीं जीविताचें तारूं भडकलेंच समजा. म्हणून सामान्यपणें नीति–अनीतीचें बंधन प्रत्येकानें पाळलें पाहिजे.

# १६

## स्त्रियांशीं वर्तन

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः। (मनु)

१

स्त्रिया बसल्या असतील त्या ठिकाणीं पुरुषांनीं अभावितपणें व गुपचुप जाऊं नये. जाणेंच असेल तर त्यांना आपलें येणे अगोदर कळेल अशा तऱ्हेनें जावें.

२

ज्या स्त्रींला आपल्याला पाहून लज्जा उत्पन्न होत असेल तिचे समोर जाणें, पुढें पुढें करणें, भाषण करण्याचा प्रयत्न करणें, अगर तिचेकडे मुद्दाम पाहणें असभ्यतेचें आहे. स्त्रियांचे देखत मुद्दाम गाणेंबजावणें, चुटक्या वाजवणें वगैरे प्रकार अनुचित होत.

३

एखाद्यावरोवर आपला कितींहि स्नेहभाव असला तरी त्याचे पत्नीबरोबर पवित्र अंतःकरणानें देखील एकान्तीं भाषण वगैरे करूं नये.

इच्छेचेद्विपुलां मैत्रीं त्रीणि तत्र न कारयेत्।
वाग्वादमर्थसंबंधं तत्पत्नीपरिभाषणम् ॥

४

परस्त्री मातेसमान, परद्रव्य मातीसमान व अखिल प्राणिमात्र आपलें स्वतःसमान समजावें. हें सर्व शास्त्रांचें रहस्य आहे.

५

स्त्रियांशीं भांडणतंटा करणें, वाद करणें, अगर त्यांच्या अंगावर हात टाकणें ही असभ्यता आहे. हें स्त्रीदाक्षिण्य नव्हे. स्त्रियांना नेहमीं सन्मानीत जा.

६

स्वतःचे पत्नीलाहि मारहाण वगैरे करूं नये. अशा रीतीनें राहावें कीं. असा प्रसंगच सहसा येऊं देऊं नये. घरीं स्त्री संतुष्ट असेल तरच सुख, शान्ति व आनंद हीं त्या घरांत नांदतात.

संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैव च ।
यस्मिन्नेव कुले नित्यं कल्याणं तत्र वै ध्रुवम् ।।

७

स्त्रियांना कष्ट देणें, त्यांची छळणूक करणें, त्यांना अन्नवस्त्र पुरतें न देणें नीचपणाचें आहे. तसेंच त्यांचेंविषयीं कुत्सित भाव प्रकट करणें, टिंगल करणें वगैरेहि असभ्यतेचें व कमीपणाचें आहे.

८

विधवा स्त्रियांशीं कठोर होऊं नका. परमेश्वरानें त्यांना अगोदरच आपत्तींत ठेवलेलें असतें; त्यांचे दुःखावर आणखी डागण्या देऊं नका. कित्येकजण विधवांना अशुभ समजून त्यांना रात्रंदिवस झिडकारत, ते दुष्ट होत. विधवांना कष्ट देणे अगर त्यांचो निर्भत्सना करणें अनुचित होय. उलट त्यांशीं नम्रतेनें व सहानुभूतीनेंच वागावें. यांत माणुसकी आहे.

९

स्त्रीदाक्षिण्य खरें पाहिलें तर आमच्या समाजांत फार कमी आहे. स्त्रिया मुळांत शारीरिक दृष्ट्या दुर्बल असतात व लज्जाविनयादि सहज जातिधर्माप्रमाणें केव्हां केव्हां हतबल होतात. तेव्हां त्यांस सहाय्य करणें सोडून उलट त्यांचा छळ केला जातो व त्यांच्या असाहाय्यतेचा गैरवाजवी फायदा घेतला जातो, हें लांछनास्पद आहे.

१०

सर्वसाधारणपणें पत्नीस "अगे, जाग" असें एकेरी संबोधण्याची प्रथा समाजांत अद्यापि मूळ धरून आहे. तींत बदल केला पाहिजे. स्त्री दाक्षिण्याचे दृष्टीनें पत्नीस, विशेषतः मुलांच्या व इतरांच्या देखत निदान उतार वयांत तरी "अहो जाहो" असें बहुमानार्थी संबोधणें यांत पत्नीचा तर आहेच पण एकंदर स्त्रीजातीचा बहुमान आहे.

११

स्त्रीदाक्षिण्याची व्यवहारांत अनेक प्रसंगीं जरूर असते. पण ती एकंदर स्त्रीजातीबद्दल भावना असावी. केवळ रूप व ऐपत अशासारख्या गुणांवरच ती अधिष्ठित नसावी.

१२

स्त्रियांची उगीचच्या उगीच कुचेष्टा करणें, निंदा करणें, त्यांच्या शीलाविषयीं अकारण संशय प्रदर्शित करणें हे अवगुण समाजांत फार मोठ्या प्रमाणांत पाहण्यांत येतात. ही असंस्कृतता होय.

नारीकूं निंदो नहि, नारी नरकी खान ।
जिस खनीमें पैदा हुवे भीष्म राम हनुमान् ॥ ( कबीर )

१३

कोणाच्या शिष्ट वा अशिष्ट वागणुंकीची परीक्षा घेणें असेल तर ती व्यक्ति स्त्रियांचे बाबतींत कशी काय वागते हें जरा अपरोक्षपणें पहावे. स्त्री ही अशी एक कसोटी आहे कीं जीवर सभ्यतारूपी सुवर्णाची खरी पारख केली जाते.

१४

" सीताराम " " लक्ष्मी नारायण " इत्यादि नामकरणांत स्त्रीचें जे नांव अगोदर येते यावरून पूर्वकाली स्त्रियांस किती सन्मानीत असत हें अनुमानितां येते. नामकरणाची प्रथा बदलली तरी त्यांतले तत्त्व अबाधित आहे.

१५

जपानी भाषेत शिवीवाचक शब्दच नाहींत म्हणतात. तें कसेंहि असो. भारतीय भाषांत अशा शब्दांचा तुटवडा नाहीं. ते, कोशकार भाषासमृद्धीच्या हेतूनें संग्रहीत असले तरी हरघटकेला उच्चारण्याची खोड व ऐकणारांनीं ते हसण्यावारी नेणें हीं दोनहि व्यवहारांत निंद्य होत.

१६

कित्येकांस थोड्याशा कारणांवरून वर्दळीला येऊन अथवा केव्हां केव्हां थट्टेनेंदेखील शिवीगाळ करून जीभ विटाळण्याची फार वाईट खोड लहानापासून थोरापर्यंत असते. अशा वेळीं कित्येकदां स्त्री, माता व भगिनीं यांचा नामोच्चारपूर्वक उल्लेख करून केलेला उद्धार कित्येकांस मोठा पुरुषार्थ वाटतो. पुरुषाच्या अपराधाकरितां स्त्रीच्या नांवे गालिप्रदान हा एक व्यवहारांत विचित्र न्याय आहे. समंजस माणसांनीं अशांच्या जिभेला लगाम घालण्याचा शक्यतो प्रयत्न, जरूर तेथें विरोध करूनहि करावा.

## १७

जशी ज्याची बरी वाईट दृष्टि असेल तशा त्याला जगांतील सर्व गोष्टी दिसतात. धर्मराजाला सर्व लोक भलेच दिसले, तर दुर्योधनाला सर्व दुष्टांचे पुतळेच दिसले, ही गोष्ट महाभारतांत दिली आहे. जगांत चांगलेपणा अगर वाईटपणा आपल्यांवरच अवलंबून आहे. म्हणून स्त्री-जातीवर व्यर्थ कुत्सित टीका करणें ही अत्यंत घोर मूर्खता व नीचता होय.

## १८

शिष्टाचाराचे बाबतींत धर्माधर्महि पहावा लागतोच. स्त्रीनें स्त्रीत्व सोडलें तर मात्र स्त्रीदाक्षिण्याचा हक्क गमावला असें व्यवहारांत मानलें जातें. पतिवध टळावा म्हणून नरकासुराची स्त्री युद्धांत नग्न होऊन पुढें उभी राहिली तरी श्रीविष्णुनें तिकडे न पहाता नरकासुराचा वध केला अशी कथा आहे तिचें तात्पर्य हेंच.

## १९

भारतीय सभ्यतेचे दृष्टीनें स्त्रिया मातृरूप होत. आपण त्यांचा सदैव सन्मान करणें अवश्य आहे (मदनमोहन मालवीय).

## २०

स्त्रियांच्या बाबतींत दक्षता घेण्यासंबंधी कांहीं नियम व्यवहारांत असे आहेत:–

१ स्त्रियांची बसावयाची जागा वगैरेची प्रथम सोय पाहिली पाहिजे.

२ स्त्रियांपासून कांहीं अंतरावर इतरांनीं बसावें.

३ अपरिचित स्त्रीशीं सलगी करूं नये.

४ स्त्रीच्या पावित्र्याचें रक्षण अवश्यमेव केलें पाहिजे.

५ स्त्रीस अवस्थांतराप्रमाणें भगिनी, माता इत्यादि प्रकारें आदरानेंच संबोधिलें पाहिजे.

# १७

# स्त्रीशालीनता

१

स्त्रियांचा खरा दागिना व खरें सौंदर्य एक पातिव्रत्य हेंच आहे. 'नारीरूपं पतिव्रतम् ।'

२

स्त्रियांना शील व शालीनता हीं नितान्त आवश्यक होत. शील असल्याशिवाय स्त्रीचें स्त्रीत्वच नव्हे. तसेंच कुलीनत्व हेंच प्रत्येक स्त्रीचें भूषण. तें तिनें अवश्यमेव सांभाळलें पाहिजे.

३

स्त्रियांनी दुकानांत, नाटक-सिनेमांत काम करणें चांगलें नव्हे. तरुण स्त्रियांनीं दुकानावर बसणें, पुरुषांशीं देवघेवीचें भाषण करणें म्हणजे आपलें चरित्र कलंकित करणें होय. अशा स्त्रियांविषयीं समाज नेहमीं साशंक असतो.

४

स्त्रियांनीं पुरुषांशीं अकारण भाषण वगैरे करूं नये. जरूर असेल तर बोलतांना अधोदृष्टि ठेवावी व कारणापेक्षां अधिक बोलूं नये.

५

स्त्रियांना मोठमोठ्यानें बोलण्याची संवय असूं नये. नेहमीं शांतपणें व थोडें हळू बोलण्याची त्यांनीं संवय करावी. या गोष्टीकडे लहानपणीं आईबापाचें घरीच लक्ष्य असावें.

६

स्त्रियांनीं रानांत अगर परगांवी वगैरे एकटे जाणें ठीक नव्हे. निदान स्वसंरक्षणार्थ कांहीं शस्त्र असावें:

७

सौंदर्यप्रसाधन अथवा केशभूषा वगैरे स्त्रियांनी सहजी लोकांचे नजरेस पडेल अशा ठिकाणी बसून करूं नये.

८

स्त्रियांनीं आपले दीर, जांवई अगर जांवयांचे नात्याचे इतर पुरुष यांशी थट्टामस्करीं करूं नये.

९

सुशील गृहिणींनीं आपलें घरकाम आटोपल्यावर आपला वेळ लेखन-वाचनांत व्यतीत करावा; अगर आपल्या मुलांस कांही शिकवणें, उपदेश करणें तें करावें. फुरसतीच्या वेळीं निरर्थक गप्पा मारणें, दुसऱ्याच्या घरच्या कुळकथा सांगणें वगैरे उचित नव्हे.

१०

स्त्रियांचे अंगीं विनय असणें आवश्यक मानिलें आहे. विनयानें शालीनतेंत अधिक भर पडते. शिक्षणाची उच्चनीचता ही तें शिक्षण प्रत्यक्ष व्यवहारांत व वर्तनांत, समाजांत व राष्ट्रांत कितपत उपयोगी पडते यावरूनच ठरत असते, हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे.

११

पैशाचा संग्रह करणें, आयव्यय यांवर लक्ष ठेवणें, स्वच्छता, धार्मिक विधि व घरांतील अंतर्गत व्यवस्था या गोष्टी स्त्रियांनीं अवश्य केल्या पाहिजेत.

## १२

स्त्री म्हणजे अत्यंत श्रेष्ठ परमात्म शक्तीचेंच स्वरूप होय. जगाचे, समाजाचे, वंशाचे, जातीचे व राष्ट्राचे जनन,पोषण, संवर्धन आणि स्थैर्य हीं सर्व स्त्रीजातीवरच अवलंबून आहेत.

## १३

गृहाला स्वर्ग किंवा नरक बनविणें स्त्रियांकडे आहे हें त्यांनीं सदैव लक्षांत ठेवलें पाहिजे.

## १४

प्राचीनांनी स्त्रियांचे सोळा शृंगार सांगितले आहेत त्यांत बाह्य आणि आंतर असे दोन भेद आहेत. आंतर शृंगार स्त्रीजातीला भूषणभूत होत.

| बाह्यशृंगार | आंतरशृंगार |
|---|---|
| १ चोळी अंगाबरोबर घालणें | १ दया |
| २ डोकीवरून पदर घेणें | २ क्षमा |
| ३ दागिने बेतानें घालणें | ३ शांति |
| ४ हळू चालणें | ४ प्रीति |
| ५ हरिणाक्षी | ५ नीति |
| ६ वेणीफणी नित्य करणें | ६ भक्ति |
| ७ वस्त्र व्यवस्थित असणें | ७ चातुर्य |
| ८ काजळ घालणें | ८ धैर्य |
| ९ कुंकू लावणें | ९ पातिव्रत्य |
| १० सडपातळ असणें | १० परोपकार |
| ११ गौरवर्ण असणें | ११ मनमिळाऊपणा |
| १२ थोडीं निद्रा घेणें | १२ समाधान |
| १३ हंसतमुख असणें | १३ सत्यवचन |
| १४ मधुर भाषण करणें | १४ नम्रता |
| १५ हात राखून खर्च करणें | १५ सहिष्णुता |
| १६ आदरातिथ्य राखणे | १६ ज्ञानलालसा |

१५

रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्या स्त्रियांची सर्वसाधारणपणें टिंगल करणें वा अनुदारता दाखविणें म्हणजे समाजाची भुरटी कीड होय. या किडीचे जंतू जागचे जागी ठार होण्यास स्त्रियांनी विशेषतः तरुण स्त्रियांनी शीलबलसंपन्न असावयास—व्हावयास पाहिजे.

१६

धर्मबंधनांवाचून पुरुषांना मुक्ति नाहीं तशी पतिबंधनावांचून स्त्रियांना मुक्ति मिळत नाहीं. अनन्य पातिव्रत्य हा जसा स्त्रीचा धर्म आहे तसाच आजन्म पत्नीनिष्ठा हा पुरुषाचा धर्म आहे. हा दांपत्यधर्म परस्परांनीं निष्ठेनें पाळणें यांतच समाजहित आहे.

१७

सभ्यता, व्यवस्थितपणा, उद्योग करण्याची संवय, आळसाचा कंटाळा इत्यादि सद्‌गुण सुशील स्त्रियांना भूषणावह असून ते त्यांची नीतिमत्ता वाढविण्यास पुष्कळ अंशीं कारण होतात. म्हणून असे सद्‌गुण अंगीं आण—ण्याची उमेद प्रत्येक स्त्रीनें बाळगली पाहिजे.

१८

स्त्रीशालीनतेस अवश्य अशा पुढील नियमांकडे लक्ष्य द्या :

१ घरांतील मंडळींच्या मतांना मान द्या.

२ वडील मंडळींची मर्यादा ठेवा.

३ केशभूषा व वेशभूषा कुलीनतेला शोभेल अशी ठेवा.

४ कपडयालत्त्याची अगर दागिन्यांची प्रौढी मारूं नका.

५ उत्तान शृंगारविभ्रमाचा अवलंब करूं नका.

## १९

स्त्रियांनीं एकटे फिरावयास जाणें, बाजारांत जाणें, परपुरुषाशीं अगर पुरुष मित्रांशी गप्पा मारणें वगैरे प्रकार असभ्य समजले जातात. स्त्रीशालीनतेस या गोष्टी वर्ज आहेत. समाजांत आततताई अगर गुंडांची संख्या नेहमींच इतकी अधिक असते कीं स्त्रियांना असा स्वेच्छाचार म्हणजे जळत्या आगींत उडी घेऊन सतीचें वाण घेणें होय. इतका तो महाग पडतो. हें कुलीन स्त्रियांनीं लक्षांत घ्यावें.

# १८

# स्वावलंबन

१

जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला
जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ।।

रामदास

२

स्वावलंबन म्हणजे स्वतः कोणतीहि गोष्ट करण्याची तयारी असणें. परावलंबित्व केव्हाहि त्याज्यच. कार्यांची हानी होते. आळशी मनुष्य स्वावलंबी होऊं शकत नाहीं व स्वावलंबी मनुष्याला आळस करून भागत नाहीं. स्वावलंबन म्हणजे स्वतःच्या प्रयत्नाची पराकाष्ठा.

३

स्वावलंबनानें व्यवहारांत कोणत्याहि परिस्थितीत कोठेहि नडत नाहीं. वेळ पडते तसें करण्याची निभावून नेण्याची तयारीहि स्वावलंबनानेंच होते. स्वतः शूर असेल तर कशाचीच अडचण पडणार नाहीं.

४

स्वतःचें प्रकृतिमान आपल्या प्रापंचिक गरजा व त्या भागवण्यासाठीं लागणारें द्रव्य अगर वस्तुसंपादन व संग्रह या सर्व गोष्टीला व्यवहारांत स्वावलंबनांची नितांत आवश्यकता आहे. उटल्या सुटल्या कोणाकडे तोंड वेंगाडणें व्यवहारांत कमीपणाचें आहे.

५

आजकाल पुरुषांना स्वतः मंडईत जाणें व स्त्रियांना घरची धुणीं धुणें देखील कमीपणाचें वाटू लागलें आहे. हा कालमहिमा. वास्तविक स्वतः केलेलीं कामे जितकीं स्वच्छ नीटनेटकीं होतात तितकी मोलाची होणें दुरापास्त म्हणून प्रत्येकानें स्वावलंबनाची कास धरली पाहिजे.

६

कित्येकांस आयत्या पिठावर रेघा ओढण्याची म्हणजे वाडवडिलांच्या मिळकतीवर चैन करण्याची संवय असते. ती मनुष्याला परमार्थातहि कमीपणा आणणारी आहे. 'सांगे वडिलांची किर्ती तो एक मूर्ख' असें समर्थ म्हणतात. वाडा कोणी बांधिला ? बगीचा कोणी लाविला याचे उत्तर एखाद्यानें वडिलांच्या हातचें आहे हें सांगण्यांत स्वारस्य नाहीं. पुरुषांचें जीवन स्वावलंबी असावें.

७

स्नेही म्हणून एखाद्याकडे जाणें झाल्यास आंथरूण पांघरूण स्वतःचें घेऊन जावें. आपले कपड़े आपण धुवावेत. कांहीं माणसें व्यवहारांत हें तारतम्य पाळीत नाहींत त्यामुळें मानहानि करून घेण्याचा क्वचित् प्रसंग येतो, तो टाळावा.

८

व्यसन चांगले कीं वाईट हा प्रश्न स्वतंत्र आहे. पण असेल तर व्यवहार दृष्ट्या स्वावलंबन तरी अवश्य राखीत जावे. बिडी आहे तर काडी नाहीं. पान आहे तर तंबाखू नाहीं. हा ओढगस्तपणा व्यवहारांत हीनता दर्शवितो. व्यसन असेल तर त्याचें साहित्य स्वतःपाशीं असणें इष्ट. व्यवहारांत पुष्कळदा मोठीं माणसें देखील हें अवधान ठेवीत नाहींत. हें व्यवहारांत कमीपणाचें मानलें जाते

९

प्रवासांतहि स्वावलंबन पाहिजे. भौतिक शास्त्रामुळें सुखसोयी वाढल्या. कोणत्याहि वस्तु वाटेल तेथें मिळण्याची सुलभता वाढली. या गोष्टी खऱ्या असल्या तरी स्वावलंबनाची गरज व्यवहारांत कमी होत नाहीं. पुष्कळ माणसें आजकाल रेल्वे प्रवासांत पाणी पिण्याचा लोटाहि जवळ बाळगण्याची हेळसांड करतात. परिणाम, नळावर एकच गर्दी, त्यांतच तोंड लावून पाणी पिणें असभ्यतेचे, दुसऱ्याची गैरसोय करणारे, खेरीज तहान भागत नाहीं हें निराळेंच. कालमानाप्रमाणें कपडे व एखादें भांडें इतक्या पुरतें तरी स्वावलंबन हवें.

१०

स्वत:ला करतां येण्यासारखें स्वपरिचर्यात्मक कार्य शक्य असलें तर दुसऱ्याकडून भाडोत्री न करून घेतां स्वत: करणें म्हणजे स्वावलंबन. "पूजेला ब्राम्हण आणि मुलांना मास्तर" ही म्हण उपहासगर्भ आहे पण तींत सत्य आहे. कांहीं गोष्टी व्यवहारांत ज्याच्या त्यानेंच करावयाच्या असतात. यांचेंहि व्यवहारांत पुष्कळांना भान रहात नाहीं.

११

परावलंबनानें मिळालेल्या पंचपक्वान्नापेक्षां स्वावलंबनानें मिळविलेली मीठभाकर व्यवहारांत अधिक श्रेष्ठ मानिली जाते. कोणत्याहि कार्यांत यश:प्राप्ती कार्य स्वत: करण्यानेंच होते. रामा आचाऱ्याचा रामशास्त्री बनला तो स्वावलंबनानेंच.

---

# १९

## चालचलणूक : उठणें–बसणें

१

चालतांना पाय काढीत अगर पाय आपटीत चालणें, अगर चालते–वेळेस पायाचा आवाज करणें. हें ठीक नव्हे. चालतांना हातवारे करणें, खांदे उडवणें इत्यादि अनेक खोडी असतात. या लहानपणींच मुलांना न लागूं देण्याची काळजी घेतली पाहिजे.

२

वरचेवर हातापायाचीं बोटें मोडणें, तसेंच उकिडवें बसल्यावेळीं वेडें वांकडें बसणें, बोलतांनां मध्येंच उगीचच मोठ्यानें हासणें, अगर " काय " " काय " असें काही पालूपद मधेंच घुसडून बोलणें वगैरे संवयी व्यवहारांत चमत्कारिक असतात.

३

रात्रीचे वेळीं, शेजारीं माणसें निजलीं आहेत अशा वेळीं व्यर्थ गोंधळ माजवणें, तसेच दार लावलेलें असतांना एखाद्याचे घरांत काय चाललें आहे हें पाहणें असभ्यतेचे आहे.

४

नेहमीं विद्वान् व शीलवान् मनुष्याची संगत असावी. त्यांचेपासून मिळणारें ज्ञान नीट समजून घ्यावें व त्याप्रमाणें आचरण करावें.

५

लहान वयांत देखील मुलांनीं मुलींमध्यें खेळूं नये. तसेंच मुलींनींहि मुलांमध्यें बसणें, उठणें, खेळणें वगैरे करूं नये. मुलें व मुली निदान आठ वर्षांचीं झाल्यावर एकत्र खेळणें, वसणें. उठणें, अगदीं वर्ज्य करावें. सह-शिक्षण ही भारतीय सभ्यता नव्हे.

६

सडकेवर मधून चालूं नये, कडेनें जावें. ज्या नगरांतून सडकेच्या बाजूला पादचारी रस्ते ठेवलेले असतात त्या ठिकाणीं लोकांनीं पादचारी रस्त्यावरूनच जावें. त्यांत धोका नाहीं.

७

चालतां चालतां कित्येकांस सारखें मधून मधून थुंकण्याची संवय असते. ही संवय घाणेरडी आहे. तिचा त्याग करावा. थुंकणे जरूर असेल त्या वेळीं वाऱ्याची दिशा पाहून थुंकणे बरें. म्हणजे दुसऱ्याचे अंगावर तरी उडणार नाहीं.

८

बाजारांत अगर गल्लींत वाटेल तेथें लघवीस बसण्याचा कित्येकजण निर्लज्जपणा दाखवतात. लोकांची रहदारी असते अशा ठिकाणीं शहरांत, नियुक्त स्थळींच लघवी करणें सभ्यतेचें द्योतक आहे.

९

चालतांना दोनहि हात पाठीमागें वळवून अगर कमरेवर हात ठेवून चालणें, अगर हातांतील काठी अगर छत्री हालवीत अगर उडवीत जाणें टोपी अगर फेटा एका बाजूस झुकता ठेवणें, चालतांना झुकत झुकत चालणें,

एखाद्याची वस्तू संधी सांपडतांच लपवून ठेवणें, आणि वर मिठाई मागण्याची चेष्टा करणें या गोष्टी वाईट आहेत.

१०

थट्टेनें अगर चेष्टेनें कोणाचीहि वस्तु त्याच्या अपरोक्ष घेऊं नये अगर दडवून ठेवूं नये. ही गोष्ट केव्हां केव्हां चोरीचा आळ येण्यापर्यंत जाते.

११

शिमग्यांत होळीच्या नांवाखालीं गोंवऱ्या, लाकडे चोरणें अगर एखाद्याची अशीच कांहीं बरींच नुकसानीं करणें, अभद्र शब्द उच्चारणें, येणाऱ्या–जाणाऱ्याच्या अंगावर चिखल अगर रंग उडविणें, हे सर्व प्रकार असभ्यपणाचे, शिवाय अधार्मिकहि आहेत.

१२

कित्येकांस दुसऱ्याचें कागदपत्र चाळण्याची खोड असते. कोणाचींहि खाजगी पत्रें अगर दैनंदिनी ( डायरी)—जीमध्यें खाजगी टिपणें अगर स्मरणार्थ कांहीं गोष्टी लिहून ठेवलेल्या असतात त्या—त्याला विचारल्याखेरीज वाचून पाहणें हाहि असभ्यतेचा प्रकार आहे.

१३

मुके, आंधळे, तोतरे इत्यादि शारीरिक व्यंग असलेल्या दीन जनांची नक्कल वगैरे करून उपहास करूं नका; त्यांत पाप व निष्ठुरता आहे.

१४

कित्येक अशा घाणेरड्या संवयी कोणाकोणास जडतात की त्यायोगें एरव्ही चांगला असलेला मनुष्य अकारण तिरस्कारास पात्र होतो. भल्या

मोठ्यानें " ढेंकरा " देणें, डोळे मिचकावणें, केंसावरून हात फिरवणें, कांहीं तरी गाणें सतत गुणगुणणें वगैरे चाळे असभ्यपणाचे होत.

१५

कित्येकांचें सहज बोलणें देखील आरडून ओरडून असते. म्हणजे ते बोलतात कीं भांडतात हें समजत नाहीं. विशेषत: रेल्वे प्रवासांत या गमती आढळतात. जेणेंकरून दुसऱ्यास त्रास होईल असें करूं नये.

१६

बाहेर पाहिजेंच पण घरी देखील वयपरत्वें आदरानें व प्रेमळपणें वागणें अवश्य आहे. बाहेर दाखविली जाणारी सभ्यता घरी अव्हेरिली जाते. मातापित्यांचा निर्देश सहजासहजी 'म्हातारा, म्हातारी' असा करणें इष्ट नव्हे. तेंच वळण भावी पिढीला लागतें हें विसरूं नका.

१७

सार्वजनिक रस्ता हा एकाचा नसतो हें पुष्कळांच्या ध्यानांत रहात नाहीं. रस्त्यानें चालतांना वेडे वांकडे भटकणें अगर चक्राकार वाटेंत उभे राहून जाणाऱ्या येणारांची अडवणूक करणें वगैरे गोष्टी दिसण्यांत क्षुल्लक असल्या तरी सभ्यतेस सोडून आहेत.

१८

दुसऱ्यावर टीका करण्याचे अगोदर आत्मनिरीक्षण करणें दसपटीनें चांगलें.

१९

रस्त्यानें चालतांना पादचारी माणसांनीं प्राय: आपल्या उजव्या बाजून जावे. वाहनें डाव्या बाजूस हांकावींत असा नियम आहे.

२०

सभ्यतेचे प्रकार तीन. वाणीची, स्वभावाची तसेंच आचरणाची सभ्यता. सभ्यता पाळणाऱ्या पुरुषानें हे तीनहि प्रकार आत्मसात केले पाहिजेत.

२१

एखादा वाटेंत ठेंच लागून पडला अगर सायकलवरून पडला तर त्यास सहाय्य करण्याचे ऐवजी नुसती "बत्तीशी"च उघडणें ही माणुसकी नव्हे.

२२

" बोलें तैसा चाले" अशीं वागणूक नसेल तर त्याची व्यवहारांत किंमत शून्यावर येतें. व्यवहारांत माणसानें आपला शब्द खरा करण्यास सदैव झटले पाहिजे.

२३

प्रत्येक मनुष्य हा समाजाचे धन व बल आहे व तो समाजाचा एक घटक म्हणून समाजाचा ऋणी आहे. तें ऋण शक्य तों फेडलें पाहिजे. याकरितां त्याच्या शरीराचे, चालचलणुकीचें, मनाचें व शीलाचें योग्य पोषण व संवर्धन झालें पाहिजे. या त्याच्या गुणसमुच्चयावर व सुस्थितीवरच समाजाचे सांसारिक जीवन अवलंबून आहे.

# २०

# सर्वसाधारण राहणी

## १

विचारेंवीण बोलूं नये । मर्यादेवीण हालूं नये ।
विवंचनेंवीण चालूं नये । कांहीं केल्या ॥

( दासबोध )

साधी राहणीं व उच्च विचारसरणी या म्हणींत पुष्कळ अर्थ आहे. दूरचें पाहिलें पाहिजे; नुसती चालू घडी पांहून उपयोगाचें नाहीं. दूरवर विचार करून मनुष्यानें वागलें पाहिजे. सर्व दिवस सारखे नसतात हे लक्षांत ठेवा.

## २

भोजनपात्र अगर इतरहि वस्तू पायांनीं कधींहि लोटूं नयेत. तीं घेतांना अगर खालीं ठेवतांना आदळ आपट करूं नये.

## ३

दरवाजे, खिडक्या अगर कवाडें उघडते वेळेस अगर बंद करते वेळेस जोरानें आपटणें चांगले नाहीं. त्यापासून वस्तूची हानि व जवळ काम करीत असणारास उपसर्ग होतो. विशेषत: रेल्वेचा डबा उघडझाप करते वेळेस विशेष लक्ष्य असावें; कारण एखादे वेळेस इतरांस इजा होण्याचा संभव असतो.

४

कोणतेंहि सामान–खुर्च्या, टेवलें, तसबीरी वगैरे इकडच्या तिकडे हालवणें झाल्यास जपूनच वापरलेलें बरें. एरवीं नुकसान ठरलेलेंच.

५

झोंपेंत कित्येकांचें तोंड उघडें राहतें; कित्येकजण दांत खातांत, त्यांचा सारखा कर्रकर्र आवाज करतात, अगर भारी बडबडतात. या संवयी त्याज्य होत.

६

वय, धन, गृहछिद्र, मंत्र, मैथुन, औषध, पाप, दान आणि अपमान यां गोष्टी गुप्त ठेवाव्या असें शास्त्र सांगतें आणि व्यवहारांत ह्यापासून हित आहे.

७

मुलें कळतीं झाल्यावर त्यांना एका अंथरुणावर घेऊन निजणें अगर त्यांचे देखत भलत्याबुऱ्या गोष्टी करणें–बोलणें, थट्टामस्करी करणें वगैरे प्रकार आईबापांनीं वर्ज्य करावें.

८

घराचीं साफसफाई व मांडणी यांत, त्यांत राहणाऱ्या मनुष्यांच्या स्वभावाचें प्रतिबिंब उमटतें. गृहरचना पाहून तेथील माणसाच्या मनोरचने–चीहि ओळख होते. चतुर मनुष्य त्यांत राहणाऱ्या मनुष्याच्या स्वभावाचे आकलन तेव्हांच करतो. सामान अस्ताव्यस्त पडलें असेल तर तो मनुष्य आळशी, स्त्रियांची चित्रें अधिक असलीं तर कामुक, व संत–महंतांचीं व सत्पुरुषांची चित्रें असलीं तर मनुष्य धार्मिक प्रवृत्तीचा असला पाहिजे, असें सहजच अनुमान होतें.

९

गरीबी म्हणजे हलकेपणा नव्हे, अगर श्रीमंती असली म्हणजे मनुष्य सभ्य होतो असें नव्हे. सभ्यता ही स्वतंत्र आहे. ती श्रीमंत व गरीब दोघांनाहि सारखीच आहे. मनुष्य सदाचारी पाहिजे व हीच सभ्यतेचीं गुरुकिल्ली आहे.

१०

ज्या घरीं नेहमीं कलह होतात तें कुटुंब सभ्य गणलें जात नाहीं. यासाठीं गृहकलह होऊं देऊं नयेत. एखादे वेळेस तसाच प्रसंग आला तरी होतां होईल तों आरडाओरडा दुसऱ्यास कळून येईल असें करूं नये.

११

सभ्य त्यासच म्हणावें कीं जो नेहमीं कानानें चांगल्या गोष्टीच ऐकतो. डोळ्यांनीं सत्कार्याकडेच पाहातो, मुखानें नेहमीं पवित्र वाणींच उच्चारतो, हातानेंहि पण एखादे सत्कर्म करतो, मनानें कोणाचेंहि अहित चिंतीत नाहीं व शक्य तर इतरांच्या कल्याणाकडे आपल्या शक्तीचा व्यय करतो.

१२

मुलास काय, मुलीस काय लहानपणींच चांगली चालरीत अगर वळण लावलें पाहिजे. चालरीत या शब्दांत पुष्कळ गोष्टींचा समावेश होतो. सभ्यपणाचे वर्तन, दुसऱ्याचे मन न दुखविणें, गुरुजनांविषयीं आदर व त्याप्रमाणें वर्तणूक, समाजाच्या नीतिनियमांचें उल्लंघन न करणें वगैरे गोष्टींचा चालीरीतींत समावेश होतो. याचें तारतम्य व्यवहारांत राखणें व त्याप्रमाणें वागणें हेंच मुख्य आहे.

१३

कोणी कांहीं मागावयास आल्यास, देण्याची इच्छा नसल्यास स्पष्ट नाहीं म्हणणें बरें; पण नुसते हेलपाटे घालावयास लावून चकवणें बरें नव्हे. एखादे

काम आपले हातून होत असल्यास करणें. आज—उद्यां करून चाळवणें ठीक नव्हे. पुष्कळांस काहीं अगदीं क्षुल्लक कारणांकरितां देखील खोटें बोलून वेळ मारून नेण्याची संवय असते. हें चांगलें नव्हे. यांत कोणाचाच फायदा नाहीं उलट नसता दोष पदरीं येतो. हें व्यवहारांत जाणलें पाहिजे.

१४

जगाला सुधारण्यापूर्वी स्वतःची सुधारणा करावयास शिका.

१५

वाटल्यास चार पैसे उचलून द्यावेत पण न विचारतां कोणालाहि सल्ला सांगण्याच्या भानगडींत पडूं नये. विचारल्याविना सांगितलेल्या अगर केलेल्या उपदेशाचा उपयोग सहसा होत नाहीं.

१६

"अव्यापारेषु व्यापार" कोणी झाले तरी सहसा करूं नये. ज्यांत आपली गती नाहीं त्यांत नसती बढाई मारणें व्यर्थ. वांझोटया स्त्रीनें शिशुसंगोपनाचा उपदेश करण्यापैकींच.

१७

साधारणपणें रस्त्यावर वा उपहारगृहें वगैरे सार्वजनिक ठिकाणीं नेहमी जपूनच बोलावे. कारण एखाद्या गोष्टीचा सहजासहजी विपर्यास होण्याचा संभव असतो.

१८

रंगमंदिरांत अगर बोलपटगृहांत आपल्या जागेवर जातांना रंगभूमीकडे दृष्टी असावी. पुढील बाकावर बसलेल्यांस धक्का वगैरे लागण्याचा संभव रहात नाहीं. बाहेर जावयाचे ते प्रवेश संपल्यावरच जावें.

१९

कोणीं आप्तइष्ट अगर परिचित मनुष्य आजारी असल्यास त्याचे समाचारास जाणे व्यवहारांत अत्यंत अगत्याचे आहे.

२०

लहानपणीं आपणास सहाय्य केलेल्यांना आजन्म विसरूं नये. यांत मोठेपणा आहे. पुष्कळवेळां भाग्यकाल आला असतां कित्येकजण मागले दिवस विसरतात हें चांगले नव्हे.

२१

दुसऱ्याच्या मनोभावना व हक्काविषयीं आदर म्हणजे समाजांतील वागणुकीविषयींचा केवळ नियम नव्हे तर सामाजिक आयुःक्रमाचा मूळ पायाच आहे.

२२

प्रथमदर्शनींच एखाद्याविषयीं बरें वाईट मत ठोकून देणें व्यवहारांत पुष्कळदां चुकीचे होते. कमीत कमी सहा महिनें परिचय झाल्याखेरीज भलेबुरे कांहींच न म्हणणें बरें. "सुस्थे को न वा पंडितः ?" एरव्ही दोन गोष्टी गोड बोलावयास कोणाचें काय जाते ? पण प्रसंगी कोण कसा वागतो याची जाणीव प्रसंगानेंच येणार. बाह्यतः गोरी गोमटी दिसणारी सर्वच माणसें अंतःकरणानेंहि तशीच असतात असा निर्वाळा देणें प्रायः धाडसाचे होते.

२३

जगण्यासाठीं आहार तसेंच वागण्यासाठीं सारासार विवेक हें सर्व-साधारण राहणींचे मुख्य सूत्र आहे.

२४

एखाद्यांचे भेटीस जाणें झाल्यास आपले नांवाची चिठ्ठीं प्रथम पाठवून मगच जावें. ज्यास भेटावयाचे त्याचीहि सवड पाहिली तर ती उभय पक्षी श्रेयस्कर. कालापव्यय होत नाहीं.

२५

जगांत जर खरें सुख असेल तर तें साधीं राहणी, साधी वागणूक, निर्व्यसनीपणा व दिवसभर कोणत्या ना कोणत्या उद्योगाशीं झगडणें, यांत आहे.

२६

जग पाहून राहणी सुधारते, सांगून सुधारत नाहीं. आपलीं सर्वसाधारण राहणी आदर्शवत् असावी. स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा यांजविषयीं आस्था, प्रेम व अभिमान असावा. जुनें होतां होईल तो सोडूं नये. त्यांतलें मर्म समजून घ्यावें. नवें आवश्यक व अपरिहार्य असेल तें जरूर घ्यावें. मात्र स्वातंत्र्याच्या नांवाखालीं स्वैर वर्तन असूं नये.

२७

आमच्या एकंदर राहणींतच मूलतः सुधारणांची नितान्त जरुरी आहे. प्रत्येक व्यक्ति अगर कुटुंब हा समाजाचा अगर राष्ट्राचा सर्वांत लहान पण महत्त्वाचा घटक होय. सर्वसाधारण राहणींतच प्रत्येकानें व्यवहारांत लक्ष्यांत घ्यावयाच्या गोष्टी तत्परतेनें अवलंबिल्या तर तें व्यवहारांत भूषणास्पद होते. त्यायोगें व्यवहारांत सोय, वेळेची बचत, निष्कारण अडचणी टळणें, वेळेवर उपचार, सामाजिक कर्तव्यास मदत, अशा बऱ्याच गोष्टी साधता येतील. उदाहरणार्थ, घराच्या प्रवेशद्वाराजवळ आपल्या नांवाची पाटी

लावल्यास अनोळखी मनुष्याला घर शोधतांना श्रम पडणार नाहींत. घरीं सर्व प्रकारची स्वच्छता राखणें, जेथली वस्तु तेथें ठेवण्याची संवय असणें व वस्तु हरवल्याच जाऊं नयेत म्हणून त्यांवर नांव घालणें. नित्योपयोगी हत्यारें म्हणजे हातोडी, अंबूर, हातकरवत, कुऱ्हाड वगैरे जवळ बाळगणें. यामुळें केवढी सोय होते व गरज लागली की तोंड वेंगाडणें बंद होतें. तसेंच नेहमीं लागणारीं औषधें संग्रहीं असणें व त्यांची माहिती करून घेणें व त्याप्रमाणें प्रसंगी स्वतःला व इतरांना तीं उपयोगी पडतील असें करणें हें व्यवहारांत अगत्याचें आहे.

---

# २१

# वाचन-लेखन

१

ज्ञानप्राप्तीच्या अनेक साधनांत वाचन हें एक महत्त्वाचें साधन आहे. घरबसल्या व फुरसतींप्रमाणें थोड्या श्रमांत व कालांत ज्ञानसंपादनास वाचनाविना अन्य साधन नाहीं. म्हणून समर्थ म्हणतात " भोजन झालिया-वरी । कांहीं वाची चर्चा करी । एकांती जाऊनी विवरी नाना ग्रंथ" वाचनानेंच मनुष्याचे अंगी बहुश्रुतता येते.

२

सुंदर अक्षर ल्याहावें । स्वर नेमस्त--
वाचावें । विवर विवरोनी जाणावे अर्थांतर ( दा. बो. )
हें सर्व वाचन-लेखनाचें सारसर्वस्व.

३

मनुष्याचे विचार वाचनानें व अनुभवानें पक्व होतात. वाचनाविना ज्ञान वाढणार नाहीं. जगांतील घडामोडीचें यथातथ्य ज्ञान होणार नाहीं. शरीराला जेवण तसें मनाला वाचन.

४

वर्तमान पत्राचे वाचनानें प्रचलित विषयांचे ज्ञान होतें, तर ग्रंथांच्या योगें ज्ञानांत कायमची भर पडते. चांगले अभिजात ग्रंथ हे कायमचे गुरु होत.

५

सुखांत भर घालणाऱ्या वस्तूमध्यें सद्ग्रंथाची योग्यता फार मोठी आहे. ते गत गोष्टी सांगतात, प्रसंगी धैर्य देतात, स्वावलंबी कसें बनावे हे शिकवतात. याबद्दल त्यांस कांहीं द्यावे लागत नाहीं. नुसती रहावयास जागा दिली म्हणजे झालें.

६

मात्र वाचनांत निवड पाहिजे. जगांत होऊन गेलेल्या साधु, मुत्सद्दी, कवि, ग्रंथकार, कारागीर, राजकारणी व स्वपराक्रमानें उदयास आलेल्या थोर पुरुषांची चरित्रें ही आत्मनिरीक्षणाचीं साधनें होत.

७

ग्रंथमित्रांचा विशेष हा कीं ते बोलवाल तेव्हांच जवळ येतील, ठेवाल तितकाच वेळ तुमचे संगतींत रहातील. ते होऊन तुम्हास त्रास देणार नाहींत अगर रागावणार नाहींत उलट त्यांचेकडे पाहून कांहींतरी लाभच होईल.

८

वाचनाप्रमाणेंच लेखनाचेंहि महत्त्व आहे. आजकालच्या शिक्षण क्षेत्रांत अक्षरवळणाकडें अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. त्यामुळें चांगलें अक्षर पहावयास मिळणें देखील दुर्लभ झालें आहे. थोड्या कालापूर्वी सुंदर मोहरेदार सफाई वळण असलेलें अक्षर असणें "वरपसंती"चें एक गमक समजलें जात असे. केवळ अक्षरांवरून त्याला जाणण्याची–पहाण्याची जिज्ञासा जागृत होत असे. समर्थ म्हणतातः–"ऐसा ग्रंथ जपोनी लिहावा । प्राणिमात्रासी उपजे हेवा ॥ ऐसा पुरुष पहावा । म्हणती लोक ॥"

९

कोणी लिहीत वाचीत असेल तर गुपचुप रीतीनें त्याचे मार्गे उभें राहून लिहीत असलेलें वाचून पाहणे अनुचित. तसेंच दृष्टीमध्यें कांही दोष नसेल तर कागद अगर पुस्तक अगदी डोळ्याजवळ नेऊन वाचणें अगर लिहिणें दृष्टीला बाधक आहे. प्रथमपासूनच यापासून सावध असावें.

१०

लिहितांना हाताचीं बोटें शाईनें काळीं करण्याची संवय लावून घेऊं नका. लेखणीनें अगर टाकानें शाई बेसुमार घेऊन मग इकडे तिकडे झाडून बैठकीवर सर्वत्र शितोडे उडवून लिहिण्याची कित्येकांस संवय असते. शाई घेतांनाच ती प्रथम बेतानें घ्यावी.

११

पुस्तक वाचावयास घतल्यावेळीं मधून मधून आपल्यास पसंत अगर नापसंत मजकूर आल्यावेळीं आपल्या मनास येईल त्या टीपा देणें अगर खुणा करणें अनुचित आहे. विशेषतः दुसऱ्याचें पुस्तक वाचावयास आणिल्या वेळीं याबद्दल जपलें पाहिजे.

१२

वाचतांना कांहीं मनोरंजक, बोधप्रद अगर कांहीं नाविन्यप्रद आढळलें तर अगोदर सांगून नंतर वाचून दाखवावें. नाहीं तर गुपचूप मनांतच वाचलेलें बरें. पुष्कळांस वाचतांना ओठ हालविण्याची वगैरे खोड असते. ती वाईट होय.

१३

कोणाचाहि खाजगी पत्रव्यवहार त्याच्या आज्ञेव्यतिरिक्त वाचून पाहणें निंद्य आहे. तसेंच कोणाकडून वाचावयास मागून आणलेलें पुस्तक चुरगळून

खराब करणें, पानें मुडपणें, मळवणें अगर आपलें नांव लिहिणें अगर पृष्ठ उलटतांना बोटांना थुंकी लावणें वगैरे सर्व प्रकार असभ्यतेचे होत.

१४

लिखाण शुद्ध, स्पष्ट व बाळबोध असावें, कीं ते वाचतांना वाचणारास कष्ट पडूं नयेत. घाईनें कांहीं तरी कसें तरी लिहूं नये. विशेषतः पत्रें वगैरे लिहितांना हें जरूर लक्ष्यांत ठेवावें; नाहीं तर मजकूर बरोबर कळला नाहीं तर लिहिण्याचा उपयोग काय? 'आप लिखे खुदा जाने!' असें व्हावयाचें. शक्य तितक्या लवकर लिहितां येऊन शुद्ध व सुवाच्य लिहितां आलें तरच लेखनाचें कौशल्य.

बाळबोध अक्षर। घसडून करावें सुंदर।
जे देखताचि चतुर। समाधान पावती॥ (दासबोध)

मनुष्याला स्वच्छ व व्यवस्थित पोषाखाचें जितकें महत्त्व तितकेंच लिखाणाला अक्षराचें आहे.

१५

मुलांनीं शाळेचें वेळीं लिहिण्यावाचण्याव्यतिरिक्त खेळणें, दंगामस्ती, वगैरे करूं न ये. खेळाचे वेळीं खेळ व अभ्यासाचे वेळीं अभ्यास, इकडे नेहमीं लक्ष असावें.

१६

कोणी लिहीत असेल तर त्याच्याजवळ बसून मोठमोठ्यानें वाचणें अगर गप्पा मारणें, तसेंच सार्वजनिक वाचनालयांत जोरजोरानें वाचणें अनुचित होय. कारण त्यापासून दुसऱ्यास उपसर्ग होतो.

१७

नेहमी सद्ग्रंथांचें श्रवण, पठण व निदिध्यास हें मनुष्याला सदाचारप्रवृत्त करणारें आहे. आजकाल ललित या नांवाखाली चटोर आणि उथळ वाङ्मयाकडे बहुजनसमाजाची प्रवृत्ति आहे. ती राष्ट्रहितास चिरंतन घातक आहे. सद्ग्रंथ हे भूलोकीचे साक्षात् चिंतामणि होत.

१८

मांनवजातीची जीवनसंस्कृति कशी असावी हें प्रत्यक्ष उदाहरणांनीं दाखविणारे रामायण व महाभारत हे दोन आदर्श ग्रंथ होत. या आदर्श-ग्रंथवाचनानेंच छत्रपति शिवाजी महाराजांसारखे स्वराज्यसंस्थापक व तुळशी दासासारखे रामभक्त निर्माण झाले. असे आदर्श राष्ट्रीय ग्रंथ म्हणजे गीता, ज्ञानेश्वरी, दासबोध, मनाचे श्लोक, स्वामी रामतीर्थ व विवेकानंद, गुलाबराव महाराज इत्यादि आधुनिक सत्पुरुषांचे ग्रंथ असून ते नित्य अभ्यासावेत.

१९

वागावें कसें तें रामायण शिकवितें. मरावें कसें तें शिकविण्याचें काम भागवताचें आहे व 'धर्मसंमूढचेताः' झालेल्यास कर्तव्याचें शिक्षण देणारी भगवद्गीता होय. या राष्ट्रीय ग्रंथांचें अध्ययन नित्य व्यवहाराला अत्यन्त आवश्यक आहे.

२०

वाचन एकांगीं नसावें. निरनिराळ्या विषयांचें सामान्य ज्ञान मनुष्यास व्यवहारास आवश्यक आहे. त्यामुळें मनुष्य चौकस होतो. वाचनाचा बरावाईट परिणाम पुस्तकांवर अवलंबून आहे. यांकरितां चांगलींच पुस्तकें मुलांस वाचण्यास देण्याची खबरदारी पालकांनीं प्रथमपासूनच घेणें जरूर आहे. पुढील आयुष्यांत दिसणारें वर्तन बहुधा लहानपणच्या संवयींवर अवलंबून राहतें. ज्या प्रकारचीं पुस्तकें लहानपणीं वाचण्यांत येतात त्या

प्रकारचे विचार स्वाभाविकपणेंच बनतात. कारण मुलांची धारणाशक्ति अद्यापि बाल्यावस्थेंत असते. नाटकें-कादंबऱ्या अगर उथळ ललितवाङ्मय वाचणें विद्यार्थ्यास हानिकारक आहे. विचाराचें जनकत्व वाचनाकडे आहे. त्या अर्थी विचारांत उन्नति घडून येण्यास सद्ग्रंथांचे वाचनाची आवश्यकता आहे.

## २१

उत्तम ग्रंथांच्या अवलोकनानें मनुष्याचें शील चांगलें राहतें व तो सुशील बनतो. उत्तम ग्रंथ आपल्या जिवलग मित्रांपेक्षांहि अत्यंत जवळचे होत.

## २२

ग्रंथाचें रहस्य ओळखल्याशिवाय उगीच पानें चाळणें म्हणजे वाचन नव्हे. तर त्यात सांगितलेल्या गोष्टींशीं, निवेदिलेल्या कथानकांशी आणि सोडविलेल्या सिद्धांन्ताशीं एकजीव होणें व त्यांतील रहस्य आपल्या नित्याच्या कर्तव्यांत आणून त्याप्रमाणें वागणें म्हणजेच वाचनाचें चीज होय.

## २३

वाचनानें मनुष्य निष्णात होतो, भाषणानें हजरजबाबी होतो आणि लेखनाच्या योगाने अंगीं टापटीप येते. मात्र भाराभर पुस्तकें वाचण्यापेक्षां थोडेच निवडक ग्रंथ वाचून त्यांचें मनन केलें पाहिजे. एरव्हीं मननावांचून वाचन व पचनावाचून जेवण व्यर्थच.

## २४

कुटुंबवाचन हें सर्व सुधारणांचें मूळ आहे. समाजाची सुधारणा करूं पाहणारांनी अगोदर आपलें घर सुधारलें पाहिजे. म्हणजे नित्य कांहीतरी निवडक ग्रंथांतील निवडक भाग आपल्या कुटुंबीयांना नियमानें वाचून दाखविला तर सर्वांच्याच ज्ञानांत भर पडल्याशिवाय राहाणार नाहीं.

२५

शरीरवाढीला जशी योग्य आहाराची जरूरी, तशीच मनोविकासाला योग्य वाचनाची जरूरी आहे. आजकाल समाजाचें याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. चटोर व बाष्कळ वाङ्मयाच्या अमूप निर्मितीचें बीज या सर्व साधारण उपेक्षेंत आहे. ज्ञानसंपादन व मनोरंजन हे वाचनाचे उभयविध हेतु होत. ते साध्य होतील व जेणेंकरून मन सुसंस्कृत बनेल असेंच वाचन असावे.

२६

" लांडग्याचे संगतीत रहा म्हणजे तुम्ही गुरगुरावयाला शिकाल " अशी स्पॅनिश भाषेंत म्हण आहे. तिचें तात्पर्य इतकेंच की पांचट पुस्तकाचे वाचनानें मनुष्य खास अधोगतीस जाईल. ज्यांत निश्चयात्मक ज्ञान आहे असेच ग्रंथ पहावेत.

२७

वाचनाविषयीं मुख्य नियम :—

१ वाचनांत निवड असावी.

२ सदभिरुची सोडूं नये.

३ फार बारीक अक्षराचीं पुस्तके वाचणें टाळावें.

४ झगझगीत दिव्याच्या प्रकाशांत वाचूं नये.
मागून पुस्तकावर प्रकाश पडेल अशा बेतानें ताठ बसून वाचावे म्हणजे डोळयास त्रास होत नाही.

५ लेखन–वाचनास प्रायः बाजूनें प्रकाश घ्यावा. निजून वाचूं नये.

# २२

# आदर-सत्कार

१

आपल्याहून वयानें, विद्येनें, ज्ञानानें, मानानें अगर कर्तबगारीनें श्रेष्ठ असलेल्यांचा आदर करणें अवश्य आहे. ज्यांच्याविषयीं असा आदरभाव आहे, असे पूज्य गुरुजन आपणांस वाटेंत भेटले तर त्यांना नमस्कार करणे उचित आहे. त्यांना पाहून न पाहिल्यासारखें करणें, तोंड लपवणें असभ्यतेचें आहे. म्हटलें आहे--

अभिवादनशीलस्य नित्यं वृद्धोपसेविनः ।
चत्वारास्तस्य वर्धन्ते आयुः कीर्तिर्यशो बलम् ॥

२

कोणासहि प्रणाम अगर नमस्कार करणें झाल्यास आपली भारतीय प्रथा म्हणजे दोन्ही हात जोडून व वडिलांच्या पायां पडून नमस्कार करणें होय. नमस्कार करणें तर दोन्ही हात जोडूनच करा. नुसता एक हात उचलून कपाळाला लावणें ही नमस्कार करण्याची आपली रीत नव्हे.

३

लहान मोठा कोणीहि असो, त्यानें जर आपणांस नमस्कार केला तर जाणूनबुजून त्यास उत्तर न देणें म्हणजे त्याचा स्वीकार न करणें, ही फार मोठी असभ्यता आहे. असें कधीहि करूं नका.

४

पूज्य अगर वडीलधाऱ्या मनुष्यावरोबर फिरत असल्यावेळीं कोणीं नमस्कार केला तर त्याचा तारतम्यानें स्वीकार करा. यदा कदाचित् आपल्याबरोबर असलेल्या वडील मनुष्यास कोणीं अभिवादन केलें तर तें आपणच स्वीकारण्याची असभ्यता करूं नये.

५

एखाद्याचे भेटीस गेल्या वेळीं जाणारानें प्रथम नमस्कार करावा हें उचित. नमस्कारानें आदर दर्शविला जातो. तसाच राखलाहि जातो. नमस्काराला कांही पैसा पडत नाही. परिचय दृढ होतो. स्नेह व आपुलकी वाढते. रोष असला तरी तो नाहीसा होतो. नुसत्या नमस्कारामुळें व्यवहारांत कितीतरी गोष्टी सहज साध्य होतात.

६

कित्येक देशांत प्रणामसूचक ठराविक वाक्य अगर शब्दप्रयोग असतो. तशी आपल्या हिंदुस्थानांत, विशेषत: हिंदु जातींत, ठराविक पद्धत नाहीं. नमस्कार, नमस्ते, राम राम, जयगोपाळ अशा सारख्या अनेक पद्धती आहेत. तेव्हां ज्यांस भेटावयाचें आहे त्याचे पद्धतीप्रमाणें नमस्कार करणें उचित होय.

७

कोणी पूज्य पुरुष आपल्या घरीं आल्यास त्यांना उत्थापन देऊन उच्चासनावर बसवावें व ते परत जाते समयीं दोन पावलें त्यांचेबरोबर जाऊन शिष्ट शब्दांनीं त्यांना निरोप देणें उचित आहे. कोणीहि आपल्या घरी आल्यावेळीं ' या वसा ! ' अवश्य म्हणावें. हा शिष्टाचाराचा पहिला धडाच म्हणाना.

८

कोणाचा थोडाबहुत का होईना उपकार झाल्यास ' आपली कृपा ', अशा शब्दांनीं त्याविषयीं कृतज्ञता व्यक्त करा.

९

कोणाच्या शरिराला अगर अंगाला उठते–बसतेवेळीं चुकून आपला पाय वगैरे लागला तर त्यास नमस्कार करून चुकून पाय लागल्याबद्दल क्षमा मागावी.

१०

बाहेरगांवीं जातांना अगर गांवाहून आल्यावर अगर बरेच दिवस दूर-देशीं जाणें झाल्यास, अगर पुष्कळ दिवसांनीं परत आल्यावेळीं व सर्व शुभ–प्रसंगीं आपल्या पूज्य व वडील माणसांकडून आशीर्वाद घ्यावा.

११

कोणताहि उत्सव अगर पुराणप्रवचन चालल्या वेळीं तेथें उपस्थित असलेल्या सभ्यांना नमस्कार करणें आवश्यक व शिष्टसंमत होय.

१२

आपल्या गुरूंविषयीं अत्यंत पूज्य भावना असावी. आपली प्राचीन परंपरा अशी आहे कीं, आपल्या ज्ञानदात्या गुरूला साक्षात् ईश्वर मानावें. म्हणूनच ' गुरुर्ब्रह्मा गुर्रुविष्णु: गुरुर्देवो महेश्वरः । गुरुः साक्षात् परब्रम्ह तस्मै श्रीगुरवे नमः ।। ' असें म्हटलें आहे.

१३

आजकाल पाश्चात्य शिक्षणाच्या संसर्गानें गुरु, आचार्य व गुरुजन या विषयींचा आदर नामशेष झाला आहे. कोणापासूनहि कांहीं ज्ञान मिळालें

तर तो तेवढ्यापुरता आपला गुरुच होय. अवधूतानें एकंदर चोवीस गुरू केले होते म्हणतात. माणसेंच काय पण जड वस्तूहि त्यांनी गुरुस्थानी मानिल्या. निंदक अगर दुर्जन यांसहि गुरु करावें असें सांगितलें आहे. 'बालादपि सुभाषितं ग्राह्यम् ।'

१४

आपण दुसऱ्याचा मान ठेवला तर लोकहि आपला मान ठेवतात, हा उघड व्यवहार आहे,

१५

श्रेष्ठ असतील त्यांचा बहुमान करावा. लहान व दीन असतील अशांशी सहानुभूतीनें वागावें व बरोबरीच्याशीं मित्रत्वानें वागावें हें आदरातिथ्याचें मुख्य सूत्र आहे.

१६

आर्यसंस्कृतीची अतिथीचाहि आदर करावा अशी शिकवण आहे. अतिथि म्हणजे ज्याची येण्याची तिथी अगर दिनांक निश्चित नसतो अगर तशी पूर्वसूचना नसते तो आकस्मिक आला तर त्याचाहि स्थल काल विवेक राखून आदर करावा. यांतच व्यवहार आणि परमार्थ यांचा समन्वय आहे.

१७

आतिथ्य व पाहुणचार यांत थोडासा फरक आहे. आतिथ्यांत धार्मिक, निष्काम अगर पारमार्थिक बाजू अधिक आहे तर पाहुणचारांत व्यावहारिक दृष्टि आहे.

१८

व्यवहारांत पाहुणचाराचे प्रसंग नेहमी यावयाचेच. कांहीं ना कांही कामा-निमित्त कोणाकडे तरी जाण्याचा प्रसंग साधारणपणें प्रत्येकास येतोच. अशा वेळीं परस्परांनीं गृहस्थ—धर्मप्रमाणें करावयाची सोय याला व्यावहारिक भाषेंत पाहुणचार म्हणतात.

१९

घरासारखा पाहुणा होतो. पाहुण्यासारखें घर होत नाहीं अशी म्हण आहे. एखाद्याचे घरीं जावयाचें तर त्याचे कलानेंच घेतलें पाहिजे. आपल्या आवडी निवडीं असतील त्याला तात्पुरती तरी मुरड घातली पाहिजे. हें तारतम्य न ठेवल्यास पाहुणचार उभयपक्षीं हास्यांस्पद होतो.

२०

ज्याचे घरीं जावयाचें त्याच्या एकंदर परिस्थितीचें सम्यक ज्ञान पाहुणा म्हणून जाणारांस असणें, तें करून घेणें व ते लक्षांत ठेवून वागणें यांतच व्यवहाराचे इंगित आहे. पाहुणचाराचा अतिशय लाभ घेणें, कंटाळा येईपर्यंत राहणे, दुसऱ्याला उपसर्ग होईल याची दखल न घेणें हें या बाबतींत मोठे दोष होत.

२१

कोणाकोणास पाहुणचार घेणें आवडतें पण द्यावयाचें जड जातें. हा आडमुठेपणा अगर क्षुद्रपणा व्यवहारांत दोषास्पद होतो. देवाण घेवाण हा तर जगांतला न्याय आहे. दिल्याविना घेऊं पाहणें माणुसकीला मंजूर नाहीं.

२२

पाहुणचाराचे बाबतींत व्यवहारांत कित्येकदा फसगत होते. कारण नसतां कित्येकजण वरकरणी आग्रह "आमचेकडे आलेंच पाहिजे" म्हणून करितात.

अशांची खरी पारख प्रसंगानेंच होते. वरपांगी आग्रह आणि तेवढ्यावर विसंबून पाहुणचाराचीं अपेक्षा ही दोन्ही खरीं नव्हेत.

## २३

आजकाल आदरसत्काराची एक विचित्र प्रथा अगर भ्रांत शिष्टाचार समाजांत रूढ झाला आहे. आजकाल कोणाकोणाकडे केव्हांहि कोणी येवो, त्यास चहा हा दिलाच पाहिजे, असें झालें आहे. त्यांत स्थल, काल, विवेक उभयपक्षींहि राहिला नाहीं. देणारांस अगर घेणारांस त्यांत कांहीं वावगें वाटत नाहीं. पण या भ्रांत शिष्टाचारानें प्रकृति, पैसा, वेळेचा अपव्यय व रोजच्या कार्यक्रमांत किती बिघाड होतो, याचा विचार करा.

## २४

आप्तेष्टांस ऐपतींप्रमाणें मदत करावी. पण त्याचे आळसास मदत करूं नये.

## २५

आदरसत्काराचाच एक औपचारिक भाग म्हणजे शिष्टाचार होय. या शिष्टाचारांशीं परिचित असणें व्यवहारांत अगत्याचें असतें. नाहींतर व्यवहारशून्यपणाचा दोष पदरीं येतो. नुसता आंपल्याकडे कोणीं आला तर त्याचें काम होवो अगर न होवो किंवा काम कोणतें का असेना पण त्याला प्रथम 'या बसा!' म्हणणें हा पहिला शिष्टाचार होय, हा न कळत कां होईना पण न पाळल्यामुळें, आलेल्या मनुष्याचा आपल्याविषयीं विनाकारण विपरीत ग्रह होतो.

## २६

कोणत्याहि समाजांत अगर व्यवहारांत अनेक शिष्टाचार व संकेत ठरलेले असतात. त्यांचीं यादी करतां यावयाचीं नाहीं. ते तर्कानेंच जाणले

पाहिजेत, पाळले पाहिजेत व आचरणांत आणिले पाहिजेत. उदाहरणार्थ कोणी आपणाकडे आला तर त्याचे हातांतील अवजड सामान आपण घेऊन त्याचें ओझें हलकें करणें, गांवास निघाल्यावेळीं दोन पावलें बरोबर जाऊन सर्व व्यवस्था लावून देणें, या व अशा अनेक गोष्टीं शिष्टाचारांत मोडतात.

## २७

आदरातिथ्य व त्याचेच एक प्रमुख अंग पाहुणचार. या बाबतींत कांहीं ठोकळ नियम लक्षांत घेतल्यास व्यवहारांत ते यजमान व पाहूणे या दोघासहि हिताचे होईल:—

१ वस्त्रपात्र अंथरूण पांघरूण स्वत:चे बरोबर असावें व ज्याचे घरीं जावयाचें त्याचे मुलासाठी खाऊ अगर फळफळावळ अवश्य न्यावी.

२ अवेळी जाऊं नये. आकस्मिकपणें जाणे बहुधा गैरसोयीचे होतें.

३ रोख पैसे अगर महत्वाचा जिन्नस यजमानाचे स्वाधीन करणें बरें. कारणपरत्वें स्वत:चें नुकसान व यजमानाला निष्कारण कमीपणा हीं दोनहि टळतील.

४ कामासाठी, बाहेर गेल्यास वेळेवर येणें होत नसल्यास तसें सांगून जावें.

५ कारणाव्यतिरिक्त आणि तेंहि कंटाळा येईपर्यंत राहूं नये.

# २३

# बाजार–हाट

१

रोजचा " आणा " कोणाला चुकला आहे. ? म्हणजे बाजार–हाट हा नित्याचाच आहे. त्यांतहि व्यवहार पाहिला पाहिजे. परदेशी प्रवास करून आलेले लोक सांगतात कीं तिकडे दुकानदार व गिऱ्हाईक यांमधील व्यवहार सभ्यतेनें उरकला जातो.

२

गिऱ्हाईक दुकानांत प्रवेश करतांच त्यास काय पाहिजे याची विचारपूस करणें, आपल्या दुकानांतील माल व्यवस्थित मांडून तो गिऱ्हाइकास पसंत पडेल अशा तऱ्हेची आकर्षक योजना त्याचे नजरेस आणणें, आळस अथवा कंटाळा न करतां विविध वस्तू उमाप दाखवणें व्यवहारांत जरूर असतें. मग तें गिऱ्हाईकास पसंत पडो न पडो, गिऱ्हाईक तें घेवो न घेवो, वेळ व्यर्थ गेला असें मानूं नये. ही दुकानदारीच्या व्यवहारांतली यशस्विता.

३

गिऱ्हाइकाच्या अपेक्षेपेक्षां अधिक वाण, कमी अधिक भावाचा, ज्याला जसा परवडेल तसा पुढे टाकून अगर तसा तो आहे असें पटण्याइतके वर्णन करून दाखविल्यास गिऱ्हाईक कितीहि चिकित्सेखोर असले तरी सहसा परत जात नाहीं हा सार्वत्रिक अनुभव आहे.

४

बाजार–हाट चांगला करतां येणे ही देखील एक कला आहे. त्याचेंहि एक तंत्र आहे. तें अनुभवानें साध्य होतें. खरा बाजार थोडें तरी फिरल्याखेरीज कळत नाहीं. मालाचे प्रकार, त्यांचा भाव, दुकानदारास पडणारा पडतल, मालाचा सरस निरसपणा यांतला तरतम भाव जाणून खरेदी व्यवहार करणें हाच खरा बाजार. तो ज्यास चांगला करतां येईल तो व्यवहारचतुर होय.

५

बाजार हा ज्याचा त्यानें स्वतःच करावा. मग तो भाजी आणण्यापासून कपडचालत्त्यापर्यंत कोणताहि असो. त्यांत स्वतःचेंच हित आहे. आवडीनिवडी, वस्तूंची आवश्यकता व गरज, पैशाची अनुकूलता, मालाचा डावेउजवेपणा आणि तात्कालिक जरूरी या सर्व गोष्टी ज्याच्या त्यालाच चांगल्या अवगत असतांत. मागाहून दुसऱ्यास बोल लावणें व्यवहाराला धरून नाहीं.

६

"सराफ सोयरा नव्हे आणि वाणी मित्र नव्हे" अशी म्हण आहे ती व्यवहारांत खरीच आहे. कारण दुकानदाराला माल ज्या भावांत पडला असेल त्यावर पडतल पाहूनच तो विकणार एरव्ही कदाचित् तोच माल इतरत्र कमी भावांत कां असेना? म्हणून बाजार–हाट स्वतः फिरूनच केला पाहिजे.

७

आजकाल विशेषतः मध्यमवर्गीयांत स्वतः बाजार करणें कमीपणाचें समजतात. दारावर येईल तो, मिळेल त्या भावांत खरीदण्याची प्रवृत्ति

केवळ आळसामुळें वळावत आहे. स्वतःची लाभाहानि न कळण्याची आयतोबा वृत्ती व्यवहारांत ज्याचे त्याच्याच अपकर्षास साधनीभूत होते. हें लक्षांत घेतलें पाहिजे.

८

व्यवहारांत सचोटी ही मुख्य आहे. कोणीहि जावो ठराविक भावांत खात्रीचा माल मिळेल असा विश्वास दुकानदारानें गिऱ्हाईकांत निर्माण केला पाहिजे. ही त्याच्या व्यावहारिक उत्कर्षाची कसोटी होय.

९

व्यापारी अथवा दुकानदार व गिऱ्हाईक हा नित्याचा संबंध आहे. एकावाचून दुसऱ्याचा निर्वाह नाहीं. प्रापंचिकाला तर राहोच पण विरक्ताला देखील बाजार चुकत नाहीं. म्हणून परस्परांनी परस्परांच्या लाभहानीचा विचार लक्षांत घेतला पाहिजे.

१०

जगांतला प्रत्येक व्यवहार परस्पर सापेक्ष आहे. दुकानदार व गिऱ्हाईक या उभयतासहि कांहीं नियम बंधनकारक आहेत. त्यांचा अवलंब व्यवहारांत परस्परांनीं करणें. यांत त्यांचेच हित आहे.

११

दुकानदारानें पुढील नियम पाळणें अवश्य आहे.

१ दुकानांत स्वच्छता असावी. तसेच भाषेंत सभ्यता असावी.

२ ग्राहकांना टेकण्यापुरती तरी जागा राखलेली असावी. वजनें मापें खरीं असावीं. वजनांत लबाडी नसावी.

३ माल स्वच्छ असावा. तसेंच खाद्यपदार्थ उघडे ठेवल्यास बिघडण्यासारखे किंवा खाण्यास अपायकारक होतील असे वा तेल तुप वगैरे असेल तर तें झाकलेलें असावें.

४ विक्रीच्या वस्तूची व्यवस्थित मांडणी असावी.
५ वस्तूचे माप अगर भाव योग्य तोच घेतला जावा.
६ गिऱ्हाईकापाशी अक्कल असते हें दुकानदारानें विसरूं नये.
७ कायम ग्राहकांची सूचि ठेवलेली बरी.
८ उधारीचा व्यवहार माणूस पारखून वेतानें ठेवावा.
९ नवीन ग्राहकाकडून अधिक लाभाची अपेक्षा करूं नये.

## १२

दुकानदाराप्रमाणें गिऱ्हाइकानेंहि कांहीं नियम पाळले पाहिजेत ते असे:–

१ एका वेळची खरेदी एका ठिकाणींच करणें. फसगत होऊं देऊं नये. चूक भूल देण्याघेण्यास बरें.
२ घ्यावयाचे असेल त्याचीच चौकशी करावी. भाराभर चौकशी नाहक करण्यांत दुकानदाराचा वेळ व्यर्थ जातो.
३ दुकान उघडते वेळीं व सायंकाळीं दिवाबत्तीचे वेळीं उधार मागूं नये.
४ दुकानदार स्नेही असला तरी दुकानांत गिऱ्हाईक नात्यानेंच जावें.
५ दुकानदाराच्या अनवधानतेचा फायदा घेऊन त्यास फसविण्याचा प्रयत्न करूं नये.

# २४

# दानधर्म

१

तपः परं कृतयुगे त्रेतायां ज्ञानमुच्यते ।
द्वापारे यज्ञमेवाहुः दानमेकं कलौ युगे ।। (मनु)

कृतयुगांत तप, त्रेतायुगांत ज्ञान, द्वापारांत यज्ञ आणि कलियुगांत दान हें श्रेष्ठ आहे. तथापि दान हें सत्पात्रीं द्यावें असें शास्त्र आहे.

कीं संपत्ती जैशी धर्मेविण । कीं पंडितावांचून सभास्थान ।
कीं दीपेविण जैसें सदन । कीं फळेवीण तरू जैसा ।।
तैसें सत्पात्रावांचून दान । देतां व्यर्थ संपूर्ण ।
म्हणोन सत्पात्रा विलोकून । त्यासचि दान अर्पिजे ।।

(अधिकमासमहात्म्य)

२

मानवी जीवनांतील अत्युच्च आनंद त्यागांत आहे. दान हें धर्माचें प्रत्यक्ष अंग आहे. अन्नदान प्राणरक्षण करतें, द्रव्यदान धर्मरक्षण करतें, विद्यादान जीवनसौख्य देतें, तर ज्ञानदान चिरंतन कल्याण करतें.

३

चालू घडीला ज्यास ऐश्वर्य असतें व ज्याचा काळ चांगला असतो तें त्याचें पूर्वदत्त फल होय. म्हणून भाग्यवानानें यथाशक्ति दान करीत असावें; पण दानाची वाच्यता नसावी.

द्वावम्भसि निवेष्ठव्यौ गले बद्ध्वा दृढां शिलाम् ।
धनवंतमदातारं दरिद्रं चातपस्विनम् ॥

निर्धन असून तपश्चर्या न करणाऱ्याला म्हणजे कष्ट न करणाऱ्याला व धनिक असून अदाता असेल तर त्यास गळ्यांत घट्ट धोंडा बांधून पाण्यांत बुडवावे, असें विदुरनीतींत सांगितलें आहे.

४

दैवानें धनप्राप्ति झाल्यास त्याचा उपयोग कुटुंबरक्षण करून पंचमहायज्ञ, तीर्थयात्रा इत्यादि सत्कर्मे करण्याकडे करावा:—

कुटुंबासि यथोचित । सुखी करूनी समस्त ।
पाहूनि उरला जो अर्थ । तो श्रेयार्थ वेंचावा ॥

असें नाथभागवतांत सांगितलें आहे. बायकापोरांचे हाल करून दानाचें पुण्य गांठीं बांधण्यास शास्त्राची अनुज्ञा नाहीं.

५

प्रापंचिक जीवनांत व आयुष्यक्रमांत तसेंच प्रत्यक्ष व्यवहारांत दानाचें महत्त्व फार मानलें आहे. 'वक्ता दशसहस्रेषु दाता भवति वा न वा ।' असें म्हटलें आहे. दान, आपण होऊन दिलेलें, श्रेष्ठ होय, मागितलें म्हणून दिले तें कनिष्ठ प्रकारचें होय, असें पराशरस्मृतींत सांगितलें आहे. त्याचा अर्थ दुर्बल व असहाय्य अशांसच आपण होऊन दान द्यावें. आजकाल दान हा शब्द मागें पडून त्याऐवजीं स्वार्थत्याग हा शब्द रूढ झाला आहे. पण खरा स्वार्थत्याग फार कठीण आहे. म्हणूनच दानाचें महत्त्व. मात्र दानांत पात्रापात्रविचार व परिणामावर दृष्टि पाहिजे. यासंबंधीं दोन मतें आहेत. एका पक्षाचें मतें तात्काल स्फूर्तीनें जें द्यावेंसें वाटतें तें दात्यानें द्यावें. त्याचा पुढें विनियोग कसा केला जातो हें बघण्याचें दात्याला कारण नाहीं; त्यानें आपलें कर्तव्य केलें. पुढील जबाबदारी त्याचेवर नाहीं. दुसऱ्या पक्षाचें

म्हणणें असें कीं पात्रापात्रविचार जरूर पाहिजे. नाहीं तर तें दान व्यर्थ होय. दिलेल्या दानाचा अपव्यय झाला तर त्याचा दोष दात्याला लागणें अपरिहार्य आहे.

६

व्यक्तिदानांपेक्षां सार्वजनिक दान श्रेष्ठ होय. व्यक्तिदानानें आळसाला उत्तेजन मिळतें. व्यक्तिधर्मापेक्षां समष्टिधर्माकडे दानधर्मांचा विनियोग होण्याची खबरदारी व्यवहारांत घेतली पाहिजे.

७

अतिथि, अभ्यागत, दीन, पंगू, अनाथ, भिक्षेकरी इत्यादिकांस तात्कालिक स्फूर्तीनें दिलें जाणारें दान तें व्यक्तिदान होय. यानें गरजू माणसाची वेळ निभावून जाते व दात्याला क्षणिक समाधान वाटतें. परंतु यांत समाजाचा उत्कर्ष नाहीं.

८

म्हणून समाजाचें परिणामीं सामुदायिक हित होईल तें दान श्रेष्ठ होय. ज्याप्रमाणें इतर बाबतींत त्याचप्रमाणें दानधर्माचे बाबतींतहि कालमाना-प्रमाणें सुधारणा झाली पाहिजे. नियमांत प्रसंगोपात्त बदल केलाच पाहिजे. यांतच धर्मांचें व जीविताचें संरक्षण आहे. विवेकपूर्वक दिलेले दान अतएव श्रेष्ठ होय.

९

पात्रापात्र विचार हा दानधर्माचे कामीं मुख्य आहे. नाहींतर त्याचा दोष हा त्यास लागतो. खडकावर पेरलेलें बी, फुटक्या भांड्यांत ठेवलेलें दूध, राखेंत केलेलें हवन तसें अपात्री दान व्यर्थ असा सिद्धांत आहे. तो धर्म आणि व्यवहार यांत सारखाच लागू आहे.

१०

अपात्री दानधर्म होत असल्यामुळेंच आपल्या देशांत भिक्षेकऱ्यांचा एक फार मोठा वर्ग उत्पन्न झाला आहे. आगगाडींत जा, मोटारीत जा, जेथें तेथें धटिंगण भिक्षेकरी दत्त म्हणून उभा आहेच. समाजाला हा भार असहनीय आहे. याचा उपशम होण्यास अपात्री दान अधर्म होय ही शिकवण यापुढें अवलंबिली पाहिजे.

११

धार्मिक आचरणहि नेहमीं तारतम्यानें, धोरणानें व व्यवहारकुशलतेनेंच केलें पाहिजे. नाहीं तर प्रत्यक्ष फल अनिष्ट न दिसलें तरी अप्रत्यक्ष परिणाम विपरीत होण्याचा संभव असतो. देश, काल, परिस्थिति ध्यानीं घेऊनच धर्माचरण केलें पाहिजे, यावर धर्मशास्त्रकारांचा कटाक्ष आहे.

१२

आजच्या आपल्या दानधर्माला ध्येय असें कांहीं नाहींच; तो आंधळा झाला आहे; त्याला कांहीं ताळतंत्र नाहीं. एखादा नारळ फोडला अगर थोडी खडीसाखर वांटली म्हणजे आपण मोठा दानधर्म केला व कृतार्थ झालों असें वाटतें. पण हें खरें नव्हे.

१३

प्रत्येकजण आपल्या जीवनांत हरघडी समाजाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष उपयोग करून घेत असतो. त्याची फेड करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. 'कृते च प्रतिकर्तव्यं एष धर्मः सनातनः।' संपत्ति म्हणजे नुसता पैसा नव्हे. श्रम, पैसा. ज्ञान इतक्या प्रकारची संपत्ति ज्याच्याजवळ जी असेल ती समाजहिताकरितां म्हणून दान केली पाहिजे.

१४

वैयक्तिक तात्कालिक दानापेक्षां सामुदायिक दीर्घकालिक दानासच अधिक महत्व दिलें पाहिजे. या दृष्टीनें पाहिल्यास विद्यार्थ्यांस शिष्यवृत्त्या देणें, अनाथालयें, रुग्णालयें व इतर ज्ञान-बल-उद्योगवर्धक वगैरे संस्था यांस मदत करणें हें आजकाल अधिक श्रेयस्कर होईल.

१५

निरनिराळ्या समाज त दानधर्मांचीं विशिष्ट तत्वें आहेत. मुसलमानांत प्राप्तीच्या अडीच टक्के दानासाठीं खर्च करण्याचें तत्व आहे. पारशी लोकांतहि ज्ञातिफंड आहेत. तसेंच हिंदुसमाजालाहि आपल्या दानधर्म पद्धतीला नवीन संघटित वळण लावून पुष्कळ कार्य करतां येण्यासारखें आहे.

१६

मनुष्याला मनुष्यत्वापासून देवत्वाकडे नेण्यासाठीं अर्थात् उन्नतीकडे नेण्यासाठीं दान हें एक श्रेष्ठ कर्म आहे. दानात त्याग आहे. त्यागानेंच जगांतलीं थोर माणसें थोर झालीं आहेत. अहिल्याबाईची दानपरायणता सहस्रावधि घाट व देवालयांचे दगड अजून सांगत आहेत. दिलें तें कधींच वायां जात नसतें.

१७

दानप्रसंगी व्यक्तिधर्म आणि समष्टिधर्म या दोनहि दृष्टींनीं विचार केला पाहिजे. द्यावयाचें तें श्रद्धापूर्वक व ज्याला द्यावयाचें ती व्यक्ति व संस्था यांची माहिती, तसेच दिलेल्याचा योग्य विनियोग होईल एवढी दक्षता दात्यानें अवश्य घेतली पाहिजे.

# २५

# सत्संगति

१

पुष्कळ वेळां आयुष्याला वळण लागतें तें लहानपणापासूनच्या संगती-मुळें असतें. यासाठीं लहानपणापासून चांगली संगति लावणें इष्ट होय. पुढील आयुष्यांत दुर्वर्तनी निघणाऱ्या माणसाचें चरित्र प्रथम कसें बिघडलें हें पाहूं गेलें तर प्रायः त्यास लागलेली कुसंगती कारण असल्याचें आढळून येतें.

२

सत्संगाची गोडी अर्थात आपली स्वतःची आवड तिकडे असल्याशिवाय लागत नाहीं. समसमांची मैत्री होते; विषमांची नाहीं.

धनिका आणि द्रव्यहीना । उदार आणि परमकृपणा ।
हृदयशुद्धा चित्तमलीना । मैत्री नाहीं परिसिली ॥
कर्मभ्रष्ट आचारशीला । मूर्ख आणि शास्त्रकुशला ।
सज्जना आणि कुटिला खळा । मैत्री नाहीं परिसिली ॥

(मुक्तेश्वर)

३

असंगसंगदोषेण सत्याश्च मतिविभ्रमः ।
एकरात्रप्रसंगेन काष्ठघंटाविटंबना ॥

एका गरीब गाईस ओढाळ गाईची संगत लागल्यामुळें तिच्यावर लोढणें अडकवून घेण्याचा प्रसंग आल्याची गोष्ट सांगतात. तिचें तात्पर्य एवढेंच कीं, थोडयाशा साहचर्यानेंहि कुसंगतीचा परिणाम भोगावा लागतो. एकच नासका आंबा असला तर सर्व आढीच नासून जातें हें आपण पहातोंच.

४

सुखाची व कीर्तीची इच्छा करणारांनीं नेहमी सत्संगति धरावी. संपूर्ण दुराचाराचें मूळ कुसंगति व पवित्र विचाराचें मुख्य मूळ सत्संगति होय.

संगति असेल त्याप्रमाणें मनुष्याच्या मनाची प्रवृत्ति होते. सुखदुःख प्राप्त होण्यास प्रायः संगति हीच सहाय्यभूत होते. म्हणून कपिलाचार्य म्हणतात.

निंदको वंचको धूर्तो खलो दुष्कृततामसी ।
एते नाटकिनः प्रोक्तः सर्वतः परिवर्जयेत् ।।

निंदक, वंचक, दुष्कर्मी, संतापी इत्यादिकांची संगति सर्वथा वर्ज्य करावी.

५

सत्संगतीनें तुटती कुबुद्धी । सत्संग झाल्या बहुसाल सिद्धि ।।

मनुष्याला जीं अनेक व्यसनें अगर बऱ्यावाईट संवयी जडतात त्या संगतीमुळेंच होत. चांगल्या संवयी जडल्या तर त्याचे हातून चांगलेंच कार्य होतें. संवयीचा जोर मोठा अजब आहे. संवयीच्या जोरावर डाव्या उजव्या दोन्ही हातांनीं अर्जुन सारखेच बाण मारीत असे अशी कथा आहे. नराचा नारायण बनविणारी यक्षिणीची कांडी संवय हीच होय. असाध्य गोष्ट देखील संवयीनें साध्य होते. म्हणूनच संवय ही निसर्गाची धाकटी बहीण असें म्हणतात.

" असाध्य तें साध्य करितां सायास ।। कारण अभ्यास तुका म्हणे ।। "

या संवयी संगतीनेंच जडतात. म्हणून संगतीचें महत्त्व आहे हें व्यवहारांत पदोपदीं प्रत्ययास येतेंच.

६

गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरुस्तथा ।
पापं तापं च दैन्यं च घ्नान्ति सन्तो महाशयाः ॥

गंगा पापाला, चंद्र तापाला आणि कल्पतरु दैन्याला हरण करतात; पण पाप, ताप व दैन्य हीं तीनहि एकटा सत्संगच नाहींसा करतो; इतकें सत्संगाचें महत्त्व आहे. कोणताहि मनुष्य मूळचा वाईट नसतो; संगतीनेंच तो सुष्ट अगर दुष्ट बनतो. आपला भाग्योदय व कीर्ति इच्छिणारांनीं नेहमीं सत्संगतीच धरावी.

७

सत्संगतीनें मनुष्याच्या मनांत सद्विचार येतात. आणि त्या विचारांतूनच मनुष्याच्या जीवनांतील स्वभाव, शील, सर्वसाधारण राहणी इत्यादि सर्व गोष्टी कोणासहि सहजीं अनुमानितां येतात. इतका सत्संगतीचा प्रभाव असतो.

८

पारखूनच स्नेह जोडावा. एकदम कोणाशीहि लगट करूं नये. व्यवहारांत पुष्कळदां फसगत होते. मागाहून पश्चात्ताप होण्याचें कारण रहात नाहीं. हळुहळु जडलेला स्नेह फार दिवस टिकतो. व्यवहारांत कारणपरत्वें झालेले मित्र अकारण शत्रूहि होतात. तसें न घडूं देण्याची सावधानता अवश्यमेव घेतली पाहिजे.

९

सर्व दुराचारांचें मूळ कुसंगति होय. दुर्वर्तनी मनुष्यांच्या मनोव्यापाराचें पृथक्करण केलें व त्याचें मूळ शोधू गेलें तर प्रायः त्यांना बालवयांत लागलेली कुसंगतीच आढळून येते. संभाजीसारखा शूर-वीर-धीर पुरुष कुसंगतीनेंच बिघडला याची साक्ष इतिहास देतच आहे. पुष्कळांचें उत्तरआयुष्य मातीमोल होते. त्यांचेबरोबर त्यांच्या बायकामुलांचेहि हाल होतात व कसेंतरी आयुष्य कंठण्याचा प्रसंग येतो. याला कारण अल्प वयांत लागलेली कुसंगति. निरनिराळ्या व्यसनांचा व संवयींचा उगमहि असाच असतो. म्हणून सत्संगाचा महिमा अपार आहे. सत्संगानेंच मनुष्याची राहणी शुद्ध, साधी व व्यवहारांत अगर समाजांत आदर्शरूप बनते.

# २६

# तीर्थयात्रा व प्रवास

केल्यानें देशाटन पंडितमैत्री सभेत संचार ।
शास्त्रग्रंथविलोकन मनुजा चातुर्य येतसे फार ।।

१

प्रवास केला पाहिजे, विद्वानांचा सहवास केला पाहिजे, तसेंच सभांत गेलें पाहिजे व शास्त्रग्रंथ वाचले पाहिजेत. या सर्व गोष्टी मजेकरितां म्हणून नव्हे तर ज्ञान संपादण्याकरितां करावयाच्या, हें ध्यानांत ठेवून केल्या तर बहुश्रुतता व व्यवहारचातुर्य हीं साध्य होतील. गृहस्थाश्रमी लोकांनींहि मधून मधून यात्रेला गेलेंच पाहिजे.

२

तीर्थयात्रा, प्रवास वगैरेंचे अनेक फायदे वरील आर्येत फार चांगल्या प्रकारें व्यक्त केले आहेत. त्यामुळें मनुष्याला निरनिराळ्या प्रांतांतील विविध गोष्टी, तऱ्हा, चालीरीती यांचें ज्ञान होतें, नवे नवे संबंध जोडता येतात व एकाच ठिकाणीं सतत राहिल्यामुळें जीवनावर जमलेलें शेवाळ काढून टाकतां येतें.

३

तीर्थानामवलोकनं परिचयं
सर्वत्र विद्यार्जनम् ।
नानाश्चर्यनिरीक्षणं चतुरता
बुद्धे : प्रशस्ता गिरः ।
एते सन्ति-गुणाः प्रवासविषये ।।

जगांत ज्ञानार्जनाची जी नानाविध साधनें आहेत; त्यांतले प्रवास हें एक महत्त्वाचें साधन आहे. प्रत्यक्ष अवलोकन हें केव्हांहि श्रेष्ठच. प्रवासाखेरीज शिक्षणाची खरी पूर्णताच नाहीं.

४

भारतीय जीवनांत सर्वांत मोठी यात्रा "चारीधामयात्रा" ही मानली गेली आहे. उत्तरेस "बद्रिकेदार" दक्षिणेला "रामेश्वर" पूर्वेस "जगन्नाथपुरी" तर पश्चिमेला "द्वारका" हे ते चार धाम होत. यांत सर्व भारत आला. ही यात्रा अनुकूलतेप्रमाणें प्रत्येकानें करावी. म्हणजे आयुष्याचें चीज झालें असें म्हणतां येईल.

५

तीर्थयात्रा अगर प्रवास पावसाळ्यांत सहसा करूं नये. अनेक अडचणी येतात. उचित काळ म्हणजे शरदऋतू म्हणजे विजयादशमीनंतर. प्रवाससमयीं आवश्यक वस्तूच घ्याव्या! सामान आटोपशीर असावें. प्रवासांत भोजन आणि निद्रा परिमित असावी म्हणजे स्वास्थ रहातें.

६

तीर्थयात्रा व प्रवास यापासून ऐहिक व पारमार्थिक असे दोनहि प्रकारचे लाभ होतात. म्हणूनच महाभारतांत "संसारतापतप्तनां भेषजं तीर्थमुत्तमम्" असें भीष्माचार्य म्हणतात.

७

प्रवासांत अनेकांच्या गाठीभेटीमुळे. तिकडील रीतिरिवाज, नाना प्रकारच्या कलाकौशल्याच्या वस्तू पहाण्यांत येतात व थोडीशी ग्रहणशक्ति असली तर अनेक गोष्टींत तुलनात्मक अभ्यास करतां येतो तेणें करून मनुष्याची दृष्टि विशाल होते.

८

मनुष्य स्वभावाला नेहमी कांहींतरी बदल अगर नाविन्य हवें असतें. कोणतीहि गोष्ट नित्य एकच एकसारखी कंटाळवाणी होते. ती घालविण्यास प्रवासासारखें दुसरें साधन नाहीं. स्वावलंवन, काटकपणा, सृष्टिनिरीक्षण तसेंच समाजाचें निरीक्षण, निसर्ग सौंदर्याचा आनंद अशा कितीतरी गोष्टी प्रवासाने अनुभवतां येतात.

९

तप एकट्यानें, अभ्यास दोघांनीं, गायन तिघांनीं व प्रवास चौघांनी करावा असें शास्त्र आहे. एकाकी प्रवासांत, मौज, आनंद तर नाहींच; उलट हरघडी परावलंबित्व व अडचणी मात्र येतात, हा नेहमीचा अनुभव आहे.

१०

प्रवास करावयाचा तर जेथे जावयाचें आहे, त्याठिकाणीं मार्गदर्शक अशीं पुस्तकें वाचून अगर जाऊन आलेल्याकडून जरूर ती माहिती टिपून घेतल्यास प्रवास सुखकर होतो.

११

प्रवास अगर देशपर्यटन हें ज्ञानप्राप्तीचें साधन आहे, हें जाणून जो ज्ञानप्राप्तीकरितां देश फिरतो त्याला कांहींना कांहीं ज्ञानलाभ होणारच. केवळ चैनीखातरच प्रवास करतो त्यास चैनीखेरीज काय मिळणार? कित्येकांचा स्वभाव चौकस नसतो, अगदी एकमार्गी; दिसेल तेवढेंच पहाणार असा मनुष्य प्रवास करूनहि बहुश्रुत होणार नाहीं. देशाचा आत्मा व देशाचें विराटस्वरूप या दोहोंचें एकसमयावच्छेदेंकरून दर्शन घ्यावयाचें असेल तर यात्रा हीच एक अमोघ साधना आहे.

१२

प्रवासांत स्मरणवही जवळ जरूर असावी व तींत प्रवासवृत्तान्त, आढळलेल्या गोष्टी वगैरे लिहीत असावें. ही संवय विद्यार्थिदशेपासून असणें अधिक श्रेयस्कर. तींत ज्या ज्या गांवीं फिरलों त्यांचीं नांवें, त्यांचें परस्परांपासून अंतर, वाटेंत नद्या, पर्वत, डोंगर, किल्ला, पूल वगैरे लागतील त्यांचें सविस्तर वर्णन, तेथील शेतीभातीची उद्योगधंद्याची माहिती, चालीरीती, लोकसमजुती इत्यादि गोष्टी लिहाव्या.

१३

मनुष्य स्मरणाचा कितीहि धड असला तरी सर्वच गोष्टींचे स्मरण-नंतर नीट रहात नाहीं म्हणून प्रवासांत घडलेल्या गोष्टी, आलेला अनुभव व पाहिलेल्या नव्या नव्या गोष्टी थोडक्यांत कां होईना जेव्हांच्या तेव्हांच टिपल्या पाहिजेत.

१४

तीर्थयात्रा व प्रवास योग्य रीतीनें केल्यास व्यवहारास तशीच धर्मलाभासहि मदत होते. प्रपंच व परमार्थ दोनहि साधतां येतात. यात्रा अगर प्रवास, त्यांचें प्रयोजन काय आहे, हें लक्ष्यांत घेऊन केला तरच उपयोग. प्रवासांत दोन पैसे अधिक खर्चावे लागतात, यात्रेलाहि त्याग हवाच. ऐहिक हेतूनें करतात तो प्रवास, व पारमार्थिक हेतूने करतात ती यात्रा होय.

१५

चित्तशाठ्य तसेंच वित्तशाठ्य हें तीर्थयात्रा अगर प्रवास या बाबतींत उपयोगाचें नाहीं. साधा प्रवास झाला तरी कमी अधिक खर्च हा लागतोच. मग तीर्थयात्रेंत हात आंखडून काय उपयोग व असें करावें तरी कां? कारण तीर्थयात्रेचा मूळ उद्देश म्हणजे स्वार्थाचा हळूहळू त्याग करावयास शिकणें. म्हणून उद्देश सोडून तद्विपरीत आचरण करणें निंद्य होय. विष्णुकवि म्हणतो—

"देवधर्माला खोटा पैसा, छोटि सुपारी किडकी,
शीकला वातबेत सारा, जुंपला बैल संसारा ॥"

असें पुष्कळ वेळां होतें. तीर्थयात्रेची सफलता दानाशिवाय, स्वार्थत्यागाशिवाय नाहीं. स्वार्थ सुटल्याशिवाय मोक्ष नाही. हा तर रोकडा सिद्धान्त आहे.

१६

प्राचीन काळीं देखील लोक तीर्थयात्रा व प्रवास करीत असत. "नित्य प्रवासी" म्हणून नारदांची ख्याति आहेच. त्यांचे अनेक लोकांत जाणें येणें असें. नारद व परशुराम हे भारतीयांचे आद्य यात्रागुरू होत. त्या काळीं प्रवास फार कष्टांचा असे, आतांसारखीं सुखसाधनें उपलब्ध नव्हतीं. हुएनत्संग हा चिनी प्रवासी सातव्या शतकांत हिंदुस्थानांत राजाहर्षवर्धनाच्या दरबारांत आला होता. त्यानें लिहून ठेवलेल्या हकीकतीवरून जुना इतिहास मिळतो. श्रीशंकराचार्य बदरीनारायणाकडे गेले होते. संत ज्ञानदेव, नामदेव पंजाबांत जाऊन आले. समर्थ रामदास सबंध हिंदुस्थान हिंडले होते. मुक्तेश्वरानें रामेश्वराची यात्रा केल्याचें वर्णन आढळतें. तात्पर्य, व्यावहारिक ज्ञान व परमार्थसाधन या दोन्ही दृष्टींनीं तीर्थयात्रा व प्रवास अत्यंत हिताचीं आहेत. प्रवासाच्या अनुभवाशिवाय मनुष्य पूर्ण शिक्षित होतच नाहीं.

१७

तीर्थयात्रेचा आनंद मोठा आहे. मात्र तो स्वतः अनुभवावा तेव्हांच, नुसती वर्णनें वाचून नव्हे. ग्रंथ वाचनापासून मिळतें तें ज्ञान अंगी मुरावयाला प्रवासासारखें साधन नाहीं. प्रसंगातून निभावून जाण्याचे धडे त्यांत मिळतात.

अनेक भाषा अवगत होतात. नद्या, गिरिकंदरें वगैरे पाहून परमेश्वरी सामर्थ्य प्रतीत होतें. नाना प्रकारच्या माणसांशी गांठी पडल्यामुळें मनुष्य स्वभावाचे मासले पहावयास मिळतात. त्यामुळें समयसूचकता व बहुश्रुतताहि येते.

१८

कालमानाप्रमाणें प्रवासाची साधनें विपुल झालीं आहेत. पायी, बैलगाडी, घोडागाडी, दुचाकी, मोटार, फटफटी, आगगाडी, नांव, जहाज, आणि आतां विमान अशी उत्क्रांती झाली आहे. "साधनानामनेकता" उपासनेप्रमाणें प्रवासालाहि लागू आहें. ज्या प्रकारचा प्रवास असेल त्यास अनुसरून पोषाख, कपडेलत्ते, खाद्य पेयांचें पदार्थ, औषधें व अितर सामग्री ही ठेवणें अगत्याचे असतें.

१९

समुद्रप्रवासांत संवयीचे अभावी पुष्कळांना बोट लागते. "समुद्रवांती" नांवाचा आजार होतो. सारख्या उलटचा होतात. म्हणून लिंबू, आलें वगैरे पित्तशामक पदार्थ जवळ बाळगणें, खानपानांत परिमितता राखणें जरूर आहे. परदेशप्रवास करावयाचा असेल त्या देशाच्या सरकाराची जरूर ती परवानगी मिळविली पाहिजे. तसेच तेथील भाषेशी थोडी तरी तोंडओळख करून घेणे व्यवहाराला अत्यंत अगत्याचें आहे.

२०

समुद्रप्रवासांत बोटीवर पाणी पिणें बेताचें असावें. पाणी अधिक पिण्यानें वान्ती अधिक होण्याचा संभव असतो.

२१

स्वदेशांतला प्रवास व परदेशांतला प्रवास यांत महदंतर आहे. भारतीयांना युरोप, अमेरिका खंडांत प्रवास करणें झाल्यास इकडील अधिक कपडे

बरोबर घेऊं नयेत. कारण तिकडील देशांत विशेष प्रकारच्या नमून्याचेच कपडे वापरले जातात. म्हणून इकडून शिववून घेतलेले ते कपडे प्राय: निकामी होतात.

२२

परदेशांत रहात असतांना तेथील धार्मिक तथा सामाजिक रीतीभाती-विषयीं आपणांस कांहीं चमत्कारिक दिसलें तरी त्याची वाच्यता अगर त्यास विरोध प्रकट करूं नये. हें तारतम्य सांभाळलें पाहिजे.

———

# २७

## पत्रव्यवहार

### १

आजकालच्या व्यवहारांत पत्रव्यवहाराला फार मोठें स्थान आहे, हें पत्रव्यवहार या शब्दावरूनच प्रतीत होतें. भौतिक सुधारणांमुळें रेल्वे, मोटारी व विमानें हीं निरनिराळीं वाहनें व इतर प्रवासहि वाढला आहे. आजकाल प्रवास केल्यावांचून जसें कोणाचें भागावयाचें नाहीं तसेंच पत्रव्यवहाराचेंहि आहे. तो वाढला आहे व त्याशिवाय व्यवहारांत कोणाचेंच चालावयाचें नाहीं असें झालें आहे.

### २

पूर्वी पत्रव्यवहार साधनांचे अभावीं फार थोडा असे. पण आजकाल ही बाब महत्त्वाची व नित्याची होऊन बसली आहे. तथापि यांत प्रवीणता व व्यवस्थितपणा जसा असावयास पाहिजे तसा पुष्कळांचे ठिकाणीं नसतो, हीहि तितकीच सत्य गोष्ट आहे.

### ३

पत्रव्यवहारांत साधारणपणें कौटुंबिक पत्रव्यवहार, व्यावहारिक पत्रव्यवहार व व्यावसायिक पत्रव्यवहार असे तीन प्रकार होतात अगर असतात. कौटुंबिक पत्रव्यवहाराचें क्षेत्रहि विभक्त राहणीमुळें पुष्कळच विस्तृत झालें आहे. आईबाप व मुलें, भाऊबहीण, मित्र, आप्त, पतिपत्नी या सर्वांमध्यें जो पत्रव्यवहार असतो व ज्यांत जिव्हाळा व प्रेम असतें तो कौटुंबिक पत्रव्यवहार होय.

४

कुटुंबांमध्यें केव्हां केव्हां असे प्रसंग निर्माण होतात कीं, कोणाशीं कसें बोलावें हा विचारच पडतो. पण पत्रानें अशा वेळीं बरेंच सुलभ होतें. मात्र लिहितांना ज्याला लिहावयाचें त्याची मनोभूमिका समजून घेतली पाहिजे, गैरसमजास जागा न राहील असें लिहिलें पाहिजे व वाचणाऱ्यानेंहि लिहिणाऱ्याच्या अंतःकरणाचा भाव ओळखला पाहिजे.

५

पत्र लिहिणें तें साधें स्वाभाविक पण जोरदार म्हणज त्यांत तजेला पाहिजे. 'पत्र म्हणजे खरें म्हटलें तर लिहिणाराची आवड अगर शील वगैरेचें दर्शन करविणारा विलोरी आरसाच असतो.

६

पत्रव्यवहार कोणत्याहि स्वरूपाचा—खाजगी, कौटुंबिक किंवा सार्वजनिक—असो त्याचा मुख्य उद्देश ज्याला लिहावयाचें त्याचें मन वेधून त्यास आपला भाव प्रगट करावयाचा असतो, असला पाहिजे. संदिग्धता पत्रव्यवहाराचे बावतीत दोषास्पद होय.

७

आलेल्या पत्राचें उत्तर—मग तें नकारात्मक कां असेना—अवश्य दिलें पाहिजे. केव्हां केव्हां याकडे कित्येकांचे दुर्लक्ष होतें. तें व्यवहारांत क्षम्य नाहीं.

८

व्यावहारिक पत्रव्यवहारहि जीवनकलह, दिवसेंदिवस तीव्रतर झाल्यामुळें, वाढला आहे. पूर्वी साधारणपणें ज्या त्या पंचक्रोशींतच व्यक्तीचें बहुतेक आयुष्य जात असें; पण सध्या बालपण व विद्याभ्यास एकें ठिकाणीं तर नोकरी अगर उद्योगधंदा दुसरीकडे, शरीरसंबंध महाराष्ट्रांत तर निर्वा-

ह्याचा उद्योग दुसऱ्या एका प्रांतांत, असें सर्वत्र झाल्यामुळें पत्रव्यवहार स्वाभाविकपणें वाढलाच आहे. ऋणानुबंध सांभाळणें, देवघेव करणें वगैरें कारणासाठीं जो पत्रव्यवहार, त्यास व्यावहारिक पत्रव्यवहार म्हणतात. व्यावसायिक पत्रव्यवहार म्हणजे व्यापार व उद्योगधंदे या संबंधीं पत्रव्यवहार होय.

९

पत्रव्यवहार कोणत्याहि तऱ्हेचा असला तरी सामान्यत्वें पत्र सुवाच्य, स्पष्ट, सभ्य, वेळचे वेळीं धाडलेलें व मार्दवयुक्त असलें पाहिजे. लेखनसाहित्य चांगल्या प्रकारचें वापरलें पाहिजे. तसेंच थोडक्यांत त्याचा अर्थबोध व्हावा व दुसऱ्याचे मनास लागेल असें तें नसावें. व्यवस्थित पोषाख केलेल्या मनुष्याविषयीं जसा एकदम अनुकूल ग्रह होतो तसें सुवाच्य, व्यवस्थित लिहिलेल्या पत्राविषयींहि आहे. आपलें पत्र प्रभावी व्हावें असें ज्यास वाटत असेल त्यानें या टापटिपीचें महत्व ओळखलें पाहिजें. कोणतीहि माहिती आटोपशीर पण स्पष्ट असावी; त्यांत थापेबाजी असू नये. पत्रव्यवहारांत सचोटी ही मुख्य आहे.

१०

अक्षर वळणदार असलेलें चांगलेंच पण तें चांगल्या कागदावर व त्याचा एक चतुर्थांस भाग समास सोडून नीट ओळीनें व अंतर ठेवून लिहिलें पाहिजे. कांहींतरी कसेंतरी गंदीपणानें लिहिणें असभ्यतेचें समजलें जातें.

११

पत्रलेखन ही एक कला आहे. आपलें हृदय उघडें करून दाखवण्याचें एक मोठें साधन आहे. अगदीच तारवजा लिहिणें अगर भलतेच असंबद्ध व अरसिकपणें कांही तरी लिहिणें हे सर्व प्रकार त्याज्य होत.

१२

पत्र लिहितांना आपल्या परंपरेप्रमाणें प्रथम "श्री" कार अवश्य आहे. नंतर आपला पत्ता व त्या खालीं लगेच आपली मिति व चालू दिनांक ही दोनहि असावीत. पत्र ज्यास लिहावयाचें त्याचें आपलें नातें, व्यवहारातली

परस्परांची योग्यता, वयमान इतक्या गोष्टी लक्षांत घतल्या पाहिजेत. पत्र लेखनाचे मायने व संकेत ठरले आहेत. वडील मंडळींस तीर्थ स्वरूप, लहानांस आशीर्वाद बरोबरीच्यांस सा. न. इत्यादि संकेत पाळले पाहिजेत.

१३

पत्र लेखकानें आपलेकडील क्षेम वर्तमानानंतर जी हकीगत कळवावयाची ती फार पाल्हाळ न करितां मुद्देसूद दुसऱ्याला अर्थबोध होईल अशी लिहून जी काय पृच्छा करणें ती करावी. त्यांत आंत एक बाहेर एक असें असू नये. हा व्यवहारांतला साधा नियम आहे.

१४

पत्रांचे उत्तर वेळचें वेळीं दिलें पाहिजे. त्यांत व्यवहार आहे. नाहींतर कार्य हानी व कालहरण तर होतेंच पण निष्कारण गैरसमजहि होतो.

१५

पत्रव्यवहारालाहि कांहीं नियम–बंधनें आहेत. तीं व्यवहार सांभाळूं इच्छिणारानें पाळलीं पाहिजेत.

१ कोणतेंहि पत्र लिहिण्यापूर्वीं मजकुराचा नीट विचार करा.

२ उत्तर देतांना ज्याचें उत्तर देणें असेल तें पत्र जवळ ठेवा व लिहिणें झाल्यावर विचारल्या गोष्टीचें उत्तर बरोबर लिहिलें आहे ना हें नीट पहा.

३ समक्ष बोललेलें विसरून जातें पण लिखित गोष्टीला ही सवड नाहीं, हें लक्षांत ठेवा.

४ पत्र टपालांत टाकण्यांपूर्वीं दोनदां विचार करा. विकारवश असल्यावेळीं पत्र लिहिण्यांचें करूं नका.

५ फार महत्त्वाचीं व वेळेवर गेलींच पाहिजेत अशीं पत्रें टपालांत टाकण्यांचें काम स्वत: करा.

# २८

# पैसा

यस्याऽस्ति वित्तं स नरः कुलीनः
स पण्डितः सः श्रुतिमान् गुणज्ञः ।
स एव वक्ता स च दर्शनीयः
सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ति ॥

१

जगाचे बाजारांत– त्यांत व्यवहार आलाच– पैशाची किंमत काय आहे, हें कांहीं कोणास सांगावयास नको. तथापि तो मिळवावयास कष्ट पडतात, उद्योग करावा लागतो, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. पैसा असला तर सर्व कांहीं आहे. पैशानें सर्व गोष्टी प्राप्त करून घेतां येतात.

२

पूर्वकाळीं सर्व व्यवहार धान्यांत अगर वस्तूच्या मोबदल्यांत होत असे. परन्तु तो घेणारास–देणारास सारख्याच अडचणीचा; म्हणून अलीकडच्या काळांत पैसा हेंच एक विनिमयसाधन झालें आहे; कारण तो सुटसुटीत व व्यवहारास सोयीस्कर आहे.

३

धनवंतालागीं । सर्वमान्यता हे जगीं ॥ (तुकाराम)
द्रव्याची अनुकूलता असल्याशिवाय कांहीं उपयोग नाहीं. व्यवहारांत तर पैशाच्या अभावीं पदोपदीं नडतें, हा नित्याचा अनुभव आहे. ज्याचा लक्ष्मीनें

त्याग केला, त्याला नुसतें बसा सुद्धा कोणी म्हणत नाहीं. पैसा असल्याशिवाय जीवन व्यर्थ होय. पैशाशिवाय नुसते मनोरथ सिद्धीस जात नाहींत. 'उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः ।' असें म्हटलें आहे, तेंच खरें.

४

भाई जगांत सारा, पैसाच एक प्यारा !

... ... ... ...

पैसाच दिव्य दृष्टी, पैशांत सर्व सृष्टी;
पैशामुळेंच ताई, पैशांत बाप माई;
हातीं असेल पैसा, या तोवरीच बैसा ! (आम्बराई काव्य)

व्यवहारांत पैशांचें असेंच अतुलनीय महत्त्व आहे. परमार्थाचा भाग वेगळा आहे. बाकी त्यालाहि पैसा लागतोच. तेव्हां सचोटीनें व सततोद्योगानें पैसा मिळवा. कोणाचा अपहार करूं नये. त्यांत जय नाहीं.

५

स्वतः कष्ट करून पैसा मिळवावा; तोच केव्हां झाला तरी उपयोगाला येतो, असें वर्णन वेदांतहि अढळतें. "स्वतः संपादन केलेला पैसा पुरा पडतो म्हणून आम्हांला स्वसंपादित संपत्तीचे मालक कर; दुसऱ्याचा मुलगा आपला होत नाहीं म्हणून खुळ्या लोकांचे मार्ग आम्हांला जाणण्याचा प्रसंग येऊ नये, " अशी ऋग्वेदांत एके ठिकाणीं (७. ४. ७) अग्निनारायणाची प्रार्थना केली आहे.

६

धनमाहुः परं धर्मः धने सर्वं प्रतिष्ठितम् ।
जीवन्ति धनिनो लोके मृता ये त्वधना नराः ॥

धनसंपन्न लोकच जगांत जिवंत असतात; धनहीन पुरुष मेल्यांतच जमा.

७

मनुष्याला आयुष्याचे आरंभीं कोणती स्थिति असेल हें ज्याचें त्याचें पूर्वप्राक्तनानुसार ठरलेलें असतें. तरीं प्रत्येकाला स्वतःच्या कर्तृत्वानें, उद्योगानें, सचोटीनें व व्यवहारकुशलतेनें ऐश्वर्य व संपत्ती मिळवणें शक्य आहे. 'दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम् ।' असें महाभारतांत कर्णाचे उद्गार आहेत. त्याचा अर्थ हाच कीं, प्रत्येकाला आपली परिस्थिति सुधारण्याचा मार्ग मोकळा आहे.

८

जगांत पैसा ही एक मोठ्यांतलीं मोठी शक्ति आहे. तिच्या सहाय्यानें मोठमोठीं कार्यें सिद्धीस नेतां येतात. शिवाजी महाराजांनीं वयाचे सोळावे वर्षी तोरणा किल्ला घेतल्यावर किल्ल्याची डागडुजी करीत असतां दैववशात् त्यांस द्रव्यानें भरलेला हांडा सांपडला व त्या द्रव्यामुळें शिवाजी महाराजांना पुढील कार्यांत मोठी मदत झाली, असें बखरकार सांगतात.

९

पैशाचें महत्त्व लहान मुलांनाहि कळतें म्हणूनच तीं नेहमीं पैशासाठीं हट्ट धरून बसतात. लहानापासून मोठ्यापर्यंत, गरीबापांसून श्रीमंतापर्यंत सर्वांनाच पैसा हवा आहे. व व्यवहारांत तो लागतोहि. म्हणून तुकारामासारखे सत्पुरुष देखील 'जोडुनिया धन उत्तम व्यवहारें । उदास विचारें वेंच करीं ॥' धन उत्तम व्यवहारें जोडा व असें जोडलेलें धन विवेकानें खर्च करा, असें सांगतात. ऐहिक अभ्युदय होण्यास संपत्तीची आवश्यकता आहे व ती श्रमसायासानें मिळविण्याचा प्रयत्न प्रत्येकानें केला पाहिजे.

१०

पैसा हा राजाचा राजा आहे, अशी एक म्हण आहे. हरएक कामांत पैसा पाहिजे. प्रपंचांत पाहिजे, व्यवहारांत पाहिजे, धर्मकृत्यांत पाहिजे, कोणा-

ला वेळ प्रसंगाला मदत करावयाची झाल्यास पाहिजे, प्रवास करावयाचें मनांत आणल्यास पाहिजे. पैशाचे अभावी या सर्व गोष्टी लंगड्या पडतात.

## ११

"प्रपंचांत वित्त आणि परमार्थांत चित्त" नसेल तर प्रपंच आणि परमार्थ यांत कांहींच साधणार नाहीं.

## १२

पैसा राखणें म्हणजे योग्य ठिकाणीं बेतानें खर्च करणें होय. अनाठायीं तो फाजील खर्च करूं नये. सत्कार्याला देखील तो उपयोगांत आणूं नये असा याचा अर्थ नव्हे. आजकालची राहणी इतकी कृत्रिम झाली आहे व नको असलेल्या संवयी व चैनी इतक्या वाढलेल्या आहेत कीं, ज्याला त्याला आपल्या मिळकतीचा पैसा पुरत नाहीं. मजुरी करणारा मनुष्यहि रिस्टवॉच घालून मिरवतो व पंधरा वीस रुपये मिळवणाराची बायकोहि घरगुती कामें मोलानें घेऊं इच्छिते. पैशाचा अपव्यय समाजांत कसा होत आहे, याचें चित्र ठिकठिकाणीं सिनेमागृहें दाखवतील.

## १३

श्रम करून पैसा मिळवावा. पण खर्चतांनाहि शिलकेकडें लक्ष असावें. भावीं गरजा भागविण्यास थोडीबहुत तरी शिल्लक असणें अगत्याचें आहे. कोणत्या वेळीं काय प्रसंग येईल याचा नेम नसतो. याकरितां व्यवहारांत, आयुष्यांतील एकंदर राहणींत, काटकसरीनें वागणे हिताचें आहे.

## १४

आपली ऐपत काय, मिळकत काय, याचा विचार जो करणार नाहीं तो खर्चाच्या नाहक अडचणींत आल्याशिवाय राहणार नाहीं. एक वेळ उपाशी असलेलें पत्करलें पण कोणाचें पाव आणा देणें असू नये. ऋण काढून सण करणें म्हणजे शुद्ध अजागळपणा.

१५

पैसा स्वभावतः वाईट नाहीं. पण त्याचा विनियोग सत्कारणीं झाला पाहिजे. लांचलुचपत, व्यसनें वगैरेपायीं खर्च करणें हा पैशाचा अपव्यय होय. अग्नी हा स्वभावतः चांगला आहे.; मानवाला उपकारी आहे; पण त्याचा दुरुपयोग केला तर भलताच प्रसंग ओढावतो. मनुष्य जन्माला येतांना अनेक ऋणें घेऊन येतो कुटुंबऋण, तसेंच समाजाचें ऋणहि असतें. जे शक्त्यनुसार समाजऋण फेडण्याचा आपल्या आयुष्यांत प्रयत्न करतात ते टाटा सारखे सुपुत्र धन्य होत

१६

पैसा असला तरी उपयोग करतां आला पाहिजे. कित्येकांस खरा उपयोग कसा करावा हेंच समजत नाहीं. द्रव्य ही चल वस्तु आहे. ती फिरती राहील तितकें अधिक चांगलें. त्यांत लोकांचेहि हित साधेल. आपले द्रव्याची वाढहि होत राहील असे उद्योग असावे. हा पैशाचा खरा उपयोग. पैसा मिळवताना उत्सुकतेनें मिळवावा, काळजीपूर्वक सांभाळावा, निरपेक्षपणें खर्च करावा. यांत व्यवहारांतलें सर्व अर्थशात्र आलें.

१७

पैसा असूनहि त्याचा स्वतःला अगर समाजाला कांहीं उपयोग करींत नाहीं असा नतद्रष्ट कृपण मनुष्य समाजाचा शत्रु होय.

१८

पैशाचे बाबतींत हिशोब हा पाहिजेच. तोहि रोजचे रोज ठेवण्याची पद्धत असावी. 'वाहिली ती गंगा, राहिले तें तीर्थ' असें भोंगळपणानें वागणारी माणसें उत्तर आयुष्यांत कष्टी झालेलीं आढळतात. व्यवहारांत गरजा आपल्या स्वाधीन पाहिजेत. आपण गरजांचें स्वाधीन होऊं नये.

१९

पैशाची खरी किंमत तो दुसऱ्याजवळचा उसना घेऊन पहा, म्हणजे समजेल.

२०

ज्याचा जो धंदा असेल त्यांत त्यानें प्रावीण्य मिळविलें पाहिजे; म्हणजे त्यांत त्याला काम व पैसा मिळण्याची अडचण कधींच पडणार नाहीं. मात्र त्याचा उपयोग शहाणपणानें व सावधचित्तानें केला पाहिजे.

२१

पैसा मिळविण्यास ज्ञान लागतेंच पण त्या पेक्षां तो सांभाळण्यास व संवर्धन करण्यास अधिक अक्कल लागते. पुष्कळ पैसा मिळवूनहि बेहिसाबी वागण्यामुळें पुढें पश्चाताप झालेली माणसें व्यवहारांत अनेक आढळतात. तेव्हां प्रथमपासून पाहिलें पाहिजे.

२२

मेळविती तेतुके खर्चती । ते कठीण काळीं मरोनी जाती ।
दीर्घ सूचनेनें वर्तती । तेचि भले. ॥

रामदास.

२३

जगांत हरएक व्यवसायांत संपत्तीलाच प्राधान्य असल्यामुळें संपत्तीची कृपादृष्टि असलेले लोक व समाजच उदयाला येतात. पैशावांचून मनुष्याचें जीवितच व्यर्थ होत असल्यामुळें तो सततोद्योगानें प्राप्त करून घेण्याचा प्रत्येकानें जरूर प्रयत्न केला पाहिजे. ऐहिक किंवा पारलौकिक सुख आपल्या सत्कर्मावर अवलंबून असून सत्कर्माचरण प्रायः संपत्तीवर अवलंबून आहे. म्हणून आपला अभ्युदयहि संपत्तीच्याच आधीन आहे.

# २९

# शिस्त

## १

शिस्त म्हणजे विवक्षित पद्धतिनुरूप वर्तणूक, व्यवहार, शिरस्ता, पद्धति अगर रीत होय; अथवा आपल्यापेक्षां श्रेष्ठ असलेल्यांची आज्ञा निमूटपणें पाळावयास लावतें अशा प्रकारचें शिक्षण होय. वडीलधाऱ्या माणसांची अगर दर्जानें श्रेष्ठ असणाऱ्यांची आज्ञा बिनतक्रार पाळणें हा एक शिस्तीचा महत्वाचा भाग आहें. शिस्त हें एक नैतिक शिक्षण देण्याचें साधन होय. शिस्त या शब्दांत आज्ञाधारकपणाचाहि समावेश होतो. खाणें पिणें, बसणें-उठणें, बोलणें-चालणें, कोणताहि व्यवहार करणें या सर्वच व्यवहारांत शिस्तीची अत्यंत जरूरी आहे. कोणतेंहि काम चांगलें होण्यांकरितां व हातीं घेतलेल्या कामांत यश येण्यांकरितां शिस्त अगर ठराविक पद्धत पाहिजे. शिस्तीचे अभावी कार्यांत बिघाड होतो. तें व्हावें तसें होत नाहीं, दिसण्यांत बरें दिसत नाहीं, इत्यादि अनेक तोटे आहेत. शिस्त आहे तर सगळें कांहीं आहे. नाहींतर कशांत कांहीं मेळ राहत नाहीं, हा नेहमींचाच अनुभव आहे.

## २

कार्यक्षमता हें शिस्तीचे ध्येय आहें. कामाची पद्धत आणि कौशल्य हीं शिस्तीच्या शिक्षणावर अवलंबून आहेत. सध्या शिधापद्धतीनें व्यवहारांत शिस्तीचे चांगले धडे दिले आहेत. कालाचा, द्रव्याचा, काटकसरीनें उपयोग व कार्यक्षमता या शिस्तीच्या मर्यादा होत. शिस्तीचा मनुष्य कर्तव्यास जागतो

३

आपल्याकडे कोणी आला तर त्यास आपण उत्थापन देणें, शाळेंत कोणी सामान्य गृहस्थ आला तरी विद्यार्थ्यांनीं उठून उभें राहणें, वडीलधाऱ्या मंडळींच्या देखत कोणतीहि असभ्य वर्तणूक न करणें, कीर्तन, प्रवचन, सभा वगैरे ठिकाणीं दुसऱ्यास अडचण न होईल असें रस्ता सोडून बसणें, गोंधळ गोंगाट न करणें, चालू कामांत व्यत्यय न येईल अशी वर्तणूक करणें, वगैरे सर्व गोष्टी शिस्तीखालीं येतात. त्या पाळणें नितान्त आवश्यक आहे.

४

शिस्तीचेंहि एक शास्त्र आहे. ती राव असो रंक असो त्यानें पाळिली पाहिजे. त्यांत राष्ट्राचा उत्कर्ष आहे. तिची आवश्यकता सर्वत्र आहे. नाहींतर बजबजपुरी होते. पोषाख, चालणें बोलणें, अगर कोणतेहि नित्याचे व्यवहार असोत, अथवा रणभूमीवरील अटीतटीचे प्रसंग असोत, शिस्तीनेंच सर्व व्यवहार सुरळीत होतात.

५

रणांत तसेंच व्यवहारांतहि शिस्तीचें मोठें महत्व आहे. एकी व शिस्त हे दोन्ही राष्ट्रीय सद्‌गुण पाश्चात्यांपासून घेण्यासारखे आहेत. संख्येनें लहान पण शिस्तीत तरबेज सैन्य, अफाट पण अव्यवस्थित सैन्याचा धुव्वा उडवूं शकते, हा अनुभव हिंदुस्थानच्या इतिहासांत अनेक वेळां आला आहे. संस्था अगर समायिक उद्योगधंदे शिस्तवार, व्यवस्थित व नियमितपणें होत असतील तरच यशस्वी होतात.

६

घरीं, शाळेंत अगर सार्वजनिक आयुष्यांत सर्व स्थळीं, सर्व काळीं, सर्व व्यवहारांत शिस्तीची आवश्यकता आहे. एकच गोष्ट कां होईना पण व्यवस्थितपणें केली तर दिसण्यांत बरें दिसतें व ती लवकर होते, रुबाब येतो व

सर्व खुलून दिसतें. शिस्त ही राष्ट्राचे अभ्युदयास जरूर लागते. शिस्ती-शिवाय कोणाला यश येणें शक्य नाहीं. जहाजाला जसें सुकाणूं, जनावराला जशीं शिंगें तशी आयुष्याला शिस्त ही आहे. सुकाणूशिवाय सुरक्षितपणें समुद्रावरून जाणें अशक्य होय. शिस्त हा सर्व सद्‌गुणांचा राजा आहे.

७

मुलांना शिस्त लहानपणापासूनच लागली पाहिजे अगर लाविली पाहिजे. तिची पुढील आयुष्यांत मोठेपणा प्राप्त होण्यास मदत होईल व मुलांना समाजाचा उत्तम घटक ती बनवील. ज्याला घरीं लहानपणीं शिस्त लागणार नाहीं त्याचें पुढील आयुष्यहि बेशिस्त होणार हें निश्चित. ज्या घरीं शिस्त नाहीं, कोणी कोणाचें ऐकत नाहीं, जो तो आपल्या लहरीप्रमाणें वाटेल तसें वागूं इच्छितो, त्या घरांत समाधान व सौख्य राहणार नाहीं. कलह, गोंधळ व बजबजपुरी माजल्याशिवाय राहणार नाहीं. असा प्रकार प्रायः अनेक ठिकाणीं आढळतो.

८

कुटुंबाचें, तसेंच राष्ट्राचें व राज्यकारभाराचेंहि आहे. राज्यकारभारांत तर शिस्तीची पदोपदीं जरूर लागते. मोठ्यांपासून लहानांपर्यंत सर्वांसच शासनसंस्थेच्या वरिष्ठाधिकाऱ्यांनीं दिलेल्या आज्ञा पाळाव्या लागतात. तरच तो कारभार सुरळीत चालतो. एरवीं राज्यकारभाराचा गाडाच चालणें अशक्य होईल. शिस्त ही सर्व गुणांची माता.

९

राष्ट्राच्या सैनिकास तर या शिस्तीची अत्यंत आवश्यकता आहे. प्रत्येक सैनिकानें व्यक्तिशः वरिष्ठाची आज्ञा पाळलीच पाहिजे. दिलेल्या आज्ञेची विचक्षणा करीत बसल्यास त्याचे हातून सांगितलेलें काम कधींच होणार नाहीं. थोड्याशा हयगयीनें देखील सर्व सैन्यावर आपत्ति येण्याचा संभव असतो. शिस्तींत तरबेज असलेलें सैन्यच मोठमोठ्या फौजांस थोपवून धरूं शकतें, हें अनेकवार इतिहासांत नमूद आहे.

१०

पाश्चात्यांपासून जे अनेक राष्ट्रीय सद्‌गुण घेण्यासारखे आहेत त्यांत शिस्तीचा प्रामुख्यानें निर्देश केला पाहिजे. आमच्यांत, विशेषत हिंदु समाजांत, तर शिस्तीचें वावडें आहे. शिस्त व संघटना नसेल तर उत्पन्न केली पाहिजे. शिस्त ही एक संजीवनी विद्या आहे. हिचें अवलंबन केल्यास एक तरबेज झालेला मनुष्य नाहींसा झाल्यावर काम अडून पडत नाहीं; दुसरा तो जागा घेऊं शकतो, हें पाश्चात्यांच्या एकंदर व्यवहारांत आपण पाहतोंच. त्यांचा राज्यकारभार तसेच सर्व व्यवहार व्यक्तिनिष्ठ नसून राष्ट्रनिष्ठ आहेत. शिस्त, संघटना, कर्तव्याची जाणीव हे फार मोठे सद्‌गुण आहेत; समाजाचा अभ्युदय होण्यास व तो बलशाली होण्यास ते लागतातच. तसेंच आयुष्यांत हरप्रसंगीं त्यांची आवश्यकता असल्यामुळें ते सद्‌गुण प्रत्येकानें आत्मसात् करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांत स्वहित तसेंच राष्ट्रहित आहे.

११

शिस्तीचें अलिकडचे प्रसिद्ध उदाहरण स्वामी श्रद्धानंदांचे. त्यांचे गुरुकुलांत चहाला बंदी होती. गव्हर्नर सारख्या बड्या पाहुण्यास त्यांनीं तुळशीचे पानाचाच चहा करून दिला. ही शिस्तीची कदर.

१२

आजकाल लहान मुलांत अगर विद्यार्थिवर्गांत सांगितलेलें ऐकावयाचें नाहीं ही वृत्ति बळावत आहे. त्याचा व्हावयाचा तोच परिणाम म्हणजे पुढील आयुष्यांत सर्वच व्यवहारांत शिस्तीचा अभाव दृष्टोत्पत्तीस येतो. "लालनाद्बहवो दोषास्ताडनाद्बहवो गुणाः ।" असें सुभाषित आहे. मुलांचे लहानपणीं खाण्यापिण्यांत लाड करावे पण आचरणांत तीं अमर्याद व दुर्गुणी होऊं नयेत म्हणून जरूर ती शिस्त व आज्ञाधारकपणा हीं त्यांना लावलीं पाहिजे.

## १३

शिस्त व शिष्टाचार यावरूनच मनुष्याची नेहमीं पारख होते. शिस्ती-संबंधीं कांहीं अनुभवानें दृढ झालेले नियम येणेंप्रमाणें:—

१ दुसऱ्याच्या भावना लक्ष्यांत घ्या. एखाद्या गोष्टीविषयीं दुसऱ्याला काय वाटतें याचा विचार करा.

२ वडील मंडळी आपल्याशीं बोलत असतां किंवा आपण त्यांच्याशीं बोलत असतां उभे राहा.

३ खरेपणानें वागा पण स्वतःच्या मताची प्रौढी मारूं नका.

४ कपडे करतांना रूढीपेक्षां सुखाकडे व सुटसुटीतपणाकडे अधिक लक्ष्य द्या.

५ पाहुणे म्हणून गेलांत तर त्या घरच्या माणसांची गैरसोय होऊं देऊं नका.

६ सभ्यतेनें वागा. आचरणानेंच कोणाची झाली तरी पारख होते.

७ माणुसकी दाखवा. हाच सर्वांत मोठा गुण आहे.

# ३०

# पशू आणि वनस्पती

१

जगांत " मूक " आणि जड अथवा " अचेतन " असे आणखी दोन समाज अगर जीव कोटि आहेत त्यांसही आपण चांगल्या रीतीनें वागविले पाहिजे. पण पुष्कळदां ही सहृदयता पाळली जात नाहीं ही व्यवहारांत मनुष्याला कमीपणा आणणारी गोष्ट आहे. एवढेंच काय पण ती निर्घृणपणाची आहे. " मूक " म्हणजे जनावरे पक्षी वगैरे प्राणी आणि जड म्हणजे वनस्पती होत.

२

मनुष्यातले सर्व गुण पशूतहि आहेत. अंतर फक्त ज्ञान नाहीं एवढेंच. मनुष्याप्रमाणें त्याला वाचा नाहीं एवढ्याचा फायदा घेऊन त्यांशीं अशिष्ट-पूर्ण व्यवहार करणें हें दयाधर्माला मान्य नाहीं. मनुष्यमात्राप्रमाणेंच पशुपक्ष्यांविषयीहि भूतदया अवश्यमेव पाळिली पाहिजे. कारण तीही एक जीवकोटि आहे.

३

ग्रीष्मऋतूंतल्या प्रखर उन्हांत रस्त्यानें वणवण हिंडतांना अथवा भयंकर थंडींत मोकळ्या मैदानांत बांधले जातांना पशूवर मनुष्यजातीकडून होणारा अत्याचार हे निमूटपणें सहन करीत असलेले दिसतात. स्वतःकरितां मात्र उन्हाळ्यांत वाळ्याचे पडदे आणि हिवाळ्यांत लोकरीचे कपडे अशी

चैन करतो पण ज्यांच्या दुधातुपावर आपले पोषण होते, अंगकांति वाढते त्यांची अशी दुर्दशा केव्हा केव्हां केली जाते ही एकप्रकारची निर्दयताच नव्हे काय ?

४

वेळचे वेळीं चारा पाणी देणें, कष्टाचे मानानें खावयास घालणें, ऋतुमानाप्रमाणें निवाऱ्याची सोय करणें, वरचेवर अंग धुणें, जड साखळदंड वगैरे तसेंच गळफांस बसेल असें न बांधणें, सकाळीं रोज गोठा साफ करणें, गोठ्यांत चिखल वगैरे न होऊं देणें हें जनावरांच्या स्वास्थ्याच्या दृष्टीनें आवश्यक आहे.

५

शिवीगाळ आणि घटके घटकेला मारपीट ही गोष्ट गाडीवानांचे बाबतीत तर नित्याची आहे. त्यांत त्यांस विधिनिषेध असा वाटतच नाहीं. वाचा असती तर त्याचा प्रतिकार केव्हांच झाला असता. गाडींत बसणाऱ्या स्त्रीपुरुषांनीं या गोष्टीस दक्षतेनें आळा घातला पाहिजे.

६

केव्हा केव्हा शक्तीबाहेर ओझें लादलें जातें. ही शुद्ध निर्घृणता आहे. लोढणें बांधणें, काठीनें बडवणें वगैरे प्रकार तर कित्येक जण बेदरकारपणें करतात. जनावराला ओझें अधिक झालें आहे हें न पाहतां जर मारपीट केली तर जनावर टेकीस येते. केव्हा केव्हा गाडी उलटण्याचेहि प्रकार होतात. ते टाळणें जनावरांच्या, आंत बसलेल्यांच्या, व हाकणाऱ्याच्या अशा त्रिवर्गाच्याहि हिताचें आहे.

७

मनुष्य पशुपक्षी इत्यादि प्राण्याबरोबर निर्दयतेनें वागणारा तो स्वतःहि पशुवत् बनत जातो हे लक्षांत घ्या.

८

पशूंचा जिवंतपणीं उपयोग होतोच पण मेल्यावरही त्यांच्या कातड्यांचे अनेकविध उपयोग मनुष्य जातीस होतात. म्हणून माणसानें पशूंविषयीं कृतज्ञ असलेंच पाहिजे.

९

पशु पक्षी हे मानवाचे आद्य गुरु होत. संगीत ही कला पशुपक्ष्यांकडूनच मानवांत उत्क्रांत झाली असें प्राणिशास्त्र सांगते. कोळी जाळे विणतो यावरून मनुष्यास विणकामाचें ज्ञान झालें व साळुंकीपासून गायन कला अवगत झाली. हा सत्य इतिहास आहे हें लक्षांत घ्या.

१०

पशुपक्ष्याव्यतिरिक्त दुसरी एक जीव कोटी वा समाज म्हणजे वनस्पती समाज. त्यानांहि सुखदुःखात्मक संवेदना असते, हें जगदीशचंद्र बोस यांनीं सिद्ध केलेच आहे. पशुपक्ष्यांना भूक लागली व अन्न पाणी मिळाले नाहीं तर ते दावे तोडतील, नाहीं तिथें जाऊन क्षुधा तृषा शांत करतील, पण वनस्पती एखाद्या स्थितप्रज्ञाप्रमाणें आहे त्या स्थितींत निश्चल राहतील. जलवायू इत्यादी पोषणद्रव्यें समयानुसार मिळतील तर त्या तिथेंच बहरतील, फल पुष्पयुक्त होतील, विपरीत स्थितींत सुकून जातील.

११

वनस्पतीचे दोन वर्ग आहेत. एक स्वाभाविकपणें उगवतो व वाढतो. आणि दुसरा मनुष्याकडून ज्याची लागवड केली जाते तो. लागण करावी लागणारी वनस्पती नाजुक असते. म्हणून वेळचें वेळीं खत पाणी देणें, माती खालवर करणें, छाटणें, सावळणें, जनावरांपासून संरक्षण करणें इत्यादि प्रकारे निगा राखणें अत्यंत जरूर आहे.

१२

भाजीपाला आणि वनस्पती ह्या जीवकोटीचें उपकार मानवावर चिरंतनाचे आहेत. ओलेपणीं मूळ, पान, फूल आणि फळ इत्यादि सर्वांगानीं मनुष्याची ते सेवा करतात. तर सुकल्यावरहि इंधनाचे कामीं येतात. जगांत वनस्पती नसल्या तर निरनिराळीं रोगनिवारक औषधें मिळतीना. अतऐव झाडपाला व वनस्पती यांचेही अगत्येंकरून संवर्धन केलें पाहिजे.

१३

" दशकूपसमावापी दशवापीसमो ह्रदः
दश ह्रदसमः पुत्रो दशपुत्रसमोद्रुमः "

'दहा जलसंचयाबरोबर एक पुत्र तर दहा पुत्रांची बरोबरी एक झाड करते' असे शास्त्रकार सांगतात. इतके वनस्पतीसृष्टीचे महत्व आहे हें प्रत्येकानें व्यवहारांत कृतीनें जाणलें पाहिजे.

# ३१

# अंत्यसंस्कार

१

व्यक्ति मर्त्य असली तरी समाज (व्यक्तिसमूह) अमर आहे. म्हणून व्यक्तिपुरता व्यवहार संपला तरी त्याचे पश्चात् समाजरूपी व्यवहार हा चालावयाचाच. व्यक्तिदृष्ट्या आयुष्याचा अखेरचा पडदा पडला तरी समाज-दृष्ट्या अंत्यसंस्कार हाहि विषय व्यवहाराचे कक्षेत येतोच व तो पाळणें मागें रहाणारांचें एक अवश्य कर्तव्य ठरतें.

२

जीवित क्षणभंगुर आहे व प्रत्येकास हें नश्वर जग एक दिवस सोडून जावयाचें असलें तरी एतद्विषयक व्यवहार हा नित्याचाच आहे. तथापि व्यवहारांत याहि बाबतींत अक्षम्य अनास्था निदान हिंदुसमाजांत तरी दिसून येतें. ही गोष्ट उपेक्षणीय नाहीं. शेजारी प्रेत पडलें असतां त्याचे तजविजीस हातभार लावण्याचे कामीं अंगचोरपणा करणें हा सामाजिक गुन्हा आहे.

३

शोकजनक स्थितींत प्राय: निकटचे आप्त दिङ्मूढ होतात. जवळच्या इतर लोकांची प्रथम करावयाची गोष्ट ही कीं गतमनुष्याचे कोणी सगेसोयरे, सुहृद्, स्नेही सोबती, समयानुसार जवळ अशा सर्वांस अंत्यदर्शनास उपस्थित होण्याविषयीचा निरोप कळविणें ही होय. पुष्कळदां हें राहून जातें. मग "आम्हाला कळलेंच नाहीं" म्हणून फुकटचें श्रेय घेण्यास कित्येकांस संधी मिळते तशी संधी संबंधीयांनीं व्यवहारदृष्ट्या देऊं नये.

४

मंडळी जमल्यानंतर जरूर त्या उद्योगाला लागलें पाहिजे. पण पुष्कळ वेळां जमलेली कांहीं मंडळी प्राप्त प्रसंग सोडून कांहीं तरी जुन्या गोष्टी, उखाळ्या पाखाळ्या अगर गतासंबंधी उणें अधिक बोलणें उरकून घेण्यांतच निमग्न झालेलीं आढळतात. हें असभ्यतेचें होय.

५

निधनानंतर अग्निसंस्कार, भूमिनिक्षेप (पुरणें), अगर प्रेत पक्षांना भक्ष्य म्हणून निर्वाणसदनांत ठेवून देणे वगैरे अनेक पद्धति निरनिराळ्या समाजांत रूढ आहेत. त्यांत वैद्यकशास्त्रदृष्ट्या अग्निसंस्कार श्रेष्ठ गणला जातो. आमची ही प्रथा पाश्चात्यहि आजकाल हळुहळू उचलू लागले आहेत. देहहि पंचमहाभूतात्मकच असल्यामुळें अखेर तो पंचमहाभूतातच विलीन होणार.

६

रस्त्यानें वाटेत प्रेत आडवें आल्यास जागचे जागीं तसेंच बसून रहाणें व्यवहारांत निंदय आहे. इतरांबरोबर दोन पावलें जाणें, निदान जागचें उठून उभे राहणें, मृताविषयीं आदर व्यक्त करणें अत्यंत अगत्याचें आहे.

७

स्मशान यात्रेहून परतताना खालील गोष्टी वर्ज्य मानल्या आहेत.:—

१ हसंत हसंत गप्पा गोष्टी करणें,

२ पान वगैरे खाणें,

३ जळत्या प्रेताकडे पुन्हां वळून पाहणें,

४ मृत व्यक्तीची निंदा करणें,

५ स्नान करण्याचें टाळणें.

८

शोक समयींचा एकंदर व्यवहार पहातां एक गोष्ट विशेषेकरून नजरेस येते ती अशी कीं, ख्रिस्ती व मुसलमानांत एखाद्या कुटुंबियाच्या मृत्युनंतर फार थोडा शोक करतात. पण रडण्या ओरडण्याचा गोंधळ हिंदूत अधिक दिसून येतो. इतका करुण युक्त कीं, तो ऐकून उपस्थितांनाहि गहिंवर आल्याखेरीज राहात नाहीं. मोठमोठ्यानें आक्रोशयुक्त रुदन हिंदु समाजांत सर्व साधारण आहे. गीतेसारखा ज्यांचा धर्म ग्रंथ आहे, ज्यांत, "नैनं छिंदन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः" असें म्हणून आत्मा अमर असल्याची खात्री दिली आहे, त्यांनीं असें विपरीत आचरण करणें व्यवहार तसेंच धर्मतत्वाविरुद्ध आहे. 'मरण प्रकृतिः शरीरिणाम्' असें गृहित धरलेंच पाहिजे.

९

धार्मिक दृष्ट्या अवश्य तें सुतक व तसेंच व्यवहार दृष्ट्या निदान दहा दिवस खालील गोष्टी वर्ज्य कराव्या :—

१ कोणतेंही मंगल कार्य करणें,

२ तांबूल भक्षण,

३ नवीन वस्त्र वगैरे धारण करणें,

४ यात्रा वगैरेस निघणें,

५ कोणत्याही स्नेह्याचे वगैरे शुभकार्यांत सहभागी होणें.

१०

खरा सुहृद् तोच कीं, जो शेवटच्या क्षणाला उपयोगी पडला. अर्थात प्रत्येक स्नेही, शेजारी, परिचित असणारांचे अशावेळीं न बोलावतां उपस्थित होणें हें एक महत कर्तव्य होय. बोलावणें येण्याची अपेक्षा अशासमयी सहसा कोणी करूं नये.

११

मृत्यूनंतर निकटच्या आप्त सुहृदांनीं कुटुंबियांचे, विशेषतः धर्मग्रंथातील वा गीतेतील दृष्टांत देऊन सांत्वन करावें. अशा वेळीं मृतव्यक्तिच्या चांगल्या गुणांचें वर्णन करावें. त्यामुळें घरच्या मंडळीस एक प्रकारचें धैर्य येतें.

१२

शोकसमयीं सांत्वन समक्ष भेटूनच करावें व त्या वेळीं पोषाख साधाच असावा. जेणें करून शोकाकुल कुटुंबियास अवडंबर दिसेल असें असू नये. समक्ष जाणें नच जमल्यास निदान सांत्वनपर-पत्र तरी अवश्य लिहावें. हाहि एक शिष्टाचारच.

१३

संतमहंत, राजकारणी मुत्सद्दी, अगर कितीही मोठ्या अवतारी विभूती झाल्या तरी काळ हा कोणाची गय करीत नाहीं; म्हणून गत गोष्टीचा शोक आवरून याज्ञवल्क्य ऋषिनीं सांगितल्याप्रमाणें " अतो नरोदितव्यं हि, क्रीया कार्य स्वशक्तितः " म्हणजे शोक आवरून व्यवहाराला आरंभ करून कार्यप्रवण झालेंच पाहिजे.

जय-हिन्द

[ सर्व हक्क लेखकाधीन ]

# लोकसमजुती

कोणताहि व्यवहार शतकानुशतकें चालत आला म्हणजे त्यांस रूढी अगर लोकसमजुती म्हणतात. त्यांत कांहीं तरी सत्य अथवा तथ्य असतेंच. अशा कांहीं लोकसमजुती सर्व देशांत व सर्व समाजांत आढळून येतात. या रूढ समजुतींत अनुभव सांठवलेले असतात. या समजुती आरोग्य, पावित्र्य, धार्मिक, आणि कार्यकारणभाव जाणतां येत नाहीं अशा अदृष्टांची भीति, तसेंच देव, पिशाच्च, सजीव निर्जीव पदार्थ व प्राण्याविषयींहि अशा अनेक रूढ झालेल्या असतात. प्रचलित लोकसमजुतींविषयीं अवश्य तें ज्ञान नसलें म्हणजे व्यवहारशून्यता पदरीं येते. या लोकसमजुती अनंत आहेत. त्या सर्वच देणें इष्ट व शक्यहि नाहीं. कांही ठळक व प्रशस्त अशा सर्व सामान्य विशेषत: महाराष्ट्रांतील लोकसमजुती शक्य तेथें स्पष्टीकरणासह खाली दिल्या आहेत:—

१ लेखनाचे आरंभी "श्री" कार काढावा. ईशस्मरण करून लेखनारंभ करणें शुभसूचक आहे.

२ दोघांमधून विस्तव नेऊ नये (भांडणाची कल्पना)

३ दक्षिणेस पाय करून निजूं नये (दक्षिण ही यमाची दिशा आहे,)

४ उंचावर उभे राहून वस्त्र नेसूं नये (वाऱ्यानें इकडे तिकडे होतें)

५ पंक्तींत दोघा भावांचे अगर बापलेकांचे मध्यें जेवणास बसूं नये. (विकल्प येण्याचा संभव)

६ तळहातावर मीठ देऊं नये. ( दुर्भाग्याचें लक्षण समजतात)

७ मीठ पायाखाली पडूं देत नाहीत. तसेंच रात्रीं मीठ देत नाहींत.

८ निजलेल्यास ओलांडूं नये. (आयुष्य क्षीण होते ही कल्पना)

९ आईबापांनीं वडील मुलास नांवानें हाका मारूं नये. ( मुलाला बापाचे नांव ठेवतात म्हणून)

१० पतिपत्नीनीं परस्परांस नांवाने संबोधूं नये. (आदरार्थ)

११ मूळ नक्षत्रावर मुलाचा जन्म अशुभ समजतात.

१२ बाहेर कामास निघाल्यावेळी कोठे जाता म्हणून विचारू नये. (काम होत नाहीं अशी समजूत)

१३ आजाऱ्यास शिक आली तर बरें होण्याचें लक्षण. पण त्याचे समोर कोणी शिकला तर आजाऱ्याची प्रकृति बिघडते म्हणतात.

१४ केरसुणी पायांनी तुडवू नये. (धरित्री स्वच्छ करते म्हणून तिला लक्ष्मी मानली आहे.)

१५ वड आणि पिंपळ हे वृक्ष तोडूं नयेत.

१६ माप पालथें घालीत नाहींत. (दारिद्र्याचे लक्षण)

१७ जनावरें व इतर वस्तू यांची विक्री करतांना शेवटी शून्य येणें अशुभ म्हणून त्याची किंमत १ नें वाढवली तर देणारा व घेणारा दोघांचेही हित होतें असें मानतात म्हणून दानहि १ आकड्यानें वाढवून द्यावे अशी चाल आहे.

१८ कोजागिरी पौर्णिमेस सुईत दोरा घातल्यास दृष्टी तीक्ष्ण होतें अशी शिंपी लोकांत समजूत आहे.

१९ स्वस्तिक चिन्ह हें शांति आणि समृद्धि यांचे निदर्शक मानलें आहे.

२० कोंकणांत पूर्वेस इंद्रधनुष्य दिसेल तर पाऊस पडणार व पश्चिमेस दिसेल तर थांबणार अशी समजूत आहे.

२१ पुरुषाचा उजवा व स्त्रीचा डावा डोळा लवत असल्यास (नेत्र-स्फुरणें) शुभ व तद्विरूद्ध झाल्यास विपरीत मानतात.

२२ फळझाडास व वेलीस दृष्टीची बाधा होऊं नये म्हणून मांडवास कवड्या, मिरच्या, केरसूणी वगैरे बांधण्याची चाल आहे.

२३ मुलांची दृष्ट कांढणे झाल्यास तोंडाभोवती मीठमोहरी ओवाळून विस्तवांत टाकतात.

२४ जळता दिवा जमीनीवर पडला तर संकट येते अशी समजूत आहे.

२५ जोडे पालथे पडल्यास आकस्मिक पाहुणा येतो म्हणतात.

२६ जन्मल्याबरोबर मुलांस उन्हांत ठेवल्यास त्यास शीतोष्णाची बाधा होत नाहीं अशी भिल्ल लोकांत समजूत आहे.

२७ एखाद्याचीं मुलें जगत नसलीं तर तिरस्कार वाचक नांव ठेवलें तर मूल जगतें अशी समजूत आहे.

२८ झाडें आणि मुलें रात्रीचे वेळीच वाढतात. ही वाढ चंद्र किरणामुळें होते म्हणतात.

२९ दाराची कडी वाजवूं नये. (दारिद्र्याची कल्पना)

३० तोंडानें दिवा विझवूं नये. (ज्योतीवर थुंकी उडण्याचा संभव)

३१ भांड्यांचा नाद होऊं देऊं नये. (भांडणाची कल्पना)

३२ पाणी, दूध, तूप, मीठ व कात हे पदार्थ हातावर देत नाहींत.

३३ व्यालेल्या जनावराचा चीक (दहा दिवसाचे आंतले दूध) कोणी दिल्यास भांडे रिकामें परत न करतां धान्य घालून द्यावें.

३४ कपाळावर हात ठेवून वसूं नये (दुर्दैवी समजलें जातें.)

३५ नक्की वय, विचारणारानें विचारलें तरी सांगणारानें सांगूं नये. (आयुष्य क्षीण होतें म्हणतात.)

३६ एखाद्याची जिवंतपणी मृत्यू वार्ता पसरली तर त्याचें आयुष्य वाढतें अशी समजुत आहे.

३७ जनावर विकलें तरी दावें देत नाहींत.

३८ मनुष्य झोपी गेला असतां त्याचा आत्मा शरीर सोडून इकडे तिकडें भटकत असतो. झोपेंत तहान लागली असतां त्याचें शरीर सोडून पाणी प्यावयास जातो. म्हणून निजतांना पाण्यानें भरलेले भांडे जवळ ठेवावें. अशी समजूत आहे.

३९ रात्री हिंग व मीठ आणू नये व देऊं नये.

४० कोणत्याहि कार्यास तिघांनीं जाऊं नये (काम होत नाहीं अशी समजूत)

४१ तीर्थ क्षेत्रांतून त्या त्या देवतेच्या वारीं परतून निघं नये.

४२ तुळस ही विष्णुची पत्नी लक्ष्मी हिचें प्रतीक आहे असें मानण्यांत येतें म्हणून प्रत्येक घरापुढें तुळसीवृंदावन असावें अशी समजूत आहे.

४३ महाराष्ट्रांत धान्य मापतांना पहिल्या मापाला एक न म्हणता लाभ म्हणजे लाभदायक असें म्हणण्याची रूढी आहे.

४४ कर्नाटकांत धान्य मापतांना सात हा आकडा अशुभ मानतात म्हणून सहा झाल्यावर सात न म्हणतां सहा व एक असें म्हणण्याची रूढी आहे.

४५ वेळूच्या वेटाखालीं निजूं नये. वेळूचा कोंब शरीर विदीर्ण करून येतो अशी समजुत आहे.

४६ संध्याकाळीं केरसुणीनें केर काढूं नये व रात्री केर बाहेर टाकू नये (महत्वाची चीजवस्त गहाळ होण्याचा संभव)

४७ शुक्रवारीं संध्याकाळीं योजलेला कोणताही बेत सिद्धीस जात नाहीं असा समज व अनुभव आहे. (शुक्राचा संबंध वीर्याशी आहे. शुक्रवार हा कमकुवत प्रकृतीचा दिवस ठरविला आहे.)

४८ ओंजळीने दुसऱ्याचे ओंजळीत पाणी ओतूं नये. (आपलें पुण्य दुसऱ्यास अर्पण केल्यासारखे होतें अशी समजूत)

४९ अगस्ती, माधव, मुचकुंद, कपिल आणि आस्तिक या पांचाचे निद्रासमयीं ध्यान केल्यास सुखानें निद्रा येते. (यांनी फार परिश्रमानंतर दीर्घकाल सुखानें निद्रा घेतली.)

५० मीठ हें मनुष्याचें जीवन आहे. त्याला समरस म्हणतात. तरी मिठाचा संबंध पिशाच बाधेशी आहे म्हणून अशुभ मानलें आहे. देवाचे नैवेद्यास मीठ वाढीत नाहींत. व्यवहारांत मीठ हें मैत्रीचे लक्षण मानले जाते म्हणून पंक्तीत पानावर मीठ प्रथम वाढतात.

५१ तळहाताला खाज सुटली तर लाभ होतो अशी समजूत आहे.

# रसग्रहण

" मनुष्य कोणत्याहि व्यवसायांत असला तरी त्याला त्या व्यवसायांत मिळणाऱ्या अनुभवाचा लाभ देशास करून देण्याची बुद्धि असल्यास तो इतरांच्या ज्ञानांत कशी भर घालतो याचा प्रस्तुत पुस्तक हा एक मासला आहे. स्टेशनमास्तराच्या नजरेखालून सहस्रावधि माणसें जातात व त्याला प्रवासहि पुष्कळ घडतो. त्यांत त्याचे कान व डोळे उघडे ठेवावयास पाहिजेत. तसे ते रा. हणमंते यांनीं ठेविल्यामुळें त्यांना ' वाटेचा सोबती ' व प्रस्तुतचें ' व्यवहार आणि शिष्टाचार ' या धर्तीचीं पुस्तकें लिहितां आलीं. इंग्रजींत एटिकेट या विषयावर पुस्तकें आहेत; तसेंच आपल्या प्राचीन कवींनीं व ग्रंथकारांनींहि आपल्या लेखनांत व्यवहार व शिष्टाचार याविषयीं तत्कालीन समाजास बोध केला आहे. भर्तृहरीचें नीतिशतक ह्याचें एक निराळ्या धर्तीचे प्रत्यंतर समजण्यास हरकत नाहीं. दासबोध व गुरुचरित्र यांतहि या दृष्टीनें घेण्यासारखें पुष्कळ आहे. त्या सर्वांच्या उपदेशाचा परिणाम तत्कालीन लोकांवर झाला आहे. शिवाय जेथून शिष्टाचार लोकांत पसरावयाचे ती राजसत्ताहि आपलीच असल्यामुळें ते पक्के रुजले.

पण अलीकडे परकीय राज्यांत स्वदेशी शिष्टाचार व परदेशी शिष्टाचार यांची भेसळ होऊन आमच्या शिष्टाचारांना धेडगुजरीपणा आला आहे. त्यामुळें समाजांत शिष्टाचार असा उरलाच नाहीं असें म्हणावें लागतें. अशा दुःस्थितींत निदान पुस्तकरूपानें शिष्टाचारांची मीमांसा करून आपणांस योग्य वाटणारे शिष्टाचार नमूद करावयास पाहिजेत. रा. हणमंते यांचा प्रस्तुत ग्रंथ फार उपयुक्त असून त्यांत त्यांनीं भोजनव्यवहार, स्त्रियांशीं व्यवहार, पोषाख, दिनचर्या इत्यादि पंचवीस प्रश्नांची मार्मिक चर्चा केली असल्यानें ग्रंथ प्रत्येकानें संग्रही ठेवावा व तरुण पिढीला वाचावयास द्यावा असा झाला आहे."

**वा. कृ. भावे**, केसरी, २० जून १९४१

---

**साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे**
**नित्याच्या अवलोकनें जन परी होती पहा अंधळे !**

जीवनाला अनेक उपमा देण्यांत येतात. कोणाला तें सागरासारखें वाटतें, तर कोणी म्हणतात जीवन ही लढाई आहे; पाण्यावरील बुडबुड्याची

उपमा कोणी जीवनाला देतात, तर कोणाला जीवन हा एक यज्ञ वाटतो. एक ना दोन, हजारों उपमा ! त्याप्रमाणेंच जीवन म्हणजे व्यवहार आणि शिष्टाचार यांच्या देवघेवींचा बाजार असें नाहीं कां म्हणतां येणार ? ज्याला माणूस म्हणून जगांत जगायचें आहे, त्याला या बाजारांत पाऊल टाकावेंच लागतें. व्यवहार आणि शिष्टाचार हे जीवनाला जीवनाइतकेच आवश्यक आहेत.

समाज अनुकरणप्रिय असतो; आणि पुष्कळ वेळां समाजाकडून अंधानुकरण होत असतें. चांगल्या गोष्टींचें अनुकरण न करतां वाईट गोष्टींचेंच अनुकरण करण्याकडे आपली प्रवृत्ति असते. शिस्त, आम्हांला नको; शारीरिक कष्ट, आम्ही त्याज्य मानतों; वेळेचा सदुपयोग, आम्हांला मान्य नाहीं; मातृभूमिच्या पायांतील परदास्याच्या शृंखला तोडून तिच्या कंठीं स्वातंत्र्याची माला अर्पण करण्यासाठीं देशाभिमान तरी असावा ना ? पण तोहि आम्ही ओळखत नाहीं ! स्वातंत्र्यासाठीं धडपड हें मनुष्यमात्राचें कर्तव्य ना ? पण त्यासाठीं आम्ही काय करतो ? चोवीस तासांत स्वातंत्र्याचें स्मरण आम्हांला होईल तर ना! स्वत्वाची तरी चाड आम्हांला असावी ना ? पण स्वाभिमानाला-हि आपण पारखे झालों आहोंत ! पोषाखावरून हिंदु कां मुसलमान हें ओळखणें सुद्धां दुर्घट झालें आहे ! आमचा धर्माभिमान गेला, देशाभिमान गेला, भाषाभिमान गेला, कुलाभिमान गेला ! सारांश, कोणत्याच चांगल्या गोष्टीचा अभिमान आमच्यांत उरला नाहीं ! जणूं काय गुलामगिरीचें रक्त आमच्या नसानसांतून भरलेलें आहे. सामाजिक काय, धार्मिक काय, आणि राजकीय काय, आमच्या अवनतीची सीमा झाली असें आम्हांला अजूनहि वाटतच नाहीं ! अशा आम्हांला वेळोवेळीं धक्के देऊन जागृत करणें आवश्यक असतें. गृहशिक्षणापुरताच कां होईना, पण असा एक लहानसा धक्का देण्याचें काम रा. हणमंते यांच्या या पुस्तकानें केलें आहे, असें वाटतें. घरींदारीं दुर्मिळ होत चाललेल्या गृहशिक्षणाचे धडे या पुस्तकावरून मिळणार आहेत. लहानथोरांना, मुलाबाळांना, स्त्रीपुरुषांना, सर्वांनाच या पुस्तकापासून कांहीं ना कांहीं शिकण्यासारखें आहे.

**इंदुमती**

**रामदास रामदासी मासिक,** पौष शके १८६४

REFBK-0006986



# साहित्यसम्राट् कै. तात्यासाहेब केळकर यांचा अभिप्राय

" शिष्टाचार हें संस्कृतीचें बहिरंग होय. शिष्टाचारानें व्यवहार तर बिघडत नाहींच पण झाला तर सोपा व सुखकरहि होतो. व्यवहारांत शिष्टाचार पाळण्याचें कारण नाहीं असें कोणतेंहि ज्ञान किंवा शास्त्र सांगत नाहीं. निष्ठुर सत्यहि शिष्टाचार संभाळून आचरतां येतें. या दृष्टीनें पाहतां रा. हणमंते यांच्या या पुस्तकाचें स्वागतच झालें पाहिजे. लांबलचक निबंधांत न सांगतां स्फुट, त्रोटक व ठाशीव रीतीनें उपदेशिलेल्या या सूत्रवचनांचा लहानांनाच काय पण थोरांनाहि उपयोग आहे."

साहित्यसम्राट् तात्यासाहेब केळकर